म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. क्र.
REFBK-0008142
REFBK-0008142

# आमची माती...
# आमचें आकाश

म. ग्रं. सं. ठाणे.
प्रवास
नं. १८०

लेखक
अनंत काणेकर
चित्रें
दीनानाथ दलाल


REFBK-0008142
REFBK-0008142

किंमत साडे चार रुपये

# आमची माती आमचें आकाश

अनंत काणेकर

चित्रें : दीनानाथ दलाल



# आमची माती....
# आमचें आकाश

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
सं. क्र. ग्र. प्र. ९८०
स्थळ प्रत

लेखक :

अनंत काणेकर

चित्रें :

दीनानाथ दलाल

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ८९४२

किंमत साडे चार रुपये

मौज प्रकाशन : १ :

सर्व हक्क स्वाधीन

प्रथमावृत्ति : ११०० | जून, '५०

मुद्रक : वि. पु. भागवत,
मौज प्रिंटिंग ब्यूरो,
गिरगांव, मुंबई ४

प्रकाशक : वा. पु. भागवत,
मौज प्रकाशन लि.,
गिरगांव, मुंबई ४

आईस-

एक दोन महिने उत्तर हिंदुस्थानांत भटकण्याचा मांझा आणि चित्रकार दलालांचा विचार आहे, असं प्रवासाला निघण्यापूर्वीं म्हणालों तेव्हां कुणीसा म्हणाला, 'आपल्याच देशांत भटकण्यांत काय आहे मोठंसं ?—तीच माती आणि तेंच आकाश !'

'तें खरं आहे,' मी म्हटलं, 'पण पाहूं तर खरी आमची माती आणि आमचं आकाश !'

या संवादांतून दुसरं कांहीं निष्पन्न झालं नाहीं, तरी या पुस्तकाला नांव काय द्यावं हें सुचलं हें काय कमी आहे ?

ही लेखमाला वाचणारे माझे कांहीं इतिहासप्रेमी मित्र म्हणाले, मोठमोठीं ऐतिहासिक स्थळं तुम्हीं पाहिलींत, पण या लेखांत ऐतिहासिक माहिती कांहीं दिलेली नाहीं. एक फुलझाडांचे शोकी म्हणाले, अमक्या गावांत मिळणाऱ्या त्या सुंदर फुलाचं नांवही तुमच्या वर्णनांत नाहीं. डोंगराळ प्रदेशांत तुम्हीं फिरलां, पण तिथल्या आदिवासींच्या जीवनाचे विशेष तुम्ही मुळींच दिलेले नाहींत,—समाजशास्त्राचे एक व्यासंगी विद्वान् म्हणाले. या सर्वांचं म्हणणं अगदीं खरं आहे. एक-एका ऐतिहासिक स्थळीं वर्ष दीड वर्ष राहून प्रत्येक स्थळावर एक एक ग्रंथ चांगला इतिहासकार लिहूं शकेल; एखाद्या लहानशा खेड्यांतल्या फुलांफळांवर हुषार वनस्पतिशास्त्रज्ञ माहितीपूर्ण पुस्तक लिहील; आणि विशिष्ट खोऱ्यांतल्या

आदिवासींच्या विविध जीवनांतल्या एकाच वैशिष्ट्यावर सूक्ष्म दृष्टीचा समाजशास्त्रज्ञ चार ग्रंथराज निर्माण करील. हे ग्रंथ अत्यंत वाचनीय होतील, आणि जिज्ञासूंना ते वाचतांना अत्यंत आनंदहि होईल. पण वेगवेगळी माती आणि वेगवेगळं आकाश पहाण्याचा आनंद लुटण्याकरतां आम्ही भटकलों; आणि दीड दिवसाच्या मुक्कामांत इतिहासाचा व्यासंग करण्याचं किंवा साडेतीन दिवसांत आदिवासींच्या जीवनाचा सखोल अभ्यास करण्याचं धाडस आम्ही केलं नाहीं. टांगेवाल्यांनीं सांगितलेले समाजशास्त्राचे सिद्धान्त आणि हमालांनीं दिलेलं इतिहासाचं ज्ञान आम्हांला फारच मनोरंजक वाटलं. त्या आनंदाचा पुसटता अनुभव जरी वाचणाराला मिळाला तरी खूपच झालं असं मी समजेन.

अनंत काणेकर



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. ८१४२
३१ मार्च, १९४९

## तमे मि शुक्ल है क्या जी ?

काल रात्रीं मुंबईहून निघालों. सकाळीं सात साडेसातच्या सुमाराला अहमदाबाद स्टेशनांत उतरलों. अहमदाबादेंत एक दिवस रहायचें, पहातां येईल तितकें दिवसभर पाहून घ्यायचें आणि रात्रीच्या गाडीनें पुढें अबूला जायचें असें आमचें ठरलें होतें. आमच्या कॉलेजांतील गुजरातीचे प्राध्यापक आणि गुजरातींतील एक चांगले कवि आणि लेखक माझे मित्र प्रेमशंकर भट यांनीं अगोदरच पत्र लिहून आमची अहमदाबादेंत उतरण्याची सोय केली होती. अहमदाबादमधील दैनिक 'वर्तमान' आणि साप्ताहिक 'भारती' या पत्रांचे मॅनेजिंग एडिटर श्री. शुक्ल हे भट यांचे लहानपणापासूनचे मित्र आहेत. प्रत्येक गोष्ट व्यवस्थित आणि चोख करायची या आपल्या स्वभावा-प्रमाणें भट यांनीं आम्ही येणार ती गाडी, दिवस, वेळ शुक्लांना बरोबर कळवून ठेवली होती, इतकेंच नव्हे तर शुक्लांनीं आम्हांला आणि आम्ही शुक्लांना पूर्वी कधींच पाह्यलेलें नसल्यामुळें त्यांनीं किंवा त्यांनीं पाठविलेल्या माणसानें आम्हांला कसें ओळखायचें याचीहि संपूर्ण योजना आम्हाला आणि त्यांना सांगितलेली होती. स्टेशनांतल्या व्हीलर स्टॉलपाशीं जाऊन आम्ही उभें राह्यचें; आणि शुक्लांनीं किंवा त्यांच्या माणसानें तिथें येऊन चवकशी करायची, असे या 'कटा'चे धागेदोरे होते. कट बिनबोभाट पार पडला. आम्ही सामान हमालाच्या डोक्यावर देऊन व्हीलर स्टॉलपाशीं जातों तोंच दुसऱ्या बाजूनें एक पोरगेलासा पायजमा घातलेला गृहस्थ इकडे तिकडे पहात स्टॉलपाशीं येऊन घोटाळतांना मला दिसला. 'आपण मि. शुक्ल का ?' हा प्रश्न 'तमे मि. शुक्ल है क्या जी ?' अशा मराठी-गुजराती-मिश्रित माझ्या स्वतःच्या हिंदी भाषेंत विचारला. त्याला अर्थ बरोबर समजला, आणि माझ्यापेक्षां कितीतरी अधिक शुद्ध हिंदींत त्यानें, 'नाहीं, मी शुक्ल नाहीं—पण शुक्लांच्या ऑफिसांतला मी माणूस आहे. माझं नांव हर्षद.

तुम्ही काणेकर व दलाल का ? ' असें मला उलट विचारलें. होय, म्हणून मी सुटकेचा श्वास टाकला. त्यानें हमालांना सामान बाहेर न्यायला सांगितलें, आणि आम्ही त्याच्याबरोबर निघालों.

## पोळांतली घाण आणि वैभव

महाराष्ट्रीयांचें पुणें, तसें मला वाटतें, गुजरात्यांचें अहमदाबाद. पुण्याचे बोळ, तर अहमदाबादेचे पोळ ! बाकी पोळ म्हणजे बोळ किंवा गल्लीच नव्हे. अहमदाबादेंत व राजपुतान्यांतल्या शहरांत सूरजपोळ, गणेशपोळ अशीं शहरांच्या जुन्या, ऐतिहासिक दरवाजांचींहि नांवें आहेत. हा पोळ म्हणजे दरवाजा. अहमदाबादेंतल्या पोळांतून आमचा टांगा जात असतांना पुण्याच्या बोळांतून जातांना वाटतें तसेंच कांहीं तरी वाटत होतें. अहमदाबादेंतहि पुण्या-मुंबईसारखे मोठे रस्ते आणि आधुनिक पद्धतीचीं घरें आहेत. पण या पोळांत जे जुने वाडे दिसतात, त्यांच्यांत कांहीं तरी गुजराती वैशिष्ट्य दिसतें. पुण्यांतल्या जुन्या वाड्यांना असतात तशाच चिंचोळ्या, कमानदार पण अधिक सुंदर कोरीव काम केलेल्या लाकडी खिडक्या, सज्जे आणि दर्शनी भागाचे मोठे सुबक खांब या वाड्यांना दिसले. बोळांप्रमाणेंच पोळांतहि काळोख आणि घाण आहे, तसेंच हें वैभवहि आहे.

शुक्लांच्या घरीं पोहोंचलों तेव्हां सकाळीं आठचा सुमार झाला होता. तो बोळ इतका अरुंद होता कीं आम्हांला सोडल्यानंतर त्यांतून टांगा वळवून बाहेर काढणें अशक्य वाटल्यामुळें टांगेवाल्यानें घोडा मागें ढकलीतच टांगा घरासमोर नेऊन उभा केला ! हर्दनें आम्हांला माडीवरल्या दिवाणखान्यांत नेऊन बसविलें. थोड्या वेळानें स्नान आटोपून श्री. शुक्ल वर आले. तरतरीत चेहऱ्याचा जेमतेम तीस बत्तीस वर्षें वयाचा हाच तरुण गृहस्थ, एक दैनिक आणि एक साप्ताहिक मोठ्या यशस्वी रीतीनें चालविणारे व्यवस्थापक संपादक श्री. शुक्ल असतील असें मला वाटलें नाहीं. पण टेलिफोनवरून ते भराभर देत असलेले हुकूम, त्यांची धांवपळ आणि हें सर्व चालू असतां आमच्याशीं त्यांचें चाललेलें रेखीव पण सौजन्यपूर्ण संभाषण पाहून ते एक कर्तृत्ववान् संपादक असावेत याबद्दल कुणाचीहि खात्री पटली असती.

" तुमचं आमचं स्वस्थतेंत बोलणं आतां रात्रीं जेवणानंतर होणार. " ते म्हणाले, " मला कांहीं तुमच्याबरोबर फिरतां येणार नाहीं; पण हा हर्षद सबंध दिवस तुमच्याबरोबर राहील."

" तुमच्या अमदाबादेंत पहाण्यासारखं काय काय आहे ? " आम्ही सहज म्हटलें.

" अहमदाबादेंत आणि पहाण्यासारखं—छे:, मला नाहीं वाटत इथें कांहीं असेल असं, " ते हंसत म्हणाले, " मी पांच सात वर्षं इथें आहें, पण इथलं कांहींच पाहिलेलं नाहीं."

" जुम्मा मशीद, रोझा शहा आलम—" प्रवासाला निघण्यापूर्वी कशांत तरी वाचलेलीं नांवें मी घेऊं लागलों.

" ऐकलीं आहेत हीं नांवं, " शुक्ल म्हणाले, " पण कोण मुद्दाम पहातो ?—इथल्या लोकांना त्याचं काहींच वाटत नाहीं. "

शुक्लांचें म्हणणें अगदीं बरोबर होतें. मुंबईंत सारा जन्म काढून मुंबईतल्या कित्येक गोष्टी बाहेरून आलेले लोक आम्हाला अजून दाखवितात !

जेवण वगैरे आटोपून आम्ही अकरा वाजतां बाहेर पडायचें आणि रात्रीं जेवायला परत यायचें असें ठरवून शुक्ल ऑफिसांत गेले.

## भकास साबरमती आश्रम

साडे अकरा वाजतां आम्ही बाहेर पडलों. पहिल्यांदा गांधीजींचा साबरमती आश्रम पाहायचा असा आमचा बेत ठरला होता. आधीं स्टेशनवर जाऊन अबूरोडची रात्रीच्या गाडीची जागा रिझर्व्ह केली, आणि मग वाडजची बस घेतली. वाडज येथें दुसरी बस पकडून साबरमती आश्रमाकडे जायचें. साबरमती रेल्वे स्टेशनहि आहे, पण बसनेंच जाणें सोयिस्कर आहे. साबरमती ही पाण्यापेक्षां वाळूचीच नदी आहे असें दिसतें. वाडजला बराच वेळ थांबलों तरी साबरमतीकडे जाणारी बस येण्याचीं चिन्हें दिसेनात. समोर दूर आश्रम दिसत होता. तेव्हां पायींच पुढें निघालों. साबरमती आश्रमाच्या आजूबाजूचा प्रदेश भयंकर रुक्ष वाटला. जिकडे तिकडे वाळू आणि धूळ, धूळ आणि वाळू. त्यांत आणखी दुपारचा एक दीड

वाजल्यामुळें वरून ऊन आणि खालून वाळू भाजून काढीत होती. झाड नाहीं, झुडूप नाहीं, कीं त्या रखरखणाऱ्या उन्हाला कुठें इवल्याशा सावलीचीहि तीट लागलेली नाहीं. आश्रमाच्या रस्त्याकडे जाण्यापूर्वी एक लहानसा पूल ओलांडावा लागतो. पुलाच्या पलीकडे थोडेंसें गेलों तों पुष्कळशीं पांखरें चिवचिव करीत असल्याचा आवाज कानावर आला. बाजूला वळून पाहिलें तों एक पर्णहीन पण मला मोठा वृक्ष दिसला. त्याच्या ढोलींतून पांखरांचा तो आवाज येत होता. मला वाटतें त्या टापूंतलीं सारीं पांखरें त्या वृक्षाच्या ढोलींत जमलीं होतीं. सहाऱ्यांतल्या ओयासिससारखाच तो वृक्ष त्यांना वाटला असावा. उन्हानें तंग झालेल्या त्या वातावरणांत मलाहि तो चिवचिवाट ऐकून क्षणभर बरें वाटलें. एखाद्या शाळेच्या जुनाट वसतिगृहासारखी दिसणारी आश्रमाची इमारत मलां अगदींच भकास वाटली. आंतलेंहि वातावरण मला असेंच भकास आणि निर्जीव वाटलें. १९१८ पासून १९३० पर्यंत गांधीजी या आश्रमांत होते. साऱ्या देशाला हालवून सोडणाऱ्या, असहकारिता आणि कायदेभंगाच्या दोन महान् आंदोलनांचीं सूत्रें त्यांनीं इथूनच हालविलीं. ते इथें असतांना इथलें वातावरण कसें होतें कुणाला ठाऊक, पण आतां मात्र प्राण निघून गेलेल्या कुडीसारखा हा आश्रम दिसतो. सर्व जगाला वंदनीय झालेला महात्मा जिथें एक तप वास्तव्य करीत होता आणि सर्व जगाला चकित करून टाकणाऱ्या आपल्या असामान्य तत्त्वज्ञानाचें निरूपण जिथें बसून त्यानें केलें, तिथलें एकंदर वातावरण प्रसन्न आणि दृश्य रमणीय ठेवण्याची तरी काळजी गांधीजींच्या मोठमोठ्या अनुयायांनीं घ्यायला नको काय?

## 'सनातनी' साबू!

भिंतीवर धूळ सांचली आहे, कोनाकोपऱ्यांत कोळिष्टकें लोंबताहेत अशा एखाद्या घरांत शिरतांना वाटतें तसें या इमारतींत शिरल्यावर मला वाटलें. कुठें कुठें कांहीं कांहीं काम चाललें होतें. पण कालप्रवाह इथें थांबून त्याचें डबकें झाल्यासारखा भास मला झाला. एका कोंपऱ्यांतल्या एका दहा पंधरा चौरस फूट लहानशा खोलींत एक म्हातारी गुजराती मोलकरीण आठ दहा फूट उंचीचें एक मोठें थोरलें लाकडी चाक मोठ्या प्रयासानें खांदे ताणून कसें.

असें हळुहळू फिरवीत होती. हातबनावटीचा स्वदेशी साबू इथें तयार होत होता. त्या चाकावरच्या पट्टयामुळें एक दोन लहान यंत्रें चाललीं होतीं. त्यांतल्या एका डब्यासारख्या दिसणाऱ्या लहानशा यंत्रांत मळकट पिवळा साबूचा रांधा दिसत होता. यंत्राच्या हालचालीबरोबर तो पुढें सरकून त्याचे लांबट चौकोनी तुकडे व्हावे म्हणून एक तरुण गुजराती मोलकरीण एक लहानसा लाकडाचा ढलपा हातांत घेऊन तो रांधा यंत्राच्या भोंकांत डिवचीत



होती ! आणि पलीकडे एक सुरकुतलेल्या चेहऱ्याचा म्हातारा ते चौकोनी तुकडे ठशांतून दाबून काढीत होता. दाबलेल्या साबूच्या वडीवरचें नांव मी पाहिलें. मला नीटसें आठवत नाहीं, पण मला वाटतें ‘सनातनी साबू’ असें कांहींतरी होतें ! दुसऱ्या एका खोलींत घडीचे किंवा ‘पोर्टेबल’ चरखे असेच तयार होत होते. साबूचें नांव ‘सनातनी’ समर्पक आहे यांत शंका नाहीं. इथें भूत, वर्तमान, भविष्य हे काळाचे भेद नष्ट होऊन तो ‘सनातन’ झाल्याचाच प्रत्यय येतो. त्या चरख्यावर कापसाचें सूत होणार, त्या सुताचें धोतर होणार, तें वापरल्यावर मळणार, हें सर्व होईपर्यंत तें धुण्याकरतां ‘सनातन’ साबूची एक वडी खात्रीनें तयार होईल !

**‘ हृदयकुंज ’**

ही इमारत पाहून झाल्यानंतर तिच्यासमोरच रस्त्याच्या दुसऱ्या बाजूला असलेल्या लहान लहान इमारती पाहिल्या. एका लहानशा बंगलींत आश्रमाचे

चालक श्री परीक्षितभाई मुझुमदार यांची कचेरी आहे. त्यांच्या परवानगीनें ही बाजू पहावयाला गेलों. साबूप्रमाणेंच हातबनावटीचा कागद एके ठिकाणीं चालला होता. पण या बाजूची महत्त्वाची जागा म्हणजे १९१८ पासून १९३० पर्यंत महात्माजी रहात असत ती इमारत 'हृदयकुंज' ही होय. दोनतीन खोल्यांच्या या बैठ्या इमारतीच्या ओट्यावरील भिंतींत एक संगमरवरी दगडाची पाटी बसविली आहे; आणि तिच्यावर महात्मा गांधी इथें अमक्या साला पासून अमक्या सालापर्यंत रहात होते, आणि इथेंच त्यांचे महान् विचार त्यांना स्फुरले वगैरे माहिती कोरली आहे. पलीकडे साबरमतीचें वाळवंट दिसतें. ओट्यापासून थोड्या अंतरावर एक चौकोनी मोकळी जागा आहे. तिथें 'उपासनामंदिर' अशी पाटी आहे. इथेंच महात्माजींच्या रोजच्या प्रार्थना चालत असत. या जागा पहात असतांना अंतःकरणांत अनेक भावनांचें काहूर माजतें. थोड्याशा विषण्ण अंतःकरणानेंच आम्ही बाहेर आलों; आणि आश्रमाच्या दारांतच रस्त्यावर असलेल्या मोठ्या थोरल्या चिंचेच्या झाडाखालीं आश्रमांतल्या एका मुलानें दिलेलें थंडगार पाणी पीत बसची वाट पहात पारावर बसलों. आजूबाजूच्या रखरखाटांत हें चिंचेचें झाड फारच आल्हाददायक वाटतें.

बसच्या रस्त्यावर एका बाजूला एकाद्या किल्ल्याच्या तटबंदीसारख्या राखी रंगाच्या उंच भिंती सभोवतीं असलेली एक इमारत दिसली. राष्ट्रीय शिक्षणाच्या चळवळीच्या ऐन भरांत अस्तित्वांत आलेलें प्रख्यात गुजरात विद्यापीठ तें हेंच, असें कुणी तरी म्हणालें तेव्हां बसमधून उतरून आम्ही आंत गेलों. एके काळीं आचार्य गिडवानी, आचार्य काका कालेलकर, आचार्य कृपलानी वगैरेंनीं गाजविलेल्या या संस्थेंत फारसा जिवंतपणा दिसला नाहीं.

## जुम्मा मशिदींतले पंखे


तिथून गांवांत गेलों. उन्हानें घसा कोरडा पडला होता. कुठें ताक प्यावयाला मिळेल का, म्हणून आमच्या वाटाड्याला—हर्षदला-विचारलें. त्यानें एक मोठें चहाचें दुकान दाखवून, या मद्रासी दुकानांत ताक मिळेल म्हणून सांगितलें. आंत जातों तों दुकान इराण्याचें निघालें! मात्र आनंदाची गोष्ट म्हणजे तिथें ताक मिळालें. प्रत्येक गावांत दुकानाचें स्वरूप कसें बदलतें तें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. इराण्याचें दुकान कुठलें, मद्राशाचें कुठलें आणि

ब्राह्मणाचें उपाहारगृह कुठलें हें मुंबईत पाटी पाहिल्याशिवाय आम्ही सांगूं शकतों. प्रत्येकाच्या दर्शनी भागाचें कांहीं एक वैशिष्ट्य असतें. अहमदाबाद-मधल्या इराण्यांचें दुकान आम्हाला ओळखतां आलें नाहीं.

दुपारचे तीनचार वाजले होते. ऊनहि कमी होत होतें. पायींच फिरून जुम्मा मशीद, रोझा शहा आलम, तीन दरवाजा वगैरे ऐतिहासिक जागा पहाव्या असें आम्हीं ठरविलें. अहमदाबादेंतील जुम्मा मशीद चारपांचशें वर्षांची जुनी आहे म्हणतात. मशिदीसमोर लाल दगडांची फरशी असलेलें मोठें थोरलें प्रशस्त पटांगण आहे. मशिदीचे कोरीव काम केलेले दगडी खांब आणि पानें, फुलें, झाडें वगैरेच्या सुंदर आकृत्या दाखविणाऱ्या, दगडी भिंतींत कोरलेल्या जाळीदार खिडक्या फारच प्रेक्षणीय आहेत. रमजान किंवा बकरी-ईदच्या दिवशीं हजारों भाविक मुसलमान इथें नमाज पडावयाला येत असा-वेत. त्यांना उन्हाळ्याचा त्रास होऊं नये म्हणूनच कीं काय, या सुंदर दगडी खांबावर लाकडी पट्टया मारून विजेचे ‘ रिव्हॉल्व्हिंग टेबल फॅन्स ’ रांगेनें बसविले आहेत ! पांचशें वर्षांच्या या सुंदर शिल्पकृतींवर भाविकांच्या आरामा-करतां पितळी पंखे ठोकणाऱ्या धर्मवीरांच्या हळव्या ( आणि उलट्या ) काळजाचें कोण कौतुक करणार नाहीं ? दगडांत सुंदर जाळीदार खिडक्या कोरण्याचें काम सोमनाथ येथील हिंदु शिल्पकारांनीं केलें आहे, असें म्हणतात. पंधराव्या शतकांत अहमदाबाद हें शहर वसविणाऱ्या अहमदशहा सुल्तानाच्या पदरीं हे शिल्पकार होते. दिल्लीच्या मोंगलांचें आणि या सुल्तानांचें ठीक नव्हतें. त्याला ते ‘ अहमदशहा गुजराती ’ म्हणत असें कळलें !

## ‘ लारी ’

अहमदाबादच्या धुळकट रस्त्यावर बाहेरच्या माणसाला दोन नवीन दृश्यें दिसतात. एक, उंट ओढीत असलेले खटारे. पण याहूनहि मजेदार दुसरें दृश्य म्हणजे नवरा आणि बायको ओढीत असलेल्या गाड्या. डनलॉपचे टायर लाव-लेल्या दोन चाकांच्या या गाड्या असतात, आणि सिमेंटचीं पोतीं, धान्याच्या गोणी किंवा असलेंच कांहीं जड सामान, गाडीच्या पुढल्या आडव्या दांडीच्या एका टोकाला नवरा आणि दुसऱ्या टोकाला बायको दोन्ही हात लावून जोडीनें



ओढीत असतात! जोडप्यानें हमाली करायचा हा नवा प्रकार आम्हाला फारच मजेदार वाटला. संसाराचा गाडा नवराबायकोनें जोडीनें ओढावा वगैरे वगैरे कल्पना सद्गदित कंठानें सांगणाऱ्या कवींचें काव्य अहमदाबादच्या हमालांनीं अगदीं रस्त्यावर आणून सोडलें आहे ! हे गाडे ओढणाऱ्या बहुतेक स्त्रिया भरदार शरीराच्या आणि नीटस चेहेऱ्याच्या होत्या. कवींना आणि चित्रकारांना त्यांच्याबद्दल सहानुभूति वाटली असती, पण त्यांच्या नवऱ्यांना तसें कांहीं वाटत नव्हतें हें उघड आहे. कारण संध्याकाळच्या वेळेला कांहीं रिकाम्या चाललेल्या गाड्यांत नवरा एकटाच किंवा मुलाला घेऊन विडी फुंकीत बसला आहे आणि बायको एकटीच गाडा ओढते आहे असें दृश्य आम्हाला पुष्कळ ठिकाणीं दिसलें ! या गाड्यांना तुम्ही काय म्हणतां असें तिथल्या माणसांना विचारतां, यांना आम्ही 'लारी' म्हणतों असें उत्तर मिळालें ! नवऱ्याचे कपडे मळकट असले तरी बायकोचा लेहेंगा आणि साडी रंगी बेरंगी असते, आणि चाकांना लावलेल्या पत्र्यांच्या तुकड्याच्या माळा खुळखुळ करीत हें जोडपें तो गाडा ओढतें तेव्हां तें दृश्य

चित्र काढण्यासारखें वाटतें. दलालांनीं या दृश्याचें चित्र आपल्या नोटबुकांत ताबडतोब रेखाटलेंच.

अहमदाबादमधलें पहाण्यासारखें बहुतेक पाहून झालें होतें. प्रख्यात गुजराती कवि माझे मित्र उमाशंकर जोशी यांना भेटायचें, आणि मग घरीं जायचें असें आम्ही ठरविलें होतें. उमाशंकरांच्या सहवासांत शीतल छायेंत एखाद्या झुळुझुळु वहाणाऱ्या ओढ्याच्या काठीं बसल्याचा आनंद मला नेहेमीं होतो. अहमदाबादेंत आल्यानंतर त्यांना भेटणें हा एक महत्त्वाचा कार्यक्रम होता. गुजरातींत उन्हाला, मला वाटतं, तडका म्हणतात. अहमदाबादेच्या उन्हाचा अनुभव घेतल्यानंतर इतका समर्पक शब्द शोधून काढल्याबद्दल गुजरात्यांचें अभिनंदन करावें तितकें थोडेंच वाटतें. तडकून टाकणाऱ्या या 'तडक्यांत' सबंध दिवस फिरल्यानंतर संध्याकाळच्या प्रशांत वेळीं उमाशंकरांच्या प्रशांत व्यक्तित्वाची ओढ वाटणें साहाजिक होतें.

## शहरांत कसें शिरावें !

अहमदाबादच्या पंचवटी नांवाच्या भागांत उमाशंकर राहातात असें कळलें होतें, पण निश्चित पत्ता माहीत नव्हता. पंचवटीची बस घेऊन पंचवटींत येऊन तर पोहोंचलों. शहराचा हा अगदीं नवीन भाग दिसला. सुंदर प्रशस्त रस्ते, लहान मोठे टुमदार बंगले, त्यांच्याभोंवतीं व्यवस्थित बागबगीचे हें सर्व दृश्य संध्याकाळच्या पिवळ्या उन्हांत पाहून आपण एखाद्या नवीनच शहरांत आलों आहोंत असें वाटलें. एक चमत्कारिक विचार माझ्या डोक्यांत चमकून गेला. एखाद्या शहरांत आपण कुठून शिरतों त्यावर त्या शहरासंबंधींचें आपलें मत बरेंचसें अवलंबून असतें. पहिल्यांदा जीं दृश्यें दिसतात त्यामुळें प्रवाश्याचा त्या शहरासंबंधीं जो एक ग्रह होतो तो कायमच रहातो. बर्लिनमध्यें शिरल्यानंतर आजूबाजूची वनश्री, रस्ते, घरें यांचा असा कांहीं परिणाम माझ्या मनावर झाला कीं, तें फारच सुंदर शहर आहे असें मला वाटलें. पॅरिसचा याच्या उलट परिणाम झाला. बर्लिनपेक्षांहि सुंदर असलेले पॅरिसचे भाग मी नंतर पाहिले. पण अजूनहि बोलतांना पॅरिसपेक्षांहि बर्लिन फार सुंदर शहर आहे असें मी म्हणतों. तसें कारण कांहींच सांगतां येणार नाहीं. कदाचित् पॅरीसच अधिक

सुंदर असेल. पण तुम्ही शहरांत कुठून शिरतां, कुठल्या वेळीं शिरतां, पहिल्यांदा तिथें कोण भेटतात, यावर बरेंचसें अवलंबून आहे. अहमदाबाद शहराचें स्टेशन या पंचवटीच्या बाजूला असतें आणि पोळांतून किंवा बोळातून शहरांत येण्याऐवजीं मी इथून पहिल्यांदा आलों असतों तर अहमदाबादबद्दल माझें कांहीं वेगळेंच मत झालें असतें.



एक खेडुत

पंचवटींतल्या या रस्त्यावरून त्या रस्त्यावर फिरलों, पुष्कळांना विचारलें, पण उमाशंकरांचा पत्ता मिळेना. समोरून कांहीं शाळेंतलीं मुलें ओरडत, उड्या मारीत येत होतीं. त्यांच्यापैकीं एकाला विचारलें. त्यानें बरोबर पत्ता सांगितला. अमक्या अमक्या बंगल्याच्या मागल्या बाजूला एक 'आऊट हाऊस' आहे, तिथें पहिल्या मजल्यावर उमाशंकर जोशी रहातात. जिना चढून आम्ही वर गेलों. दरवाजा उघडाच होता. आंत डोकावून पाहिलें. पांढरें स्वच्छ खादीचें धोतर आणि खादीची कोपरी अशा वेषांत एका चटईवर बसून आपल्या छोट्या चरख्यावर पांढऱ्या स्वच्छ कापसाचें सूत काढण्यांत उमाशंकर गर्क होते. एकदम कांहीं कल्पना नसतांना मला आणि दलालांना दत्त म्हणून समोर उभे राहिलेले पाहून ते चकितच झाले. चरखा बाजूला ठेवून आपल्या नेहेमींच्या गोड आणि अकृत्रिम पद्धतीनें आम्हाला बसवून घेऊन, आधीं थंडगार पाणी प्यावयाला आणून देऊन, 'तुम्ही चहा घेणारच' म्हणून घरांत चहा करावयाला त्यांनीं सांगितलें.

## मोठ्या माणसांना काव्य कोठून माहीत असणार !

'फार छान आहे बुवा, तुमची ही पंचवटी !' मी म्हणालों.

‘ मग, इथें चांगले श्रीमंतच लोक–मिल ओनर्स-रहातात कीं. मला इथें ही या बंगल्यामागली ल्हानशी, शांत जागा मिळाली हें माझें नशीबच ! अर्थात् माझीहि ही ल्हानशी मिल आहेच ! ’ आपल्या चरख्याकडे बोट दाखवीत ते हंसत म्हणाले.

‘ तुमची ही जागा शोधून काढायला मात्र आम्हाला फार त्रास झाला. कुणालाच नीट सांगतां येईना, ’ मी म्हणालों.

‘ त्यांत काय आहे ?–रस्त्यावरल्या एखाद्या शाळेंतल्या मुलाला विचारायचं.’

‘ शाळेंतल्या मुलांनींच अगदीं बरोबर तुमचं घर दाखवलं ! ’

‘ तेंच तर मी म्हणतों. इथें अहमदाबादेंत मोठ्या माणसांना कवि नी काव्य कुठून माहीत असणार ! ’

दक्षिण हिंदुस्थानांत फिरून उमाशंकर नुकतेच परत आले होते. त्या प्रवासांतल्या पुष्कळ मौजा त्यांनीं आम्हाला सांगितल्या. तास दीड तास मनसोक्त गप्पा करून उल्हसित मनानें आम्ही घरीं परत आलों.

रात्रीं जेवण झाल्यानंतर शुक्लांचे एक सहकारी आणि एक उत्तम गुजराती लेखक श्री. अशोक हर्ष मुद्दाम आम्हाला भेटायला आले होते, त्यांच्याशीं आणि श्री. शुक्लांशीं बराच वेळ गप्पा केल्या. रेडिओवर होणारीं आमचीं भाषणें आम्हाला न विचारतां वाटेल त्या पत्रांत रेडिओचे अधिकारी छापतात त्यासंबंधीं एक लेख मी ‘ नवयुगां ’त लिहिला होता. मराठी लेखकांनीं किंवा पत्रांनीं या विषयाची कुठें दखल घेतलेली मला दिसली नाहीं. पण आश्चर्याची गोष्ट म्हणजे गुजराती लेखकांत त्यानें बरीच खळबळ उडवलेली दिसली. श्री. अशोक हर्ष यांनीं माझा लेख वाचला होता, आणि गुजराती पत्रांत त्यासंबंधीं मजकूर आल्याचेंहि त्यांनीं मला सांगितलें. उमाशंकर जोशांनींहि त्यांच्याशीं बोलतांना त्या लेखाचा मुद्दाम उल्लेख करून; आपण लेखकांनीं यासंबंधीं कांहींतरी केलें पाहिजे म्हणून सांगितलें होतें. अबूची गाडी रात्रीं ११ ला सुटणार होती. श्री. आणि सौ. शुक्लांचा कृतज्ञतापूर्वक निरोप घेऊन १० वाजतां आम्ही स्टेशनकडे जावयाला निघालों.

१२ मार्च १९४०

## ' व्हिक्टरी हॉटेल ' म्हणजे ' गुजरात हिंदु लॉज ! '

सकाळीं ७-३० ला अबूरोड स्टेशनांत गाडी आली. अबू रोड ते माऊंट अबूपर्यंत दीड तासाचा रस्ता आहे. बस कंपनीचें ऑफिस स्टेशनांतच आहे. साडे आठला सुटणारी पहिली बस स्टेशनांत उभी होती, आणि तिच्यांत बरींच माणसेंहि बसलेलीं होतीं. या बसचीं तिकिटें नाहींत, पुरेशीं माणसें जमल्यावर दुसरी बस सुटेल वगैरे नेहमींच्या गोष्टी बस कंपनीच्या माणसानें सांगितल्या. गाडींतून उतरल्याबरोबर बसमध्यें जागा मिळविण्याच्या खटपटींत आम्ही होतों. चहासुद्धां घेतलेला नव्हता. दुसऱ्या बससाठीं किती तास रखडावें लागेल कुणाला ठाऊक, या विचारानें आम्ही कावल्यासारखे झालों. पण थोड्या वेळानें 'तुम्ही याच बसनें जाऊं शकतां' असें सांगून त्यानें दोन तिकिटें आम्हाला दिलीं ! मोकळ्या मनानें स्टेशनांत चहा घेतला. साडेआठला बस सुटली.

काळ्याकभिन्न खडकांच्या डोंगरांना वळसे घेत बस वर वर जात होती. पंचगणी, महाबळेश्वर किंवा खंडाळा-लोणावळ्याला जातांनासुद्धां कांहींना कांहीं रम्य वनश्री आजूबाजूला दिसते. पण या अबूच्या रस्त्यावर उघडेबोडके काळे खडक, जळकट खजुरीचीं झाडें आणि धुळकट झुडपें यांखेरीज कांहींच दिसलें नाहीं. आपण हवेच्या ठिकाणीं जातों आहोंत, असा संशयसुद्धां येईना. लाल माती, हिरवीगार झाडें, कांहींच कुठें दिसेना.

१० वाजतां अबूला पोहोंचलों. बस स्टँडजवळ हॉटेलांचे दोन तीन प्रतिनिधी आपापलीं कार्डें घेऊन आमच्यावर तुटून पडले. कुठल्या तरी हॉटेलांत उतरायचें होतें. आणि अगोदर कुणी सांगितलें नसेल तर चांगलें हॉटेल प्रत्यक्ष पाहिल्याशिवाय समजणार कसें ? तेव्हां त्यांतल्या त्यांत सज्जन दिसणाऱ्या एका-बरोबर आम्ही चालायला लागलों. ' व्हिक्टरी हॉटेल 'च्या नांवाचें कार्ड त्यानें आम्हाला दाखवलें होतें; पण हॉटेलच्या आवारांत शिरतों तों ' गुजरात हिंदु लॉज ' या नांवाची पाटी दिसली ! आम्हाला नेणारा पंजाब्यासारखा दिसणारा

सिंधी तरुण सांगतो ' व्हिक्टरी हॉटेल ', नेतो ' गुजरात लॉज 'कडे, हें काय गौडबंगाल आहे म्हणून विचारतां, व्हिक्टरीच्याच मालकानें हेंहि हॉटेल घेतलें आहे, असें त्यानें आम्हाला सांगितलें. सिंधमधून निर्वासित होऊन आलेल्या एका श्रीमंत शीख गृहस्थानें हीं दोन्ही हॉटेलें घेतलीं होतीं. आम्हाला घेऊन येणारा तरुण या शीखाचा जावई होता. नंतर आम्हाला कळलें कीं सिंध आणि बलुचिस्तानमध्यें हिंदु-शिखांत सर्रास विवाह होतात.

## देवानें नखानें खोदलेलें रम्य तळें

अबूचा ' सीझन ' अजून सुरू व्हावयाचा होता, आणि नवीनच घेतलेल्या हॉटेलची कायापालट चालू होती. हॉटेलच्या नांवाच्या पाट्या अस्ताव्यस्त पडल्या होत्या. कांहीं भागांतलें इलेक्ट्रिक फिटिंग नीट केलें जात होतें. हा सर्व प्रकार पाहून कसेंसेंच वाटलें. परत फिरण्याचा विचार करीत होतों. पण त्यानें आम्हाला दाखवलेल्या खोलीच्या खिडकींतून ' नखी ' तळयाचा रमणीय



' नखी ' तळयाच्या कांठावरून

देखावा दिसत होता. ‘ नखी ’ तळ्याच्या कांठीं एका टेकडीवर हें हॉटेल होतें. तेव्हां सर्व गबाळेपणा माफ करून इथेंच रहावयाचें आम्ही टरविलें. ‘ नखी ’ तळें हें अबूंतलें अत्यंत रमणीय स्थान आहे. राजपुतान्याला दिलेल्या महात्मा गांधींच्या राखेचें विसर्जन याच तळ्यांत करण्यांत आलें होतें.


चहा घेतला, स्नान वगैरे आटोपलें आणि जेवायला दीडदोन तास अवकाश असल्यामुळें ‘ नखी ’ तळ्यावर फेरी मारण्याकरतां बाहेर पडलों. साडेअकरा-बाराचा सुमार झाला होता आणि ऊन कडक पडलें होतें तरी झाडांखालून चालतांना कमालीचा गारवा वाटत होता. अबूची हवा मध्यान्ह झाला तरी थंड आणि उत्साहवर्धक होती. रस्त्यांत पाहिलेले मद्राशाच्या गोष्ट्या-सारखे बोडके खडक आणि शुष्क ताड, खजुरी यांच्यामुळें अबूबद्दल पहिल्याच दर्शनाला आमचें फारसें चांगलें मत झालें नव्हतें. पण आतां मोहोर आलेलीं कांहीं आंब्याचीं झाडें दिसलीं. विशेषतः ‘नखी’ तळ्याच्या आजुबाजूची वनश्री आणि भर दुपारीं थंडगार वाटणारी अबूची सुंदर हवा पाहून अबूबद्दलचें आमचें मत हळुहळू बदलूं लागलें. नखी तळ्याच्या कांठींच रघुनाथजीचें मंदिर आणि रघुनाथजीची धर्मशाळा आहे. धर्मशाळा कसली, हें एक सुंदर सॅनाटोरियम किंवा आरोग्यमंदिरच आहे म्हणाना. कोरी करकरीत दुमजली इमारत असून तीन तीन चार चार खोल्यांचे ब्लॉक भांडींकुंडीं, खुर्च्याटेबलांसह अगदीं नाममात्र भाड्यानें कुटुंबांना देण्यांत येतात. एकट्यादुकट्या प्रवाशाकरतां एक दोन दिवसांकरतां खोलीहि मिळते. •

नखी तळ्याच्या कांटाकांटानें हिंडत असतां दोन मजेदार गोष्टी माझ्या पहाण्यांत आल्या. तळ्याच्या मध्यभागीं एक मोठा थोरला काळा खडक दिसत होता. त्यावर पुष्कळसे काळे पक्षी गर्दी करून बसलेले मला दिसले. दुरून ते कावळे असावेत असें मला वाटलें; पण जवळ गेल्यावर ते काळ्या रंगाचे चिमुकले बगळे असल्याचें आढळून आलें. काळे कुळकुळीत इतके छोटे बगळे पूर्वी मी पाहिलेले नव्हते. या तळ्याच्या कांटाशीं एके ठिकाणीं अशींच अगदीं चिमुकलीं कमळें मला दिसलीं. पारिजातकाच्या फुलाएवढीं छोटीं कमळें आणि त्यांचीं तितकींच छोटी पानें इतस्ततः पाण्यावर पसरलीं होतीं. या

खडकाळ प्रदेशांत देवाला पाणी मिळेना, तेव्हां त्यानें आपल्या नखानें हें तळें खोदलें, म्हणून त्याला 'नखी' तळें नांव पडलें म्हणतात !

## खडकांचे वाघ आणि बेडूक

संध्याकाळीं अबूच्या वर खालीं जाणाऱ्या नितळ डांबरी रस्त्यावरून फिरतांना अबूच्या सौंदर्याची अधिकाधिक खात्री पटूं लागली. दाट बांबूचीं बनें, करवंदीच्या जाळ्या, हिरवेगार कडुनिंब, उंच उंच 'रॉयल ओक' वृक्ष पाहून आनंद झाला. काश्मीरमधल्या चिनारी वृक्षाप्रमाणें दिसणाऱ्या या उंचच उंच 'रॉयल ओक' झाडांना इथले लोक 'बेलगुडिया' म्हणतात. अबूच्या पहाडावर दिसणारे अजस्र खडक मात्र खरोखरच आश्चर्यकारक आहेत. नखी तळ्याच्या आसपास एक प्रचंड खडक आहे. त्याला 'टोड् रॉक' म्हणतात.



अबूंतले पुरातन रहिवासी

खरोखरच या खडकाला दुरून पहातांना एखादा पंधरा वीस फूट लांब आणि दहा बारा फूट उंच असा प्रचंड बेडूकच बसला आहे कीं काय असा भास होतो. इतिहासपूर्वकाळांतील अजस्र जनावरांचे जबडे आ वासून पडले आहेत

कीं काय असें कांहीं खडकांना पाहून वाटतें. एका खडकाचा आकार, जमिनी-वर बसलेला वाघ वर मान करून पहातो आहे असा दिसला. अबूचा पहाड हा अरवली पर्वताच्या रांगेतला एक पहाड आहे. जगांतल्या अत्यंत प्राचीन पर्वतांपैकीं अरवली हा एक पर्वत आहे असें भूगोलशास्त्रज्ञ म्हणतात. अरवलीच्या मानानें त्यांच्या मतें हिमालय पर्वत अगदींच तरुण ! हे खडक फार प्राचीन असल्यामुळें त्यांना हे विचित्र, चमत्कारिक आकार आले कीं काय, कोण जाणे.

ब्रिटिश अमदानींत अबू येथें राजपुताना संस्थानांचा रेसिडेंट रहात असे. त्याचा प्रशस्त बंगला आणि रेसिडेन्सीची भव्य दगडी इमारत पाहिली. पूर्वी जिथें ' युनिअन जॅक ' डोले तिथें तिरंगा झेंडा फडकत होता. जयपूर, सिरोही, पालनपूर वगैरे संस्थानिकांचे छपरावर धुरांडीं असलेले इंग्लिश पद्धतीचे बंगले विपण्ण दिसले.

## ' सन्सेट् पॉइंट् '

चालतां चालतां वाटेंत एका रस्त्यावर ' टु सन्सेट पॉइंट ' अशी पाटी दिसली. माथेरान, महाबळेश्वर येथें पुष्कळ ' पॉइंट्स ' आहेत. अबूंत ' पॉइंट ' असा हा एकच आहे; पण सूर्यास्ताच्या वेळीं कांहीं अलौकिकच देखावा इथून दिसतो, असें आम्ही ऐकलें होतें. पावणेसहा वाजले होते. सूर्यास्ताला पाऊण एक तास होता. ती पाटी पाहून त्या रस्त्यानें आम्ही भरा-भर चालूं लागलों. तिथून ' सन्सेट पॉइंट ' किती दूर आहे याची आम्हाला कांहींच कल्पना नव्हती. मैल, दोन मैल चाललों तरी कुठेंच कांहीं दिसेना. निर्जन रस्त्यावरून दलाल आणि मी दोघेच चाललों होतों. रस्त्यावर दुसरें कुणीच दिसत नव्हतें. रस्ता चुकला आणि काळोख पडला तर घोटाळाच व्हायचा, म्हणून परत फिरण्याचा विचार करूं लागलों. पण मोह आवरेना. आणखी पांच सहा मिनिटें चाललों. माणसांचे आवाज ऐकूं येऊं लागले. धीर आला. एक वळण घेऊन पुढें गेलों तों प्रचंड दरी डोळ्यासमोर पसरलेली आणि सिमेंटानें बांधून काढलेल्या ' पॉइंट ' वरल्या सज्जांत पन्नास साठ गुजराती स्त्रीपुरुष मुलांबाळांसह गप्पागोष्टी करीत शेवचिवडा खात सूर्यास्ताची वाट

पहात बसलेले दिसले. डोळ्यासमोर सूर्यबिंब दिसत होतें. साडे सहा झाले होते. सूर्यास्ताला दहाच मिनिटें होतीं. पण त्या दहा मिनिटांत यक्षकिन्नरांची सोनेरी मायानगरी तर दिसली नाहीं ना, असें वाटलें. समोर पसरलेल्या अफाट दरीच्या पलिकडे दूर दूर कुठें तरी अस्पष्ट अशा धुक्यांत क्षितिजाची कडा दिसत होती. समुद्रावरला सूर्यास्त मी अनेक वेळां पाहिला आहे. तांबडेंलाल झालेलें सूर्यबिंब हळू क्षितिजाखालीं सरकत मटकन पाण्यांत जातें. डोंगरमाथ्यावरला सूर्यास्त वेगळा असतो. सोनेरी सूर्य डोंगरमाथ्यावर येऊन टेकतो, हळुहळू खालीं जातो, कांहीं क्षण सोनेरी किरणांचा पिसारा डोंगरमाथ्यावर दिसतो, तोहि लुप्त होतो, आकाश तांबडें नारिंगी होत होत काळवंडूं लागतें. पण अबूच्या 'सनसेट पॉइंट'वरून दरीच्या पलीकडल्या त्या क्षितिजावर होणारा हा सूर्यास्त कांहीं अजबच आहे. नारिंगी तांबडे सोनेरी रंग आकाशांत मुळींच दिसत नाहींत. सूर्य स्वच्छ पांढऱ्या रुपेरी रंगाचा दिसतो. हा चंद्र कशावरून नव्हे असा प्रश्न कुणी विचारल्यास त्याला उत्तर देतां येणार नाहीं. त्याच्याकडे पहात राहिलें कीं ही रुपेरी तबकडी गरगर गरगर जागच्या जागीं फिरते आहे असा भास होतो. पहाणारांच्या दृष्टिभ्रमाचा हा प्रकार असेल, पण दिसतें तें असें. कांहीं क्षणांनीं या रुपेरी तबकडीच्या मागें अनेक काळ्या तबकड्या स्वतःभोंवतीं गरगर फिरतांना दिसतात. डोळे मिचकावले तर या तबकड्या आकाशभर अधिकच पसरलेल्या दिसतात. वर वर काळ्या आणि खालीं क्षितिजाकडे जमत चाललेल्या काळोखांत पांढऱ्या तबकड्या फिरतांना दिसतात. शेवटचा क्षण. किंचित् काळवंडलेल्या क्षितिजाच्या कडेवर सूर्यबिंब येऊन ठेपलें आहे. बिंबाची खालची बाजू किंचित् तांबूस दिसूं लागली. क्षणार्धांत ती नारिंगी झाली. आणि सबंध सूर्यबिंब अस्पष्ट होत होत नाहींसें झालें.

## गेमानदास

सकाळीं हॉटेलमध्यें आल्यापासून तिथें वावरणाऱ्या एका चमत्कारिक व्यक्तीकडे आमचें लक्ष विशेष वेधलें होतें. मळून घाण झालेल्या पायजम्यावर गुढघ्याखालीं लोंबणारी, विटून गेलेली काळ्या रंगाची एक गबाळ शेरवाणी घातलेला, तीन चार दिवसांची दाढी चेहेऱ्यावर असलेला हा माणूस आम्हाला

काय हवें नको तें मधून मधून विचारीत होता. त्याचें नांव गेमानदास. सकाळीं आम्ही आलों तेव्हां आमच्यासाठीं पाव, अंडीं वगैरे आणण्याकरतां याला बाजारांत पिटाळतांना मालकाच्या जांवयाला मी पाहिलें होतें. तेव्हां तो जांवई मॅनेजर आणि हा बाजारमास्तर असावा, असें मला वाटलें होतें. हा गेमानदास इथेंच रहातो, तुम्हाला काय हवें नको तें याला सांगा,–असें म्हणून मॅनेजर निघून गेला आणि दिवसभर गेमानदासच सर्व कांहीं पहात होता. तेव्हां तोच मॅनेजर असावा आणि मालकांचा प्रतिनिधी म्हणून तो जांवई देखरेख ठेवीत असावा असें वाटलें. बसलेल्या गालफडांचा, खोल गेलेल्या डोळ्यांचा हा केविलवाणा दिसणारा माणूस 'यस् सर' 'यस् सर' म्हणून आमच्याशीं अतिशय लीनतेनें वागत होता. रात्रीं जेवण झाल्यावर आम्ही गप्पा करीत बसलों असतां 'आंत येऊं का' म्हणून विचारून तो आंत आला, आणि नम्रपणें उभा राहून आमच्याशीं बोलूं लागला. त्याला बसायला सांगून त्याची



गेमानदास

हकीगत आम्ही विचारली. हा आहे तरी कोण, हें जाणून घेण्याची आम्हाला उत्सुकता होतीच. त्याच्या चमत्कारिकपणाची मी थट्टाहि केली होती. शौच-कूपांत जातांनासुद्धां हा माणूस ती लांब शेरवाणी काढून ठेवीत नाहीं, याचा अर्थ काय?–मी दलालांना म्हणालों होतों. पण संध्याकाळीं त्यानें एकदां शेरवाणी काढली तेव्हां आमच्यासमोर येतांना शर्टावर टॉवेल टाकून तो आला होता. फाटका शर्ट दिसूं नये म्हणून तो सारा दिवस शेरवाणी घालून राही हें उघड होतें. त्याची थट्टा केल्याबद्दल मला वाईट वाटलें.

फाळणीनंतर सिंधमधून देशोधडीला लागून इथें आलेल्या निर्वासितांपैकीं गेमानदास एक होता. म्हातारे आईबाप, बायको आणि दोन वर्षांची मुलगी मिरा यांच्यासह सिंधमधील लारकाना शहर सोडल्यापासून तो कल्याण कँपमध्यें रहात होता. पंधराच दिवसांपूर्वीं त्याचे म्हातारे वडील कल्याण कँपमध्यें वारले आणि आपली आई, बायको आणि मुलगी यांच्यासह तो अबू येथें आला. आमच्या बाजूच्याच मधल्या खोलींत तीं सर्व रहात होतीं. हॉटेलचा शीख मालक गेमानदासाचा आतेभाऊ. त्यानें बोलावलें म्हणून कल्याण कँप सोडून गेमानदास इथें आला होता. हॉटेलचा मॅनेजर म्हणून गेमानदासनें इथें रहावें असें त्याच्या आतेभावाचें मत होतें.

## ‘क्या कहूं, सांई...’

“क्या कहूं, सांई,” आपल्या फाटक्या कपड्याकडे पहात तो सांगूं लागला, “हे कपडे पाहून हा असाच कुणी तरी मवाली आहे असें तुम्हांला वाटलें असेल; पण लारकाना येथें स्टँडर्ड ऑईल कंपनीचा मी सेल्स-मन होतों. तीनचारशें रुपये मला पगार होता. जमीनजुमला, आमचं स्वतःचं घरदार तिथं होतं. चांगले चांगले सूट मी घालीत होतों. एक कसाबसा बचावून आणलाय मी. उद्यां संध्याकाळीं पाहिजे तर दाढी वगैरे चांगली करतों आणि तो सूट घालून तुमच्याबरोबर फिरायला येतों...”

त्याचे ते शब्द ऐकून मला हसूं आलें; पण दयाहि आली. आपण ‘जंटल-मन्’ आहोंत हें त्याला आमच्या मनावर ठसवावयाचें होतें. आमच्याशीं तो कामचलावू इंग्रजींत आणि हिंदुस्थानींत बोलत होता. त्याचा ओढलेला चेहरा

आणि चिपाड झालेलें शरीर पाहून तो पंचेचाळीस पन्नास वर्षांचा असावा असें कुणाला वाटलें असतें; पण आपलें वय चौतीस असल्याचें त्यानें सांगितलें. सिंधमधून येतांना झालेले हाल आणि कल्याण कॅंपमधल्या अपेक्षा यांनीं आपली ही दशा झाली,—तो म्हणाला.

"सांई, पांखरालासुद्धां आपलं घरटं सोडवत नाहीं; मग आमची माणसांची सर्व कांहीं सोडून येतांना काय स्थिति झाली असेल, सांई?" त्यानें विचारलें, "तुमच्या त्या कल्याण कॅंपमध्यें रहाण्यापेक्षां आम्हाला पुन्हां पाकिस्तानांत धाडतील तर बरं. मुसलमान एकदम मारून तरी टाकतील!"



अजूच्या गुहांतील एक नेहमींचें दृश्य

"कां, बुवा?" आम्ही म्हटलें.

"नरकवास आहे तो," तो सांगूं लागला, "धड अन्न नाहीं, धड जागा नाहीं, धड पाणी नाहीं. लाखों निर्वासितांचे हाल चाललेत तिथं. शेंकडा ऐशीं लोकांच्या अंगाला पायापासून डोक्यापर्यंत खुजली झालीय! कॅंपमधल्या एका सेक्शनचा मी उपाध्यक्ष होतों; पण कुणी कांहीं दाद देत नाहीं. आमच्या

सिंधमधल्या आदरातिथ्याची तुम्हाला कल्पना नाहीं, सांई! रस्त्यावरून जाणारा कुणीहि दाराशीं आला तरी सिंधी माणूस त्याला चहापाणी, पापड खायला दिल्याशिवाय रहाणार नाहीं. इथें पाणी द्यायला कुणी कबूल नाहीं, सांई!"

"**कोकी तें काय?**"

लारकान्यामध्यें गहूं, दूध, तूप, लोणी किती मुबलक होतं, याचें रसभरित वर्णन करून तो म्हणाला, "सकाळीं उठल्याबरोबर बचकाभर लोणी आणि गरम गरम गव्हाची पोळी आम्ही खात होतों! तुम्ही 'कोकी' खाल्लीय का कधीं?"

"कोकी तें काय?" आम्ही विचारलें.

"सकाळच्या न्याहारीसाठीं गव्हाच्या पिठाचाच 'कोकी' नांवाचा पदार्थ आम्ही सिंधी लोक करतों. काय मस्त लागतो, सांई! थांबा, उद्यां सकाळीं तुमच्यासाठीं माझ्या बायकोला करायला सांगतों कोकी! चहा घेऊं नका सकाळीं मी कोकी आणल्याशिवाय—"

"छे, छे, कांहीं नका आमच्यासाठीं करूं!" आम्ही म्हणालों. या गरीबाला आमच्यासाठीं हा आणखी भूर्दंड कशाला,–आम्ही विचार केला.

"नाहीं, नाहीं, सांई!" तो म्हणाला, "पहाच तुम्ही. वेगळा चार्ज वगैरे कांहीं नाहीं. हॉटेलचा त्याच्याशीं कांहीं संबंध नाहीं. माझे मित्र म्हणून मी तुमची सरबराई करणार. सकाळीं पहाच तुम्ही कोकीची लज्जत!"

"बरं बुवा!" म्हणून आम्ही स्वस्थ बसलों.

निर्वासितांच्या हालअपेष्टांच्या पुष्कळ गोष्टी त्यानें सांगितल्या. "सिंध-मधील किंवा जुनागड-काठेवाडमधून आलेले मुसलमान वाईट नव्हते," तो म्हणाला, "पण पंजाबी बडे सोदे, सांई!"

कराची, नबाबशहा वगैरे ठिकाणीं या पंजाबी मुसलमानांनीं रस्त्यांत असो कीं गाडींत असो, हिंदु दिसला कीं त्याला भोसकायचा, पैसे काढून घ्यायचे आणि फेंकून द्यायचा, असा सपाटा चालविला होता. तो म्हणाला, "जिथें राजासारखे आम्ही रहात होतों तिथें पाकिस्तान झाल्यावर मुसलमानांचीं पोरं-

टोरंसुद्धां आमचा पदोपदीं अपमान करूं लागलीं !" किती सांगूं आणि काय सांगूं असें गेमानदासला झालें होतें. 'कोकी'ची पुन्हां आठवण करून तो झोंपायला गेला.

२३ मार्च, १९४९

## कुरकुरीत 'कोकी'ची लज्जत

सकाळीं चहाबरोबर खायला गेमानदासनें गरमागरम 'कोकी' आणून दिली. लहानशा थालिपीठाच्या आकाराचा गव्हाच्या पिठाचा मीट, मिरी, तूप घालून केलेला हा सिंधी पदार्थ आहे. आपल्याकडल्या पानग्याचाच हा एक प्रकार आहे म्हणाना. गेमानदासनें केलेल्या रसभरित वर्णनाप्रमाणें 'कोकी' खरोखरच आम्हाला कुरकुरीत आणि चवदार वाटली.

कालचा गेमानदास आज कुणी ओळखला नसता. चकचकीत दाढी करून बूट, निळ्या सर्जची पॅंट, निळ्या रेघांचा स्वच्छ शर्ट, त्यावर निळ्या चट्टयापट्टयाची टाय, असा जामानिमा करून आज सकाळपासून गेमानदास फिरत होता.

"मुंबईत तुमच्या ओळखींचे पुष्कळ चांगले चांगले लोक असतील," दुपारीं आमच्याशीं बोलत बसला असतां तो म्हणाला, "कुणाला तरी चिठ्ठी देऊन मला कसलीहि नोकरी द्यायला सांगा."


"पण तूं इथें मॅनेजर म्हणून रहाणार आहेस ना?" मी म्हणालों. इथें अमुक नाहीं, तमुक नाहीं अशी कुरकुर आम्ही काल केली, तेव्हां आम्ही आतां इथें रेडिओ आणणार आहोंत, नवीन फर्निचरहि लवकरच येईल वगैरे गोष्टी मॅनेजरच्या उत्साहानें तो सांगत होता, म्हणून हा प्रश्न मी विचारला..

"होय, रहाणार होतों," तो म्हणाला, "पण नातेवाईकाकडे नोकर म्हणून फार दिवस रहातां येईल असं वाटत नाहीं आणि आमचा हा शीख आते-भाऊ पगाराची कांहींच गोष्ट काढीत नाहीं ! जेवून खावून मी आणि माझ्या कुटुंबानं इथं राहावं असं त्याचं मत दिसतं. असे किती दिवस काढायचे ?"

दहाबारा दिवसांनीं आपण परत कल्याण कॅंपमध्यें जाणार, तिथें गेल्याशिवाय नोकरीचें कांहीं जमायचें नाहीं, असें तो म्हणाला. कुणाला तरी तुम्ही चिठ्ठी द्याच म्हणून तो गयावया करूं लागला, तेव्हां व्यापारी कंपनींत असलेल्या मुंबईतल्या एका मित्राला मी चिठ्ठी दिली. कांहीं तरी नोकरी मिळवण्यासाठीं तो इतका अधीर झाला होता कीं, त्याची कुणालाहि दया आली असती.

## दिलवाऱ्यांतील कलाकुसरीची दाटी

दुपारीं ३ वाजतां अबूहून दोन मैलांवर असलेलीं 'दिलवारा' (देऊळवाडा) जैन मंदिरें पहावयाला आम्ही बाहेर पडलों. शुभ्र संगमरवरी दगडांचीं,



दिलवारा देवालयाचें एक दृश्य

अत्यंत प्रेक्षणीय कोरीवकाम असलेलीं हीं मंदिरें ताजमहालपेक्षांहि सुंदर आहेत, असें कांहीं लोकांचें म्हणणें आहे. ताजमहाल सुंदर आहे कीं नाहीं याबद्दल अलिकडे तज्ज्ञ टीकाकारांत वाद आहे, पण त्याची भव्यता आणि रेखीवपणा याबद्दल मुळींच दुमत नाहीं. या देवळांच्या संगमरवरी खांबावरील नक्षीकाम किंवा संगमरवरी छतावर कोरलेलीं विविध दृश्यें, किंवा कांहीं खांबांवरील संगमरवरी कमानींचे जितके वेगळे तितकेच सुंदर आकार कुणालाहि थक्क करून टाकतील असेच आहेत. छतावर एके ठिकाणीं चौकोनी तुकड्यांत वसुदेव कृष्णाला घेऊन तुरुंगांतून बाहेर पडतो आहे, हा कथाभाग कोरला



दिलवाऱ्यांतलें शिल्पसौंदर्य

आहे, तर दुसरीकडे गोल तुकड्यांत आणखी कांहीं तरी पौराणिक दृश्य कोरलेलें दिसतें. हिंदु देवदेवता जैन मंदिरांत कशा आल्या तें कळत नाहीं. कुठें कमळांच्या वेलींची आकृति तर कुठें फुलाफळांची आकृति. दृश्यें, आकृत्या, चेहेरे, नक्षीकाम यांत कमालीचें वैचित्र्य आणि विविधता आहे; आणि असे किती तरी खांब आणि किती तरी दृश्यें आहेत. पण या कलाकुसरीची इतकी दाटी झाली आहे कीं कोणत्याहि कलाकृतींतले सर्व तपशील मिळून जो एकमेव असा कांहीं परिणाम मनावर व्हायला पाहिजे तो होत नाहीं. सुंदर, मौल्यवान् दागिन्यांनीं मट-वून काढलेल्या स्त्रीसारखी या मंदिरांची अवस्था झाली आहे, असें मला वाटतें. आंत प्रत्येक मंदिरांत जशी तपशीलांची गर्दी झाली आहे त्याचप्रमाणें हीं चारहि मंदिरें एकमेकांना कशीं तरी खेटून बांधलेलीं असल्यामुळें बाहेरून पहातांनाहि कांहीं शोभा वाटत नाहीं. मंदिरांच्या सभोवार एक भली उंच जुनाट भिंत असल्यामुळें दुरून तर हा एखाद्या खेड्याचा पडका भाग असावा असाच भास होतो. मूर्तिभंजक मुसल्मानांचें लक्ष जाऊं नये म्हणून मुद्दामच त्या काळीं बाहेरून हा असा देखावा करण्यांत आला, असें मला कुणीसें सांगितलें. कदाचित् हें खरें असेल.

## संगमरवरी खांबांचें जंगल

पहिलें पार्श्वनाथाचें मंदिर संगमरवरी दगडाचें नाहीं. साध्या दगडाचेच त्याचे खांब आहेत. तिथल्या कांहीं कोरीव मूर्तींचीं रेखाचित्रें दलाल आपल्या चोपडींत भराभर रेखाटीत होते, इतक्यांत एक वृद्ध जैन साधु तिथें आला.

समोरचें चित्र हुबेहुब चोपडींत उतरलेलें पाहून त्याला आश्चर्य वाटलें आणि आनंदहि झाला. आपणहून आमच्याबरोबर फिरण्याचें आणि सर्व मंदिरें दाखवण्याचें त्यानें कबूल केलें. त्याचें नांव कुमुदविजयजी. कुमुदविजयजींचें वय साठच्या आसपास असेल. अंगाभोवतीं शुभ्रवस्त्र लपेटलेलें, हातांत दंडा, कमंडलु, टागोरांच्या सारख्या अर्ध्याअधिक पांढऱ्या झालेल्या दाढीमिशा, तरतरीत नाक आणि सडपातळ बांधा, यामुळें कुमुदविजयजींचें व्यक्तित्व आकर्षक वाटत होतें. जैन साधू पावसाळ्याचे चार महिने सोडून वर्षाचे आठ महिने निरनिराळ्या जैन तीर्थांना भेटी देत साऱ्या देशभर पायीं फिरत असतात. सध्यां कुमुदविजयजींचा मुक्काम दिलवाड्यांत होता. ते बरोबर आल्यामुळें या मंदिरांतलीं पुष्कळच सौंदर्यस्थळें आणि इतिहास आम्हाला कळला.



दिलवाऱ्यांतील आणखी एक शिल्पाकृति



दिलवारा देवालयांतील संगमरवरी शिल्प

पार्श्वनाथाच्या मंदिराला लागूनच आदीश्वर किंवा ऋषभ भगवान् याचें मंदिर आहे. पार्श्वनाथाचें पांचशें वर्षांचें जुनें मंदिर आहे तर हें आदीश्वराचें जवळ जवळ साडे आठशें वर्षांचें आहे. पाटणचा राजा भीमदेव याचा मंत्री विमलशाहा यानें इ. स. १०८८ सालीं अठरा कोटी त्रेपन्न लाख रुपये

खर्च करून शुद्ध संगमरवरी दगडाचें हें सुंदर मंदिर बांधलें. हें पहातांना अप्रतिम कोरीवकाम केलेल्या शुभ्र संगमरवरी खांबांच्या जंगलांतून आपण फिरतों आहोंत असें वाटतें. संगमरवरी छत्रांत कोरलेल्या आकृतींची आणि दृश्यांची विविधताहि थक्क करून टाकणारी आहे. शंकरासमोर नंदी असतो त्याप्रमाणें गाभाऱ्यासमोरच्या खोलींत संगमरवरी दगडाच्या घोड्यावर स्वार झालेली विमलशहाची मूर्ति आहे.

यापुढलें मंदिर नेमिनाथ भगवानांचें. यांतले खांब आणि त्याहिपेक्षां त्यावरील संगमरवरी दगडांच्याच निरनिराळ्या आकारांच्या नक्षीदार कमानी विशेष प्रेक्षणीय आहेत. हें मंदिर १२३१त वीरधवल राजाचा मंत्रि वस्तुपाल यानें बारा कोटी तेहेतीस लाख रुपये खर्च करून बांधलें. गाभाऱ्याच्या दाराच्या दोन बाजूला दोन संगमरवरी दगडाचे, कोरीव काम केलेले कोनाडे किंवा 'गोकले' आहेत. एकाचें नांव 'जेठाणीना गोकला' आणि दुसऱ्याचें नांव 'देराणीना गोकला'. वस्तुपालची बायको जेठाणी हिनें नऊ लाख रुपये खर्च करून एक 'गोकला' बांधला, तेव्हां इरेला पेटून वस्तुपालचा भाऊ तेजपाल याची बायको देराणी हिनेंहि नऊ लाख रुपये खर्चून दुसरा 'गोकला' बांधला, असें सांगतात !

चौथें ऋषभ भगवानाचें मंदिर लहानसेंच आहे. त्यांत पहाण्यासारखें कांहीं नाहीं. त्यांतली एकच उल्लेखनीय गोष्ट म्हणजे आंतली मूर्ति दगडाची नसून सोनें, चांदी, तांबें वगैरे अनेक धातू मिळून केलेली आहे. हीं चार मंदिरें पाहून बाहेर पडलें कीं रस्त्याच्या कडेला बऱ्याचशा वर गेलेल्या पायऱ्या आणि उंचवट्यावर एक जुनाट मंदिर दिसतें. हें दिगंबर जैनांचें आहे. साध्या दगडाचें हें एक पडित मंदिर आहे. पहाण्यासारखें त्यांत कांहींच नाहीं.

## जैन साधू आणि संन्यासी

मंदिरांच्या आवारांत असलेल्या धर्मशाळेंतल्या कुमुदविजयजींच्या खोलींत, मंदिरें पाहून झाल्यावर आम्ही गेलों. एखाद्या गुंफेसारखी ती भकास खोली होती. जमिनीवर उठण्याबसण्याकरतां, झोंपण्याकरतां एक कांबळी आणि जैन साधूंच्या इतर दोन चार वस्तू तिथें होत्या. कुमुदविजयजींनीं सांगितलेली त्या



कुमुदविजयसिंहजी

वस्तूंचीं नांवें मजेदार होतीं. हातांत धरायची काठी,—दंडा. चवरीसारखी दिसणारी सुताच्या दशांची एक झाडू होती. तिचें नांव रजोहरण. कुठेंहि बसण्यापूर्वी रजोहरणानें जमीन झाडायची आणि मग बसायचें. वीत दीड वीत लांबीच्या रंगीत खुंट्यांची ‘ ठेवणी ’; या ‘ ठेवणी ’ वर धर्मग्रंथ ठेवून वाचायचा. दुसऱ्या दोन वस्तू म्हणजे ‘ तर्पणी ’ आणि ‘ पातरा ’. या दोन्ही वस्तू मोठ्या सुबक आणि सावंतवाडीच्या खेळण्यासारख्या रंगीत लाकडाच्या होत्या. ‘ तर्पणी ’ कमंडलूसारखी असते. तिच्यांत प्यायचें पाणी घ्यायचें.

' पातरा ' म्हणजे जेवण ठेवायचा एकांत एक दोन कप्पे असलेला लाकडी डबा म्हणाना. जैन साधूनें भिक्षेचें अन्नच खायचें असतें. तें या ' पातऱ्यां 'त घ्यायचें. पाणी नेहेमीं उकळून प्यायचें. जैन साधू दोन प्रकारचे असतात. मंदिर-मार्गी, म्हणजे आठ महिने तीर्थें करीत फिरणारे; आणि स्थानकवासी, म्हणजे ज्यांचा मूर्तिपूजा किंवा मंदिरांवर विश्वास नाहीं ते. हे स्थानकवासी नाकातोंडावर पट्टी बांधतात. जैन साधूंचे यमनियम फार कडक आहेत. स्त्रियांचा स्पर्शहि त्यांना होतां कामा नये. लहान मुलीला हात लागला तरी अडतीस तास कडकडीत उपास करावा लागतो. जैनांत लहानपणींच संन्यास घेऊन साधू होतां येतें, किंवा गृहस्थाश्रमी माणसालाहि वाटेल तेव्हां संसार सोडून दीक्षा घेतां येते. मात्र साठ वर्षांनंतर कुणाला साधू होतां येत नाहीं. कारण संन्याशानें करावयाच्या सर्व ' क्रिया ' किंवा कडक यमनियम त्याला झेपणार नाहींत. ही सर्व माहिती आम्हाला कुमुदविजयजींनीं दिली. त्यांनीं स्वतः पन्नासाव्या वर्षी दीक्षा घेतली. त्यांचें पूर्वाश्रमीचें नांव जीवराज. इमारती बांधण्याच्या धंद्यांत असल्यामुळें भोपाळ, बार्शी, अहमदनगर वगैरे ठिकाणीं ते अनेक वर्षं होते. ते मूळ कच्छमधले. त्यांची बायको आणि एकुलती एक मुलगी जिवंत आहे. पण आतां त्यांचा कसलाच संबंध उरलेला नाहीं. भेट, पत्रव्यवहार कांहीं नाहीं. कुमुदविजयजी हा माणूस मोठा सालस आणि सरळ वाटला. मोठ्या आस्थेनं आम्हाला तो सर्व माहिती देत होता, आणि माझ्या कॅमेऱ्यासमोर किंवा ' स्केचेस् ' करण्याकरतां दलालांसमोर सांगावें तेव्हां सांगावें तसा निमूटपणें बसत होता. कुमुदविजयजींच्या खोलींतलं पाणी पिऊन आणि त्यांचे आभार मानून आम्ही बाहेर पडलों.

## केशिया व त्याची बायको

संध्याकाळचे सहा वाजले होते. खडबडीत काळ्या पहाडांच्या बाजूबाजूनं अबूकडे जाणाऱ्या रस्त्यानं चालतांना मजा वाटत होती. समोरून हंसत खिदळत चार पांच खेडवळ पुरुष आणि एक स्त्री म्हैशी हांकीत येत होतीं. बहुधा ते गुराखी असावेत. त्यापैकीं एका पुरुषाचा आणि त्या स्त्रीचा वेष रंगीबेरंगी आणि भपकेबाज होता. होळी जवळ आली होती,—नव्हे, उद्यांच होळी

पौर्णिमा–म्हणूनच कीं काय, मंडळी मजेंत होती. थांबा, तुमचा फोटो घेतों, –कॅमेरा सरसावून मी म्हणालों. ते सर्व आनंदानें उभे राहिले. त्या सर्वांचा फोटो घेतल्यावर त्या ऐटबाज जवानाचा आणि त्याच्या बायकोचा एक वेगळा फोटो मला घ्यायचा होता. नांव विचारतां आपलें नांव केशिया



केशिया व त्याची बायको

भिल्ल असल्याचें त्यानें सांगितलें. चुन्याचुन्या असलेला सदरा त्यानें घातला होता. डोक्याला तांबडा फेटा होता. भरदार छातीवर लाल, निळ्या रंगाच्या बोराएवढ्या मण्यांची, मागें रेशमी गोंडे सोडलेली माळ आणि करगोट्या-सारखा चांदीचा कंठा रुळत होता. खोटी रुपेरी जर लावलेली गुलाबी कंचुकी आणि भडक लाल आणि पिवळ्या रंगाची साडी त्याच्या बायकोनें परिधान केली होती. तुझा आणि तुझ्या बायकोचा एक फोटो घेतों, म्हटल्यावर केशिया खूष झाला, पण बायको लाजून दूर व्हायला लागली. 'चल इकडे,' म्हणून हंसत हंसत तिचा दंड धरून केशियानें तिला जवळ ओढली, आणि मी पटकन् फोटो घेतला. आदिवासी स्त्रीपुरुषांच्या राकट चेहेरेपट्टींत केव्हां केव्हां एकप्रकारचें विशेष सौंदर्य असतें. तें केशिया आणि त्याच्या बायकोच्या चेहेऱ्यांत खास होतें. कॅमेरा बंद करूं लागलों तेव्हां आम्हाला आमचा एक फोटो द्या, म्हणून केशिया पुढें आला. ताबडतोब फोटो देतां येणार नाहीं, त्याला बरेच दिवस लागतील, असें मी म्हणालों तेव्हां जरा हिरमुसल्यासारखी होऊन ती सर्व मंडळी पुढें चालू लागली !

## माय मदर–ही इज ट्रॅव्लिंग...

रात्रीं दहाच्या सुमाराला आम्ही झोपायची तयारी करीत होतों इतक्यांत दार ठोकून गेमानदास आंत आला.

"माय फादर इज ट्रॅव्लिंग विथ फीव्हर," तो सांगूं लागला, "तुमच्या-कडे कांहीं औषध आहे का ?"

"अरे पण, तुझे वडील पंधरा दिवसांपूर्वी वारले ना ?" मी एकदम उद्गारलों.

"हो हो–माय मदर–ही इज ट्रॅव्लिंग !" तो म्हणाला. तरीहि पुन्हां 'ही'च ! आमच्याकडे हींवतापावर घ्यावयाच्या 'पॅलुड्रीन' गोळ्या होत्या. त्या मी त्याला दिल्या.

आईला 'फादर' म्हणायचें आणि 'मदर' म्हटल्यावरहि पुन्हां 'ही' म्हणायचें हें पाहून आम्हाला हंसूं आवरेना. पण पंजाबी लोकांशींहि बोलतांना मला असाच अनुभव आला आहे. एक पंजाबी व्यापारी आपल्या बायकोला

बाळंतपणाला पाठविली आहे हें सांगतांना पुन्हां पुन्हां 'ही' 'ही' म्हणत होता. तेव्हांहि मी असाच बुचकळ्यांत पडलों होतों. उत्तर हिंदुस्थानांतल्या लोकांच्या बोलण्यांत ही काय भानगड आहे कळत नाहीं, कीं इंग्रजींत बोलतांना बायकांचा उल्लेख हे लोक 'ही' म्हणून करतात. गेमानदासनें तर 'ही'च नव्हे, पण 'मदर'बद्दल 'फादर' हाच शब्द वापरला !

१४ मार्च, १९४९

## मेवाडी होळी

आज होळी. संध्याकाळीं गांवांत फेरी मारून होळीची गंमत पहावयाला बाहेर पडलों. बाजारांत एक फेरी मारली. हातांत उंच उंच दंडे आणि डफ घेतलेले मेवाडी पुरुष आणि रंगी बेरंगी चुनड्या नेसलेल्या मेवाडी बायका यांचे घोळके गात, नाचत जात असलेले ठिकठिकाणीं दिसले. बहुतेकांच्या हातांतल्या दंड्यांना वरच्या टोकाला नव्या धान्याचे लोंबर बांधलेले दिसले. या वर्षी आलेल्या पहिल्या धान्याचे ते लोंबर होते. पेटलेल्या होळींत दंड्यानें तें धान्य भाजून घ्यायचें आणि खायचें म्हणजे वर्षभर धान्याची ददात पडत नाहीं, अशी या लोकांची समजूत आहे.

आतां पौर्णिमेचा पूर्णचंद्र आकाशांत वर आला होता. भाजीबाजाराच्या आवारांत गांवाची मुख्य होळी होती. स्त्रीपुरुषांची, मुलांची खूप गर्दी जमली होती. नाच, गाणीं, हंसण्याखिदळण्याला ऊत आला होता. गांवचा तहसिलदार ही होळी पेटवतो. आमच्या इकडल्या होळीपेक्षां ही होळी मला जरा वेगळी दिसली. खड्डा खणून लांकडें, ओंडके, गवत वगैरे टाकलेलें नव्हतें. जमिनीवरच लांकडांचे ढलपे, खजुरीचे ओंडके, गोवऱ्या वगैरेंचा उंच ढीग केला होता; आणि मग हा ढिगारा पेटवण्यांत आला. इथल्या गोवऱ्याहि मला वेगळ्या वाटल्या. आपल्या इथें भाकरीच्या आकाराच्या गोवऱ्या असतात. इथल्या गोवऱ्या लहानशा थालीपिठासारख्या तळहाताएवढ्या आणि मध्यें भोंक. भोंकांत दोरी घालून गोवऱ्यांच्या लांब लांब माळा केलेल्या असतात, आणि असल्या माळा प्रत्येकजण आणून होळीच्या त्या ढिगाऱ्यावर टाकीत होता.

होळी भडकली तेव्हां भोंवतीं लोक गात, नाचत, ओरडत होते. पण अश्लील आरोळ्या मी ऐकल्या नाहींत. कदाचित् भाषा नीटशी समजत नसल्यामुळें माझा गैरसमज झाला असेल. होळींत टाकलेले नारळ आगीच्या झळा चुकवून मेवाडी तरुण आपल्या दांड्यानें मोठ्या कौशल्यानें बाहेर ओढून काढीत होते.

## रामचंदर

उद्यां सकाळीं ११ च्या बसनें आम्ही अबू सोडणार. रात्रीं बांधाबांधी करीत होतों, इतक्यांत आमच्या हॉटेलचा 'महाराज' रामचंदर 'कांहीं हवें का' विचारायला खोलींत आला. अबूहून आम्ही उदयपूरला जाणार होतों, आणि रामचंदर उदयपूरचाच होता. तेव्हां उदयपूरची माहिती आम्हीं त्याला विचारली. तो खूष झाला. मोठ्या अभिमानानें तो सांगू लागला, "आमच्या राणाजींच्या रेल्वेंत बसा, मारवाड जंक्शनहून दोन तासांत उदयपूर!" उदयपूरच्या राणाजीबद्दल त्याला वाटणारा अभिमान ठीक होता, पण रेल्वेटाईमटेबलांत मारवाड ते उदयपूर प्रवास चांगला आठ तासांचा होता! पण आमच्या रामचंदरच्या बोलण्याची आम्हांला चांगलीच परिचित झालेली ती लकब होती. "रामचंदर, चाय लाव!" म्हणून हांक दिली कीं "दो मिनिट में साब!" म्हणून उत्तर यायचें; आणि केव्हां केव्हां एक तासभर चहाचा पत्ता नमायचा. "रामचंदर, न्हानेकु पानी लाव!"ला उत्तर "दस मिनिटमें,



रामचंदर

साब!" पण दीड दीड तासांत पाणी मिळालें तर सुदैव! केव्हां केव्हां आम्ही चिडायचे त्याच्यावर, पण तो तरी काय करणार? खोली झाडायची त्यानेंच, बिछाने झटकायचे त्यानेंच, बाजारांतून भाजीपाला आणायचा त्यानेंच, जेवण करायचें त्यानेंच, आणि भांडींहि त्यानेंच घासायचीं! "एवढं सगळं तूं करतोस, तुला पगार तरी किती?" म्हणून विचारतां, "पंचवीस रुपये!" म्हणून त्यानें सांगितलें. मोठा हंसतमुख, कामसू, तगडा मेवाडी तरुण होता तो. हॉटेल नुकतेंच सुरू झालें होतें, आणि आम्ही दोघे पहिलेच एकुलते एक उतारू होतों, तोंपर्यंत रामचंदर कसें तरी चालवीत होता हें ठीक; पण पुढें हें कसें काय चालणार, म्हणून गेमानदासला आम्हीं विचारलें. सीझन सुरू झाला कीं आणखी नोकर ठेवतील—तो म्हणाला.

२५ मार्च, १९४९

## 'पडदानशीन' मोटारींतला प्रवास

सकाळीं १० च्या सुमाराला अबूच्या बस स्टँडवर आलों. बस कंपनीची व्यवस्था छान आहे. स्टँडच्या समोर बस कंपनीची इमारत आहे. खालच्या मजल्यावर तिकिट ऑफिस आणि एक उत्तम 'रेस्टोरॉं' आहे. वरच्या माळ्यावर हॉटेलसारखी रहायची व्यवस्था आहे. भाड्यानें चांगल्या खोल्या मिळतात. चहा वगैरे घेऊन बस सुटण्याची वाट पहात बसलों. बस ११ ला सुटावयाची होती. आज धुळवडीचा दिवस असल्यामुळें रंग उडवीत लोक रस्त्यांतून फिरत होते. बस स्टँडजवळ कांहीं चांगले सुशिक्षित दिसणारे तरुण रंगलेले सदरे घालून इकडे तिकडे फिरत होते, कांहीं एकमेकांच्या अंगावर रंग उडवीत होते. मला सारखी भीति वाटत होती; एखाद्यानें आमच्या अंगावर मारली पिचकारी तर करायचें काय? बस सुटतां सुटतां आंतल्या उतारूंवर ते कांहीं तरी प्रयोग केल्याशिवाय रहाणार नाहींत असें मला वाटत होतें. पण तसें काहीं झालें नाहीं. या बाजूला बाल, वृद्ध, अशिक्षित, सुशिक्षित सर्व मंडळी किती उत्साहानें होळीच्या उनाडक्यांत भाग घेतात त्याचें थोड्याच

वेळांत मला प्रत्यंतर आलें. आमच्या बसमध्यें अजमेरच्या कॉलेजमध्यें जाणारा एक अबूचा विद्यार्थी बसला होता. त्याचा वृद्ध बाप त्याला निरोप द्यायला म्हणून बस स्टँडवर आला होता. म्हाताऱ्याचें सर्व डोकें आणि कपाळ शेंदुरानें माखलें होतें. लाल, पिवळ्या, जांभळ्या डागांनीं त्याचा सदरा रंगला होता. स्वच्छ परीटघडीचा पायजमा, व्यवस्थित पांढरा शर्ट आणि कोट घालून शांत-पणें बसमध्यें बसलेला तो तरुण मुलगा, आणि शेंदूर माखलेला, रंगीबेरंगी सदऱ्यांतला, हंसत खिदळत त्याच्याशीं बोलणारा त्याचा म्हातारा बाप पाहून मला मोठी मजा वाटली.

बस बरोबर ११ ला सुटली. सुदैवानें आमचा एकाक्ष बस-ड्रायव्हर महंमद फारच चांगला होता. एके काळीं लष्करी मोटार-ड्रायव्हर असूनहि बस तो मोठ्या कुशलतेनें आणि झपाट्यानें हांकीत होताच, पण इतर दृष्टींनींहि आम्हां उतारूंची तो चांगलीच काळजी घेत होता. घाट उतरून अबू रोड स्टेशनच्या रस्त्याला बस लागल्यानंतर कांहीं वेळानें बस उभी करून बसच्या बाजूचे व मागचे सर्व पडदे, मुसळधार पावसांत लावतात तसे त्यानें घट्ट लावून घेतले.

"तुम्हांला मारवाडची होळी माहीत नाहीं," तो म्हणाला, "यापुढें रस्त्यांत रंगाचे डबे, बाटल्या घेतलेलीं मवाल्यांचीं टोळकींच्या टोळकीं भेटतील. तुम्हां सर्वांना चांगलेंच रंगवून काढतील!"

तो झपाट्यानें मोटार चालवीत होता. मेण्यांतल्या बायकांसारखे जीव मुठींत धरून आम्ही उतारू त्या पडदानशीन मोटारींत बसलों होतों. वाटेंत एकदां थोडीशी आरडाओरड ऐकूंहि आली आणि मागोमाग मोटारीच्या पडद्यावर सपासप पाणी मारल्याचा आवाज आला. पडदे रंगले असतील; पण आंत कांहीं आलें नाहीं. स्टेशन पांच दहा मिनिटांवर राहिलें होतें. इतक्यांत दूर समोरच्या नाक्यावर डोक्यापासून पायापर्यंत रंगलेल्या, ओरडाआरडा करीत येणाऱ्या पांचपंचवीस धटिंगणांचें एक टोळकें मोटारींतून आम्हांला दिसलें.

"हे दिसताहेत ना," महंमद म्हणाला, "ते या गांवांतले 'बहोत खतरनाक लोक हैं'!"

आम्ही मनांतल्या मनांत अगदीं भेदरून गेलों. वाटेंत आडवे उभे राहून



एक मेवाडी धोबीण उदयपूर

या लोकांनीं मोटार थांबवली तर काय करायचें ? श्वास धरून वाट पहात बसलों; पण या टोळक्याला मोठ्या कौशल्यानें झुकांडी देऊन महंमदनें मोटार पुढें हाणली. आणि मग आम्हीं सुटकेचा श्वास टाकला.

**...ही मरुभूमि !**

गाडी वेळेवर स्टेशनांत आली आणि आम्हाला जागाहि भरपूर मिळाली. दीड पावणेदोनच्या सुमाराला गाडी सुटली. अबू रोड ते मारवाड जंक्शनचा प्रवास भर दुपारीं करतांना मरुभूमि या शब्दाचा अर्थ पुरेपूर मनावर ठसला. गाडीच्या दोन्ही बाजूंना दिसणारी जमीन, झाडें, झुडुपें, सर्व कांहीं जळून, खाक होऊन, मरून गेलेलें दिसत होतें. जळकट काळी जमीन, शुष्क काळवंडलेलीं झुडुपें, धुरकट काळे खडक, आणि हा सर्व काळेपणा अधिकच विकट वाटावा म्हणून कीं काय मधून मधून तांबड्या लाल फुलांनीं फुललेलीं पर्णहीन पळसाचीं झाडें !

ही वनश्री पाहून कुणाला कालिकामूर्तीची आठवण झाली, तर आपली तांबडी लाल जीभ काढून तुम्हांला ती भिवविते आहे असेंच वाटायचें ! वसंतऋतूंत ही मरुभूमि जर अशी दिसते, तर ग्रीष्मांत ती दिसत असेल तरी कशी ?

आमच्या डब्यांत एक तरतरीत चेहऱ्याचा, उंची इंग्रजी कपडे घातलेला सिंधी तरुण होता. कोणत्याशा कंपनीचा तो सेल्समन होता. मूळचा तो सिंध हैद्राबादचा, पण फाळणीनंतर देशोधडीला लागून सध्यां अजमेरांत रहात होता. चांगलाच श्रीमंत घराण्यांतला असावा, हें त्याच्या चेहऱ्यावरून आणि कपड्यांवरून दिसत होतें. पाकिस्तानचें राज्य झाल्यानंतरच्या सिंधमधल्या कांहीं गमती त्यानें सांगितल्या. आपली मंडळी घेऊन हिंदुस्थानांत येतांना आपणाला व इतर निर्वासितांना काय काय त्रास झाला तें त्यानें सांगितलें. हैद्राबाद ते जोधपूर किंवा बिकानेरचें एक एक तिकिट पांच पांचशें, हजार हजार रुपये देऊन घ्यावें लागलें. सरहद्दीवर मुस्लीम नॅशनल गार्डांनीं मुलांसाठीं बरोबर घेतलेल्या दुधाच्या बाटल्या आणि थर्मासहि हिसकावून घेतले. त्याच्या एका म्हाताऱ्या आत्याबाईनें कराचींतला आपला सुंदर बंगला सोडून हिंदुस्थानांत येण्याचें साफ नाकारलें. मी इथेंच रहाणार,—म्हातारी म्हणाली. कांहीं दिवसांनीं म्हातारी कुणातरी नातेवाईकांना भेटायला बाहेर गेली होती. घरांत फक्त नोकरचाकर होते. म्हातारी संध्याकाळीं परत येते तों बंगल्यांत पंजाबमधून आलेल्या मुसलमान निर्वासितांनीं तळ ठोकलेला. पांढऱ्या शुभ्र संगमरवरी फरशीच्या न्हाणीघरांत चूल मांडून त्याचें स्वयंपाकघर त्यांनीं केलें होतें आणि दिवाणखान्यांतल्या सोफांच्या पायांना मेंढ्या बांधल्या होत्या !

## मळकट कपडे आणि काळकट चेहरे

पावणेसहाला मारवाड जंक्शन आलें. आम्हांला रात्रीं तीन वाजेपर्यंत उदयपूरच्या गाडीसाठीं मारवाड स्टेशनांत थांबलें पाहिजे. वेटिंगरूममध्यें सामान ठेवलें आणि शेजारींच असलेल्या रेस्टोरांच्या माणसाला आम्ही गांव पाहून येईपर्यंत सामानावर लक्ष ठेवायला सांगितलें. तो माणूस गोव्याचा ख्रिश्चन होता आणि दलाल त्याच्याशीं कोंकणींत बोलले तेव्हां त्याला आमच्याबद्दल एकदम आपलेपणा वाटला. रात्रीं नऊ वाजतां आम्हांला जेवण पाहिजे म्हणून

आम्हीं सांगितलें, तेव्हां फर्मास जेवण देण्याचें त्यानें आश्वासन दिलें. " लहानसा बाजार, त्याच्या पलीकडे लाख पाऊण लाख सिंधी निर्वासितांचा दूरवर पसरलेला कॅम्प, आणि नंतर जंगल यापेक्षां या गांवांत दुसरें कांहीं नाहीं !" तो म्हणाला. हातपाय, तोंड धुवून गांव पहायला आम्ही बाहेर पडलों. रेल्वेलाईन ओलांडून आम्ही त्या बाजाराकडे वळलों. हा बाजार म्हणजे एक चिंचोळी धुळकट गल्ली आणि मळकट कपडे घालून बसलेल्या दुकानदारांचीं किराणा मालाचीं, कापडाचीं, किंवा भाजीपाल्याचीं या बाजूला दहापंधरा आणि त्या बाजूला दहापंधरा धुरकटलेलीं दुकानें. या बाजाराच्या आसपास दिसलेल्या लोकांइतके मळकट कपड्यांचे आणि कळकट चेहऱ्याचे लोक मी कुठेंच पाहिले नाहींत. त्यांत आणखी आज धुळवड असल्यामुळें एकमेकांवर घाणचिखल उडवीत, एकमेकांच्या तोंडांना डांबर फांशीत या मळकट लोकांचे घोळके फिरत होते. हें एकंदर दृश्य पाहून आम्ही मनांत जरा चरकलोंच. घातला आम्हांला गराडा या लोकांनीं आणि उडवली घाण अंगावर, तर करायचें काय ? आमचे स्वच्छ कपडे आणि हॅट्स् वगैरे बघून यांना एखादे वेळीं चेवच यायचा ! शक्य तितके उग्र चेहरे करून इकडे तिकडे न पहातां आम्ही पुढें निघून गेलों. तिथून परतच फिरणार होतों, पण शेंपन्नास पावलांवर सिंधी निर्वासितांचा कॅम्प होता त्यावर एकदां नजर टाकावी आणि परत फिरावें असा विचार केला. कांहीं अंतरावर एक दुर्मुखलेल्या चेहऱ्याचा सिंधी माणूस भेटला. समोर तंबूंच्या रांगांवर रांगा दूरपर्यंत पसरलेल्या दिसत होत्या.

" कितीसे निर्वासित या कॅम्पांत आहेत ? " मी त्याला विचारलें.

" कां ? असतील एक लाख ! " संशयी नजरेनें आमच्याकडे पहात तुटकपणें त्यानें उत्तर दिलें. " तुम्ही कुणी सरकारी अधिकारी तपासणी करायला वगैरे आलां आहांत कीं काय ? "

" छे छे, आम्ही प्रवासी आहांत, " असें म्हणून आम्हीं तिथून काढता पाय घेतला.

## अविस्मरणीय मारवाडी रात्र

आतां काळोख पडत होता. मळकट लोक, मळकट कपडे, मळकट जमीन आणि आतां आकाशहि मळकट होऊं लागलें होतें. स्टेशनांत परत आलों तेव्हां

काळोख पडला होता आणि या टोकापासून त्या टोकापर्यंत सर्वत्र शुकशुकाट झाला होता. रात्रीं बारा-एक वाजेपर्यंत गाडी नसल्यामुळें स्टेशनमास्तर, कारकून, हमाल, फेरीवाले तिथें कुणीच नव्हते. सबंध स्टेशनांत कुठें दिवा नव्हता. तो गुडुप काळोख आणि भयानक शुकशुकाट यामुळें कसेंसेंच वाटूं लागलें. वेटिंगरूममधल्या दोन आरामखुर्च्या बाहेर ओढून आम्हीं बोलत बसलों; पण फारसें बोलवेंसेंहि वाटेना. कुठें पाय वाजले तरी काय होईल आणि काय नाहीं असें वाटूं लागलें. लांब मिशांचे आंकडे वळविलेला आणि तंग तुमान आणि सदरा घातलेला, नाटकांतल्या खलपुरुषासारखा दिसणारा एक उंच, किड-किडीत माणूस कांहीं वेळानें तिथें आला आणि आमच्याकडे नजर टाकून वेटिंगरूममध्यें शिरला. पहिल्यांदा तो कोण आहे हें समजलेंच नाहीं. काडयांची पेटी काढून वेटिंगरूममधला दिवा तो लावूं लागला तेव्हां तो वेटिंगरूमचा अटेंडन्ट आहे हें समजलें आणि जीव खालीं पडला. वेटिंगरूम-मधल्या दिव्याला कांचेची चिमणी नव्हती. तेव्हां काकडयासारखी दिव्याची वात ढणाढणा पेटत होती आणि तिचा थरथरणारा तांबडा पिवळा प्रकाश आणि त्याबरोबर वेटिंगरूमच्या भकास भिंतींवर नाचणाऱ्या छाया यामुळें वातावरण अधिकच विकट वाटूं लागलें. मधून-मधून छपरावरून कुणीतरी चाललें आहे असे ' कुड कुड कुड कुड ' ' खुड खुड खुड खुड ' आवाज



वेटिंगरूमचा अटेंडंट

ऐकूं येत होते. इकडे तिकडे पाहिलें. कांहीं लक्षांत येईना. इतक्यांत एक दोन पाकोळ्या तीरासारख्या कुठून तरी आल्या, आणि स्टेशनाच्या भिंतींवर ठिकठिकाणीं लावलेल्या प्रेक्षणीय स्थलांच्या रंगीबेरंगी चित्रांच्या चौकटींमागें घुसल्या. या चौकटींमागें पाकोळ्यांनीं घरें केलीं होतीं. आणि त्यांच्या धडपडीचा तो कुड कुड खुड खुड आवाज सारखा चालू होता. वारा पडला होता. समोर दिसणारीं झाडपानें स्तब्ध होतीं. दुरून कुठूनतरी डुम डुम डुम डुम असे, आफ्रिकी चित्रपटांत जंगली जमातींच्या ढोलक्यांचे मंद गंभीर आवाज ऐकू येतात, तसे आवाज येऊं लागले. या ओसाड गांवांत कुणीतरी ढोलकें वाजवून होळीचा नाच करीत होते असें दिसतें. कांहीं वेळानें असाच दुरून कुठून तरी शंखाचा आणि देवळांतल्या घंटांचा आवाज ऐकूं येऊं लागला. या मंगल ध्वनींनीं ती अवजड स्तब्धता हलली तेव्हां, कां कुणास ठाऊक, मनाला बरें वाटूं लागलें. समोर पलीकडच्या रुळावर मालगाडीचे कांहीं डबे उभे होते. वर पाहिलें तों स्वच्छ निळ्या आकाशांत चार दोन तारे हिऱ्यासारखे चमकत होते. आणखी तारे क्षणाक्षणाला उजळणाऱ्या आकाशांत इकडेतिकडे पटापट डोकावूं लागले. मालगाडीच्या डब्यांना एकदम रुपेरी किनार दिसूं लागली, आणि डब्यामागून हळुहळू वर येणारें पूर्णचंद्राचें हंसतमुख दिसूं लागलें. जणूं विषण्णतेच्या सागरांतून प्रसन्नताच वर येत होती ! ते मालगाडीचे डबे, तीं स्तब्ध झाडपानें, तो एकाकी प्लॅटफॉर्म या सर्वांना आपल्या रुपेरी मायेंत पूर्णचंद्रानें गुरफटून टाकलें. तें मळकट गांव, ते कळकट लोक, तो गुडुप काळोख, ती अवजड स्तब्धता, आंकडेदार मिशांचा तो माणूस, ढणढणाऱ्या दिव्याचा तो विकट प्रकाश, त्या पाकोळ्या, तें डुमडुमणें, तो घंटानाद, आणि या सर्व वातावरणाला उजळून टाकणारा, मालगाडीच्या डब्यामागून झालेला तो पूर्णचंद्रोदय—ही मारवाडी रात्र मी कधींहि विसरणार नाहीं !

रात्रीं बारा साडेबाराला स्टेशन जागें झालें. गाड्या येण्याची वेळ झाली होती. गॅसचे दिवे ठिकठिकाणीं लागले. हमालांची वर्दळ सुरू झाली. वेटिंगरूममधल्या बांकावर बेडिंगला टेकून आम्ही डुलक्या घेत होतों. आंकडेदार मिशांचा तो नाटकांतल्या खलपुरुषासारखा दिसणारा

अटेंडन्ट, आतां केशरी रंगाचा लफ्फेदार रजपूत फेटा बांधून आणि काळ्या रंगाची लांब शेरवाणी घालून फिरत होता. "जोधपूरची गाडी आतां येईल, तिला उदयपूरचा एक डबा असतो. त्यांत तुम्हांला भरपूर जागा मिळेल. मी तुमची सर्व व्यवस्था करतों," असें म्हणून त्यानें आम्हांला उठविलें. कांहीं वेळानें गाडी आली. उदयपूरच्या कंपार्टमेंटमध्यें हमालाकडून आमचें सामान त्यानें ठेवविलें, आणि भरपूर 'टिप' दिली तेव्हां दरबारी सलाम ठोकून तो निघून गेला. हा डबा उदयपूरच्या गाडीला लागून गाडी सुटावयाला अजून दोन अडीच तास अवकाश होता. गाडी तीनला सुटायची होती. आतां कुठें पाऊण-एक वाजत होता. बेडिंग पसरून आम्ही झोंपीं गेलों.

२६ मार्च, १९४०.

## 'दोस्ताना' उदयपूर

सकाळीं सातच्या सुमाराला आम्ही जागे झालों. उदयपूर यायला अजून तीन चार तास असले तरी आतां गाडी उदयपूर संस्थानच्या प्रदेशांतूनच चालली होती. राणा प्रतापचे वडील राणा उदयसिंग यांना चितोडगड ही आपली राजधानी सोडावी लागली तेव्हां डोंगरांच्या रांगा आणि सरोवरें यांनीं वेढलेलें हें उदयपूर शहर त्यांनीं वसविलें म्हणतात.

अबू ते मारवाडपेक्षां वेगळा प्रदेश आतां भोंवतालीं दिसत होता. मध्यें लागणाऱ्या स्टेशनांच्या आवारांत आणि इतरत्रहि, आपल्या बाजूला जशा पहावें तिथें चिमण्या दिसतात तशा इथें जिकडे तिकडे साळुंक्या दिसत होत्या. आपल्याकडल्या साळुंक्यांच्या चोंची पिवळ्या असतात आणि त्यांच्या कानाकडले ठिपकेहि पिवळेच असतात. इथल्या साळुंक्यांचा विशेष म्हणजे त्यांच्या चोंचींचा रंग तांबूस गुलाबी आणि कानावरले ठिपकेहि तांबूस गुलाबीच. गाडीच्या खिडकींतून बाहेर पहात असतां कांहीं ठिकाणीं गुलाबी चोंच असलेले राखी रंगाचे चिमुकले बगळेहि मला खूप दिसले. बगळे दिसतात म्हणजे जवळपास पाणी असलें पाहिजे. वाळवंट संपलेलें दिसतें.



उदयपूरची एक गली

कांहीं वेळानें लावा सरदारगड नावाचें एक स्टेशन आलें; आणि दूर अंतरावर आजूबाजूला डोंगर, झाडेंझुडपें कांहीं नाहीं, मध्येंच सपाट जमिनीवर एक टेकडी आणि तिच्यावर एखाद्या चित्रांतल्या किल्ल्यासारखा सकाळच्या सोनेरी सूर्यप्रकाशांत चमकणारा एक चिमुकला किल्ला दृष्टीला पडला. उदयपूरच्या राण्यांच्या एखाद्या मांडलिक ठाकुराची ती गढी असावी.

साडे नऊच्या सुमाराला मावली जंक्शन आलें. इथून तास पाऊण तासांत उदयपूर. उदयपूरभोंवतीं डोंगरांचें कडें आहे. दोन डोंगरांच्या मधल्या एका खिंडींत तटबंदी केलेला एक प्राचीन दरवाजा आहे. दरवाजाजवळच एक प्राचीन देवालयहि आहे. जवळून आगगाडी जाते. हा दरवाजा ओलांडल्यावर उदयपूर आलें असें आम्हाला वाटलें. पण स्टेशन अजून बरेंच दूर होतें. अजूनहि खूपसा डोंगराळ प्रदेशच दिसत होता.

एक मुसलमान व्यापारी आमच्या डब्यांत होता.

" उदयपूरला कसला व्यापार चालतो ? " मी त्याला विचारलें.

" उदयपूर हें कांहीं मोठेंसें व्यापारकेंद्र नाहीं, " तो म्हणाला, " चितोड-गडच्या आसपासच्या प्रदेशांत कापूस बराच होतो. लसूण फार स्वस्त आहे. कांदा आणि खसखसहि या मेवाड प्रदेशांत पिकतात. "

आणखीहि कांहीं माहिती त्यानें सांगितली. 'सध्यांचे उदयपूरचे महाराज भूपालसिंग यांचे वडील फत्तेसिंग यांनीं पहिल्या म्हणजे १९१४–१८ च्या महायुद्धांत ब्रिटिश सरकारला चांगली मदत केली म्हणून त्यांना स्वतःचीं नाणीं पाडण्याचे अधिकार ब्रिटिश सरकारनें बहाल केले. या नाण्यांच्या एका बाजूला ' दोस्ताना ' अशीं अक्षरें असतात. उदयपुरचे राणे कधींच कुणाला शरण गेले नाहींत. ब्रिटिशांचा आणि आपला दोस्तीचा तह झाला, असें त्यांचें म्हणणें. म्हणून नाण्यावर हें ' दोस्ताना ' !

## ' मधुर ताम्बूल भुवन '

उदयपूरच्या टांग्यांतली व्यवस्था मला आवडली. टांगे ओबडधोबड पण चांगले रुंद असतात, आणि बैठकीखालची फळी वर करून बॅगा किंवा ट्रंका आंत सरकवून ठेवतां येतात. उदयपूर स्टेशनांत आम्हाला मिळालेला गफूर टांगेवाला ही एक वल्ली निघाली. तुळतुळीत दाढी केलेली, कोरीव मिशी, केसांचीं झुलपें मागें वळवलेलीं, मोठा तरतरीत माणूस वाटला. ' लेक व्ह्यू ' हॉटेलमध्यें आम्हाला जायचें होतें. हें काय, तें काय, म्हणून गफूरला आम्ही विचारीत होतों. मुंबईत सर. . .कडे कांहीं दिवस आपण नोकरीला होतों म्हणून त्यानें सांगितलें. मुंबईचें पाणी दिसतच होतें त्याच्या तोंडावर. एका छानदार

बंगल्याकडे बोट दाखवून तो म्हणाला, "याचा मालक नुकताच्च मेला. खूप पैसा होता त्याच्याजवळ. साठपासष्टाव्या वर्षी, दोन्ही डोळे गेले होते तरी त्या वयांत त्यानें एका अठरा वर्षांच्या मुलीशीं लग्न केलें."

"दोन मुलंहि झालीं!" डोळे मिचकावून तो पुढें म्हणाला, "त्या दोन मुलांसह ती विधवा इथं रहाते!"

"अरे, तुमचं उदयपूर संस्थान आतां जोधपूर, जयपूर वगैरे मिळून जो राजस्थान संघ होणार त्यांत विलीन होईल, त्याचं काय वाटतं तुला?" मी मुद्दाम गफूरला विचारलें. उदयपूरचा राणा या संघांत विलीन व्हायला कबूल नाहीं, असें वर्तमानपत्रांत मी वाचीत होतों. उदयपूरच्या एका सामान्य टांगेवाल्याला याबाबत काय वाटतें तें मला पहायचें होतें.

"बहोत खराब होगा, साब!" तो म्हणाला.

"कां रे?" मी विचारलें.

"आज बरं आहे. आमचे लोक आम्हीं ओळखतों. उद्यां हें मोठं थोरलं प्रकरण झाल्यावर कोण अधिकारी येईल नी काय करील कुणाला ठाऊक!" त्यानें उत्तर दिलें. लहान विकेंद्रीकृत घटकांत अधिक लोकशाही असते, हें नकळत टांगेवाल्यानें ओळखलें आहे म्हणायचें!

रस्त्यांत कांहीं इमारतींवर दिसणाऱ्या पाट्या लक्ष वेधून घेणाऱ्या होत्या. 'राज्यकुक्कुटशाला'-('गव्हर्मेंट पोल्ट्री फार्म'); 'बीज भाण्डार'-('सेंट्रल सीड फार्म'). एका पानपट्टीच्या दुकानावर 'मधुर ताम्बूल भुवन' अशी पाटी होती!

## टांगेवाला जादा हुषार निघाला!

साऱ्या उदयपूर शहराभोंवतीं उंचच उंच दगडी भिंतीचा प्रचंड तट आहे. चितोडगड सोडून डोंगरांच्या नैसर्गिक तटबंदींत हें शहर वसविलें तेव्हांच हा तट बांधलेला असावा. डोंगरांच्या खिंडींतून शत्रू घुसलाच आंत, तर या दुसऱ्या तटबंदीवर त्याला थोपवून धरायचा. अजूनहि रात्रीं साडे अकराला तोफ होते आणि या तटाचे दरवाजे बंद होतात. तटाबाहेरहि आतां

वस्ती झाली आहे. गांवांतला माणूस बाहेर आला आणि रात्रीं साडे अकरा वाजून गेले तर सकाळीं साडे पांच वाजतां तटाचे दरवाजे उघडेपर्यंत त्याला गांवांत बरीं जातां येणार नाहीं ! आमचें 'लेक व्ह्यू' हॉटेल गांवाबाहेरच्च 'स्वरूपसागर' सरोवराच्या कांठीं होतें. असे किती तरी 'सागर' –फतेसागर



'स्वरूपसागर' तलाव, उदयपूर

उदयसागर, पिछोला,–उदयपुरांत आहेत. हुषार टांगेवाला मिळाला म्हणून आम्ही खूष होतों, पण तो जादा हुषार निघाला. हॉटेलमध्यें आम्हीं पोहोंचल्या-वर तो म्हणाला, दुपारीं गांव बघायला तुम्हाला टांगा लागेलच. हॉटेल खूप दूर एका बाजूला होतें, आणि दुसऱ्या कोणत्या वाहनाची सोय नव्हती. तेव्हां आम्ही होय म्हटलें; आणि हॉटेलच्या मॅनेजरच्या सल्ल्यानें भाडें निश्चित करून दुपारीं तीन ते संध्याकाळीं सात दोन दिवस त्यानें आम्हाला फिरवायचें आणि गांवांतलीं निरनिराळीं स्थळें दाखवायचीं असें ठरलें. दुपारीं बरोबर तीनच्या ठोक्याला गफूर टांगा घेऊन आला. चहापाणी घेऊन, कपडे करून आम्ही निघालों. मुंबईतल्या राणीच्या बागेसारखी 'गुलाबबाग' म्हणून एक

सं. नं. मु. प्र. ७८७

बाग उदयपुरांत आहे. तिथें एक वस्तुसंग्रहालयहि आहे. या बागेंत पहिल्यांदा जायचें ठरलें. गांवांतल्या बोळांतून गफूर टांगा नेत होता. गलिच्छ वस्तींतल्या एका घाणेरड्या बोळाच्या तोंडाशीं टांगा उभा करून 'हा आलोंच पांच मिनिटांत!' असें म्हणून तो निघून गेला. पंधरावीस मिनिटांनीं गालफडें बसलेला, अंगावर मळकीं लक्तरें लोंबत असलेला एक भुकेकंगाल दिसणारा म्हातारा बरोबर घेऊन तो आला.



उदयपूरच्या राजवाड्यांतील कारकून

## सकाळींच 'घेऊन आलेला' म्हातारा

"हा नेईल तुम्हांला हवं तिकडे," तो म्हणाला, "आतां मला जरा दुसरीकडे जायचंय्. उद्यां मी येईन."

"हा काय गांव दाखवणार आम्हाला? काय रे?" त्या म्हाताऱ्याकडे पहात मी म्हणालों.

“दाखवील, दाखवील, साहेब. त्याला सर्व कांहीं माहीत आहे,” असें म्हणत गफूर त्या म्हाताऱ्याला टांग्यावर बसवूं लागला.

“साहेब, मला आधीं एक आठ आण्याचे पैसे द्या!” तो म्हातारा दीन-वाण्या सुरांत म्हणाला.

“छे, छे. त्याला कांहीं देऊं नका. त्याला काय द्यायचें तें मी देईन,” गफूर म्हणाला, “उद्यां मीच येणार आहें!” दोन्ही दिवसांचे पैसे सर्व कांहीं पाहून आल्यावर दुसऱ्या दिवशीं द्यायचें ठरलें होतें. “आम्हाला नको तुझा टांगा” असें म्हणून आम्ही रागावून उतरूं लागलों; पण गफूरनें गयावया करून आम्हाला बसायला लावलें. आणि त्या म्हाताऱ्याला ‘बोलूं नको. बस!’ म्हणून टांगा हांकायला सांगितला. त्या घाणेरड्या गल्लींतून कडक उन्हांत दुसरा टांगा पहायला जायचें कुठें, असा विचार करून चडफडत आम्ही स्वस्थ राहिलों.

तो म्हातारा वाटेल तसा टांगा हांकीत होता; एकदां या बाजूला तर एकदां त्या बाजूला वळवीत होता. घोड्यांना शिव्या देत होता. मध्येंच गाणें गुण-गुणत होता. चार आणे तरी मला द्या, अशी मधून मधून त्याची वटवट चालूच होती. कांहीं तरी बोलण्यासाठीं तो मागें वळला. त्याबरोबर वसकन् दारूच्या घाणीचा भपकारा आला.

“तूं तर दारू प्यालायस्!” मी त्याला दरडावलें.

“नाहीं, साहेब—”

“नाहीं काय?”

“थोडीशी सकाळीं घेतली होती!”

## झुकांडी

गफूरचा सर्व डाव आमच्या लक्षांत आला. टांगा हांकायची माहिती असलेल्या या बेकार कंगालाला आठ बारा आण्यांची दारू पाजून त्यानें आमच्या दिमतीला दिला होता. संध्याकाळीं आणखी चार आठ आण्यांची दारू पाजून त्याला वाटेला लावायचा. दुसरा टांगा घेऊन त्या दिवसाची आपली रोजची कमाई करायची ती करायचीच, असा त्याचा बेत होता हें उघड होतें. काय


करावें तें आम्हाला सुचत नव्हतें. पण थोडयाच वेळांत चांगली संधि चालून आली. गुलाबबागेंत आम्ही पोहोंचलों आणि वस्तुसंग्रहालयाच्या पायऱ्यांपाशीं त्यानें टांगा उभा केला. अर्ध्या पाऊण तासांत संग्रहालय पाहून आम्ही बाहेर येतों, असें सांगून आम्ही आंत गेलों. अर्ध्या तासानें बाहेर येऊन पहातों तों तो कंगाल टांग्यांत आडवा होऊन डाराडूर घोरत पडला होता. रिकाम्या पोटावर घेतलेली दारू त्याच्या चांगलीच मस्तकांत गेली होती. त्याला तसा पाहून एकदम एक कल्पना माझ्या डोक्यांत आली. दलालांना मी म्हटलें, " याला इथें असाच सोडून आपण तडक आतां बाहेर पडूं या ! दुसरा टांगा मिळाला तर ठीक आहे; नाहीं तर पायीं गांवांत फिरूं आणि मग एखादा टांगा घेऊन हॉटेलांत जाऊं. एखाद्या गांवांत पायीं खूपसें फिरल्याशिवाय त्या गांवाची नीटशी कल्पना येत नाहीं. " दलालांना तें पटलें आणि आम्ही बागेच्या बाहेर चालायला लागलों. काळोख पडून बागेंत सर्व सामसूम झाल्यानंतर तो म्हातारा किती तास तिथें घोरत राहिला, केव्हां जागा झाला, गफूरला त्यानें काय सांगितलें, याची कांहींच कल्पना नाहीं. कदाचित् त्या रात्रीं किंवा दुसरे दिवशीं सकाळीं ' काय झालें '? म्हणून विचारायला गफूर हॉटेलांत येईल असें आम्हांला वाटलें होतें. पण त्यानें पुन्हां तोंड दाखवलें नाहीं. तो हुषार माणूस होता. काय समजायचें तें तो समजला !

## संग्रहालयांत ठेवण्यासारखें संग्रहालय !

उदयपूरचें संग्रहालय मात्र एखाद्या संग्रहालयांत ठेवण्याच्या लायकीची चीज आहे ! लहानसेंच संग्रहालय आहे; पण वाटेल तें वाटेल तिथें ठेवलें आहे. एका मोठ्या थोरल्या कांचेच्या चौकोनी पेटींत खऱ्याखुऱ्या घोड्याइतक्या उंचीचे घोड्याचे स्नायू, हाडें, मेंदू वगैरे दाखविणारें घोड्याचें लाकडी मॉडेल आहे. त्याच पेटींत या मॉडेलच्या पायाशीं महाराणा प्रतापसिंगाचें चिलखत पडलें आहे ! पेंढा भरून ठेवलेल्या एका जनावराच्या पायांना रंगीत कागदी फुलांच्या माळा बांधलेल्या दिसल्या. उत्खनन करून काढलेल्या कांहीं प्राचीन अवशेषांच्या पेटींतच पेंढा भरलेलें दोन डोक्यांचें वासरूं होतें ! मौल्यवान् प्राचीन रजपूत चित्रांच्याच जोडीला व्हिक्टोरिया राणीच्या

दरबाराचीं—चांगल्या चित्रकारांनीं काढलेलीं नव्हे, तर कॅलेंडरांवर असतात तसलीं—सवंग चित्रें !

बागेंतून बाहेर पडल्यावर पायींच भटकायचें आम्ही ठरविलें. बहुतेक गल्ल्यांतलें उघडें गटार तुंबलेलें, आणि रस्ते धुळकट, चिखल, घाण, माशांनीं



उदयपुरांतील कुठल्याहि भिंतीवर दिसणारें चित्र

भरलेले आढळले. उदयपुरांतल्या घरांचा मात्र एक ठरलेला नमुना आहे. पांढरा चुना फासलेल्या भिंती आणि गणपतीच्या कोनाड्यासारख्या छोट्या छोट्या कमानदार खिडक्यांचे प्रत्येक मजल्यांचे रस्त्यावर पुढें आलेले सज्जे. बऱ्याचशा दुकानांच्या आणि घरांच्या रस्त्यावरून दिसणाऱ्या भिंतींवर निळ्या आणि तांबड्या रेघोट्यांनीं हत्तीवर किंवा घोड्यावर बसलेल्या महाराणा प्रतापच्या आकृती काढलेल्या दिसल्या.

**'...होगा वही जो पटेल रचि राखा !'**

वाटेंत एक पोऱ्या एक हिंदी वर्तमानपत्र विकीत असलेला दिसला. उदय-

पुरांतच निघणारें तें दोन पानांचें एक टीचभर दैनिक होतें. उदयपूरचें राजकारण काय आहे तें तर पाहूं, या हेतूनें तें पत्र आम्ही विकत घेतलें. पत्राचें



उदयपूरचे व्यक्तिविशेष

नांव ' जनसंदेश ' ! पहिल्या पानावर ढळढळीत जाड टायपांत पांच कॉलमी मथळा होता, " **चाहे कुछ हो जाय, होगा वही जो पटेल रचि राखा !** " तुलसीदासाच्या रामायणांत ' को करि तर्क बडा वहि शाखा, होगा वहि जो रामचंद्र रचि राखा ' अशा ओळी आहेत. त्यांत रामचंद्रा-

ऐवजीं पटेल घालून हा मथळा दिलेला होता. वल्लभभाई पटेलांच्या विरुद्ध वातावरण बरेंच प्रक्षुब्ध झालेलें आहे. राजस्थान संस्थानी संघाची राजधानी जयपूर होणार कीं जोधपूर कीं उदयपूर, यासंबंधीं या संस्थानांत मोठी खळबळ उडाली आहे. त्याचप्रमाणें जयपूरचे महाराज राजप्रमुख कीं उदयपूरचे, हाहि कडाक्याच्या वादाचा विषय आहे. जोधपूर, जयपूरच्या राजघराण्यानें आपल्या बहिणी, मुली एके काळीं मोंगलांना दिल्या होत्या. राणा प्रतापच्या उदयपूरनें शेवटपर्यंत कुणापुढें मान वांकविली नाहीं. तेव्हां राजधानी उदयपूर व्हावी आणि राजप्रमुख उदयपूरचे महाराज व्हावे अशी उदयपूरवाल्यांची मागणी आहे. जयपूर श्रीमंत, पुढारलेलें आणि वल्लभभाईंच्या मर्जीतलें; तेव्हां शेवटीं जयपूरचाच वशिला लागणार अशी सर्वांची खात्री आहे. म्हणून 'होगा वही जो पटेल रचि राखा'!

ता. १७ मार्च, १९४९

रात्रीं नीटशी झोंप आली नाहीं. गुदमरल्यासारखें होत होतें. वारा मुळींच नव्हता. चित्रांतल्या झाडासारखीं झाडें स्तब्ध होतीं. खाटा बाहेर गॅलरींत ओढून आम्ही झोपलों होतों, तरीहि उकडत होतें. हॉटेलच्या शेजारच्या 'स्वरूपसागर' तळ्यांतल्या पाणकोंबडयांचा 'कुकुड् कुंब् कुकुड् कुंब्' आवाज रात्रभर चालला होता. जरा कुठें डोळा लागला तर मध्येंच एखादा पक्षी कर्कश आवाजांत किंचाळायचा, आणि झोपमोड करायचा! पहांटे थोडी झोंप लागली; पण थोडयाच वेळानें 'धॉब धॉब् धबड् धॉब' 'धॉब धॉब् धबड् धॉब' अशा तळ्याकडून येणाऱ्या आवाजांनीं जागा झालों. अजून नीटसें उजाडलें नव्हतेंच. गॅलरीच्या टोंकाला जाऊन पाहिलें. तळ्याच्या कांठीं ठिकठिकाणीं शेंकडों बायका कपडे धुताहेत आणि बडवताहेत! हा काय प्रकार म्हणून चवकशी करतां, हजारों सिंधी निर्वासितांचा कॅंप गांवांत आहे, तिथल्या बायका सकाळींच इथें येऊन स्नान करतात आणि धुणीं धुतात, असें कळलें.

आमच्या हॉटेलजवळच्या या ‘ स्वरूपसागर ’ तळ्याच्या पलीकडे एका लहानशा टेकडीला वळसा घालून गेलें कीं ‘ फत्तेसागर ’ नांवाचें सरोवर आहे. सकाळचा चहा झाल्यावर फिरत फिरत आम्ही त्या बाजूला गेलों. तळ्याच्या कांठीं तुकतुकीत काळ्या पायांचे पांढरे बगळे दिसले. पण या बगळ्यां-पेक्षांहि सुंदर, दुसरी एक कबूतरापेक्षां किंचित् मोठ्या अशा चिमुकल्या बगळ्यांची जात मला इथें आढळली.



मुसलमान स्त्रिया, उदयपूर

## ‘ पिछोला ’ तळ्याच्या कांठचा जुना राजवाडा

या चिमण्या बगळ्यांचे पंख राखी आणि पाय गुलाबी रंगाचे होते. हे पक्षी पहात असतां एका बाजूला एक मजेदार दृश्य दिसलें. कांठाजवळच्या अगदीं उथळ पाण्याच्या एका डबक्यांत एक साळुंकी आणि एक कबूतर चोंचीनें अंगावर पाणी शिंपडीत आणि पंख फडफडावीत एकत्र आंघोळ करीत होतीं. वेगळ्या जातीचे पक्षी असे पाण्यांत एकत्र खेळीमेळीनें आंघोळ करीत अस-लेले मी पूर्वीं कधीं पाहिलेले नव्हते. फिरून आल्यानंतर स्नान वगैरे उरकून उदयपूरचे महाराज रहातात तो ‘ पिछोला ’ तळ्याच्या कांठचा जुना राजवाडा पहावयाला गेलों. उदयपूरचे संस्थापक राणा प्रतापचे वडील राणा उदयसिंग यांनीं चारशें वर्षांपूर्वीं हा बांधला असें सांगतात. प्रचंड किल्ल्यासारखा उंच उंच बुरूज असलेला हा केवढा तरी अफाट राजवाडा आहे. महाराज राहतात ती बाजू सोडून बाकी सर्व राजवाडा राजवाड्याचे शिपाई दाखवतात. डोक्यावर

मारवाडी पद्धतीची पगडी, खालीं नाना फडणीसासारखा पायघोळ मलमलीचा अंगरखा आणि कमरेला तलवार, या वेषांत हे शिपाई जरा कसेसेच दिसले. दिंडी दरवाजांतून आंत गेल्यावर मुख्य दरवाजाच्या कमानीवर रुपेरी वर्ख लावलेली गणपतीची मूर्ति दिसली. पहिल्याच दालनांत एका भिंतीवर उगवत्या सूर्याची सोन्याची प्रतिमा आहे, आणि प्रतिमेच्या दोन्ही बाजूंना प्राचीन रजपूत पद्धतीनें काढलेलीं रजपूत स्त्रियांचीं सुंदर चित्रें आहेत. उदयपूरचे राणे स्वतःला सूर्यवंशी म्हणवतात, आणि म्हणूनच राजवाड्याच्या प्रवेशाशींच हें सूर्यमंदिर आहे. बाजूच्या चित्रांतल्या रजपूत स्त्रियांच्या वस्त्रांवरलें रंगकाम इतकें सुंदर आहे कीं, मुद्दाम कुणी सांगेपर्यंत हीं खरोखरीचीं तलम रेशमी वस्त्रें नाहींत, हें रंगकाम आहे, हें खरें वाटत नाहीं. राजवाड्याच्या एका भागांतला 'शीशमहाल' दोनशें पंचावन्न वर्षांचा जुना आहे, असें राजवाडा दाखवणाऱ्या जमादारानें सांगितलें. चारी भिंतींवर आणि छतावर आरशाचे बारीक बारीक तुकडे बसवून रंगीबेरंगी मीनाकाम केलें आहे. पण या प्राचीन राजवाड्यांतला सर्वांत विस्मयकारक भाग म्हणजे एके ठिकाणीं चौथ्या मजल्यावर असलेली बाग होय. बाग म्हणजे साधी फुलबाग नव्हे, तर मोठमोठीं वृक्षझाडें आहेत अशी बाग. त्या बाजूला खालपासून तिसऱ्या मजल्यापर्यंत माती भरून ही बाग केली आहे. वरून खालीं पाहिलें कीं आपण चौथ्या मजल्यावर आहों हें कळतें. प्राचीन काळीं उदयपूरचे राणे उन्हाळ्यांत इथें विश्रांति घेत. अखंड संगमरवरी दगडांतून कोरलेलें पांच सहा फूट लांबी-रुंदीचें एक आसन या बागेंत आहे.

राजवाड्याच्या मागल्या बाजूच्या पायऱ्या उतरून 'पिछोला' तळ्याकडे जात असतां राजवाड्याच्या कांहीं दालनांतून मारवाडी पगड्या घातलेले खतावण्या घेऊन बसलेले बरेच लोक दिसले. संस्थानी कारभाराच्या बऱ्याचशा कचेऱ्या इथें असल्याचें कळलें. राजवाड्याच्या पिछाडीला असलेल्या 'पिछोला' तळ्यांत सुंदर चिमुकलीं बेटें आहेत. कांहीं बेटांवर छोटे छोटे राजवाडे आहेत. तिथें होडींतून जावें लागतें. सुंदर कोरीव काम असलेली एक मोठी थोरली नौका तळ्यांत नांगरून पडलेली दिसली. नौकेच्या एका टोकाला उंच भागावर सिंहासनासारखें एक आसन होतें. शिणगारे नांवाच्या



आणखी कांहीं व्यक्ति, उदयपूर

विशिष्ट सणाच्या दिवशीं महाराज आणि दरबारचे मानकरी यांची या नौकेंतून मोठी मिरवणूक निघते.

## मारवाड्यांचें रंगप्रेम

लाल, पिवळ्या, हिरव्या, जांभळ्या, भडक रंगांचीं वस्त्रें परिधान केलेल्या मारवाडी बायकांचे कितीतरी घोळके गाणीं म्हणत रस्त्यांतून जातांना

दिसले. होळीच्या सणाचे दिवस असल्यामुळें या बायका देवळांत किंवा नातेवाइकांकडे समारंभाकरतां अशा मिरवत जात असाव्या. आनंदाचा प्रसंग असो कीं दुःखाचा असो, गात गात मिरवणुकीनें जायचें अशी मारवाडी बायकांची पद्धत दिसते. सकाळीं 'स्वरूपसागर'च्या काठीं फिरत असतां असाच एक तोंडावर घुंगट ओढलेल्या मारवाडी बायकांचा थवा समोरून गाणीं म्हणत येतांना दिसला. तळ्याच्या कांठाशीं एका झाडाखालीं त्या सर्व जणी येऊन बसल्या, आणि गळा काढून रडूं लागल्या. चवकशी करतां कळलें कीं, त्या दिवशीं कुणा तरी मृत नातेवाइकाचें कांहीं क्रियाकर्म तिथें असावें. राजवाड्यांतहि वर जातांना एका बाजूच्या चौकांत असाच रंगीबेरंगी वस्त्रांतल्या शेंदोनशें मारवाडणींचा समुदाय गात बसलेला दिसला होता. होळीच्या सणानिमित्त महाराणीसाहेबांच्या दर्शनाला शहरांतल्या स्त्रिया आल्या होत्या असें कळलें. राजपुतान्याच्या या ओसाड, भकास, रंगहीन प्रदेशांत भडक फुलपांखरी रंगाचे कपडे वापरावेसें या मारवाडी स्त्रीपुरुषांना वाटावें हें अगदीं साहजिक आहे, असें मला वाटतें.

## 'राष्ट्रीय' मि. शम्सुद्दीन

संध्याकाळीं फिरून परत येत असतां वाटेंत एक मारवाडी पगडी घातलेला माणूस एक जीप गाडी ऐटींत हांकीत असलेला दिसला. त्याला पाहून पळीपंचपात्रीसह सायकलवरून जाणाऱ्या एका भटजीला मी पुण्याच्या रस्त्यांत पाहिलं होतें तेव्हां मला वाटलें तसें कांहीं तरी वाटलें !

रात्रीं जेवण झाल्यावर हॉटेलचे मॅनेजर मि. शम्सुद्दीन यांच्याशीं बोलत बसलों होतों. त्यांच्या आजोबांनीं संग्रहित केलेलीं जुनीं रजपूत पद्धतीचीं दोन-अडीचशें दुर्मिळ चित्रें त्यांनीं विकावयाला काढलीं आहेत, तीं पाहिलीं. वीस ते सव्वाशेंपर्यंत एकेकाची किंमत आहे. शम्सुद्दीनसाहेबांचें राजकारणांतहि लक्ष दिसलें. पाकिस्तान होण्यापूर्वी त्यांचीं मतें काय होतीं कुणाला ठाऊक, पण आतां नेहरूंच्या राष्ट्रीय सरकारला त्यांचा पूर्ण पाठिंबा दिसला. पांच वर्षे तरी पक्षभेद विसरून सर्वांनीं या सरकारला पाठिंबा दिला पाहिजे, असें ते म्हणाले. पाकिस्तानमध्यें गेलेल्या आपल्या मित्रांचा भ्रमनिरास झाल्याचें

त्यांनीं सांगितलें. "माझी खात्री आहे," ते म्हणाले, "सात वर्षांत हिंदुस्थान व पाकिस्तान पुन्हां एक होतील!" सरकारला दोष देत बसणें बरोबर नाहीं, असें सुरवातीला ते म्हणाले होते खरे, पण बोलतां बोलतां ते आणि त्यांना भेटायला आलेला व्हेटर्नरी डॉक्टर असलेला त्यांचा एक मुसलमान मित्र, महागाई, काळाबाजार वगैरेबद्दल सरकारवर सडकून टीका करूं लागले! या आमच्या उदयपूर शहरांत तुम्हांला आतां हव्या तर दहा लाख साखरेच्या गोणी काळ्या बाजारांत मिळतील,—ते म्हणाले!

रात्रीं बराच वेळ सामानाची बांधाबांध करण्यांत गेला. उद्यां सकाळीं चितोडगडला जायला निघायचें.

ता. १८ मार्च, १९४९

सकाळीं आठच्या आंत उदयपूर स्टेशनांत जाऊन पोहोंचलों. चितोडगडला जाणारी गाडी बरोबर सव्वा आठला निघाली.

डब्यांतल्या लोकांच्या गोष्टी राजस्थानसंघ आणि उदयपूर, जोधपूर, जयपूर, बिकानेर वगैरेंच्या विलीनीकरणासंबंधींच चालल्या होत्या. एकंदरींत मोठें संघराज्य नको, लहान लहान वेगळे घटक आहेत तेच बरे, असा सूर वहात होता. चितोडगडला एक पोलीस ट्रेनिंग स्कूल आहे. तिथें जाणारे दोन तगडे तरुण डब्यांत होते. त्यांपैकीं एक पदवीधर होता. त्याच्याशीं बोलतांना तो म्हणाला, "विलीनीकरणानें होणार काय, माहीत आहे? आज उदयपुरांत आम्हाला खाण्यापिण्याची विशेष ददात नाहीं. उदयपूरची जमीन तशी सुपीक आहे. जोधपूर, बिकानेर म्हणजे तीन चतुर्थांश वाळवंट! हे ओसाड प्रदेश आणि उदयपूर मिळून मोठें थोरलें संघराज्य होणार, म्हणजे आमची एक भाकरी चौघांत वाटली जाणार!"

## अंतःकरण थरारून टाकणारा इतिहास

दुपारीं साडे बाराचा सुमार झाला होता. दूर आकाशाच्या पार्श्वभूमीवर डोंगरांच्या रांगा आणि त्यावर लांबच लांब पसरलेली किल्ल्याची तटबंदी

दिसूं लागली. तटबंदीच्या मध्येंच एक उंचच उंच स्तंभ दिसत होता. ह्याच तो इतिहासप्रसिद्ध चितोडगड,—कुणी तरी म्हणालें,—तो उंचच उंच दिसतो तो राणा कुंभानें बांधलेला विख्यात विजयस्तंभ. कथा, कादंबऱ्या, इतिहासांत वाचलेल्या अनंत अद्भुतरम्य स्मृतींचा कल्लोळ माझ्या डोक्यांत उठला. हिंदुस्तानांत खूप इतिहासप्रसिद्ध ठिकाणें असतील, आणि प्रत्येक ठिकाणीं कांहीं ना कांहीं अद्भुतरम्य इतिहासहि घडला असेल, पण चितोडगडच्या दगडादगडांत आणि धुळीच्या कणाकणांत जितका रोमांचकारी इतिहास भरून राहिला आहे तितका इतरत्र कुठेंच नसेल, असें मला वाटतें. कुणाहि भारतीयाचें अंतःकरण थरारून टाकील आणि अंग पुलकित करील असाच चितोडगडचा इतिहास आहे. अल्लाउद्दीन खिलजीला आरशांतून स्वतःचें रूपदर्शन देणारी पद्मिनी, बाप्पा रावळ, राणा संग्र, मोंगलांना त्राहि त्राहि करून टाकणारा स्वातंत्र्यवीर राणा प्रताप, त्याचा बंधु शक्तिसिंह, त्यांचे ते इमानी घोडे नाटक आणि चेटक, राणा कुंभ, त्याची राणी भगवद्भक्त मीरा, स्वतःच्या मुलाचा बळी देऊन राजपुत्राला वाचवणारी ती पन्ना दाई, 'केशरिया' परिधान करून 'जय एकलिंगजी!' गर्जना करीत रणकुंडांत उडी घेणारे ते रजपूत वीर, भडकत्या ज्वालांत 'जोहार' करणाऱ्या त्या रजपूत रमणी; —चितोडगडच्या दर्शनानें किती किती आठवणी डोळ्यांपुढें नाचूं लागतात!



पद्मिनी

गाडी चितोडगड स्टेशनांत शिरली तेव्हां पाऊण झाला होता. चितोडगड हें जंक्शन आहे. जवळच वैष्णवांचें प्रख्यात तीर्थक्षेत्र नाथद्वारा असल्यामुळें तिथून परतलेल्या मुंबई, अहमदाबाद वगैरे दूरदूरच्या ठिकाणच्या गुजराती यात्रेकरू कुटुंबांनीं पहिल्या आणि दुसऱ्या वर्गाच्या वेटिंग रूम्स भरून गेल्या होत्या. आम्हाला रात्रीं अकराच्या गाडीनें पुढें अजमेरला जायचें होतें. तोंपर्यंत चितोडगड आम्ही पाहून घेणार होतों. वेळ पुष्कळ होता. पण तीन चार वाजे-पर्यंत बाहेर पडणें अशक्य होतें. ऊन इतकें भयंकर कडक होतें कीं त्या आधीं बाहेर उन्हांत जाणें म्हणजे जोहार करण्यासारखेंच होतें ! वेटिंगरूममध्यें दोन तास काढणें प्राप्त होतें. पण बसावयाला जागा नव्हती. स्टेशनांतल्या रेस्टो-रांमध्यें जेवायला गेलों. तिथें मुळींच गर्दी नव्हती. तीन वाजेपर्यंत तिथेंच कसा तरी वेळ काढला.

## ही मशीद एका हिंदूनें बांधली आहे, बरं का !


चितोडगडावर अगदीं वरपर्यंत टांगा जाऊं शकतो. तीन वाजले तरी उनाच्या झळा कमी झाल्या नव्हत्या; पण सात वाजेपर्यंत काळोख पडायच्या आंत स्टेशनांत परत यावयाचें म्हणजे तीन वाजतां निघायलाच हवें होतें. चितोडगड केवळ युद्धोपयोगी किल्लाच नव्हता; ती राजधानी होती. साऱ्या तटबंदीचा परीघ सात मैलांचा आहे, आणि आंत महाल, मंदिरें, बागा, हौद सर्व कांहीं आहे. हल्लींच्या महाराजांचा एक राजवाडाहि वर गडावर आहे. पण तो पोलीस ट्रेनिंग स्कूलकरतां वापरतात. एक लहानसा बंगलेवजा, नवा राजवाडा, चितोडगडमध्यें आल्यास रहाण्याकरतां खालीं गांवांतल्या एका मोकळ्या जागेंत महाराजांनीं बांधला आहे. जाण्यायेण्याकरतां टांगा ठरवून आम्ही तीन वाजतां बाहेर पडलों. टांगेवाला सादीक नांवाचा सोळा-सतरा वर्षांचा हुषार आणि बोलका पोरगा होता. वाटेवरल्या निरनिराळ्या ठिकाणांची माहिती मोठ्या उत्साहानें तो आम्हाला देत होता. स्टेशनाच्या बाहेर एका जीर्ण इमारतींत एक किराणामालाचें मोडकें तोडकें दुकान, त्याच्या शेजारीं एक धुरकटलेलें चहाचें दुकान आणि त्याच्या बाजूला चार पांच मळकट मारवाडी पोरें शेव खात उभीं आहेत, चार पांच बाहेर रस्त्याकडे

पहात टिवल्याबावल्या करीत आहेत, पांच-दहा खालीं जमिनीवर बसून एका सुरांत कांहीं घोकीत आहेत, आणि त्यांच्या समोर मळकट फाटका कोट घातलेला, डोक्यावर मारवाडी फेटा असलेला एक माणूस उभा आहे असें दृश्य दिसलें. वर पाहिलें तों एक धुरकटलेली पाटी दिसली—' आदर्श विद्यालय ' ! वाटेंत एक लहानशी नदी लागली. नदीवरल्या जुनाट पुलावरून टांगा चालला होता. या नदीचें नांव गमेरी, आणि हा पूल अल्लाउद्दीन खिलजीचा मुलगा खिजर यानें बांधला,—सादीक म्हणाला. कांहीं वेळानें दोन्ही बाजूंना दुकानें असलेल्या छोट्याशा बाजारपेठेंतून आमचा टांगा बाहेर पडला. गांवांतलीं कांहीं घरें मागें टाकल्यानंतर गडाची चढण समोर दिसूं लागली. गांवठाणाच्या त्या घरांच्या गर्दीत मध्येंच उभ्या असलेल्या एका घुमटाकडे बोट दाखवून सादीक म्हणाला, " ही मशीद एका हिंदूनें बांधली आहे, बरं का ! "

## तोच तो हळदीघाट...

टांगा वर चढूं लागला. पहिल्या भव्य, चिरेबंदी, कमानदार दरवाजाजवळ राणा प्रतापचे पूर्वज बाप्पा रावळ यांच्या स्मरणार्थ बांधलेला चबुतरा आहे. त्याची मोडतोड झालेली दिसली. वाटेंत इतिहासांत गाजलेल्या जयमल आणि फता या दोन रजपूत सेनानींच्या फरसबंदी छत्र्या लागल्या. वर सपाटीवर जाऊन आम्ही पोहोंचलों तेव्हां तिथें उभ्या असलेल्या एका माणसाकडे बोट दाखवून सादीक म्हणाला, " हा इथला गाईड आहे. तो तुम्हाला सर्व कांहीं दाखवील ! " धोतराचा कांचा मारलेला आणि वर कुडतें घातलेला तो तरुण आमच्याजवळ येऊन बोलूं लागला. त्याचें नांव बन्सीलाल. " चितोडगडांत एकंदर आम्ही तिघेजण गाईडचें काम करतों, " तो म्हणाला, " तीन दिवसांनीं एकदां माझी पाळी येते. आज माझी पाळी आहे " सर्व कांहीं दाखविण्याकरतां गाईड सव्वा रुपया घेतो. " तुम्ही याच्याबरोबर फिरत मीराबाईच्या कृष्णमंदिराकडे या; तिथं मी टांगा उभा करून ठेवतों, " असें सांगून सादीक टांगा घेऊन गेला. आम्ही बन्सीलालबरोबर पुढें चालूं लागलों. एका वळणावर गडाची तटबंदी तोडून आणि कटडा घालून लांबरुंद गच्ची केली आहे. इथून सारें चितोड गांव आणि सभोंवारचा दूरपर्यंतचा प्रदेश दिसतो. दूर अंतरावर

डोंगराच्या रांगा आणि झाडी दिसत होती. "तो दिसतो तो हळदीघाट. हळदी-घाटचा तो घनघोर रणसंग्राम तिथंच झाला," बन्सीलाल म्हणाला, "दूर ते मोकळे माळ दिसतात तिथंच अल्लाउद्दीन खिलजी, बहादूरशहा, अकबर, यांच्याशीं राणा प्रताप आणि इतर रजपूत वीरांनीं झुंज दिली!"



इथें राणा प्रतापचा जन्म झाला...

पडके बुरूज असलेल्या एका वाड्याकडे बोट दाखवून बन्सीलाल म्हणाला, "या महालांत राणाप्रताप जन्मला." ठेंचाळत, धडपडत आम्ही आंत शिरलों. एका बाजूला दगडी खांबांची रांग आणि खांबांना गंजलेल्या कड्या दिसत होत्या. "इथेंच प्रताप आणि शक्तिसिंहाचे नाटक आणि चेटक हे दोन घोडे बांधलेले असत," बन्सीलाल म्हणाला, "त्यांच्या खुरांनीं खोलगट झालेली ही फरशी पहा!"

## 'महाराण्यांचा महाल'

एका बाजूला ढासळून पडलेला एक दगडी जिना आणि गवाक्षें असलेली एक भिंत दिसत होती. "हा महाराण्यांचा महाल," त्यानें सांगितलें. पूर्वाभिमुख असा एका पडका सज्जा दिसत होता. चितोडगडचे राणे सूर्यवंशी असल्यामुळें या सज्जावर उभे राहून रोज सकाळीं ते सूर्यपूजा करीत,


असें कळलें. पलीकडे जमिनींत एक भुयार दिसलें. त्याचें तोंड लोखंडी गज लावून बंद केलेलें होतें. हें भुयार अर्धा मैल लांब, नैसर्गिक झऱ्याच्या गोड पाण्याची गोमुखी आहे तेथपर्यंत जातें,—असें बन्सीलाल म्हणाला. आतां त्याचें तोंड बंद करून टाकलें आहे. याच भुयारांतून रजपूत राण्या पूजाअर्चा करण्याकरितां गोमुखीपर्यंत जात. 'केशरिया' परिधान करून रजपूत वीर रणांगणावर गेले कीं, अग्नि प्रज्वलित करून याच भुयारांत त्या 'जोहार' करीत.

पुढें एक जुनाट दगडी भिंत दिसली. आजूबाजूला रान वाढलें होतें. "बनवीर व उदयसिंग या दोन भावांचें भांडण झालें तव्हां ही भिंत घालून ते वेगळे झाले," बन्सी म्हणाला, "त्या भांडणांतूनच राजपुत्राला मारण्याचा कट उद्भवला. त्या राजपुत्राच्या जागीं स्वतःच्या मुलाला ठेवून पन्नादाई या वाटेनें बाहेर पडली आणि पलीकडे तो कमानदार पडका दरवाजा दिसतो त्या 'सूरजपोळां'तून पळाली !"

वखारीसारख्या दिसणाऱ्या एका जुनाट वाड्यांत बन्सीलालनें आम्हाला नेलें. अत्यंत जुनाट, गंजलेल्या दोन प्रचंड तोफा, मोडकळीला आलेल्या आणि कीटकांनीं पोखरलेल्या दोनदोन चाकांच्या गाड्यावर धूळ खात पडलेल्या तिथें दिसल्या. राणा संग्र आणि बाबर यांच्यामध्यें झालेल्या घनचक्करींत संघानें जिंकलेल्या या दोन तोफा आहेत, असें बन्सीलालनें सांगितलें. एकीला गर्भभंजन आणि दुसरीला शत्रुभंजन अशीं नांवें रजपुतांनीं दिलीं होतीं. तोफांची लांबी सुमारें बारा फूट आणि त्यांच्या तोंडांची रुंदी सहा सात इंच होती.

## पाताळेश्वर, गोमुखी आणि गंडाकुंड !

पाताळेश्वराचें देऊळ म्हणून ओळखलें जाणारें एक पांचशें वर्षांचें जुनें मंदिर पहावयाला एक लहानसें भुयार उतरून जावें लागतें. मोडकळीला आलेलें देऊळ होतें, पण त्याच्या आजूबाजूच्या दालनांत रंगीबेरंगी मळके लेहेंगे आणि फाटके सदरे घातलेल्या बलुची स्त्रिया आणि मुलें पथाऱ्या पसरून खात, पीत, खेळत बसलेलीं पाहून आश्चर्य वाटलें. हा काय प्रकार आहे, मुसलमान बायकामुलें देवळांत कशीं, म्हणून विचारतां, बलुचिस्तानांतले हे



पद्‌मिनीचा हवामहाल

हिंदू निर्वासित आहेत, म्हणून बन्सीलालनं सांगितलं ! त्यांच्या पेहेरावांत, चेहेऱ्यांत, बोलण्याचालण्यांत कांहीं हिंदुत्व दिसत नव्हतं. " गडाच्या दुसऱ्या टोकाला जिथं पद्मिनीला अल्लाउद्दिनानं आरशांत पाहिलं तो पद्मिनीचा हवामहाल आहे; तिथंहि या वळुची निर्वासितांनीं मुक्काम ठोकलेला तुम्हांला दिसेल, " बन्सीलाल म्हणाला, " मजा आहे या लोकांची–दोन वेळचा शिधा सरकार देतं आणि गोमुखींतलं चवदार पाणी प्यायला मिळतं ! "

थोडयाच वेळांत बऱ्याचशा दगडी पायऱ्या उतरून गोमुखी होती तेथें आम्ही गेलों. तीन गोमुखें खडकाच्या कपारींत कोरलेलीं होतीं. पैकीं फक्त एकांतून पाण्याची धार चालू होती. मी पाणी पिऊन पाह्यलें. थंड आणि चवदार होतें. " या गोमुखी बांधून कित्येक शतकें झालीं असतील, पाण्याची सतत धार चालू आहे. पूर्वी तिन्ही तोंडांतून धारा पडत होत्या, आतां फक्त एकच चालू आहे." बन्सी म्हणाला. राण्यांच्या महालाकडून निघालेल्या भुयाराचें दुसरें तोंड इथेंच आहे.

गोमुखीकडून मीराबाईच्या कृष्णमंदिराकडे येतांना वाटेंत एका बाजूला एका खोल जागेंत चिखलपाणी दिसत होतें. "गंडा नांवाचा राणा प्रतापचा एक हत्ती होता, तो उन्हाळ्यांत या डबक्यांत पडून असायचा," बन्सीलाल म्हणाला, "हें गंडाकुंड."

## मीरेचें कृष्णमंदिर

काळ्या दगडानें बांधलेल्या मीराबाईच्या कृष्णमंदिरांत पाऊल टाकलें तेव्हां पांचशें वर्षांपूर्वी मीराबाईच्या पुण्यस्पर्शानें पावन झालेल्या या फरशीला आणि या खांबांना आपण स्पर्श करीत आहोंत या विचारानें अंतःकरण थरारलें. मंदिरांत मूळची कृष्णाची मूर्ति नाहीं. राणा कुंभाला मीरेचें कृष्णवेड आवडेना, तेव्हां 'गिरिधर नागरा'ची मूर्ति घेऊन मीरा वृंदावनाला निघून गेली. नंतर लोकांनीं तिथें कुंभ, मीरा आणि कृष्ण यांच्या तीन नव्या मूर्ति बसविल्या आहेत.

चितोडगड स्टेशनाजवळ गाडी येतांना दुरून दिसत होता तो विजयस्तंभ जवळून फारच सुरेख वाटला. या भव्य मनोऱ्याला आंतून दगडी जिना आहे. आणि शेवटच्या नवव्या मजल्यापर्यंत सहज वर चढून जातां येतें. बाहेरचें हिंदु पद्धतीचें दगडावरलें कोरीवकाम भरगच्च आणि सुरेख आहे. ठिकठिकाणीं वाघाचीं तोंडें कोरलेलीं दिसलीं. व्याघ्रमुख हें रजपूत लोक विजयाचें प्रतीक समजत, असें बन्सीलालनें सांगितलें.


विजयस्तंभावर चढउतर करून आम्ही दमलों होतों. कुठें चहा मिळेल का विचारतां, बन्सीलालनें एका खोपटासारख्या दिसणाऱ्या मेवाडी ब्राह्मणाच्या चहाच्या दुकानांत नेलें आणि आम्हाला स्पेशल चहा द्यावयाला सांगितलें. दुकानाचें रूप लक्षांत घेतां चहा खरोखरच चांगला होता. दुकानावर पाटी होती, 'दी लवकुश टी स्टॉल!' राणा प्रतापादि चितोडचे राजे स्वतःला प्रभु रामचंद्राच्या सूर्यवंशांतलेच समजत. तेव्हां इथें सूर्यवंशियांचा सुळसुळाट झाल्यास नवल नाहीं!

## पद्मिनीचा 'हवामहाल'

गडाच्या एका बाजूला ओसाड दिसणाऱ्या जागेंत एक जुनाट, पडकें देऊळ दिसलें. हें फार जुनें, अकराव्या शतकांतलें असून त्याचें नांव समाधी-

श्वर असल्याचें कळलें. आंतली बाजू कोंदट आणि काळोखी होती. पण घारा-पुरींतल्या त्रिमूर्तीचें जसें एक एक प्रचंड तोंड आहे त्याप्रमाणेंच या मंदिरांतलें शिवमुख प्रचंड आहे. या मंदिराला लागूनच पूर्वीच्या चितोडगडच्या राण्यांची दहनभूमि आहे.

सुकून गेलेल्या नदीच्या पात्रांतल्या खडकांसारखे जिकडे तिकडे खडक पसरले आहेत अशा एका विस्तीर्ण मोकळ्या जागीं पद्मिनीचा हवामहल आहे. पावसाळ्यांत आजूबाजूला पाणी होत असावें. इथेंच अल्लाउद्दिनानें पद्मिनीला पाहिली. सध्यां बलुची निर्वासितांनीं इथें तळ ठोकला आहे!



कीर्तिस्तंभ, चितोड

विजयस्तंभासारखाच गडाच्या एका टोकाला कीर्तिस्तंभ नांवाचा अत्यंत सुंदर कोरीवकाम असलेला एक मनोरा आहे. जैन शिल्पकलेचा हा एक उत्तम नमुना समजतात. चवदाव्या शतकांत जिजा जैनानें हा बांधला म्हणतात. चितोडगडावरच्या अत्यंत उंच अशा पठारावर कीर्तिस्तंभ आहे. अस्ताला जाणाऱ्या सूर्याचा पिवळसर प्रकाश इथून दिसणाऱ्या आजूबाजूच्या अफाट प्रदेशावर पडला होता. दूर अंतरावर डोंगरांच्या रांगा दिसत होत्या. किलबिल करीत पक्षी घरट्याकडे परतत होते. एकदां सभोंवार नजर टाकून

आम्ही बन्सीलालचा निरोप घेतला आणि सादीकला स्टेशनाकडे टांगा हांकण्यास सांगितलें. तीन चार तासच चितोडगडावर फिरलों, पण मन पांचसहा शतकांच्या अद्भुतरम्य इतिहासांत रेंगाळत होतें.

रात्रीं अकराच्या गाडीनें अजमेरला जावयाला निघालों.

१९ मार्च, १९४९

गाडी अजमेर स्टेशनांत शिरली तेव्हां पहांटेचे सहा वाजले होते. कांहीं लोकांच्या बोलण्यावरून अजमेरबद्दल मी भलत्याच कल्पना करून घेतल्या होत्या. त्या प्रत्यक्ष दर्शनानें एकदम चुकीच्या ठरल्या. अजमेर हें एक रखरखीत, धुळकट, मासलेवाईक मारवाडी शहर असेल अशी माझी कल्पना होती. पण अजमेरचें स्टेशन भव्य आणि आधुनिक होतें. इतकेंच नव्हे तर स्टेशनमधून बाहेर पडल्यावर आजूबाजूचे रस्ते आणि घरेंहि चांगलीं आधुनिक वाटलीं. गाडी अजमेर स्टेशनजवळ येत होती तेव्हांपासूनच दोन्ही बाजूंना आल्हाददायक दृश्य दिसत होतें. गाडी स्टेशनांत आली तरी दोन्ही बाजूंना अगदीं जवळ डोंगरांच्या रांगा दिसत होत्या, आणि आपण एखाद्या हवेच्या ठिकाणीं आलों आहोंत असें त्या पहांटेच्या झुळझुळ वहाणाऱ्या वाऱ्यामुळें वाटत होतें. साताऱ्यांत ज्याप्रमाणें पहावें त्या बाजूला अगदीं जवळ डोंगर दिसतो तसेंच थोडेंसें अजमेरांत वाटतें.

## मराठा बुरुज

अजमेरांत रेल्वेमध्यें नोकरीला असलेले आमच्या परिचयाचे श्री. सामंत यांच्याकडे आम्हाला जायचें होतें. सकाळीं सहा वाजतांच कुणाला कशाला त्रास द्या, म्हणून स्टेशनांतच तोंड वगैरे धुवून सात वाजेपर्यंत आम्ही वेळ काढला, आणि मग टांगा घेऊन बाहेर पडलों. गेले आठ नऊ दिवस हॉटेलचें जेवण आम्ही खात होतों, तेव्हां श्री. सामंत यांच्याकडे आल्याबरोबर त्यांच्या घरांतल्या आपुलकीच्या आदरातिथ्यांमुळें आम्हाला घरीं आल्यासारखें वाटलें. श्री. सामंत यांच्या घराची जागाहि

आम्हाला अनेक दृष्टींनीं आवडण्यासारखी होती. घराच्या समोरच एक जुनाट बुरूज दिसत होता. त्याचें नांव मराठा बुरूज ! मागल्या बाजूच्या खिडकींतून एक कांहीं ठिकाणीं जुनाट तटबंदी असलेली डोंगरांची रांग दिसे. हा पृथ्वी-



अजमेरांतील नेहमींचें दृश्य

राज चव्हाणाचा तारागड. अजमेर ही इतिहासप्रसिद्ध पृथ्वीराज चव्हाणाची राजधानी होती म्हणतात. या डोंगराच्या पायथ्यापासून तों आमच्या घराच्या मागल्या बाजूपर्यंत इतस्ततः पसरलेल्या मोडक्या तोडक्या घरांत निर्वासित सिंधी कुटुंबें रहात असलेलीं दिसलीं. या सर्व घरांत पूर्वी मुसलमानांची वस्ती होती. सामंत म्हणाले, आमच्यासारख्या इथें रहाणाऱ्या हिंदु कुटुंबांना पूर्वी जीव मुठींत धरूनच रहावें लागे. पण फाळणीनंतर सिंधी निर्वासितांच्या झुंडी अजमेरांत आल्या, एक दीड वर्षांपूर्वीचा तो प्रख्यात दंगा झाला, आणि एका रात्रींत ‘ ट्रॅन्सफर सीन ’ झाला. आतां पहावें तों मुसलमानासारखा नम्र प्राणी अजमेरांत मिळणार नाहीं.


## अजमेरांतील क्रांति

अजमेरांतल्या या ' क्रांती ' च्या अनेक गोष्टी अजमेरांतल्या अनेक लोकांनीं आम्हाला सांगितल्या. कित्येक वर्षांच्या खडतर बंदिवासांतून मुक्त झालेल्या माणसाच्या तोंडावर आपल्या अचानक मुक्ततेच्या गोष्टी सांगतांना जें तेज दिसतें आणि त्याच्या वाणींत जो रसाळपणा येतो तो या लोकांत क्षणोक्षणीं दिसे. अजमेरांत मुसलमान अल्पसंख्य होते, पण त्यांच्या मगरुरीला पारावार नव्हता. एकस्यादुकस्या हिंदु बाईला संध्याकाळच्या वेळीं बाजारांत जाणें शक्य नव्हतेंच, पण आम्हा पुरुषांनाहि बायकांना बरोबर घेऊन कांहीं ठिकाणीं जाणें बरोबर वाटत नसे,—असें एक दोघे जण आम्हाला म्हणाले. मुसलमान मवाली काय टारगटपणा करतील त्याचा नेम नव्हता. अजमेरांतले शें-दोनशें टांगेवाले सर्व मुसलमान. हिंदु टांगेवाला औषधालाहि नव्हता. राजस्थानच्या मधोमध असूनहि अजमेर पाकिस्तानांत जायला पाहिजे अशी ओरड करावयालाहि अजमेरांतल्या मुसलमानांनीं कमी केलें नव्हतें !

पाकिस्तानानें सर्वस्व लुबाडून घेऊन हांकून दिल्यामुळें पिसाळून गेलेल्या सिंधी निर्वासितांच्या झुंडी अजमेरांत आल्या आणि अजमेरांत दंगा सुरू झाला. लष्कर बोलवावें लागलें. दोन तीन दिवसांत शांतता झाली. हिंदुमुसलमानांची दिलजमाई होऊन आपल्या दोन मोहोल्ल्यांच्या बाहेर आपण विनाकारण फिरावयाचें नाहीं असें समजुतदारपणें मुसलमानांनीं ठरविलें. तेव्हांपासून आमच्या घरामागें असलेल्या त्या मोडतोड झालेल्या घरांत मुसलमानांच्या जागीं सिंधी निर्वासित रहावयाला आले, आणि अजमेरांतल्या दोनशें सव्वादोनशें टांगेवाल्यांत आतां एकहि मुसलमान नाहीं. तरतरीत सिंधी पोरें मोठ्या ऐटींत पूर्वीचेच जुनेपुराणे टांगे हाकलतात.

## दर्गा शरीफ किस्ती

चहा, स्नान वगैरे आटोपून अजमेरांतला प्रख्यात दर्गा शरीफ किस्ती पहावयाला बाहेर पडलों. हिंदुस्तानांतलेच नव्हे तर साऱ्या जगांतले मुसलमान हें एक मोठें पवित्र स्थान समजतात म्हणे. आठशें साडेआठशें वर्षांचा जुना आणि अत्यंत भव्य असा हा दर्गा आहे. अनेक हिंदु आणि



ख्वाजा मोइनुद्दीन किस्तीच्या दर्ग्याचा भव्य दरवाजा

मुसलमान संस्थानिकांनीं, कुणी चौथरे तर कुणी दरवाजे तर कुणी बुरुज बांधून दिले आहेत. ख्वाजा मोइनुद्दिन किस्ती या मुसलमान साधूचा हा दर्गा आहे. गेल्या वर्षीच्या दंग्यांत हा दर्गा दंगेखोरांनीं मोडून तोडून भ्रष्ट केल्याची ओरड पाकिस्ताननें केली होती;

पण लष्कराच्या कडेकोट बंदोबस्तांत हा प्रख्यात दर्गा सुरक्षित असल्याचें वल्लभभाईंनीं जाहीर केलें होतें. दर्ग्याला खरोखरच कुठें धक्का लागलेला नव्हता. दर्ग्याच्या भव्य प्रवेशद्वारापाशीं पादत्राणें काढून ठेवावीं लागतात. हिंदु तीर्थांच्या ठिकाणीं ज्याप्रमाणें बडवे किंवा पंडे यात्रेकरूंवर तुटून पडतात आणि अमकें करा. तमकें करा, इतके पैसे द्या, म्हणून भंडावून सोडतात, तसेच या द्वारापाशीं बसलेले मुसलमान इथें येणाऱ्या प्रवाशाला पूर्वीं सतावीत असत, असें कळलें. पण आतां तसा कांहीं त्रास नव्हता. आमच्या चेहेऱ्याकडे भीत भीत पहातच एक दोन मुसलमान तुम्हाला हें दाखवतों तें दाखवतों म्हणत पुढें आले. 'आम्हाला कुणी कांहीं दाखवावयाला नको. आम्ही काय पाहायचें तें स्वतःच पाहूं' असें त्यांना निक्षून सांगून आम्ही पुढें चालूं लागलों. पण एक जाडगेलासा पहिलवानी पैरण घातलेला आणि दुसरा मखमली टोपी आणि लांब शेरवाणी घातलेला, लचकत चालणारा, गोरटेल्या चेहऱ्याचा मुसलमान असे दोघेजण लोचटपणें हें अमुक आहे, हें तमुक आहे असें सांगत आमच्या मागून येतच होते.

## ...मग मात्र आंत जातां येणार नाहीं !

आंत शिरतांनाच एक भव्य जुनाट दरवाजा दिसतो. अल्लाउद्दीन खिलजीनें तो चौदाव्या शतकांत बांधला असें म्हणतात. १९११ सालीं दिल्ली दरबारासाठीं जॉर्ज राजे आणि महाराणी मेरी हिंदुस्थानांत आलीं असतां त्यांनीं या दर्ग्याला भेट दिली होती. त्या भेटीच्या स्मरणार्थ एक चौथरा निजामानें बांधला आहे. रामपूरच्या नबाबांनीं सोनेरी घुमट असलेला आणखी एक चबुत्रा बांधलेला दिसला. इंदूरच्या महाराजानींहि कांहीं बांधकाम केलें आहे. मधल्या पटांगणांत एक जवळ जवळ सहा फूट रुंद तोंडाचें आणि दुसरें दहा फूट रुंदीचें अशीं पुरुषभर उंचीचीं दोन प्रचंड लोखंडी भांडीं दिसलीं. गरिबांना वाटण्यासाठीं विशिष्ट दिवशीं साखर घातलेला भात एकांत साठ मण आणि दुसऱ्यांत एकशेंवीस मण शिजवला जातो, असें आमच्या बरोबर चालत असलेले ते मुसलमान म्हणाले. एका बाजूला एक छोटीशी, सुबक मशीद दिसली. ती अकबर बादशहानें बांधलेली आहे. दर्ग्याचा महत्त्वाचा भाग

म्हणजे किरतीची कबर आहे ती खोली. तिच्या दरवाजाजवळच्या भिंतीवर जरतारीचें काम केलेले भरजरी मखमलीचे मौल्यवान पडदे लावलेले दिसले. आंत चला, म्हणून बरोबरचे ते मुसलमान आग्रह करूं लागले. पाह्यचें तें सर्व बाहेरून दिसत होतें. आंत गेल्यावर तिथें बसलेले दाढीवाले मुसलमान 'पंड्ये' इतके पैसे ठेवा, ही विभूति घ्या वगैरे वगैरे सांगून गळीं पडणार हें ओळखून, आम्ही ख्रिश्चन आहोंत, आम्हांला आंत कसलेंच दर्शन घ्यावयाचें नाहीं, अशी थाप आम्ही ठोकून दिली! हां, मग मात्र तुम्हांला आंत जातां येणार नाहीं, ते म्हणाले–हिंदू किंवा मुसलमान आंत जाऊं शकतात, ख्रिश्चनांना मात्र अलिकडे बंदी आहे.

कां?–आम्ही विचारलें.

नसीराबादचे दारू पिऊन तर्र झालेले कांहीं युरोपियन सोजीर आंत शिरल्यापासून ही बंदी घालण्यांत आली आहे,–ते म्हणाले.

## काणेकर-दलाल नव्हे, पिंटो–फर्नांडिस!

आमची थाप पथ्यावर पडली; पण गरीबांसाठीं एक फंड आहे, त्याला इथें येणारे कांहीं ना कांहीं देतात, असें म्हणून त्यांनीं आमचीं नांवें लिहिण्याकरितां एक जाडजूड रजिस्टर पुढें केलें, तेव्हां क्षणभर आम्ही चमकलों. प्रसंगावधान राखून पिंटो म्हणून मी सही केल्याबरोबर फर्नांडीस म्हणून दलालांनीं सही केली! दहा रुपये द्या, पांच रुपये तरी घालाच–म्हणून ते गळीं पडूं लागले; पण एक एक रुपया देऊन आम्ही मागें वळलों. आम्ही नको नको म्हणत असतां सायलीच्या फुलांची एक एक माळ त्या दोन मुसलमानांनीं आमच्या गळ्यांत घातलीच. आम्ही नको म्हटलें तरी आमच्या बरोबर ते फिरत होते हें खरें; पण दर्ग्याची बरीच माहिती सांगून त्यांनीं वाटाड्याचें काम केलें होतें; आणि शेवटीं तर फुलांच्या माळा घालून आमचा सत्कारहि केला होता! त्यांच्या हातावर एक रुपया ठेवून आम्ही बाहेर पडलों.

## मुंगूस घेऊन फिरणारी रजपूत रमणी

दुपारीं पत्रें पाहण्याकरतां पोस्टांत गेलों होतों, तिथून परत येतांना भर बाजारवस्तींत एका बाजूला कांहीं तटबंदीचे अवशेष आणि किल्ल्याच्या दरवाजा-

सारखा दरवाजा दिसला. कुणीसें म्हणालें, याला मॅगझीन हॉल म्हणतात. आंत 'रजपुताना म्युझियम' नांवाचें वस्तुसंग्रहालय आहे. आंत गेल्यावर एका भिंतीवर कोरलेली बरीचशी माहिती दिसली. १५७० च्या सुमारास अकबरानें बांधलेल्या किल्ल्याचे हे अवशेष आहेत. १९०५ सालीं हिंदुस्थान सरकारनें या जागेची पुन्हां साफसफाई केली. कोरलेल्या पाटीवरून याच जागीं इंग्लंडचा राजा पहिला जेम्स यानें पाठविलेल्या सर टॉमस् रो या वकीलाची भेट १० जानेवारी १६१६ रोजीं जहांगिर बादशहानें घेतल्याचें कळलें. आंत एका टुमदार दगडी इमारतींत लहानसेंच पण व्यवस्थित वस्तुसंग्रहालय आहे. अजमेर, मेरवाडा, सिरोही, सीकर, जयपूर, वगैरे राजपुतान्यांतल्या निरनिराळ्या ठिकाणीं सांपडलेल्या प्राचीन शिल्पकृती इथें ठेवल्या आहेत. ब्रह्मा, विष्णु, वराह इत्यादि अनेक मूर्ती आहेत. दाढीवाल्या ब्रह्मदेवाची आणि कृष्णाला स्तनपान करीत कुशीवर झोपलेल्या देवकीची मूर्ती मला विशेष आवडली. एका खोलींत पांच हजार वर्षांपूर्वींचे सिंधूच्या खोऱ्यांत सांपडलेल्या मातीच्या भांड्यांचे अवशेष आहेत. त्यावर कोरलेल्या माणसांच्या, बैलांच्या वगैरे आकृति प्रेक्षणीय आहेत. मोहेंजोदारो येथें सापडलेल्या प्राचीन वस्तूंच्या प्लास्टरच्या प्रतिकृतीहि इथें ठेवल्या आहेत. एका कोपऱ्यांत रजपूत कालखंडांतलीं बरींच सुंदर चित्रें आहेत. कुत्रा बरोबर घेऊन फिरणाऱ्या पुष्कळ स्त्रिया अलिकडे आपण पहातों; पण मुंगूस घेऊन उभ्या असलेल्या रजपूत रमणीचें या दोन अडीचशें वर्षांच्या जुन्या चित्रांतलें एक चित्र पाहून मला आश्चर्य वाटलें. चिलखत, शिरस्त्राण वगैरे घातलेला राणा प्रतापचा एक पुतळा, आणि अठराव्या शतकांतली एक बारा फूट लांब तोफहि एके ठिकाणीं आहे.

## ख्वाजा किस्तीला डोक्यावर घेणारा भोळा शंकर

आम्ही रहात होतों तिथून जवळच असलेल्या बजरंगगड टेकडीवर संध्याकाळीं फिरायला गेलों. या चिमुकल्या टेकडीवर एक चिमुकलें मारुतीचें देऊळ आहे. मारुतीची आरती चालली होती. पुजाऱ्यानें दिलेला तीर्थप्रसाद घेतला, आणि देवळाच्या मागल्या बाजूच्या सज्जांत येऊन उभे राहिलों. संध्या-

काळच्या धूसर पिवळ्या प्रकाशांत अजमेर शहराचें मोठें अ
इथून दिसतें. एका बाजूला अन्नासागर तलावाचें दूरवर पस
पलीकडे हिरवींगार शेतें आणि कांहीं टेकड्या दिसतात; सभोंवार न . फरवली
कीं उंच उंच डोंगरांच्या रांगा आणि त्या रांगांपर्यंत पसरत गेलेली शहरांतल्या घरांची दाटी दिसते. अन्नासागर तलावाच्या कांठीं संगमरवरी दगडांचा एक



एक अजमेरी कुटुंब

कित्येक फर्लांग लांब चौथरा शहाजहान बादशहानें बांधला आहे. थोड्या थोड्या अंतरावर संगमरवरी दगडांचेच सुंदर खांब आणि त्यावर घुमट आहेत. यांना बारादारी म्हणतात. शहाजहान अजमेरांत असला कीं इथें नमाज पढत असे, म्हणतात. बारादारी पाहून जवळच असलेल्या 'सुभाषबाग' नांवाच्या, अजमेरांतले लोक मुलांबाळांसह फिरायला येतात त्या उद्यानांत आम्ही आलों. मोठी विस्तीर्ण बाग आहे. शहाजहानच्या काळापासून ही बाग 'दौलतबाग' या नांवानें प्रसिद्ध होती, असें कळलें. अलीकडेच 'सुभाषबाग' हें नवें नांव तिला देण्यांत आलें आहे. या बागेंत फिरतांना मशिदीसारखी दिसणारी एक लहानशी जागा दिसली. आंत पहातों तों महादेवाची पिंडी आणि एक पुजारी जवळ बसलेला. हें देऊळ इथें कसें आलें म्हणून आम्ही विचारलें. बजरंगगडावरल्या मारुतीच्या देवळांत आमच्या-सारखेच तिथें फिरायला आलेले अजमेरांतल्या गव्हर्मेंट हायस्कूलमधले एक शिक्षक श्री. आपळे यांची आणि आमची सामंतांनीं ओळख करून

दिली होती. श्री. आफळे वाङ्मयाचे आणि इतिहासाचे चांगलेच व्यासंगी दिसले. बारादारी, अन्नासागर वगैरेंची ऐतिहासिक माहिती त्यांनींच आम्हाला सांगितली होती. सुभाषबागेंतल्या या मशीदवजा महादेवाच्या देवळाचा इतिहास त्यांनीं सांगितला. गेल्या वर्षी ही मशीदच होती. सिंधी निर्वासितांच्या दंग्यानंतर तिचें हें महादेवाचें देऊळ झालें आहे! मात्र पूर्वी इथें महादेवाची पिंडीच होती. कित्येक वर्षांपूर्वी मुसलमानांच्या सुपरिचित पद्धतीनुसार पिंडी गाडून तिथें मशीद उभारण्यांत आली होती. तिचा पुनरुद्धार निर्वासितांनीं केला इतकेंच. अजमेरांतल्या अनेक मशिदी अशाच हिंदू मंदिरें पाडून किंवा महादेवाच्या पिंड्या गाडून तयार झालेल्या होत्या. त्या सर्वांची अशीच चोख व्यवस्था गेल्या वर्षापासून निर्वासितांनीं केल्याचें कळलें. कित्येक शतकें निर्वासित झालेल्या महादेवांची निर्वासित माणसांनीं ' पुनर्वसाहत ' केली म्हणायची! प्रख्यात ख्वाजा किस्तीच्या दर्ग्याचेंहि दुर्गादेवी मंदिर करण्या-करतां निर्वासितांच्या झुंडी दंग्याच्या वेळीं चालल्या होत्या, म्हणतात; पण सरकारच्या दक्षतेमुळें दर्गा बचावला. दर्ग्यातल्या महादेवाची वेळ आली नव्हती, दुसरें काय! या दर्ग्याचाहि इतिहास अजमेरांतल्या इतर मशिदीं-सारखा किंवा काशींतल्या विश्वेश्वरमंदिरासारखाच आहे. दर्ग्याच्या तळघरांत अजूनहि एक महादेवाची पिंडी आहे, आणि घडियाळी नांवाचा पुजारी अजूनहि तिची दररोज पूजाअर्चा करतो, असें कळलें! भोळ्या शंकरानें अजमेरांत दाखविलेल्या भोळेपणाची कथा आफळ्यांनीं पुढीलप्रमाणें सांगितली. सात आठशें वर्षांपूर्वी या प्रचंड दर्ग्याच्या जागीं शिवलिंगच होतें. ख्वाजा किस्ती ( भिस्ती ? ) आपल्या पखालींतून पाणी आणून दररोज नेमानें या शिवलिंगावर घाली. शंकर खूप होऊन तुला काय देऊं म्हणून त्यानें भिस्त्याला विचारलें. भिस्ती भोळा भट नव्हता; तो होता मुसलमान. किस्ती म्हणाला, तुझ्या डोक्यावर मला स्थान पाहिजे ! ख्वाजा मोइनुद्दीन किस्ती या मुसलमान साधूच्या प्रख्यात दर्गा शरीफची ही अशी हकीकत आहे, म्हणतात.

### विजेचें वांटप !

' सुभाषबागे 'तून घरीं येतांना वाटेंत एका कोंपऱ्यावर उंच पांढऱ्या भिंती आणि एक भला मोठा किल्ल्यासारखा दरवाजा दिसला. फार जुन्या


काळापासून दक्षिणीवाडा म्हणून ही इमारत प्रसिद्ध आहे. एक गुजराती आणि एक मारवाडी कुटुंब सोडल्यास या वाड्यांत अजूनहि तीस चाळीस दक्षिणी कुटुंबें रहात असल्याचें कळलें. घरीं आलों तों विजेच्या बत्त्या लागल्या नव्हत्या. कंदील लावून घरांतला सर्व कारभार चालला होता. आज या विभागांत रात्रीं अकराच्या पुढें विजेचा प्रवाह येईल,—सामंत म्हणाले. अजमेरांत विजेचा मर्यादित पुरवठा असल्यामुळें आळीपाळीनें शहराच्या निरनिराळ्या विभागांत निरनिराळ्या वेळीं उजेड येतो. आमच्या आळीची आज रात्रीं ११ वाजतां पाळी !

२० मार्च, १९४९

## फावल्या वेळांत पंडेगिरी करतों !

अजमेरपासून सहासात मैलांवर असलेलें पुष्करतीर्थ पहावयाला आज सकाळींच जावयाचें ठरलें होतें. त्याप्रमाणें स्नान वगैरे आटोपून टांगा आणण्याच्या तयारींत होतों; इतक्यांत अजमेरमधील महाराष्ट्र मंडळाचे श्री. हर्षे, श्री. काळे वगैरे मंडळी भेटावयाला आली. येथील गव्हर्मेंट कॉलेजच्या वाचनालयाचे श्री. हर्षे प्रमुख अधिकारी आहेत. पुष्कर पाहून आम्ही दुपारीं परत येणार होतों. संध्याकाळीं दक्षिणी वाड्यांत महाराष्ट्र मंडळासमोर व्याख्यान द्यायचें कबूल करून पुष्करला जावयास आम्ही निघालों. मोहन नांवाच्या एका चलाख सिंधी पोऱ्याचा टांगा जाण्यायेण्याकरतां ठरविला. पुष्करचा रस्ता वर खालीं जाणाऱ्या तांबड्या खडकांच्या डोंगराळ घाटांतून आहे. घाटांतून टांगा खालीं येत असतां उजव्या बाजूला एक रस्ता फुटलेला दिसला. हा रस्ता बुड्ढा पुष्कर नांवाच्या गांवाकडे जातो, असें कळलें. नंतर अजमेरांत आम्हांला कुणीसें सांगितलें कीं, या बुढ्या पुष्करमध्यें ब्रह्मचारी गोखले नांवाचे बेळगांवचे एक गृहस्थ एक आश्रम काढून गेलीं तीस वर्षें लोकसेवा करीत रहात आहेत.

पुष्करला पोहोचलों तेव्हां दहा वाजले होते. दोन चार पंड्यांनीं




एक दृश्य, पुष्कर

तुम्हांला कांहीं करायचें आहे का, म्हणून विचारलें. पण आम्ही 'नाहीं' म्हणतांच त्यांनीं फारसा त्रास दिला नाहीं. चौदा पंधरा वर्षांचीं दोन चुणचुणीत पोरें मात्र आमच्या मागून, 'साहेब, आम्हीं तुम्हाला सर्व कांहीं दाखवतों. पुष्करराजाची तुम्हाला पूजा करायची असेल, पितरांसाठीं कांहीं करायचं असेल, तर आम्ही सगळं अगदीं थोडक्यांत करूं ! आम्हाला सर्व मंत्र येतात,' म्हणून सांगत येत होतीं. त्यांचीं नांवें विचारतां, एकानें सत्यनारायण सोहनलाल आणि दुसऱ्यानें दामोदर भगवानलाल म्हणून सांगितलीं. तिथल्या पंड्यांचीं तीं मुलें होतीं. तुम्ही शाळेंत जातां कीं नाहीं, म्हणून विचारतां, शाळेंत जातों, पण फावल्या वेळांत पंडेगिरीही करतों--ती म्हणाली ! 'महाराज, तुम्हाला माहीत नाहीं,' सत्यनारायण मला सांगूं लागला, 'गयेइतकंच हें पुष्करराज तीर्थ पवित्र आहे. तुमची गंगा कलियुगांतली, पण आमचं पुष्करां-तलं ब्रह्मदेवाचं मंदिर सत्ययुगांतलं आहे, समजलांत !'

## स्केचसाठीं वैकुंठनाथाचा रथ थांबला !

पोरें मोठीं हुशार दिसत होतीं, आणि आम्हाला कुणी तरी वाटाडे हवेच होते. 'तुम्हीच आमचे पंडे. सर्व कांहीं दाखवावयाचा एक रुपया, आणि पुष्करतीर्थांची पूजा, पितरांना गंधफूल वगैरेंचा एक रुपया, आहे कबूल?' मी विचारलें.



वैकुंठनाथाचा नगारा

'हो, हो,' ते म्हणाले, 'मात्र नारळ, गंधफुलाचे पैसे तुम्ही दिले पाहिजेत.'

'ते तर देणारच,' मी म्हणालों.

'हें पहा, तें पहा,' म्हणून उत्साहानें सर्व कांहीं दाखवीत ते आमच्याबरोबर चालूं लागले.

एका आळींतून पुढें जातों तों कोपऱ्यावर पुष्कळशी गर्दी आणि ताशा,



वैकुंठनाथाच्या स्वारींतील एक नगारजी

नगारे, शंख, शिंगांचे आवाज ऐकूं येऊं लागले. विशिष्ट तिथींच्या दिवशीं पुष्करमधल्या प्रख्यात रंगनाथ मंदिरांतल्या वैकुंठनाथाची स्वारी बाहेर निघते. आमच्या सुदैवानें आज तसली एक तिथी होती, आणि नेमके सकाळच्या त्याच वेळीं आम्ही पुष्करांत येऊन पोहोंचलों होतों. जरतारी मखमली वस्त्रें अंगावर टाकलेल्या पंधरावीस घोड्यांच्या पाठीवर लाल, हिरव्या, पिवळ्या पताका फडफडत होत्या. हे घोडे पुढें चालले होते. एका गाड्यावर



वैकुंठनाथाच्या गाडीवरचे मद्रासी ब्राह्मण

एक अजस्त्र नगारा चालला होता. त्यांच्या मागें चाललेल्या प्रचंड रथावरील ऐसपैस जागेंत रुप्याच्या शेषावर फुलांनीं मढवलेली वैकुंठनाथाची सुंदर मूर्ति होती. शेषाच्या वेटोळ्यावर वैकुंठनाथ खुर्चीवर बसतात तसा बसला होता, आणि मोठ्या थोरल्या छत्रासारखी शेषाची प्रचंड फणा त्याच्या डोक्यावर

पसरली होती. लाल पांढऱ्या गंधाचें दळदळीत त्रिपुण्ड्र कपाळावर लावलेले दोन तुकतुकीत काळे मद्रासी ब्राह्मण जरतारी काम केलेलीं लाल मखमलीचीं दोन अजस्त्र छत्रें हातांत घेऊन वैकुंठनाथाच्या दोन बाजूला त्या गाड्यावर उभे होते. दलाल आपल्या चोपडींत या स्वारीचें भराभर स्केच करीत होते. आजूबाजूच्या लोकांनीं तें पहाण्याकरतां त्यांच्याभोंवतीं गर्दी केली. त्यांना तें इतकें आवडलें कीं, ओरडून त्यांनीं रथ दोन मिनिटें स्केच पुरें व्हावें म्हणून जागच्या जागीं थांबवून धरला !

## पहावें तिकडे घाटच घाट !

आमचे छोटे पंडे आम्हाला निरनिराळी माहिती देत होते. पुष्कर तीर्थाच्या तलावाभोंवतीं बावन घाट आणि साडेतीनशें मंदिरें आहेत,—ते म्हणाले, आमच्या गांवांत पंडेच दोन हजार आहेत ! या तलावांत मोठमोठे मासे आणि अजस्त्र मगरी आहेत. आंघोळीकरतां उतरणाऱ्या यात्रेकरूंना ठिक-ठिकाणीं धोक्याच्या सूचना देण्यांत येतात. खरोखरच पहावें तिथें घाट दिसतात. जयपूर दरबारनें बांधलेला एक घाट, तर दुसरा जोधपूरचा. हा ग्वाल्हेरचा, हा बिकानेरचा, हा बुंदीसंस्थानाचा,—घाटच घाट ! जयपूर सैन्यांतले दोन अधिकारी शामलाल आणि सुंदरलाल यांनीं बांधलेला एक इंद्रचंद्र घाट आहे ! अहिल्या-बाईचें एक अन्नछत्र आहे. १९११ सालीं राणी मेरी पुष्कर येथें येऊन गेली, तेव्हां त्या भेटीच्या स्मरणार्थ बांधलेला एक जनानाघाटहि आहे ! वाटेंत नारळ, फुलें वगैरे विकत घेऊन आमच्या चिमुकल्या पंड्यांनीं एका घाटावर आमच्याकडून पुष्कर तीर्थाची पूजा करविली; आणि आमच्या पितरांच्या नांवानें पाणी सोडून मंत्रोचारपूर्वक आम्हाला आशीर्वाद दिले !

निरनिराळे घाट पहात फिरत असतां नृसिंहघाटाकडे आम्ही येऊन पोहोंचलों. या घाटाच्या प्रवेशद्वारांतून शिरतांना दोन बाजूला दोन मजेदार दृश्यें दिसलीं. एका बाजूच्या खोलींत एक भली मोठी पेंढा भरलेली मगर आणि तिच्या लांब-लचक जबड्यांत पांढरें पातळ नेसवलेली यात्रेकरू बाईची एक लाकडी प्रतिमा ठेवलेली होती. मगरीच्या वर एक वाघाचें डोकें लावलेलें दिसत होतें. "हें काय?" म्हणून विचारतां सत्यनारायण म्हणाला, "मगर म्हणजे जल का शेर!"

## आय् गो ह्यूमॅनिटी सर्व्हिस !

दुसऱ्या बाजूच्या खोलींत अनेक प्रकारच्या औषधी मांडलेल्या असलेला एक दवाखाना दिसला. दवाखान्याच्या दाराशीं, जाड्याभरड्या मांजरपाटाची गुडघ्या-इतकी पांढरी चड्डी, बंद बांधलेली पांढरी कोपरी आणि त्याच कापडाची डोक्यावर एक पांढरी गोल टोपी अशा कैद्याच्या वेषांतला, तुकतुकीत लालबुंद गोऱ्यापान चेहेऱ्याचा, माजलेल्या पंड्यासारखा दिसणारा एक मध्यमवयस्क माणूस बसलेला दिसला. आपण कोण म्हणून मी हिंदुस्थानींत विचारलें. आपलें नांव डॉ. सच्चिदानंद शुक्ल, आपण बारा महिने या जागेंत गेलीं कित्येक वर्षें एकटाच रहातों, मात्र सप्टेंबरनंतर आजूबाजूच्या खेड्यांत मलेरिया सुरू होतो तेव्हां 'I go humanity service!'—असें अस्खलित भयंकर इंग्रजी बोलत त्यानें फाडफाड उत्तरें दिलीं ! बालामृताच्या जाहिरातींतल्या गुटगुटीत पोरासारखा त्याचा चेहेरा आणि शरीर होतें. डोकें मात्र जरा ढिलें असावें. आंतल्या बाजूला भुयारासारखी आणखी एक खोली दिसली. तिथें एक भला मोठा जाडजूड पलंग आणि रेडिओ दिसला.



डॉ. सचिदानंद शुक्ल

घाट पहात पहात गांवाच्या एका टोकाला असलेल्या ब्रह्मदेवाच्या देवळा-कडे येऊन पोंहोचलों. आमच्या छोट्या पंड्यानें गंगानदी कलियुगांतली तर हें ब्रह्मदेवाचें देऊळ सत्ययुगांतील इतकें प्राचीन असल्याचें सांगितलेंच होतें. साऱ्या हिंदुस्थानांत ब्रह्मदेवाचें हें एकच आणि अत्यंत प्राचीन मंदिर अस-ल्याचें पुष्कळच लोक सांगतात. देऊळ उंचावर असून बऱ्याच पायऱ्या चढून वर जावें लागतें.

## सावित्रीच्या भेटीला गंगा

कुणी स्वतःच्या नांवानें तर कुणी आपल्या आईवडिलांच्या नांवानें एक एक संगमरवरी दगडाची पायरी बांधली आहे. एका पायरीवर अमुक अमुक कोटा संस्थानचा वेटर यानें ही पायरी बांधली, अशीं अक्षरें होतीं. बडोद्याचे कुणी गद्रे यांनीं १९३८ सालीं एक पायरी बांधलेली दिसली, तर अमळनेरचे कुणी कुळकर्णी यांनीं १९४८ सालीं एक बांधलेली आहे. देवळासमोरच्या पटांगणांत एका बाजूला संगमरवरी हत्तीवर बसलेल्या कुबेर धनपतीची मूर्ति एका घुमटींत आहे; तर दुसऱ्या बाजूच्या घुमटींत पंचमुखी महादेवाची आहे. ब्रह्मदेवाच्या मूर्तीसमोर असलेल्या पांढऱ्या दगडाच्या फरशीवर मधोमध चांदीच्या पत्र्याचा एक कासव बसवलेला दिसला. कासवाच्या आजूबाजूला नानाप्रकारचे रुपये रांगेनें ठोकून बसवले होते. हैद्राबादी रुपये होते, उदयपुरी होते आणि सातव्या एडवर्डच्या मुखवट्याचेहि होते. देवळाच्या मागल्या जागेंत कार्तिक महि-न्यांत मेळा भरतो असें कळलें. देवळाच्या मागल्या बाजूला पलीकडे एका उंच टेकडीवर एक देऊळ दिसतें. ब्रह्मदेवाच्या देवळांत ब्रह्मदेवाची चार तोंडांची मूर्ति आहे आणि त्याच्या शेजारीं त्याची बायको गायत्री आहे. हें टेकडीवर दिसतें तें देऊळ त्याची दुसरी बायको सावित्री हिचें. गंगानदी या सावित्रीला भेटावयाला पुष्कळदां आल्याची आख्यायिका आहे. म्हणूनच कीं काय, कितीतरी गंगाभक्त बंगाली दर वर्षी या सावित्रीच्या देवळाला भेट देण्याकरतां पुष्करची यात्रा करतात. ब्रह्मदेवाच्या देवळाजवळच एक सूर्यमंदिरहि आहे. हें सूर्य-मंदिर शिकंदरच्या वेळचें आहे, असें कुणीसें म्हणालें. देवळाच्या आवारांत एका बाजूला असलेल्या एका खोलींत बरीचशीं संस्कृत पुस्तकें मांडून ठेवलेलीं

दिसलीं. धिप्पाड देहयष्टी असलेले एक वृद्ध साधु तिथें बसले होते. "तुम्ही कोंकणस्थ का?" म्हणून त्यांनीं शुद्ध मराठींत विचारलें, तेव्हां आम्हांला आश्चर्य वाटलें. "आपण महाराष्ट्रीय आहां कीं काय?" आम्ही विचारलें. "नाहीं. मला थोडेंसें मराठी येतें" ते म्हणाले. त्यांचें नांव महंत नंदलाल. या संस्कृत पुस्तकालयांत बरीचशीं मौल्यवान प्राचीन हस्तलिखितें असल्याचें, आणि आर्यसमाजाचे संस्थापक स्वामी दयानंद सरस्वती यांनीं आपला प्रख्यात धर्मग्रंथ 'सत्यार्थप्रकाश' या जागेंतच लिहिल्याचें महंत नंदलालांनीं सांगितलें.

## मद्रासी ब्राह्मण आणि बंगाली यात्रेकरू

पुष्कर गांवांत शिरतांनाच रस्त्याच्या एका बाजूला मदुरा, तिरुपति वगैरे दक्षिण हिंदुस्थानांतल्या देवळांसारखेंच दिसणारें एक भव्य देऊळ दिसलें होतें. देवळाच्या शिखरावर, मद्रासी वैष्णव ब्राह्मण कपाळावर एक लाल आणि दोन पांढऱ्या रेघांचा त्रिपुण्ड्र लावतात, तसाच एक पांच सहा फूट उंचीचा प्रचंड त्रिपुण्ड्र होता. पुष्करांतलें हें रंगनाथांचें मंदिर फार प्रसिद्ध आहे. इथूनच ती वैकुंठनाथांची पालखी निघाली होती. देवळांतले पुजारी वगैरे सर्व मद्रासी ब्राह्मण आहेत. देवळाभोंवतालच्या जागेंत चांगली गुढघाभर वाळू पसरली आहे. देवळाच्या भल्या मोठ्या आवारांत एका बाजूला छानदार बाग आणि एक मोठी पंप लावलेली विहीर आहे. एके ठिकाणीं एका मोठ्या खोलींत एक झुला दिसला. या झुल्यावर दर शुक्रवारीं रंगनाथांची स्वारी झुलते, म्हणतात. कुठें अजमेर, कुठें मद्रास आणि कुठें बंगाल! पण या पुष्कर तीर्थाच्या ठिकाणीं रंगनाथमंदिरांत मद्रासी ब्राह्मण, आणि सावित्रीच्या देवळांत बंगाली यात्रेकरू आढळतात. परत फिरतांना हें मंदिर पाहून तिथल्या विहिरींतलें थंडगार पाणी प्यालों, आणि आमच्या छोट्या पंड्यांचा निरोप घेऊन पुष्कर सोडलें.

अजमेरांतले एक प्रख्यात धनिक शेट भागचंद सोनी यांनीं बांधलेलें तांबड्या दगडाचें भव्य जैनमंदिर दुपारीं पहावयाला गेलों. मंदिराच्या समोर शुभ्र संगमरवरी दगडाचा एक सुंदर स्तंभ आहे. मंदिर मोठें प्रशस्त आणि भव्य आहे, पण आंत सर्व रंगीबेरंगी 'मारवाडी' गोंधळ आहे. खालच्या

मजल्यावर रुप्याचे आणि सोन्याचे घुमट असलेलीं अनेक चिमुकलीं मंदिरें ठेवलीं आहेत. वरच्या मजल्यावर निरनिराळीं मॉडेल्स मांडून ठेवावीं त्याप्रमाणें कांचेच्या भिंतींनीं वेढलेलें एक लहानसें सोनेरी नगरच आहे म्हणाना. जैन स्वर्गाचा हा देखावा आहे कीं काय, कोण जाणे! लहान लहान कितीतरी सोनेरी मंदिरें आहेत. बारीक तारांनीं बांधलेले चिमुकले हंसपक्षी वरून लोंबतांना दिसतात. एके ठिकाणीं खेळांतल्या किल्ल्यासारखा एक चिमुकला सोनेरी किल्ला आहे आणि त्याला एक शिडी लावलेली आहे! जैनपुराणांतले हे कांहीं तरी देखावे असावेत. बाहेर आवारांत मंदिराच्या बाजूला कांहीं तरी बांधकाम चालू होतें. तिथला एक माणूस म्हणाला, सोनी घराण्याची अशी कल्पना आहे कीं, या मंदिराचें कांहींना कांहीं काम चालू ठेवलेंच पाहिजे; नाहीं तर तें सोनी कुटुंबाला बरें नाहीं!

संध्याकाळीं सहा वाजतां महाराष्ट्र मंडळातर्फे दक्षिणीवाड्यांत माझें भाषण झालें. दलालांचें स्केचबुक पहाण्याकरतां मंडळींची अहमहमिका लागली होती.

२१ मार्च, १९६९

## ‘ ढाई दिन का झोपडा ’

पहाटे जागा झालों तेव्हां आमच्या घराच्या मागल्या बाजूला कुणी तरी मोठमोठ्यानें घण घालीत असल्याचे आवाज ऐकूं येत होते. मागल्या मोकळ्या जागेंत दोन चाकांचे एक दोन लांबलचक गाडे दिसले, आणि जवळच काळीं-कुळकुळीत लक्तरें अंगावर असलेले दोन घिसाडी लोखंडी पट्ट्या तापवून घण घालीत असलेले दिसले. त्यांचीं बायकामुलें तिथेंच चूल पेटवून जेवणखाण करीत होतीं. नंतर कळलें कीं या घिसाड्यांचा सगळा संसार,—भट्टी, भाता, चूल, भांडीं, लक्तरांचीं बोचकीं,—या गाड्यावरच असतात, आणि हा गाडा घेऊन ते ठिकठिकाणीं फिरतात. सकाळीं पांच साडे पांचला त्यांचें काम सुरू होतें. भटक्या घिसाड्यांचा वर्ग मी पहिल्यांदां इथेंच पाहिला. आज या गांवांत, तर उद्यां त्या गांवांत त्यांचा मुक्काम असतो.

'ढाई दिन का झोपडा' ही अजमेरांतील एक प्राचीन इमारत पहावयाला सकाळीं गेलें. आमच्या पुराणांतल्या राक्षसांसारखे मुसलमानांच्या दंतकथांत 'जिन' आहेत. त्या 'जिनां'नीं अडीच दिवसांत हा 'झोपडा' उभा केल्याची दंतकथा आहे. तींत भव्य कमानी असलेली ही चिमुकलीच पण सुंदर दगडी इमारत आहे. या कमानींवर खालपासून वरपर्यंत सभोंवार सुंदर वेलबुट्टी कोरलेली दिसते. वस्तुतः ही वेलबुट्टी नसून अरबी लिपींत कोरलेलीं कुराणांतलीं वचनें आहेत! उंचवट्यावरल्या एका ओसाडशा जागेंत हा 'झोपडा' आहे. आम्ही तिथें गेलों तेव्हां कमरेला लुंगी गुंडाळलेला आणि डोक्याला फडकें बांधलेला, तेरा चौदा वर्षांचा एक मोपला छोकरा एकटाच एका झाडाखालीं बसलेला दिसला. 'कोण रे तूं? इथें काय करतोस?' म्हणून विचारतां, 'कांहीं नाहीं. तुमच्यासारखाच बघायला आलोंय्.'—तो म्हणाला.


'म्हणजे?'

'मी इकडचा नाहीं' तो म्हणाला, 'मी मलबारी मोपला आहें.'

## बालभक्त महमद हुसेन

कालिकत जवळच असलेलें केचेरी हें त्याचें गांव. त्याचें नांव महमद हुसेन. भलताच चुणचुणीत पोरगा होता तो. त्यानें आपली हकीगत सांगितली तेव्हां एका असामान्य 'व्यक्ती'शीं आम्ही बोलत असल्याचें आम्हाला आढळून आलें. एवढासा चिमुरडा असून मोठ्या आत्मविश्वासानें आणि संथपणें तो बोलत होता. त्याची शांतपणें बोलण्याची पद्धती आणि त्याच्या चेहऱ्यावरचा करारीपणा पाहून तो खरें तेंच बोलत होता, याबद्दल मला मुळींच शंका उरली नाहीं. उत्तम हिंदुस्थानींत तो बोलत होता. मल्याळी तर त्याची मातृभाषाच होती. थोडेंसें इंग्रजी येत असल्याचेंहि त्यानें सांगितलें.—'ढाई दिन का झोपड्या'वरली वेलबुट्टी ही कुराणांतलीं अरबी लिपीतलीं वचनें असल्याचें त्यानेंच आम्हाला सांगितलें आणि तीं वाचूनहि दाखविलीं. कुराण वाचण्याइतकें अरबी आपण शिकल्याचें त्यानें सांगितलें. आपल्या धर्माबद्दल खरें प्रेम आणि आस्था त्याला दिसली. इतक्या लहान वयांत त्याचें मन या गोष्टींत रमावें, ही खरोखरच आश्चर्याची गोष्ट होती; पण या आश्चर्यकारक गोष्टी-

मुळेंच आपलें घर सोडून तो गेलीं दोन वर्षं भटकत होता. इतर मुलें भांडून किंवा डोक्यांत राख घालून घरांतून पळून जातात. त्याच्या बोलण्यावरून तसें कांहींच झालें नव्हतें. आपला मोठा भाऊ, आई वगैरे घरीं असल्याचें त्यानें सांगितलें. त्यांच्याबद्दल बोलतांना कसलाच कडवटपणा त्याच्या आवाजांत नव्हता. 'मला पहायचें तें पाहून झाल्यावर मी घरीं जाणार, आणि कांहीं तरी उद्योग करणार,'—तो म्हणाला. त्याच्या चेहऱ्यावर उनाडटप्पूपणा न दिसण्याचें आणि त्याच्या आवाजांत आत्मविश्वासपूर्ण संथपणा येण्याचें हेंच कारण असावें. कांहीं उद्योगाला लागण्यापूर्वी आपल्या धर्मांत सांगितलेलीं पवित्र स्थळें पहावीं, एवढाच त्याचा हेतु होता. इतक्या कोवळ्या वयाच्या इतर मुलांना रात्रीं एका खोलींतून दुसऱ्या खोलींत जायला सोबत लागते. त्या वयांत पूर्ण विचार करून आणि मनाचा निश्चय करून तो एक दिडकीहि खिशांत नसतां अंगावरल्या त्या दोन कपड्यांनिशीं जग पहायला बाहेर पडला होता! त्याला निरनिराळ्या देशांची आणि धर्मांची माहितीहि खूप दिसली. दार्जीलिंगला गेलों होतों,-तिथून तिबेटपर्यंत जाऊन आलों, तो म्हणाला. मुंबईला गेला होतास का? मी विचारलें, तेव्हां तो 'हो' म्हणाला.



बालभक्त महंमद हुसेन

'काय पाह्यलंस मुंबईत ?' 'बोरीबंदर, भेंडीबझार !' त्यानें लगेच उत्तर दिलें.

दिल्ली, आग्रा वगैरे ठिकाणीं फिरून तो अजमेरांत आला होता. मला येशू खिस्ताचें जन्मस्थान पहायचें आहे,—तो बोलतां बोलतां म्हणाला.

'कुठं आहे रे येशूखिस्ताचें जन्मस्थान ?' त्याला माहिती कितीशी आहे हें अजमावण्याकरतां मी मुद्दाम प्रश्न केला. 'पॅलेस्टाईनमध्यें,' त्यानें चट्कन उत्तर दिलें; आणि मक्का, मदीना करीत आपण पॅलेस्टाईनपर्यंत जाणार म्हणून सांगितलें !

'तुझं सामान कुठं आहे ? तूं राहतोस कुठं ? तूं खातोस काय ?' या आमच्या प्रश्नांना त्यानें शांतपणें उत्तर दिलें, 'हे अंगावर कपडे आहेत हेंच माझं सामान. कुठंहि मशीदींत, दर्ग्यांत, धर्मशाळेंत, सराईत मी झोंपतों. एखादा दिवस उपाशी काढावा लागतो, पण दोन घास आनंदानें देणारे उदार सज्जन कुठल्याहि गांवांत भेटतातच.'

## वो दिलसे आता है

जातां जातां आम्ही त्याला थोडे पैसे देऊं केले तेव्हां नम्रपणें हात जोडून 'मला पैसे नकोत' असें तो म्हणाला. त्याचें वय, त्याचें ज्ञान, त्याची वागणूक, आणि त्यानें दाखविलेला निरीच्छपणा पाहून आमच्या मनांत त्याच्याबद्दल विलक्षण आदर निर्माण झाला. आम्ही आग्रह केला तेव्हां लाजत त्यानें ते पैसे घेतले, आणि दोन्ही हात जोडून आम्हाला नमस्कार केला.

'अरे, हा तर अगदीं हिंदु नमस्कार झाला !' मी त्याला थट्टेनें म्हणालों.

'छे छे, साहेब,' त्यानें उत्तर दिलें, 'त्यांत हिंदु नी मुसलमान काय, ओ दिलसे आता है !'

सकाळीं साडेदहा वाजतां गव्हर्मेंट कॉलेजमध्यें जावयाचें, श्री. हर्षे यांच्याबरोबर तिथलें वाचनालय पहावयाचें, आणि मग शहराच्या दुसऱ्या टोकाला असलेल्या टीचर्स ट्रेनिंग कॉलेजमध्यें जावयाचें असें ठरलें होतें. ट्रेनिंग कॉलेजमध्यें असलेले श्री. किबे यांनीं तिथें येण्याचा फार आग्रह केला होता, आणि ट्रेनिंग कॉलेजचे प्रिन्सिपॉल डॉ. लाल यांना आम्हाला भेटायची फार इच्छा

आहे म्हणून सांगितलें होतें. गव्हमेंट कॉलेजमध्यें श्री. किवे आलेच होते. त्यांच्याबरोबर ट्रेनिंग कॉलेजमध्यें गेलों. साठ पांसष्ट वयाचे, उंच अंगकाठीचे प्रिन्सिपॉल लाल हे मोठे सुस्वभावी आणि गोड गृहस्थ वाटले. त्यांच्या टेबला-वर ' ब्लिट्झ, ' ' मार्च, ' ' शंकर्स वीकली ' वगैरे पत्रांचे अंक दिसले. सध्यांच्या सरकारावर कडक टीका करणारीं हीं पत्रें उत्तर हिंदुस्थानांत फिरतांना बऱ्याच ठिकाणीं अनेक शिक्षितांच्या हातीं मला दिसलीं. डॉ. लाल यांच्याशीं बोलतांना कॉलेजच्या विद्यार्थ्यांसाठीं श्री. किवे यांनीं माझ्या भाष-णाचा एक कार्यक्रम ठेवल्याचें कळलें ! मला कांहीं कल्पनाच नव्हती. हिंदी शिक्षक-विद्यार्थ्यांसमोर बोलायचें काय आणि कोणत्या विषयावर ? विद्यार्थी हॉलमध्यें जमल्याचा निरोप आला, तेव्हां या उत्तर हिंदुस्थानी लोकांना आम्हां दक्षिणी लोकांची भाषावार प्रांतांची मागणी ही काय भानगड आहे याची थोडीशी माहिती द्यावी, असा विचार करून या विषयावर इंग्रजींत भाषण केलें. डॉ. लाल यांच्या आग्रहावरून दलालांनीं फळ्यावर एक दोन मिनिटांत लाल यांचें खडूनें व्यंगचित्र काढून दाखविलें. विद्यार्थ्यांना तें फार आवडलें.

## दारु प्यालेले मारवाडी

दुपारीं अडीच वाजतां जयपूरला जाण्याकरतां निघालों. गाडी साडेतीनला सुटायची होती. आमच्या घराजवळून शेठ भागचंद सोनींच्या जैन मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्यावर मोठी जत्रा भरलेली दिसली. लाल, हिरव्या, पिवळ्या, काळ्या, नाना रंगी चुनड्या नेसलेल्या मारवाडी स्त्रिया मुलाबाळांना घेऊन रस्त्यांत फिरत होत्या. मारवाडणींचे तांडे गात चालले होते. पिऊन तर्र झालेले मारवाडी पुरुष गात, नाचत घोळके करून रस्त्यांतून जात होते. प्यालेला मारवाडी कधीं पाहिला नव्हता तो पहिल्यांदा इथेंच पाह्यला ! होळीच्या सणाचा आज शेवटचा दिवस. शीतळा किंवा शिळासप्तमी म्हणून इथले लोक या दिवसाला ओळखतात. आज घरांत जेवण शिजवायचें नाहीं. खायचेंच असेल तर कालचें शिळें आज शिळासप्तमीला खायचें ! सिनेमाजाहि-रातीचा एक नवाच प्रकार आज इथें पाह्यला. जत्रेच्या जवळच असलेल्या एका जुनाट वाड्याच्या उंच भिंतीवरून तोंडाला कर्णा लावून, अमक्या सिनेमागृहांत

अमक्या वेळीं अमका खेळ आहे म्हणून जत्रेंतल्या स्त्रीपुरुषांना उद्देशून कानठळ्या बसतील अशा कर्कश घोषणा चालल्या होत्या ! या गर्दीतून कशी-बशी वाट काढीत आमचा टांगा चालला होता. श्री. गोडबोले नांवाच्या कर्तबगार महाराष्ट्रीय गृहस्थांनीं स्वतः नकाशा आणि योजना तयार करून प्रभात थिएटर नांवाचें एक भव्य सिनेमागृह अजमेरांत बांधलें आहे. स्टेशन-वर जाण्यापूर्वी गोडबोल्यांच्या आमंत्रणावरून आम्हाला या थिएटराला भेट द्यायची होती; तेव्हां गर्दीतून टांगा केव्हां बाहेर पडतो असें झालें होतें. थिए-टर खरोखरच भव्य आणि प्रेक्षणीय वाटलें.

## जयपुरांतील हॉटेलचा शोध

जयपूरला जाणारी गाडी बरोबर साडेतीनला सुटली. वाटेंत फुलेरा जंक्शन या मोठ्या स्टेशनांत कांहीं खायला मिळेल का, म्हणून चवकशी केली; पण शिळासप्तमी असल्यामुळें स्टेशनांत सुद्धां हवी तर कालची शिळी 'पुरीशाक' मिळेल ह्मणून दुकानदारानें सांगितलें ! शिळासप्तमी हें मारवाड्यांचें मोठें कडक प्रकरण दिसतें ! रात्रीं ८–१० ला गाडी जयपूरला पोंचली. तीन चार वर्षांपूर्वी 'पेन' परिषदेसाठीं मी जयपूरला येऊन गेलों होतों. तेव्हां आह्मी संस्थानचे पाहुणे असल्यामुळें आमची राजेशाही बडदास्त होती. त्यावेळीं माहीत झालेल्या एक दोन बड्या हॉटेलांत टांगा घेऊन गेलों, पण कुठें मुंब-ईच्या 'ताजमहाल'पेक्षां दिवशीं अधिक पैसे, तर कुठलें वातावरण अगदींच 'मवाली' वाटल्यामुळें एखादें साधें पण स्वच्छ हिंदु हॉटेल दाखव म्हणून टांगेवाल्याला सांगितलें. रात्रींची वेळ आणि सर्वत्र शुकशुकाट दिसत होता, तेव्हां हॉटेलें शोधण्याचा कंटाळा आला. शहरांतल्या प्रशस्त हमरस्त्यावरल्या 'कैलास हिंदु हॉटेल'मध्यें रात्रीं पावणेदहाला जाऊन पोहोचलों. म्हाताऱ्या मॅनेजरनें खोली दाखवली. खोली साफ करणारा नोकर मुंबईतल्या घाटी हमालासारखा दिसला. आम्हाला मराठी बोलतांना ऐकून तो घाटवळी मराठींत आमच्याशीं बोलूं लागला. तो होता त्या बाजूचा मारवाडीच, पण मुंबईच्या बाजारांत कांहीं वर्षें एका मारवाडी व्यापाऱ्याकडे कामाला असल्यामुळें त्याला मराठी येत होतें. हॉटेल साधें पण व्यवस्थित होतें. या मारवाडी हॉटेलांची

पद्धत मला आवडली. दिवसाचा फक्त रहाण्याचा आकार ते सांगतात; आंघोळीच्या पाण्याचे इतके पैसे, चहाचे इतके, एक वेळच्या जेवणाचे इतके. पाहिजे तर तिथें जेवावें, चहा घ्यावा, पाहिजे तर बाहेर खावें, प्यावें. तुम्हाला पूर्ण स्वातंत्र्य असतें. जेवढीं जेवणें घ्याल, जेवढा चहा प्याल, तेवढेच पैसे द्यायचे. दिवसां दहा ते बारा, रात्रीं सात ते नऊ जेवण मिळतें. नंतर कांहीं मिळायचें नाहीं. स्वयंपाकी, वाढणारा, भांडीं घासणारा आपापलीं कामें उरकून, साफसूफ करून निघून जातात. भांडीं घासणारासुद्धां एखाद्या ऑफिसच्या कारकुनासारखा वेळेवर येतो आणि वेळेवर जातो. एक दिवशीं रात्रीं जेवल्यावर गच्चींत खाटा टाकून आम्ही पडलों होतों. गच्चीच्या एका कोपऱ्यांत एक किडकिडीत म्हातारा मारवाडी पंचा सोडून लांब धोतर नेसत असलेला दिसला. धोतर नेसून झाल्यावर त्यानें पैरण घातली. लांब मारवाडी अंगरखा चढवला, आणि आपली विटलेली मारवाडी पगडी डोक्यावर ठेवून तो खालीं जाऊं लागला, तिथें जवळच असलेल्या हॉटेलच्या पोऱ्याला 'कोण रे हा ?' म्हणून आम्ही विचारलें. 'हमारा कवासजी !' —तो म्हणाला. आम्हाला वाटलें, 'कवासजी' म्हणजे हॉटेलचा हेडक्लार्क किंवा खजीनदार असा कुणी तरी असेल.


'कवासजी म्हणजे काय रे ?'

'साहेब, आपला भांडीं घासणारा !'

आम्ही सर्दच झालों !

रात्रीं पावणेदहाला हॉटेलमध्यें जेवण मिळणें शक्यच नव्हतें. कपडे बदलून रस्त्यावरल्या दुकानांत कांहीं मिळतें का म्हणून बाहेर पडलों, पण आज शिळासप्तमीमुळें पुरीभाजीहि कुठल्या दुकानांत नव्हती. एका दुकानवाल्यानें टोस्ट, लोणी आणि दूध दिलें. त्यावर समाधान मानून परत हॉटेलांत आलों. खोलींत विजेचा पंखा होता, पण दिवा मालवल्यावर डांसांच्या सैन्यानें आमच्यावर चौफेर हल्ला चढवला. मॅनेजरला मच्छरदाण्या पाहिजेत म्हणून सांगितलें, तेव्हां दोन जुन्यापुराण्या मच्छरदाण्या नोकरानें आणून लावल्या. त्यांना एवढीं मोटीं भोंकें होतीं—भोंकें कसलीं,

भगदाडें होतीं—कीं डांसच काय, पण वाघसिंहहि आंत शिरूं शकले असते ! एकदां डाव्या कुशीवर तर एकदां उजव्या कुशीवर अशा क्षणोक्षणीं बदलणाऱ्या पवित्र्यांत डांसांशी सामना करीत झोंपीं गेलों !



जयपूरचें प्रवेशद्वार

२२ मार्च, १९४९.

## जसा कांहीं ऐतिहासिक चित्रपटांतील देखावा !

सकाळीं चहा झाल्यानंतर शहर पहायला बाहेर पडलों. जयपूर हें हिंदुस्थानांतलें एक अद्वितीय शहर आहे. जयपूरचे प्रशस्त, सरळ रस्ते आणि ऐसपैस अफाट चौक पाहिले कीं, पॅरिस, बर्लिन, मॉस्को यांसारख्या आधुनिक युरोपियन शहरांची आठवण होते. पण हे रस्ते आणि शहरांची ही रेखीव रचना दोन तीन शतकांची जुनी आहे हें कळलें कीं आश्चर्य वाटतें. जयपूरच्या राजांना प्राचीन काळापासून नगररचनेची आणि खगोलज्ञानाची आवड होती असें दिसतें. त्यांनीं बांधलेले रस्ते आणि चौक यांच्याप्रमाणेंच जयपुरांत आणि इतरत्रहि त्यांनीं

बांधलेल्या वेधशाळा आणि जंतरमंतर हीं प्रख्यात आहेत. नवा माणूस जयपूरच्या या भव्य रस्त्यावर उभा राहून आजूबाजूला पाहूं लागला कीं, एखाद्या ऐतिहासिक चित्रपटाच्या देखाव्यांतच आपण उभे आहोंत कीं काय असा भास त्याला झाल्याशिवाय रहाणार नाहीं. बारक्या बारक्या कमानदार खिडक्यांचे आणि नक्षीदार सज्जांचे मजल्यावर मजले असलेल्या, गेरूचा तांबडा रंग दिलेल्या, एकजात, एकरंगी घरांच्या किंवा 'हवेल्यां'च्या रांगा त्याला दुतर्फा दिसतील. दोन्ही बाजूच्या दुकानांचे आणि पेढ्यांचे दर्शनी भाग एका उंचीचे, एका पद्धतीचे आणि आंखीव वाटतील. दर्शनी भागावरल्या एकाच पद्धतीच्या लांब चौकोनी पाट्यांवर एकाच प्रकारच्या नागरी अक्षरांत पेढीचें नांव, मंदिराचें नांव किंवा चारपांच दुकानें सोडून वर जाण्याचा जिना असेल तर 'जिना' हीं अक्षरें कोरलेलीं आढळतील! 'जसवंतलाल तेजमल', 'बिहारीलाल बिसेसर', 'हनुमान मंदिर', 'जिना', 'दयाराम रामचंद', 'रामनाथ भरुका', 'जिना,' अशा प्रकारच्या चौकोनी पाट्या शेवटपर्यंत रांगेनें एका रस्त्यावर दिसतात! दुकानांच्या नांवाप्रमाणेंच मध्यें-मध्यें 'जिना' हीं त्याच आकाराचीं, त्याच रंगाचीं अक्षरें पाहून 'कायदे आझमां'चीं बरींच घरें जयपुरांत आहेत असें एखाद्याला वाटेल!

## राजवाडा पहाणें नको, पण पगडी आवरा!

राजवाड्याला लागूनच असलेलें प्रचंड जंतरमंतर किंवा वेधशाळा शेकडों वर्षांची जुनी आहे; पण जयपूर सरकारनें ती अगदीं नवी बांधल्यासारखी साफसूफ ठेवली आहे. आकाशांतल्या ग्रहगोलांचीं भ्रमणें अभ्यासण्याकरितां ज्योतिःशास्त्रप्रेमी जयपूरच्या राजांनीं वीटचुन्याचीं बांधलेलीं हीं गोल, अर्धवर्तुळाकार, चौकोनी रामयंत्रें, राशियंत्रें, धूपघडी वगैरे प्रचंड बांधकामें पहातांना कौतुक वाटतें. 'धूपघडी'च्या मधल्या दांडीची सावली आमच्या मनगटावरल्या घड्याळांत पहातां किती वाजले ते तास मिनिटें बरोबर दाखवीत होती. या वेधशाळेला लागूनच राजवाडा होता. तो पहायला मिळेल का, म्हणून तिथल्या पहारेकऱ्याला विचारतां, तो 'हो' म्हणाला. 'पण अर्ध्या बाह्यांचा शर्ट आणि अर्धी पॅंट या कपड्यांत आंत जातां येणार नाहीं!'. दुपारीं विशिष्ट वेळीं

राजवाडा पहातां येतो, पण लांबरुंद कपडे अंगांत पाहिजेत आणि आंत शिर-तांना तिथले अधिकारी मारवाडी पद्धतीची पगडी देतात ती आंत असेपर्यंत डोक्यावर ठेवली पाहिजे ! पगडीच्या भीतीनें शेवटीं राजवाडा पहायला आम्ही गेलोंच नाहीं !



कांहीं दृश्यें, जयपूर

जवळच एक प्रशस्त देवालय दिसलें. सकाळीं आठ साडेआठची वेळ होती, आणि बरेच मारवाडी स्त्रीपुरुष आंत जात येत होते. कुणाचें देऊळ आहे म्हणून विचारतां, 'गोवनजी ( गोविंद ) महाराजां ' चें राजघराण्यांतल्या मंडळीसाठीं बांधलेलें हें देऊळ आहे, असें कळलें. आंत शिरतांना जोडेच नव्हे तर पायमोजे, कमरेला चामड्याचा पट्टा असेल तर तो वगैरे वस्तूहि बाहेर ठेवाव्या लाग-तात. हातांतल्या हॅटला आणि गळ्यांतल्या कॅमेऱ्याच्या पट्ट्याला मात्र कुणी अडवलें नाहीं. दरवाजावर फुलांचे हार विकत मिळतात ते विकत घेऊन प्रत्येक जण आंत जात होता. आम्हीहि दोन घेतले. गाभाऱ्यांत गोविंदजीची सुंदर मूर्ति आहे. तुळतुळीत डोक्याचा आणि तुकतुकीत

चेहेऱ्याचा पुजारी हार घेऊन गोविंदजीच्या पायांवर टाकीत होता, आणि प्रसाद म्हणून अत्तर लावलेलीं एक दोन तुळशीचीं पानें देत होता. बाहेर संगमरवरी दगडाचे खांब असलेल्या सभामंडपांत कांहीं मारवाडी भक्त साष्टांग नमस्कार घालून देवापुढें नाक घाशीत होते, कांहीं टाळ्या वाजवून भजनें गात होते, तर कांहीं खांबांना डोकीं टेकून मिटल्या डोळ्यांनीं बोरा-एवढ्या रुद्राक्षमण्यांची जपमाळ ओढीत होते.

अजमेरच्या गव्हमेंट कॉलेजमध्यें भेटलेले प्रो. मोघे यांनीं जयपूरच्या महाराजा कॉलेजमध्यें असलेले प्रो. शितूत यांना भेटायला मुद्दाम सांगितलें होतें. संध्याकाळीं पांच वाजतां शितूतांना भेटायला गेलों. महाराजा कॉलेजची इमारत कोरी करकरीत आणि भव्य आहे. सुंदर रस्ते आणि सुंदर इमारती यांबद्दल ख्याति असलेलें जयपूर संस्थान, कॉलेजच्या आवारांतलें विस्तीर्ण 'लॉन्' या रखरखीत प्रदेशांत हिरवें ठेवण्याकरतां वर्षाकाठीं कित्येक हजार रुपये खर्च करतें. संस्थानचे माजी शिक्षणमंत्री मि. रोलो यांचें नांव दिलेला, महाराजा कॉलेजच्या प्राध्यापकांकरतां जवळच एका सुंदर टुमदार इमारतींत 'रोलो क्लब' आहे. प्रो. शितूत क्लबांत बसले होते. तिथें त्यांच्याशीं आणि तिथें असलेले दुसरे एक तरुण प्राध्यापक सबनीस यांच्याशीं गप्पा करून परत फिरलों.

## तें कुत्रें–आणि त्याचा तो इतिहास

काल रात्रीं डांसांचे संगीत हल्ले, आमच्या खोलीला लागूनच असलेल्या मॅनेजरच्या खोलींत रात्रीं बारा एकपर्यंत चाललेल्या मारवाडी भाषेंतल्या कर्णकर्कश गप्पा, आणि त्या गप्पा थांबल्यानंतर त्याच खोलींत बांधून ठेव-लेल्या कुत्र्याचें आर्त आणि अविरत भुंकणें, यामुळें झोपेचें खोबरें झालें होतें. म्हणून वरच्या मजल्यावरल्या उघड्या गच्चींत खाटा टाकायला आम्ही हॉटेलच्या पोऱ्याला आज सांगितलें होतें. आमच्या सांगण्याप्रमाणें त्यानें खाटा टाकल्या होत्या, आणि एका कोपऱ्यांत आपली चारपाई टाकून तो पडला होता. डोळा लागतो न लागतो, तोंच खुळखुळ घुंगुर वाजले आणि माझ्या खाटेवर धप्कन् कांहीं तरी पडलें. धडपडून उठून पहातों तों

तें कुत्रें माझ्या पांघरुणांत झोपण्याचा प्रयत्न करीत होतें ! त्या पोऱ्याला जागा करून खालीं मॅनेजरच्या खोलींत बांधून ठेवलेलें हें कुत्रें इथें कसें आलें, म्हणून विचारलें. तुम्हाला सोबत म्हणून मुद्दाम त्याला आज सोडून ठेवलेला होता, तो पोऱ्या म्हणाला! एका हातानें त्या पोऱ्याची तंगडी आणि दुसऱ्या हातानें त्या कुतरड्याची तंगडी धरून दोघांनाहि एकदम आपटावें असें मला क्षणभर वाटलें ! पण मन आवरून या कुत्र्याला खालीं नेऊन बांध आणि या गच्चीचा वर येण्याचा दरवाजा लावून टाक, म्हणून त्या पोऱ्याला सांगितलें. कुत्र्याला पोंहोंचवून वर आल्यानंतर तो पोऱ्या त्या कुत्र्याची गोष्ट सांगूं लागला. या मरतुकड्या कुत्र्याला इतिहास आहे हें आम्हाला तेव्हां कळलें. मॅनेजर, नोकर, चाकर त्याचे फारच लाड करीत. ‘ आमच्या मालकाला हें कुत्रं सांपडलं त्या दिवशीं त्याला एकदम कुठूनतरी सात हजार रुपये मिळाले, साहेब,’ तो पोऱ्या सांगूं लागला, ‘एकानें सहाशें रुपये देऊं केले तरी हा कुत्रा आमचा मालक विकीना ! आतां त्याच्या गळ्यांत घुंगुर दिसतात ना, पण लवकरच सोन्याचा पट्टा आणि सोन्याची साखळी घालण्याचा आमच्या मालकांचा विचार आहे, साहेब ! ’

‘ अस्सं ! ’ असें म्हणून त्या कुत्र्याविषयींचे माझ्या मनांतले विचार त्याला बोलून न दाखवितां मी झोपीं गेलों.

२३ मार्च, १९४९

## ‘ दीन ’ झालेला दीन महंमद

इथून चारपांच मैलांवर असलेली जयपूरची जुनी ऐतिहासिक राजधानी अंबेर पहावयाला आज जावयाचें होतें. सकाळीं साडेसातलाच टांगा घेऊन निघालों. गांवाच्या बाहेर पडल्यावर कांहीं वेळानें आजूबाजूला जंगल असलेला अंबेरचा डोंगराळ रस्ता सुरू होतो. हा रस्ता लागण्यापूर्वी एका बाजूला उघड्या माळावर ‘ जलमहाल ’ हा जयपूरच्या महाराजांचा राजवाडा दिसला. पावसाळ्यांत आजूबाजूला थोडेंबहुत पाणी असेल, पण सध्यां राजवाड्या-

भोंवतीं कुठेंच ' जल ' नव्हतें ! डोंगराळ रस्त्यावरून टांगा चालला असतां मध्येंच झाडींत एखादा मोर डोक्यावरचा तुरा डौलानें हालवीत लचकत चाललेला दिसे. जंगलांत मोर पाहिला कीं तो तिथें चुकून आला असावा, असें मला नेहमी वाटतें. त्याचे ते तुकतुकीत, निळ्या हिरव्या डोळ्यांचे पंख, तो भरदार पिसारा, तो डौलदार तुरा हें सर्व एखाद्या राजवाड्याच्या बागेंत शोभण्यासारखें आहे; त्यांत ' जंगली 'पणा कांहींच नाहीं. ओंठ रंगवलेली, केंस फुलवलेली एखादी चित्रपटतारका शेतांत रोपांची लावणी करीत असलेली आढळली तर जसें वाटेल तसें कांहीं तरी जंगलांत मोर पाहून वाटतें. पुढें एके ठिकाणीं रस्ता ओलांडून एकामागून एक झाडींत धांवत असलेले तीन मुंगूस दिसले. आमचा टांगेवाला दीन महंमद म्हणाला; साहेब, या जंगलांत केव्हां केव्हां वाघ पण दिसतात ! दीन महंमद दिसायला तगडा होता, पण बोलतांना अगदींच ' दीन ' झालेला दिसला. पाकिस्तान होण्यापूर्वीं कदाचित् तो इतका ' दीन ' नसावा. ' काय सांगूं, साहेब, ' तो म्हणाला, ' गेल्या वर्षाच्या होळीपासून दिन बहोत खराब है !'

' कां, काय झालं ? ' आम्हीं विचारलें.

' सिंधी निर्वासित आले आणि मोठा दंगा झाला गेल्या होळीच्या वेळीं इथें, साहेब. दुसरा कुणी मुसलमान सांपडेना तेव्हां दोन टांगेवाल्यांचेच त्यांनीं मुडदे पाडले. काय होईल काय नाहीं, कांहीं सांगतां येत नाहीं. जीव मुठींत धरून असतां आम्ही. केव्हां केव्हां आमचीं बकरीं पळवतात, तर केव्हां सबंध टांगाच्या टांगा नाहींसा झाल्याचीं उदाहरणें आहेत, साहेब ! '

## जयपुरची कुलदेवता शिलादेवी

सव्वा आठला अंबेरला पोहोंचलों. अंबेरच्या किल्ल्याच्या प्रवेशद्वाराशींच एक मोठा तलाव आहे. तिथें पाटी लावलेली दिसली, ' राजकीय मत्स्यक्षेत्र ' ( गव्हर्मेंट फिश फार्म ) ! वर चढून गेल्यावर पहिल्यांदाच सुंदर संगमरवरी दगडाचें शिलादेवीचें मंदिर लागतें. ही शिला ( शीतला ) देवी जयपूर घराण्याचें कुलदैवत आहे. शिलादेवी हें कालिमातेचेंच एक रूप असावें. मंदिरद्वाराच्या दोन बाजूला संगमरवरी दगडांत केळीचे खांब

९५२०२ २.१.१९५३ नों. नं.
हुबेहुब कोरले आहेत. केळीच्या पानांना हिरवा दगड वापरला आहे, आणि केळ्यांचे घड लाल दगडांचे आहेत. गाभाऱ्याचे दरवाजे चांदीच्या पत्र्यांनीं मढवलेले आहेत. एकावर सहा आणि दुसऱ्यावर सहा अशा दोन दरवाज्यावरल्या बारा चांदीच्या चवकटींत कालीमातेचीं कात्यायनी, छिन्नमस्ता, कमला वगैरे बारा रूपें कोरलीं आहेत. छिन्नमस्ता रूपांत एका हातानें स्वतःचें शिर कापून दुसऱ्या हातांत तिनें तें घेतलें आहे, आणि कापलेल्या कंठांतून उडणारा रक्ताचा कारंजा हातांतलें शिर प्राशन करतें आहे असें चित्र आहे. रक्ताच्या धारेवर लाल रंगाचें मीनाकाम केलें आहे. गाभाऱ्यांतली तुकतुकीत काळ्या दगडाची शिलादेवीची मूर्ती फारच सुबक आहे. मूर्तीवरील वस्त्रें अत्यंत मौल्यवान् आहेत, पण भडक नाहींत. कोणतेंहि महत्त्वाचें काम हातीं घेण्यापूर्वीं किंवा प्रवासाला निघण्यापूर्वी जयपूरच्या गादीवरील राजपुरुष या शिलादेवीच्या दर्शनाला येतात; तिथला एक माणूस म्हणाला.

शिलादेवीच्या या मूर्तीसंबंधींच्या दोन मजेदार दंतकथा त्या माणसानें सांगितल्या. जयपूर घराण्यांतला प्रख्यात राजा प्रतापादित्य मानसिंग याचा, केदार नांवाच्या त्याच्या शत्रूनें पराभव केला. तेव्हां त्यानें कालिदेवीची उपासना केली. त्यावेळीं त्याला दृष्टांत होऊन ही मूर्ति त्याला समुद्रांत मिळाली. तिथून आणून त्यानें इथें तिची स्थापना केली. दुसरी दंतकथा अशी आहे कीं, केदाराचा मानसिंगानें पराभव केला, आणि त्यानें आपली मुलगी मानसिंगाला दिली. त्यावेळींच ही शिलादेवीची मूर्तीहि केदारानें मानसिंगाला दिली.

## अंबेरचा किल्ला

शिलादेवीचें दर्शन घेऊन आम्ही अंबेर किल्ल्यांत शिरलों. समोरच गणेशपोळ नांवाचा भव्य दरवाजा दिसत होता. त्यावर पिवळीं वस्त्रें परिधान केलेल्या निळ्या रंगाच्या गणेशाची मूर्ति कोरलेली होती. लालरंगाचा गणपति नेहमींच दिसतो. निळ्या रंगाच्या मूर्ती श्रीकृष्णाच्या असतात; तेव्हां हा निळ्या रंगाचा गणपति नवीनच वाटला. सोनेरी वर्ख लावलेलें छत आणि हजारों आरशांच्या तुकड्यांनीं मढवलेल्या भिंतींचा चारशें वर्षांच्या जुना शीश महाल अजूनहि प्रेक्षणीय वाटतो. पहावें तिथें आपल्या चेहऱ्याचीं शेंकडों चिमुकलीं प्रतिबिंबें दिसतात. राणा मानसिंग आणि त्याची राणी भोजनाला बसत असत



जुना राजवाडा—अंबेर

त्या दालनाच्या भिंतींवर निरनिराळ्या हिंदू तीर्थांचीं अद्भुसद्य चित्रें रंगवलेलीं आहेत. दालनाच्या मधोमध थाळया ठेवण्याकरितां उंच दगडी ओटा आहे. अंबेर किल्ल्याच्या तटावर उभें राहिलें कीं समोरच्या डोंगरावर तांबड्या तटबंदीचा जयगड किल्ला दिसतो. या किल्ल्यावर जयपूर लष्कराची छावणी आहे. खालीं एका प्राचीन शहराचे पडके अवशेष दिसतात. हें नऊशें वर्षांचें जुनें अंबेर शहर. या शहरांतला एक पडका वाडा दाखवतात. तिथें पहिल्या मानसिंगाचा विवाह झाला. जयपूरचे राजपुरुष अलिकडे जयपूर शहरांतल्या नव्या अद्यावत् राजवाडयांत रहात असले तरी, प्रत्येक राजपुत्राचा विवाहविधि अजूनहि या पडक्या वाडयांत होतो! दूर एके ठिकाणीं अकबर मशीद नांवाची एक जुनी मशीद दिसते. अंबेर किल्ल्याच्या प्रवेश-द्वाराजवळच्या तलावाभोंवतीं फार जुन्या काळापासूनच्या दोन प्रशस्त बागा आहेत. या बागांची योजना आखणारे मोहन मिस्त्री आणि दल्ला मिस्त्री नांवाचे दोन मिस्त्री होते. म्हणून एका बागेला मोहन बाग आणि दुसरीला दल्ला बाग अशीं नांवें आहेत. अंबेरहून सव्वा दहा वाजतां जयपुरास परत आलों.




जयपूर म्युझियममधील एक शिल्पाकृति

दुपारीं जयपूरचें प्रख्यात वस्तुसंग्रहालय पाहिलें. रजपूत कालखंडांतलीं चित्रें, दोन ब्रह्मी स्त्रिया पाठीवर वाहून नेत आहेत असें सुंदर कोरीव काम केलेली एक तीन चार फूट उंचीची ब्रह्मदेशांतली घंटा, रावणाच्या डोक्यावर बसलेल्या शिवपार्वतीची प्राचीन मूर्ति, वगैरे वस्तू प्रेक्षणीय आहेत.

संध्याकाळीं जयपूरच्या एका बागेंत फिरतांना सुंदर निळ्या फुलांनीं ओथंबलेल्या फांद्यांचीं दोन तीन झाडें पाहिलीं. मुंबईंत जसा गुलमोहोर तसा हा 'नीलमोहोर' तर नसेल ना?

उद्यां आग्र्याला जायला निघायचें.

२४ मार्च, १९४९

सकाळीं साडेअकराच्या गाडीनें जयपूर सोडलें. दुपारीं दोनला बांदीकुई जंक्शन आलें. राजपुतान्याचें रेताड वाळवंट आतां खात्रीनें संपलें होतें. गाडीच्या दोन्ही बाजूला हिरवींगार झाडें आणि शेतेंच शेतें दिसत होतीं. कांहीं शेतांभोंवतीं मातीचे उंच उंच बांध आणि त्यावर उंच वाढणारें गवत दिसलें. धान्याच्या लोंबरांनीं भरलेल्या आपल्या शेतांना कुणाची दृष्ट लागूं नये म्हणून इकडील शेतकरी असे उंच बांध घालतात, कीं इकडील कुंपणाची पद्धतीच अशी आहे कीं काय कळत नाहीं. आजूबाजूला देखावा मोठा छान दिसत होता. डोंगरांच्या पायथ्याशीं चिमुकलीं धाब्याचीं घरें दिसत होतीं. या बाजूला मोर फारच दिसतात. रानांत, शेतांत, पहावें तिथें एखादा दुसरा मोर अधूनमधून दिसतोच. रंगीबेरंगी तुऱ्यांचे पक्षीहि खूप दिसले.

## शंकर हॉटेलचा पुण्यांतल्या जुन्या वाड्याचा थाट

आग्रा फोर्ट स्टेशन रात्रीं पावणेनऊला आलें. महाराष्ट्र समाजाची जागा आग्र्यांतल्या राजा की मंडी या जी. आय्. पी. च्या स्टेशनला लागून आहे. तें स्टेशन फोर्टपासून किती लांब आहे याची आम्हाला कांहींच कल्पना नव्हती. तेव्हां आजची रात्र एखाद्या हॉटेलांत काढावी आणि सकाळीं समाजाची जागा पहावी असा बेत केला. स्टेशनांत उतरल्याबरोबर हॉटेलच्या प्रतिनिधींनीं आपापलीं कार्डें पुढें करून आम्हाला गराडा घातला. रात्रीची वेळ होती, आणि आग्र्याच्या सोद्यांची ख्याती आहे, तेव्हां इतर मवाली दिसणाऱ्यांचे हात बाजूला करून एका सात्त्विक चेहेऱ्याच्या शेंडीवाल्याच्या हातांतलें कार्ड घेतलें. त्याच्या हॉटेलचें नांव 'शंकर हॉटेल' होतें. स्टेशनच्या जवळच हॉटेल आहे, तो म्हणाला. हमालाच्या डोक्यावर सामान देऊन आम्ही त्याच्या बरोबर चालूं लागलों. तरी दोघेजण, 'साहेब, याच्या हॉटेलांत जाल तर पश्चात्ताप पावाल. स्वतंत्र बाथरूम वगैरे त्यांच्या हॉटेलांत कांहीं नाहीं,' असें बडबडत आमच्या मागून येतच होते! 'शंकर हॉटेल'-च्या दाराशीं पोंहोचेपर्यंत आमच्याबरोबर ते आले. जयपूरच्या 'कैलास'-सारखेंच हें 'शंकर' होतें. व्यवस्थाहि तशीच. खोलीचें भाडें इतकें.

जेवण पाहिजे तर घ्यावें किंवा घेऊं नये. एक प्रशस्त खोली आम्हीं पसंत केली. पुण्याच्या एखाद्या जुनाट वाड्यासारख्या दिसणाऱ्या जागेंत हें हॉटेल होतें. तुम्हाला दिलेली ही खोली हॉटेलांतली सर्वांत उत्तम खोली म्हणून त्यानें आम्हाला सांगितलें. खोलीच्या एका भिंतीवर एक मोठें थोरलें वाघाचें प्लास्टरचें डोकें लावलें होतें, आणि त्याच्या दोन बाजूला पंखा घेतलेल्या जपानी तरुणींचीं चित्रें लटकावलीं होतीं. दुसऱ्या भिंतीवर दोन सिंह जुंपलेल्या रथांत पंडित जवाहरलाल बसले आहेत आणि गांधीजी रथ हाकीत आहेत असें चित्र होतें !

खोलीच्या सर्व खिडक्यादारांना व्यवस्थितपणें कड्या लावल्या, आणि विजेचा पंखा सुरू करून केव्हां एकदां सकाळ होईल असा विचार करीत या अद्भुतरम्य खोलींत अस्वस्थपणें झोपीं गेलों.

२५ मार्च, १९४९

सकाळीं चहा, स्नान वगैरे आटोपलें आणि टांगा घेऊन राजा की मंडी स्टेशनकडे जावयास निघालों. आग्र्यांतले सर्व चिंचोळे बोळ आणि घाणेरड्या गल्ल्या आम्हाला दाखविण्याचा टांगेवाल्यानें निश्चय केला होता, असें दिसतें. रस्ता कशाकरितां असतो याची कांहींच कल्पना इकडच्या लोकांना दिसत नाहीं. एक टांगा जेमतेम जाईल अशा एका चिंचोळ्या रस्त्यांत आपली हातगाडी आडवी टाकून एक आईसफ्रूटवाला खुशाल एका दुकानांत विडी ओढीत उभा होता ! टांगे, खटारे, सायकलवाले या आडव्या हातगाडीमुळें जागच्या जागीं थबकून ओरडाआरड करीत होते. कांहीं वेळानें तो शांतपणें कुठून तरी आला, आणि त्यानें आपली हातगाडी बाजूला ओढली ! रस्त्यावर लाल, पिवळ्या, हिरव्या सरबतांचीं दुकानें ठिकठिकाणीं दिसत होतीं. आईस-फ्रूटच्या कारखान्यांचाहि फारच सुळसुळाट दिसला.

## महाराष्ट्र समाजांतलें सौजन्यशील स्वागत

राजा की मंडी स्टेशनच्या प्लॅटफॉर्मवरूनच ‘ महाराष्ट्रनिवास ’ या नांवाचा एक बोर्ड एका पिवळ्या घरावर दिसतो. पण हा निवास एका महाराष्ट्रीय

नोकराच्या सहाय्यानें एका युक्तप्रांतीय गृहस्थानें चालविलेलें हॉटेल आहे, असें कळलें. त्याच्या मागल्या, बाजूच्याच बोळांत महाराष्ट्र समाजाची इमारत आहे. आम्ही तिथें जाऊन पोहोंचलों तेव्हां सकाळचे दहा वाजले होते, आणि ऑफिसांत जाणारे कांहीं महाराष्ट्रीय जेवायला बसले होते. व्यवस्थापक श्री. राजंदेकर यांनीं मोठ्या आपुलकीनें आमचें स्वागत केलें. वरच्या मजल्यावरची एक खोली आमच्यासाठीं तयार करायला सांगून समाजाचा शिपाई 'शंकर हॉटेल'मधून आमचें सामान आणवण्याकरतां बरोबर दिला. श्री. राजंदेकर हे फारच सौजन्यशील गृहस्थ वाटले. ताजमहाल किंवा किल्ला पहायचा असेल तर वाटाड्यांना काय द्यायचें, टांग्याला काय पडतें वगैरे सर्व माहिती त्यांनीं आम्हाला दिली, आणि टांगा दाराशीं आणवण्याची व्यवस्था केली.

एक टांगा ठरवून दुपारीं तीन वाजतां आग्र्याचा सुप्रसिद्ध किल्ला पहायला आम्ही बाहेर पडलों. आग्रा कॉलेज, आग्रा युनिवर्सिटी वगैरे मोठमोठ्या इमारती असलेल्या आग्र्यांतल्या स्वच्छ आणि मोठ्या रस्त्यावरून टांगा चालला होता. आग्र्यांत असाहि एक रस्ता आहे हें पाहून बरें वाटलें. किल्ल्याच्या तटावर तिरंगी राष्ट्रध्वज डौलानें फडकत होता. किल्ल्याच्या अर्ध्या भागांत हिंदी लष्कराची छावणी आहे. त्या बाजूला जाऊं देत नाहींत. किल्ल्याच्या दरवाजापाशीं एक दोन 'लायसेन्स्ड' मुसलमान वाटाडे उभे होते. आपलीं लायसेन्स पुस्तकें काढून, हा पहा अडीच रुपये दर लिहिला आहे, भलत्याच वाटाड्याबरोबर तुम्हीं जाऊं नका वगैरे गोष्टी आम्हांला सांगूं लागले. फार तर सव्वा रुपया वाटाड्याला द्या, म्हणून राजंदेकरांनीं आम्हांला सांगितलें होतें. आम्हाला वाटाड्या नको, म्हणून आम्ही पुढें चालूं लागलों. पहा. तुम्हाला पुन्हां परतण्याचा रस्ता सांपडणार नाहीं आणि काय कुठें पहायचें तें समजणार नाहीं, म्हणून ते वाटाडे आम्हांला बजावूं लागले. 'ठीक आहे'—आम्हीं म्हणालों.

### गमत्या मि. पॉल

जरा पुढें जातों तों आंतल्या मुख्य दरवाज्यापाशीं पांचसहा प्रवाशांचा एक घोळका उभा होता, आणि मळका सूट घातलेला, जाडजूड मिशांचा एक

दा. क. ९४२




वाटाड्या मि. पॉल

भरभक्कम दिसणारा म्हातारा अस्खलित हिंदुस्थानींत आणि मधून मधून इंग्रजींत त्या लोकांना त्या दरवाजाची माहिती देत होता. आम्हाला तिथें आलेले पाहून ‘ जंटलमेन, तुम्हाला या गटांत यायचं असेल तर या, प्रत्येकीं फक्त आठ आणे मला द्या ! ’ तो इंग्रजींत म्हणाला. आम्ही आनंदानें त्या

गटांत सामील झालों. या वाटाड्याचें नांव मि. पॉल. आग्र्याचाच रहाणारा तो. पहिल्या महायुद्धांत तो सैन्यांत नोकरीला होता. त्याचे दोन मुलगे दुसऱ्या महायुद्धांत मारले गेले होते, आणि पोटाकरतां म्हाताऱ्याला वाटाड्याचा धंदा आतां करावा लागत होता. उतारवयांत कष्टी जीवन कंठावें लागत असूनहि स्वभावानें म्हातारा फारच गमत्या होता. किल्ल्याचे निरनिराळे भाग दाखवतांना इतिहासांतल्या गोष्टी जितक्या मनोरंजकपणें तो सांगत होता तितक्याच मार्मिकपणें तो हिंदू शिल्पकलेचीं किंवा मोंगली कलेचीं वैशिष्ट्येंहि दाखवीत होता. 'जहांगीरची आई जोधाबाई हिच्यासाठीं अकबरानें हिंदू पद्धतीनें बांधलेला हा लाल दगडांचा महाल पहा. अबूच्या पहाडावरील दिल्वारा येथील देवळांत आढळतात तशा कमानी आणि तसेंच कोरीव काम केलेले हे खांब आहेत,' तो म्हणाला, 'या महिरपीवर कमळाच्या आकृती कोरल्यात; मुसल्मानी कलेंत कमळाचें प्रतीक आढळणार नाहीं.' 'दिवाण-इ-आम'चे हे सुंदर संगमरवरी खांब आणि पुढलें हें प्रशस्त पटांगण, भरजरी मखमलीचे पडदे आणि मोंगल काळांतल्या बादशाही बिछायती यांनीं पुन्हां एकदां तीन-चारशें वर्षांपूर्वीच्या वैभवांत झगमगलेलं आम्ही नुकतंच पाह्यलं,—पॉल म्हणाला.

'म्हणजे?'

'अहो 'पुकार' चित्रपटांतले, धोबीण सोन्याची घंटा वाजवते, जहांगीर तिला दिवाण इ आम च्या दरबारांत न्याय देतो, नूरजहान, (म्हणजे नटी नस्सीम) कबूतरें उडवीत बसली आहे वगैरे देखावे सोराब मोदींनीं इथेंच घेतले!' त्यानें सांगितलें.

## यांना कांहीं आडोसा लागत होता कीं नाहीं?

आग्र्याच्या किल्ल्यांतले संगमरवरी दगडाचे ते भव्य महाल पहातांना आणि या जस्मिन बुरुजावर शहाजहानला ठेवला होता, इथें जहांगिर शराब पीत असत असे, हें नूरजहानचें स्नानगृह वगैरे गोष्टी ऐकतांना माझ्या मनांत यापूर्वींहि मी आग्र्याचा किल्ला एकदां पाहिला होता तेव्हां एक विचार येऊन गेला होता. शुभ्र संगमरवरी खांबांवर रंगीबेरंगी फुलापानांच्या वेली कोरलेल्या आहेत,

एके काळीं सोन्यारुप्याच्या पत्र्यांनीं मढविलेलें छत वर पसरलें आहे, फरशीवर सुरेख आकृती काढलेल्या आहेत, असे हे नितळ संगमरवरी दगडाचे महाल आज पहायला मोठे भव्य आणि सुंदर दिसतात हें ठीक आहे; पण एकहि दरवाजा नसलेल्या, या सर्व बाजूंनीं सताड उघड्या असलेल्या विस्तीर्ण दालनांत मोगल बादशहा, त्यांच्या राण्या, राजपुत्र, राजकुमारी रहात होत्या कशा, खातपीत होत्या कशा, झोंपत होत्या कशा ? त्यांना कधीं कसला आडोसा लागत होता कीं नाहीं ? पॉलला हा प्रश्न मी विचारला, तेव्हां त्यानें समाधानकारक उत्तर दिलें. दरवाजे नाहींत हें मान्य आहे, तो म्हणाला, 'पण इथें राजघराणें रहात असे तेव्हां सुंदर, भरजरी मखमलीचे लांबरुंद पडदे ठिकठिकाणीं सोडलेले असत. आणि बाहेर पहारेकरी दासदासी उभे असत.' जोधाबाईसाठीं अकबरानें बांधलेला तांबड्या दगडाचा महाल दाखवतांना पॉल म्हणाला, अकबराला या लाल दगडाची फार आवड होती. इथल्या किंवा फत्तेपूर सिक्रींतल्या लाल दगडाचें सर्व काम अकबराचें आहे; जहांगिरनें बहुतेक प्लास्टरचें सुंदर काम करून घेतलें आहे आणि शहाजहान पांढऱ्या शुभ्र संगमरवरी दगडाचा शोकी !

## आग्र्याच्या किल्ल्यांत ताजमहालचें प्रतिबिंब

जस्मिन बुरुजावर उभें राहिलें कीं मध्यें यमुना आणि पलीकडल्या कांठावर ताजमहाल दिसतो. औरंगजेबाच्या कैदेंत असतांना शहाजहान ताजमहालकडे दृष्टि लावून इथें पडलेला असे म्हणतात. त्याच्या दोन मुली रोषनारा आणि जहानारा त्याची शुश्रूषा करीत. शेवटीं जहानाराच्या बाहूंत इथेंच त्यानें प्राण सोडला. या जस्मिन बुरुजावरल्या संगमरवरी सज्जाच्या खांबांवर रंगीबेरंगी दगडांच्या आकृती कोरलेल्या आहेत. एका खांबावरल्या पैशाएवढ्या चिमुकल्या एका निळ्या कांचेच्या तुकड्यांत, विशिष्ट काटकोनानें डोळा लावून पाहिलें कीं यमुनेच्या पलीकडल्या कांठावरला सबंध ताजमहाल प्रतिबिंबित झालेला दिसतो. दृष्टि अधू झाल्यावर दूर समोर असलेला ताजमहाल दिसेना तेव्हां शहाजहान हें प्रतिबिंब पहात असे अशी दंतकथा आहे. एका पटांगणांत शाळिग्रामासारख्या तुकतुकीत काळ्या अखंड दगडाचें नक्षीकाम केलेलें एक प्रचंड चौकोनी आसन आहे. १८५७ च्या बंडांत या आसनावर एक तोफेचा


गोळा पडून तो समोरच्या संगमरवरी महालाच्या कमानीवर आपटला होता. त्या गोळ्यामुळें आसन एका बाजूला फुटलें आहे आणि त्या कमानीला भोंक पडलें आहे. या दगडाला 'कसोटी पत्थर' म्हणतात. सोन्याची कसोटी त्यावर घेतां येते. काचेचे दरवाजे लावलेल्या एका दालनांत नक्षीकाम केलेले दोन प्रचंड जुने लाकडी दरवाजे ठेवलेले आहेत. सोमनाथच्या देवळाचे हे दरवाजे आहेत अशी समजूत आहे, पण प्रतापाचा पराभव केल्यानंतर अकबरानें चितोडहून आणलेले हे दरवाजे आहेत, असेंहि म्हणतात. एका दालनाच्या छताचा एक कोपरा नवें कोरें सोनेरी व रुपेरी नक्षीकाम केलेला दिसतो. पूर्वी हें कसें दिसत असावें याची कल्पना येण्याकरतां लॉर्ड कर्झननें हा तुकडा मुद्दाम करवून घेतला.

## शिवाजी इथून पळाला !

किल्ल्याच्या एका तटांत विटा चुन्यानें बंद करून टाकलेला एक दरवाजा दिसला. 'मराठ्यांचा शूर राजा शिवाजी या दरवाजांतून पळाला,' पॉल म्हणाला, 'ही वर दिसते या खोलींत औरंगजेबानें त्याला कैद करून ठेवला होता.' आमचे महाराष्ट्रीय डोळे त्या भिंतीवरून हलेनात. फळांचे पेटारे शिवाजीनें कसे बाहेर पाठवले आणि एका पेटाऱ्यांतून तो कसा पळाला, ही रसभरित गोष्ट म्हातारा पॉल आमच्या गटांतल्या लोकांना सांगत होता. अलाहाबादच्या कॉलेजमधले दोनतीन विद्यार्थी आणि लष्करांत नुकतेच नोकरीला लागलेले युक्तप्रांतांतले एक दोन तरुण ती गोष्ट मोठ्या कौतुकानें ऐकत होते. 'शिवाजी म्हणजे काय तुम्हाला कल्पना आहे?' पॉल आमच्याकडे पाहून म्हणाला, 'भल्ताच हुशार माणूस होता तो!'

'आम्ही मराठे आहोंत,' मी हंसून म्हणालों.

'अरेच्या! मग काय तुम्हाला सांगायचं—तुम्हाला सर्व माहीत आहे!' तो पहिल्यापेक्षां जरा विशेष आदरानें आमच्याकडे पहात म्हणाला. गटामधल्या इतर लोकांच्याहि डोळ्यांत आमच्याबद्दलचा आदर किंचित् वाढलेला दिसला. एखादा महापुरुष होऊन जातो, पण आपल्या सबंध राष्ट्राची इभ्रत केवढी वाढवून जातो. शिवाजीच्या देशांत जन्माला येण्यापलीकडे कांहीं एक न केलेल्यांच्याबद्दल सुद्धां लोकांना आदर वाटतो!



ताजमहाल

## निळ्या आकाशाच्या पार्श्वभूमीवर खुलणारा ताजमहाल

किल्ला पाहून झाल्यानंतर आम्ही ताजमहालकडे जायला निघालों. ताजमहाला-कडे जाणाऱ्या रस्त्याच्या दोन्ही बाजूंला बरीच झाडी दिसली. तांबड्या रंगाच्या लवंग्या फटाक्यांच्या माळांसारख्या दिसणाऱ्या फुलांचीं बरींच झाडें या बाजूला दिसत होतीं. पहाणाराला विशिष्ट अंतरावरूनच पहिलें दर्शन व्हावें आणि व्हावें तें त्या सबंध शुभ्रसुंदर संगमरवरी स्वप्नाचें एकदम व्हावें अशीच योजना ताजमहाल बांधणारानें केली आहे. तांबड्या दगडाच्या तट-बंदीच्या भव्य चौकांत आपण जातों. नंतर तांबड्या दगडाच्या भव्य कमानींत शिरतों तों समोर ताजमहालची रेखीव मूर्ति मधून दूरवर गेलेल्या लांबच लांब संगमरवरी नहराच्या टोंकाला दिसते. जवळ गेल्यावर लांबून सुबक, रेखीव लहानशाच वाटणाऱ्या ताजमहालाच्या कमानी आणि घुमट केवढे भव्य आहेत हें पाहून आश्चर्य वाटतें. ताजमहाल पहिल्यांदा दृष्टीस पडतो तो असा लांबून आणि स्वच्छ निळ्या आकाशाच्या पार्श्वभूमीवर; आजूबाजूला दुसरें कांहीं नाहीं, त्यामुळें मनावर त्याचा विलक्षण परिणाम होतो.

ताजनंतर नूरजहाननें बांधलेला इतमादुद्दौला पहायला गेलों. यमुनेवरच्या एक मोठा थोरला लांबलचक पूल ओलांडून तो पहायला जावें लागतें. नूरजहानच्या बापाची इथें कबर आहे. ताजमहालच्या मानानें इतमादुद्दौलाचें सर्वच प्रमाण लहान आहे. कांहीं जाणत्या लोकांच्या मतें ताजमहालपेक्षांहि इतमादुद्दौला इमारत सुंदर आहे. कांहीं बाबतींत ही इमारत सुंदर आहे खरी. नूरजहाननें स्वतः याचा आराखडा तयार केला होता म्हणतात. ताजमहालच्या चार बाजूला चार मेणबत्त्यांसारखे वेगळे मिनार आहेत, तसे इतमादुद्दौलाचे नाहींत. छोटेसेच पण सुबक असे इमारतीच्या चार कोपऱ्यांना जोडलेलेच चार मिनार आहेत. त्यामुळें इमारतीला एकजिनसीपणा आला आहे. ताजमहालच्या भिंतींवर रंगीबेरंगी दगडांच्या वेली कांहीं ठिकाणीं कोरल्या आहेत, पण बहुतेक उंचच उंच भिंती भकास पांढऱ्या शुभ्र वाटतात. इतमादुद्दौल्याची बोटभरहि जागा सुरेख रंगीबेरंगी चौकोनी, षट्कोनी, पंचकोनी सुंदर आकृत्यांशिवाय किंवा डौलदार वेलबुट्ट्यांशिवाय नाहीं. पांढऱ्या दगडाखेरीज अनेक रंगांचे दगड वापरले आहेत. दगडांत कोरलेल्या जाळ्याहि अलिकडल्या लेसमध्यें दिसतात तशा नानाप्रकारच्या आहेत. आंत नूरजहानच्या बापाच्या कबरेला तुकतुकीत, सुंदर पिवळ्या रंगाचा इराणी दगड वापरला आहे. या कबरेजवळच आईबापांनीं जंगलांत टाकून दिलेल्या लहानग्या नूरजहानला ज्या सौदागरानें उचलून लहानाची मोठी केली त्या तिच्या मानलेल्या बापाची कबर, तिच्या भावांच्या कबरा, आणि जहांगिरबरोबर लग्न करण्यापूर्वी पहिल्या नवऱ्यापासून झालेल्या तिच्या मुलीची कबर आहे.

## माकडें आणि मुळे

काळोख पडूं लागल्यामुळें आम्ही घरीं जाण्यासाठीं परतलों. पुलाजवळ कसल्या तरी वखारींच्या इमारतींच्या रांगा आहेत. धान्याचीं सरकारी गुदामें असतील कदाचित्. तिथें बाहेरल्या बाजूला रस्त्यावर एक इसम मोठी थोरली मुळ्यांनीं भरलेली टोपली घेऊन उभा होता, आणि आवतींभोवतीं जमलेल्या माकडांना एक एक मुळा टाकीत होता. हां हां म्हणतां वखारींच्या भिंतीं-

वरल्या नळांवरून चाळीस पन्नास माकडें सरसर सरसर खालीं उतरून त्या माणसाला त्यांनीं गराडा घातला. कांहीं त्याच्या पायावरून खांद्यावर जाऊन बसलीं. कांहीं त्याच्या डोक्यावरहि चढूं लागलीं. तो त्यांना टोपलींतले मुळे एकदम घेऊं देईना. एकएकाला एकएकच मुळा तो देत होता. तो माणूस रोज इथें माकडांना मुळे घालीत असावा. त्याला त्या माकडांच्या सलगीचें कांहीं वाटत नव्हतें.

## ताजमहाल खरोखरच सुंदर आहे का?

समाजांत येऊन पोहोंचलों तेव्हां रात्रीचे साडेसात आठ झाले होते. जेवण करून वर खोलींत जाऊन पडलों. आग्र्यांतल्या महाराष्ट्रीय समाजाचे एक पुढारी आणि माझे मुंबईंतले जुने मित्र डॉ. कुंटे दार ठोकून खोलींत आले तेव्हां मला आश्चर्य वाटलें. ते आग्र्यांत स्थाईक झाले आहेत याची मला कल्पनाहि नव्हती. माझे आणि दलालांचे दुसरे एक मित्र श्री. नाईक हेहि अलीकडे कित्येक वर्षं आग्र्यांतच आहेत. तेहि वर भेटावयाला आले. आग्र्याचा किल्ला, ताजमहाल, इतमादुद्दौला वगैरे आम्ही दुपारींच पाहून आलेल्या स्थळांविषयीं गप्पा सुरू झाल्या. ताजमहालला सुंदर म्हणणें हें आतां ठरूनच गेलें आहे. सुंदर नाहीं वाटला तरी तसें म्हणण्याचें धाडस कुणीच करीत नाहीं. आमचे नाईक मात्र कुणी ताजमहालाची स्तुती करूं लागला कीं, आपला कुणी एक शत्रू असेल तर तो ताजमहाल अशा आवेशानें ताजमहालविरुद्ध तास सव्वातास अस्खलित वक्तृत्व करूं लागतात. हंपी-विरूपाक्षासारख्या हिंदु शिल्पकलेशीं तुलना करतां या ताजमहालमध्यें कांहींच तथ्य नाहीं; पण कांहीं आपमतलबी लबाडांनीं या इमारतीसारखी सुंदर इमारत जगांत नाहीं म्हणून हूल उठविली, आणि मूर्खांना हिंदुस्थानांत तोटा नसल्यामुळें एक सुंदर म्हणूं लागला म्हणून दुसरा म्हणूं लागला आणि दुसरा म्हणूं लागला म्हणून तिसरा गर्जूं लागला,—नाईक म्हणाले. कसलेल्या वकिलाच्या कौशल्यानें ताजमहालविरुद्ध दहाबारा मुद्दे त्यांनीं एकामागून एक आम्हाला सांगितले. या देशांतल्या बहुतेक कलाकौशल्याच्या वस्तू आणि वास्तू हिंदूंच्या आहेत, तेव्हां धूर्त ब्रिटिशांनीं मुसलमानांना चढविण्याकरितां ताजमहालचे नगारे

वाजवायला सुरुवात केली,—ब्रिटिश येण्यापूर्वी ताजमहालचा फारसा बडेजाव कुणी सांगत नसे. कांहीं शहाणे तर ताजमहालपुढल्या बागेचीहि 'अहाहा, काय बाग !' म्हणून, बाग अलिकडची आहे हें विसरून, स्तुतिस्तोत्रें गाऊं लागतात ! हे मोगल बादशहा रिकामटेकडे असत आणि जयपूरचा फुकटांत पडलेला संगमरवरी दगड आणि पोटावारी राबवून घेतलेले वेठीचे मजूर मिळून हा ताजमहाल त्यांनीं बांधून घेतला. आषाढी पौर्णिमेच्या दिवशीं ताज-महालवरल्या घुमटाच्या बरोबर वरतीं चंद्रबिंब दिसतें म्हणून त्या दिवशीं शेंकडों लोक 'काय हा चमत्कार !' म्हणून पहावयाला जातात. नाईक म्हणाले, या मूर्खांना माहीत नाहीं कीं त्यावेळीं जगांतल्या कोणत्याहि इमार-तीच्या बरोबर शिखरावरतीं चंद्र दिसतो ! मुसलमानी शिल्पकलेंत घुमट बोडके असतात; ताजमहालच्या घुमटाला थोडीबहुत जी काय शोभा आहे तिचें कारण हिंदु पद्धतीचा सोनेरी कळस वर बसविला आहे ! 'जस्मिन टॉवर'वरल्या त्या पैशाएवढ्या कांचेंत सबंध ताजमहालचें प्रतिबिंब दिसतें त्याचें कौतुक करणारे तुम्हाला भेटलेच असतील, नाईक म्हणाले, चष्म्याच्या कांचेंतहि सबंध ताजमहाल दिसतो हें त्यांना माहीत नाहीं !

## ताजमहालमध्यें विटा आहेत !

या माऱ्यानंतर नाईकांनीं दोन तीन महत्त्वाचे मुद्दे सांगितले व ते खरो-खरच आपणाला विचार करायला लावतात. पांढऱ्याशुभ्र मौल्यवान् शुद्ध संग-मरवरी पाषाणाची ही सबंध भव्य वास्तू आहे या कल्पनेनें ताजमहालचें एक विशेष आकर्षण आपणाला वाटत असतें. एखादा ऐटदार अलंकार सबंध शंभर नंबरी सोन्याचा आहे असें कुणी सांगितल्यावर जरा विशेष आदरानें आपण त्याच्याकडे पहातों; पण या एवढ्या ऐटदार अलंकाराचा बाहेरला पातळ पत्रा फक्त शंभर नंबरी सोन्याचा आहे, आंतला गाभा तांब्याचा आहे, हें कळल्यावर आपणाला कसें वाटेल ? ताजमहालच्या भिंती विटांच्या आहेत, बाहेरचा पापुद्रा पांढऱ्या संगमरवराचा आहे, हें कळल्यावर तसेंच वाटतें. एवढा गाजावाजा झालेल्या ताजमहालच्या आंत विटा आहेत, फक्त बाहेर पांढरा दगड आहे, हें कुणाला खरें वाटणार नाहीं. आम्हालाहि खरें वाटलें नसतें.

पण आम्ही ताजमहाल पहावयाला गेलों तेव्हां एका बाजूच्या भिंतीची दुरुस्ती चाललेली होती, आणि आम्ही प्रत्यक्ष आमच्या डोळ्यांनीं आंतल्या विटा पाहिल्या होत्या. दुसरी एक नाईकांनीं सांगितलेली गोष्टहि आम्ही प्रत्यक्ष पाहिलेली असल्यामुळें आम्हाला पटली. बाहेर वापरलेल्या पांढऱ्या संगरमरवरी दगडाचे तुकडे सर्व सारख्या आकाराचे नाहींत, त्यांतले कांहीं लहान तर कांहीं मोठे आहेत. सर्वच पांढरा रंग असल्यामुळें ही विषमता ध्यानांत येत नाहीं इतकेंच. शेवटीं नाईक म्हणाले, अहो, पांढरा दगड हा मधूनमधून शोभेसाठीं वापरायचा असतो, त्याचीच सर्व इमारत बांधून कसें चालेल? भातभाजी न वाढतां, नुसता कोशिंबिरीचा ढीग तुमच्या पुढ्यांत कुणी ठेवला तर तुम्हाला काय वाटेल ? शहाजहानच्याहि हें नंतर ध्यानांत आलें होतें, आणि यमुनेच्या दुसऱ्या तीरावर एक काळा ताजमहाल बांधण्याचा त्यानें विचार केला होता. त्याचा पाया अजूनहि पहावयाला मिळतो,—नाईक म्हणाले. अलीकडले कलात्मक दृष्टीचे लोक आपल्या बंगल्यांतल्या ‘बाथरूम’ आणि ‘लॅट्रिन्’ला जो ‘मटिरियल’ वापरतात, तो या वेड्या बादशहानें सबंध इमारतीसाठीं वापरला !

## आल्डस हक्सले आणि ताजमहालची कला

ताजमहाल ही वास्तुकलेच्या दृष्टीनें एक हीन दर्जाची कलाकृति आहे, हें कांहीं वर्षांपूर्वी आल्डस् हक्सले या प्रख्यात इंग्लिश लेखकाच्या ‘जेस्टिंग पायलेट’ या प्रवासवर्णनपर पुस्तकांत मी वाचलें होतें. वाङ्मय आणि कला या विषयांवर अधिकारी वाणीनें बोलणाऱ्यांपैकीं आल्डस् हक्सले हा आहे आणि त्याचीं मतें विचारणीय असतात यांत मुळींच शंका नाहीं. मदुरा, तिरुपति, कुंभकोणमकडील दक्षिण हिंदुस्थानांतलीं भव्य देवालयें पाहिल्यानंतर हक्सले म्हणतो, वास्तुकलेचा भव्योदात्त आविष्कार इथें पहावयाला मिळतो. त्यांच्याशीं तुलना करतां, हक्सलेच्या मतें, ताजमहालची कला अगदींच सवंग आहे. तो म्हणतो, ताजमहालची समप्रमाणता भूमितींतल्या एखाद्या आकृतीसारखी आहे. मुख्य वास्तूपासून वेगळ्या टाकलेल्या चार कोपऱ्यांतल्या त्या चार मिनारांवर तर हक्सलेचा फारच मोठा आक्षेप आहे. कलाकृतीच्या

एकजीवतेचा त्यामुळें भंग होतो, आणि चार कोपऱ्यांत चार मेणबत्त्या उभ्या केल्यासारखें वाटतें ! मग ताजमहालचा इतका गाजावाजा कां ? हक्सले म्हणतो, आपणांपैकीं बहुतेक इतके दरिद्री असतात कीं इतक्या पांढऱ्या शुभ्र, इतक्या मौल्यवान् दगडाचा इतका मोठा ढीग एके ठिकाणीं पाहूनच त्यांचे डोळे फिरतात ! एक गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. अलिकडे हक्सले हा मोठा वेदान्तप्रेमी अध्यात्मवादी झाला आहे; पण तो हिंदुस्थानांत येऊन गेला, आणि त्यानें ' जेस्टिंग पायलेट् ' हें पुस्तक लिहिलें, तेव्हां तो पाखंडी मताचा जडवादी म्हणून इंग्रजी वाङ्मयांत प्रख्यात होता. त्या काळांत अध्यात्मवादाचे तो निर्दयपणें वाभाडे काढीत असे. या पुस्तकांत देखील बनारससारख्या पवित्र हिंदु क्षेत्रांचें वर्णन करीत असतां त्यानें पोळांना माजवणाऱ्या आणि माणसांची उपासमार उघडया डोळ्यांनीं पाहणाऱ्या अध्यात्मवादी हिंदूंची टिंगल केली आहे. तेव्हां हिंदूंबद्दल आपुलकी वाटते आणि मुसलमानांबद्दल तिरस्कार वाटतो म्हणून त्यानें हिंदु देवाल्यांची स्तुति केली आणि ताजमहालला तुच्छ लेखला असें म्हणतां येणार नाहीं. एका निःपक्षपाती कलावंतानें केलेली टीका म्हणूनच ताजमहालसंबंधींच्या त्याच्या मतांकडे पाहिलें पाहिजे.

२६ मार्च, १९४०.

फत्तेपूर सिक्रीला जाणारी गाडी सकाळीं ९–५५ ला आग्र्यांतल्या ' इदगा ' स्टेशनांतून सुटायची होती म्हणून पावणे दहालाच स्टेशनांत हजर झालों, पण १०–४० पर्यंत गाडीचा पत्ताच नव्हता. गोविंद वल्लभ पंतांचें संयुक्त प्रांत सरकार सोशालिस्टांविरुद्ध किती धादांत खोटा प्रचार करतें याचा एक नमुना स्टेशनांत पहावयास मिळाला. कांहीं दिवसांपूर्वी रेल्वेचा सार्वत्रिक संप घडवून आणण्याचा उपद्व्याप कांहीं कम्युनिस्टनियंत्रित रेल्वे कामगार संघ करीत होते, हें सर्वांना माहीत आहे. कम्युनिस्टांच्या भुलथापांना फशीं पडूं नका आणि संप करण्याच्या फंदांत पडूं नका, असा अत्यंत कळकळीचा सल्ला कामगारांना देणारें एक पत्रक प्रख्यात सोशालिस्ट नेते जयप्रकाश नारायण यांनीं काढलें

होतें आणि तो संप घडवून आणण्याचा कम्युनिस्टांचा प्रयत्न साफ बारगळला होता, हेंहि सुपरिचित आहे. तरीहि संपाविरुद्ध प्रचार करण्याकरतां स्टेशनांतल्या भिंतीवर संयुक्तप्रांत सरकारच्या प्रचारखात्यानें लावलेल्या दोन रंगी पत्रकांत, आगगाडी रुळावरून येत आहे, हातोडा कोयत्याचा लाल बावटा घेतलेला एक कम्युनिस्ट आणि चक्र नांगराचा लाल बावटा हातांत घेतलेला एक सोशालिस्ट गाडी अडवण्याचा प्रयत्न करीत आहेत आणि तिरंगी राष्ट्रध्वज घेतलेले कामगार 'हमारी गाडी नही रुकेंगी' म्हणून ओरडत त्यांना बाजूला ढकलीत आहेत, असा देखावा काढलेला होता !

## भगवी टोपी घालणारा वहाबुद्दीन !

फत्तेपूर सिक्री आग्र्याहून वीस पंचवीस मैल आहे. बरोबर पावणेबारा वाजतां गाडी फत्तेपूर सिक्रीला पोहोंचली. स्टेशनाच्या बाहेर पडतों तों पांढरी लुंगी, पांढरें कुडतें आणि भगवी गांधी टोपी घातलेला एक अठरा एकोणीस वर्षांचा तरतरीत पोरगा 'साहेब, उगाच भलत्या सलत्याला गाईड म्हणून बरोबर घेऊं नका; मी तुम्हाला सर्व कांहीं व्यवस्थित दाखवतों,' असें दरबारी हिंदुस्थानींत मोठ्या अदबीनें सांगत आमच्या मागून येऊं लागला. भगव्या टोपीवरून हा हिंदुसभावाला असावा असें आम्हाला वाटलें; पण नांव विचारतां तो 'वहाबुद्दीन' म्हणाला, आणि आपल्या कित्येक पिढ्या सिक्रींत होऊन गेल्याचें त्यानें सांगितलें ! वहाबुद्दीनच्या डोक्यावर भगवी टोपी कशी ? फाळणीच्या वेळीं झालेल्या भयंकर दंग्यानंतर ही भगवी टोपी वहाबुद्दीनच्या डोक्यावर आली असावी ! जरा पुढें गेल्यावर फत्तेपुर सिक्री पहावयाला येणाऱ्यांसाठीं लॉर्ड कर्झनच्या हुकुमावरून बांधलेला भव्य डाकबंगला दिसला. डाकबंगल्यांतल्या खानसाम्याला ऑम्लेट वगैरे बनवायला सांगितलें आणि पंधरावीस मिनिटें विश्रांति घेऊन अकबरानें वसवलेलें आणि नंतर ओसाड पडलेलें हें शहर पहावयाला बाहेर पडलों.

## अकबरच्या राणीचें तुळशीवृंदावन


सिक्रीच्या या मैदानांत राणा संग्राचा बाबरानें पराभव केला, आणि तेव्हांपासून ही फत्तेपूर सिक्री झाली. 'अकबराचा गुरु शेख सलीम

चिस्ती इथला, म्हणून या पवित्र स्थळीं नवी राजधानी बांधण्याचा अकबरानें प्रयत्न केला. इथें पाण्याचा तुटवडा पडला म्हणून सोळा वर्षांनंतर हें शहर सोडून अकबर परत आग्र्याला गेला हें खरें नाहीं,' वहाबुद्दीन म्हणाला, 'माझ्या भजनीं लागून तूं इथें रहातोस हें बरें नाहीं; राज्यकार-भाराच्या दृष्टीनें आग्र्यांतच रहाणें तूं बरें,—असें शेखसाहेबांनीं अकबराला सांगितलें म्हणून तो आग्र्याला गेला.' शेख सलीमच्या आशीर्वादामुळेंच आपली रजपूत राणी जोधाबाई हिच्या पोटीं पुत्ररत्न जन्माला आलें, म्हणून अकबरानें जहांगीरला सलीम हें नांव ठेवलें होतें. वहाबुद्दीनची वर्णन कर-ण्याची हातोटी बहारदार होती. मधून मधून एखादें फारशी कवन तो म्हणून दाखवायचा; मधूनच एखादें फांकडें इंग्रजी वाक्य सोडून द्यायचा. फत्तेपूर सिक्रींतल्या इमारती अकबराच्या आवडत्या लाल दगडाच्या आहेत. जोधा-बाईच्या भव्य महालाच्या कमानी हिंदु देवाल्यांतल्या पद्धतीच्या आहेत. हिंदु वास्तुकलेंत कमलचिन्हाला महत्त्व आहे. या महालाच्या दरवाज्यावरील महिरपींत ठिकठिकाणीं कमल दिसतें. जोधाबाई मोठी कर्मपरायण होती, आणि नेमानें ती पूजाअर्चा करीत असे. त्या मूर्तींचे कोनाडे महालांत दिसतात. पटांगणांत सुंदर तुळशीवृंदावन आहे. एका भिंतीवर मुरलीधर कृष्णाच्या रंगीत चित्राची रूपरेषा दिसते.

## याच 'हौदेखास' मध्यें तानसेनचा जलसा झाला

ज्या दालनांत बसून अकबर बिरबलाशीं खलबत करीत असे, तें सुंदर कोरीवकाम केलेल्या एका खांबावर आधारलेलें दालन पहाण्यासारखें आहे. या 'एकखंबा' दालनाच्या पलीकडे दिल्वारा देवळांतल्या कमानीसारख्या कोरीवकाम केलेल्या लाल दगडाच्या कमानी असलेला एक चौथरा आहे. इथें अकबराचा ज्योतिषी बसत असे म्हणतात. 'हौदेखास' नांवाचा एक लाल दगडाचाच बांधलेला एखाद्या पुष्करिणीसारखा दिसणारा प्रशस्त हौद, अक-बराची दुसरी बायको तुर्की बेगम हिच्या महालाजवळच आहे. वहाबुद्दीन म्हणाला, जहांगिर जन्मला त्या आनंदोत्सवप्रसंगीं हा हौद सोन्याच्या मोहोरांनीं भरून अकबरानें गोरगरीबांकडून लुटविला, आणि हौदाच्या मधोमध

असलेल्या या हवा खाण्याच्या चौकांत तानसेनाचा जलसा करण्यांत आला. तुर्की बेगमेच्या महालांतलें कोरीव काम प्रेक्षणीय आहे. महालाच्या छतांत गालिचावरल्यासारख्या विविध आकृती कोरलेल्या आहेत. खिडक्या-दरवाज्यांवर पोपट, वाघ, डाळिंबाचीं फळें, द्राक्षांच्या वेली इत्यादींच्या कोरीव आकृतींच्या महिरपी आहेत. निरनिराळे महाल पहात एका टोकाला गेलों तिथें लाल दगडाचाच एक मिनार दिसला. हा हरणमिनार, वहाबुद्दीन म्हणाला, अकबराचा हत्ती हरण इथें पुरला आहे. फणसाला कांटे असतात त्याप्रमाणें या सबंध मिनाराला हत्तीच्या सुळ्यासारखे कांटे आहेत. शेख सलीम चिस्तीची कबर, तिच्या भोंवतालचें भव्य पटांगण आणि बाहेर पडल्यानंतर दिसणारा अजस्र बुलंद दरवाजा पहाण्यासारखा आहे. इंद्रधनुष्यासारख्या चमकणाऱ्या मोत्याच्या शिंपल्यांनीं मढवलेल्या चिस्तीच्या कबरेभोंवतीं पांढऱ्या संगमरवरी दगडाच्या जाळीदार भिंती आहेत.



बुलंद दरवाजा, फत्तेपूर सिक्री

बुलंद दरवाजा पाहिल्यानंतर बसस्टँडकडे जाण्याकरतां खालीं उतरूं लागलों तेव्हां पलीकडे सिक्री गांवांतलीं घरें आणि एक उंच लाल विटांचा क्लॉक

टॉवर दिसला. तिथेंच एक पांढरा पुतळा होता. हा टॉवर दिसतो हें आमच्या गांवाचें प्रदेशद्वार, वहाबुद्दीन म्हणाला, आमचे एक प्रमुख नागरिक डॉ. गुलाबशंकर यांचा हा पुतळा. ' हा पुतळा उभा कुणी केला ?' आम्ही विचारलें.

' डॉ. गुलाबशंकर यांनींच स्वतःचा हा पुतळा इथें उभारला.'

' म्हणजे ते जिवंत आहेत कीं काय ? '

' होय ना ! '

जिवंत माणसानें स्वतःचा पुतळा स्वतःच उभारल्याचें जगांतलें हें एकमेवाद्वितीय उदाहरण असावें !

ता. २७ मार्च, १९४९

काल रात्रीं महाराष्ट्र-समाजांत तीस चाळीस स्त्रीपुरुष पाहुणे एकदम आले. त्यांत कांहीं गुजराती स्त्रीपुरुषहि होते. गच्चींत, ओट्यावर अंथरुणें पसरून लोक पडले होते. राजा की मंडी स्टेशनाला लागून समाजाची जागा असल्यामुळें इथें उतरणें लोकांना फार सोयीचें वाटतें. या गर्दींत स्नान वगैरे आटोपणें त्रासदायक होणार हें ओळखून उठल्याबरोबर आम्ही आमचे मित्र नाईक जवळच रहात होते त्यांच्या बिऱ्हाडीं गेलों, आणि चहा, स्नान वगैरे सर्व तिथेंच उरकून दुपारीं पाऊणच्या गाडीनें दिल्लीस जावयास निघालों. आग्रा कॅंटोनमेंट स्टेशनांत आम्ही साडेबारालाच पोहोंचलों. दुसऱ्या वर्गाच्या एका मोकळ्या डब्यांत आम्ही बसलों होतों. इतक्यांत एक भला मोठा अॅल्सेशियन कुत्रा घेऊन एक माणूस त्या डब्यांत येऊन बसला. त्याच्या धन्याचा तो कुत्रा असावा. बसायच्या बाकाखालीं त्यानें कुत्र्याला बसविलें. असला कुत्रा उतारूंच्या डब्यांत आणणें ठीक नाहीं म्हणून आम्ही त्याला सांगितलें. अगदीं गरीब आहे, तो कांहीं करणार नाहीं, असें म्हणून तो तसाच बसून राहिला. आणखी एकदोन उतारू आले. त्यांनींहि त्याला तेंच सांगितलें. त्यांना तेंच उत्तर त्यानें दिलें. गर्दी वाढूं लागली. एक धिप्पाड पंजाबी

गृहस्थ आपल्या छोट्या मुलीला घेऊन आंत आले. मुलीच्या अंगावर एकदम तो कुत्रा गुरगुरून धांवला, त्याबरोबर मुलीनें किंकाळी फोडली. आतां तरी त्याला बाहेर काढ म्हणून लोक सांगूं लागले; पण कुत्र्याला मागें ओढून, तो कुणाला कांहीं करणार नाहीं, अशी खात्री तो माणूस देऊं लागला ! शेवटीं तिकिट कलेक्टरला बोलावून कुत्र्यासह त्या माणसाला बाहेर काढावा लागला. आमच्या ल्हानशा डब्यांत अतोनात गर्दी झाली होती. गाडी संध्याकाळीं ६-२० ला नवी दिल्ली स्टेशनांत शिरली. दलालांचे नातेवाईक कॅप्टन् नाडकर्णी आपल्या पत्नीसह आणि छोट्या मुलीसह आम्हाला उतरवून घेण्या-करतां आले होते. त्यांच्या मिलिटरी ट्रकमधून सात आठ मैलांवर असलेल्या दिल्ली कॅन्टोनमेंटमधील त्यांच्या बंगल्यावर आम्ही गेलों.

ता. २८ मार्च, १९४९

## नकाशावरहुकुम बनवलेलें कोरें करकरीत शहर

दिल्लीला माझी ही तिसरी चौथी खेप असेल. पंचवीस वर्षांपूर्वी कॉलेजचा विद्यार्थी असतांना मी दिल्लीला येऊन गेलों होतों. त्यानंतर फाळणीपूर्वी एक-दोनदां कामाकरतां आलों होतों. शांतपणें भटकण्याकरतां असा हा याच वेळेला आलों. पंचवीस वर्षांपूर्वी नवी दिल्ली हें अगदीं कोरें करकरीत शहर होतें. इतर महत्त्वाचीं शहरें आणि नवी दिल्ली यांतला फरक हा कीं, इतर शहरें कोणतीहि योजना नसतां भौगोलिक, ऐतिहासिक, आर्थिक, राजकीय कारणामुळें मोठीं किंवा महत्त्वाचीं झालीं आहेत. कलकत्ता, मुंबई, जुनी दिल्ली यांसंबंधीं असें म्हणतां येईल. नव्या दिल्लीचें तसें नाहीं. कलकत्त्याहून आपली राजधानी हालवून दिल्लीला—हिंदुस्थानच्या ऐतिहासिक राजधानीला—ब्रिटिश आले. मोंगल सम्राटांनीं आपल्या वैभवाचीं स्मारकें जशीं जुन्या दिल्लींत किंवा आग्र्यांत ठेवलीं आहेत तसें कांहीं तरी करावें, या ईर्ष्येनें त्यांनीं नवी दिल्ली उभी करण्याचें ठरविलें. मोठमोठे वास्तुशास्त्रज्ञ, स्थापत्यकलाकोविद आणून त्यांनीं कागदावर नव्या दिल्लीचे नकाशे तयार केले; आणि या नकाशा-

बरहुकूम ही नवी राजधानी बांधण्यांत आली. त्यामुळें या शहराला जो रेखीवपणा आणि बांधेसूदपणा आहे तो यदृच्छया वाढत गेलेल्या इतर जुन्या शहरांत आढळणें शक्य नाहीं. उत्तुंग व्हाईसरीगल लॉज, त्याच्या दोन बाजूला दोन पंखांसारख्या त्या सेक्रेटरीएटच्या तांबड्या आणि पिवळसर पाषाणाच्या अजस्र इमारती, तसल्याच दगडांची ती वर्तुळाकार भव्य सेंट्रल असेंब्ली, या इमारतींच्या सभोवार पसरलेले, दृष्टीच्या टप्प्यापलीकडे जाणारे लांब रुंद प्रशस्त तुकतुकीत रस्ते, त्या रस्त्यांवर पिवळसर रंगाच्या, ठराविक पद्धतीच्या रेखीव बैठ्या इमारती, हें सर्व पंचवीस वर्षांपूर्वी मी पाहिलें, तेव्हां एक नवें, कोरें करकरीत शहर पाहिल्यासारखें मला वाटलें. पण त्यांत कांहींतरी कमी आहे असें एकसारखें माझ्या मनाला वाटत होतें. एकतर त्यावेळीं संध्याकाळ झाली कीं नव्या दिल्लीच्या त्या प्रशस्त रस्त्यांत शुकशुकाट होई आणि भीति वाटे. पण आणखी असें वाटे कीं हें शहर फक्त अधिकारी, अंमलदार, कारकून, शिपाई, गाडीघोडे यांच्यासाठीं आहे; रडणारीं, हंसणारीं, सुखीदुःखी, वेडीवाकडीं, लहानथोर माणसेंमुलें यांच्यासाठीं नाहीं. घाण, गर्दी, गलबला असलेल्या अस्ताव्यस्त पसरलेल्या जुन्या दिल्लींत जो आपलेपणा वाटे तो या नव्या शहरांत वाटेना. स्वतःचें वेडेवाकडें घर आणि साफसूफ नीटनेटकी कचेरी यांतल्या फरकासारखें हें कांहीं तरी होतें. कित्येक शतकांच्या इतिहासांत मुरलेल्या जुन्या दिल्लीचा खानदानी प्रौढपणा नव्या दिल्लीच्या उपट-सुंभ श्रीमंतींत नव्हता.

## नव्या दिल्लींत आलेली माणुसकी

आतां नव्या दिल्लींत खूपच गर्दी झाली आहे, आणि फाळणीनंतर तर सर्व फुटपाथ आणि चौक पंजाबी निर्वासितांच्या छोट्या छोट्या दुकानांनीं, भाजीपाला-मिठाई विकणारांनीं, पुरी-परोठा-समोसे तळणारांनीं आणि लष्क-रांच्या झोपड्यांनीं फुलून गेले आहेत. पण या घाणीबरोबर आणि गर्दीबरोबर माणुसकीहि नव्या दिल्लींत आली आहे, असें वाटलें. उत्तर हिंदुस्थानी लोकांपेक्षां आपण स्वतःला फार हुशार आणि अधिक सुधारलेले समजतों; पण रस्त्यांत, गाडींत, बसमध्यें आम्ही एकमेकांशीं किती तुसडेपणानें वागतों.




कांहीं दृश्यें, नवी दिल्ली

हे साधेभोळे, धिप्पाड, राकट लोक किती सौजन्यानें वागतात आणि किती आर्जवी भाषा बोलतात. हमाल असो, गाडीवाला असो, दुकानदार असो,

सा ब, ज ना ब, बा बू जी, स र का र, भा ईशिवाय संबोधन नाहीं. बस-ड्रायव्हर आणि कंडक्टर यांना गणवेष नाहीं. मळके पायजमे आणि फाटके कोटच त्यांच्या अंगावर असतात एका कापडाच्या पिशवींत तिकिटांचे पैसे खुळखुळत असतात; पण एखादी तरुण स्त्री चढत असली किंवा म्हातारी उतरत असली कीं ' रोको, रोको, बेनजी चढता है—माताजी उतरता है ' म्हणून ओरडाआरड करून ते बस थांबवून धरतात. सर्व पुरुष ज ना ब आणि बा बू जी, सर्व बायका बे न जी आणि मा ता जी !

## शांत आणि सुस्वभावी गबाळेपणा

मात्र या लोकांचा कारभार जरा गबाळा आणि ढिलाच. त्यामुळें केव्हां केव्हां आपण चिडतों आणि चडफडतों. पण एवढ्यातेवढ्यासाठीं उगाच स्वतःला त्रास करून घेणारे आपणच खुळे आहोंत, असें कांहीं वेळानें वाटतें; आणि सर्व कांहीं आरामशीरपणें करणाऱ्या या लोकांचा हेवा वाटूं लागतो. जुन्या दिल्लींतल्या बड्या डाकखान्यांत, जनरल पोस्ट ऑफिसांत, आमचे पैसे घेण्याकरतां गेलों होतों. जिथें आपली ओळख पटवून द्यायची तिथला कारकून भर दुपारीं बारा वाजतां जागेवर नव्हता. पोस्टखात्याचें छापील पत्र आपलें नांव घालून आलेलें असतें. तें घेऊन पोस्टमास्तरसाहेबांच्याकडे गेलों. पोस्टखात्याचेंच ठराविक छापील पत्र, पोस्टखात्यांतल्या माणसाला त्यांत नवीन कांहींच नसतें. पण आम्हाला मोठ्या अदबीनें बसायला खुर्च्या देऊन मास्तरसाहेबांनीं तें पहिल्यापासून शेवटपर्यंत काळजीपूर्वक वाचण्यांत पंधरा मिनिटें घालवलीं. नंतर शिपायाला बोलावण्याकरतां टेबलावरची घंटा वाजवली. तिथें कुणीच नव्हतें आणि कुणीच आलें नाहीं. पण म्हातारे मास्तरसाहेब मुळींच चिडले नाहींत. थोड्या वेळानें एक कारकून तिथून जात असलेला दिसला. त्याला हांक मारून तो दुसरा कारकून जागेवर आला कीं नाहीं म्हणून पहायला सांगून आम्हांला त्याच्याबरोबर मास्तरसाहेबांनीं पाठवून दिलें. इतका वेळ झाला तरी तो जागेवर आलेला नव्हताच. ' तुम्ही इथें बसा, मी त्याला पाहून येतों ' असें अत्यंत सौजन्ययुक्त भाषेंत आम्हांला सांगून तो कारकून गेला. वीसपंचवीस मिनिटांनीं तो परत आला. या जागेवरचा कारकून चहा प्यायला गेला

होता, पण त्याला एकदम बरें वाटेनासें झालें म्हणून त्याच खोलींत तो पडून राहिला आहे,–तो म्हणाला.

'मग, आतां काय करायचं ?' आम्ही निराश होऊन विचारलें.

'नाहीं, तसा फार आजारी नाहीं. येतोय तो उठून–' असें आश्वासन देऊन तो निघून गेला.

थोड्या वेळानें कोट अंगावर नीट चढवीत आणि बटनें लावीत तो हवा असलेला कारकून आला, आणि आमचे पैसे मिळण्याची व्यवस्था झाली. सर्व कारभार कसा शांततेनें, आरामानें आणि सुजनतेनें चालला होता; फक्त शांतता आणि आराम नव्हता आमच्या मनाला, आणि आमच्या सुजनतेचा सांठा चालला होता फार झपाट्यानें ओसरत! पण झटपट काम करणाऱ्या उद्धट आणि चिडखोर हुशार लोकांपेक्षां हे शांत आणि सुस्वभावी गबाळे लोकच मला अधिक पसंत आहेत.

संध्याकाळीं इंडियागेटच्या बाजूला फिरायला गेलों होतों. मुंबईच्या गेट वे ऑफ इंडियासारखाच पण कातीव दगडांचा खूप उंच हा गेट आहे. या गेटमधून खूप दूर अंतरावर अगदीं नाकासमोर भव्य व्हाइसरीगल लॉज, आणि सेक्रेटरिएटच्या अवाढव्य इमारती दिसतात. लॉजच्या घुमटामागें सूर्य अस्ताला जात होता, आणि त्या अजस्र इमारती तांबड्या पिवळ्या प्रकाशांत चमचमत होत्या.

ता. २९ मार्च, १९४९

सकाळीं लाल किल्ला पहायला गेलों. या किल्ल्यांतहि आग्र्याप्रमाणेंच अर्ध्या भागांत लष्करी छावणी आहे. मेजर जनरल जगन्नाथराव भोसले, धिल्लाँ, सहगल वगैरे आझाद हिंद फौजेचे अधिकारी इथेंच स्थानबद्ध होते. आग्र्याचा किल्ला पाहिल्यानंतर लाल किल्ल्यांत पहाण्यासारखें फारच थोडें उरतें. तसेच संगमरवरी दगडाचे दिवाण-इ-आम्, दिवाण-इ-खास, तेच खांब, त्याच कमानी, तेंच नक्षीकाम. तेव्हां वाटाड्या घ्यायचा नाहीं, आणि पांढऱ्या दगडांच्या

ओक्याबोक्या मशिदी आंत जाऊन पहायच्या नाहींत, असें आम्ही ठरविलें होतें. एका महालांत एक मोठें थोरलें संगमरवरी आसन दिसलें. इथेंच मोंगल बादशहाचें तख्त होतें, आणि इथेंच तें महादजी शिंद्यांनीं फोडलें, असें कळलें. त्या आसनाकडे मोठ्या कौतुकानें पाहिलें. एका हमामखान्यांत स्नानाचें गुलाबपाणी वाहून जाण्याकरतां संगमरवराचे पाट आहेत, आणि त्या पांढऱ्या फरशींत काळ्या दगडाच्या साखरपाल्यासारख्या आकृती कोरल्या आहेत. त्यांतून पाणी वहात असे तेव्हां या आकृतीमुळें आंत मासे सळसळत असल्यासारखा भास होत असे म्हणतात. लाल किल्ला पाहून परत येतांना वाटेंत एका हातगाडीवर नारळाचीं वळीं विकीत असलेला एक माणूस दिसला. आम्हा कोकणी लोकांना नारळाचें आणि खोबऱ्याचें विशेष कांहीं वाटत नाहीं. हर पदार्थांत आम्ही तो घालतों आणि उठतां बसतां खातों. पण इथें दिल्लींत उत्तर हिंदुस्थानी लोकांना हें फळ म्हणजे मोठा कौतुकाचा विषय असेल !


## दरबार हॉलमधील कलाप्रदर्शन

संध्याकाळीं व्हाइसरीगल लॉजच्या मुख्य दरबार हॉलमध्यें असलेलें कला-प्रदर्शन पहावयाला गेलों. हिंदुस्थानांतल्या प्राचीन शिल्पकलेचे, चित्रकलेचे व इतर हर प्रकारच्या कारागिरीचे उत्कृष्ट नमुने इंग्लंडमध्यें एका मोठ्या प्रदर्शना-करतां आपल्या सरकारनें पाठविले होते. ते तिथून परत आल्यानंतर येथें त्यांचें मुद्दाम प्रदर्शन मांडण्यांत आलें आहे. हें प्रदर्शन पहावयाला मिळालें हें मी मोठेंच भाग्य समजतों. तक्षशिलेपासून रामेश्वरपर्यंतच्या आणि सांचीपासून पुरी-पर्यंतच्या प्राचीन भारतांतल्या शिल्पकलेचे नमुने, चित्रें, पोथ्या, कपडे, शस्त्रास्त्रें यांना एकदम एकत्र पहावयाला मिळणें म्हणजे भारतीय कला आणि संस्कृति यांचा हजारों वर्षांचा इतिहास डोळ्यापुढें जिवंत उभा रहाण्यासारखेंच होतें. व्हाइसरीगल लॉजचें आंतून दर्शन घेणें पूर्वींच्या काळीं सामान्य माणसाला जवळ जवळ अशक्य कोटींतलें होतें. पण या प्रदर्शनाच्या निमित्तानें मोंगलांच्या ऐश्वर्याशीं स्पर्धा करण्याकरतां ब्रिटिश साम्राज्यसत्तेनें बांधलेल्या या अफाट प्रासा-दाची एक बाजू तरी गोरगरीबांना पहावयाला मिळाली. बाहेरच्या खुल्या प्रांगणांत सांची स्तूपाभोंवतालच्या प्रख्यात दगडी कठड्याचे कांहीं भाग,

बान्हुत, भिल्सा वगैरे ठिकाणचे भव्य प्राचीन स्तंभ, कोरीवकाम असलेल्या बाराशें ते अठराशें वर्षांच्या जुन्या कमानी वगैरे आंत ठेवतां न येण्यासारखे अवजड प्राचीन अवशेष रांगेनें लावून ठेवलेले होते. वर दरबार हॉल्कडे जायच्या पायऱ्यांकडे जातांनाच अशोकस्तंभावरल्या त्या प्रख्यात वृषभाची मूर्ति दिसली. त्या बैलाचा रुबाब आणि ऐट अशी कांहीं आहे कीं वीर्यशाली पुरुषाला पुरुषर्षभ कां म्हणतात तें ताबडतोब ध्यानांत आलें ! दरबार हॉलमध्यें समोरच ठेवलेली अभयमुद्रा बुद्धाची दहाबारा फूट उंचीची भव्य मूर्ति पहातच रहावें अशी आहे. भुवनेश्वर येथील प्राचीन शिल्पाचे नमुने म्हणून, आरशांत आपलें तोंड पहात असलेल्या एका स्त्रीची आणि आपल्या छबुकल्याचें कौतुक करीत असलेल्या एका स्त्रीची अशा दोन मूर्ति इथें होत्या. आरशांत पहाणाऱ्या स्त्रीच्या मानेचा झोंक, तिच्या कमरेचा बांक आणि मुलाला खेळवणाऱ्या स्त्रीच्या चेहेऱ्यावरील भाव यांचें सौंदर्य स्तंभित करून टाकणारें होतें. दुसऱ्या शतकांतल्या म्हणजे अठराशें वर्षांपूर्वींच्या मथुराशिल्पाच्या नमुन्यांत मद्य पिऊन तर्र झालेल्या दोन तीन स्त्रिया 'नयनान्यरुणानि घूर्णयन् वचनानि स्खलयन्पदेपदे' अशा चालल्या आहेत आणि दोनतीन स्वतः तर्र झालेले पुरुष त्यांना सावरीत आहेत, असें कमालीचें वास्तव दृश्य होतें !

## भारतीय कलेचे अप्रतिम नमुने

मोहेंजोदारो आणि हराप्पा येथें सांपडलेले इसवी सनापूर्वी कित्येक हजार वर्षांपूर्वींच्या सिंधूच्या खोऱ्यांतल्या संस्कृतीचे कांहीं अवशेष कांचेच्या पेट्यांत व्यवस्थितपणें मांडून ठेवलेले होते. त्यांतले कुंभारकामाचे कांहीं नमुने, आंगठ्या, रंगीत दगडांचे कंठे, कर्णभूषणें, वगैरे पाहून आश्चर्य वाटलें. त्यांतलें नक्षीकाम आणि आकृती खरोखरच प्रेक्षणीय आहेत. एका मातीच्या कुंभावर एक माणसाचा सांगाडा आपल्या दोन्ही बाजूंना दोन हातांनीं हरणासारखे दिसणारे दोन प्राणी धरून उभा आहे, आणि एक कुत्रा त्यांपैकीं एका हरणाची शेंपटी तोंडानें ओढतो आहे, असें चित्र होतें. मृत माणसाचा आत्मा स्वर्गांतला कुत्रा वर ओढून नेतो आहे, असें कांहीं तरी प्रतीक त्या चित्रांत आहे असें तिथें ठेवलेल्या कागदावर लिहिलें होतें !




भारतीय कलाप्रदर्शनांतील कलाकृति

रजपूत, पहाडी, दख्खनी, गुजराती चित्रकलेचे नमुने एका दालनांत होते. दुसऱ्या एका दालनांत जुन्या काळच्या शाली, पैठण्या, राजेराण्या वापरीत असलेले किनखापाचे परकर, चोळणे, अंगरखे वगैरे ठेवले होते. एका महाराण्याच्या जरतारी किनखापावर वितीवितीवर जरीचे बुट्टे होते आणि प्रत्येक बुट्ट्यांत महाराण्याचें नांव होतें! निरनिराळ्या रंगांच्या आणि सोनेरी वर्खांच्या वेलबुट्ट्यांनीं सुशोभित केलेल्या कागदावरल्या, वळणदार संस्कृत किंवा फारशी हस्ताक्षर असलेल्या शेंकडों वर्षांच्या जुन्या पोथ्या ठिकठिकाणीं कांचेच्या पेट्यांत ठेवलेल्या होत्या. एका दालनांत जुन्या बंदुका, तलवारी, जंबिये, खंजीर वगैरे होते. तलवारींच्या किंवा खंजीर-जंबियांच्या रत्नजडित किंवा हस्तिदंती मुठींचे आकार आणि त्यावरलें नक्षीकाम अप्रतिम होतें. एक स्फटिकाची मूठ पोपटाच्या आकाराची होती, तर दुसरी हस्तिदंती बोकडाच्या डोक्यासारखी होती! इंडोनेशियन प्रजासत्ताकाचे अध्यक्ष डॉ. सुकर्ण यांनीं जवाहरलाल नेहरूंना नजर केलेलीं, जावा बेटांतल्या पांडवांच्या आणि कृष्णाच्या जीवनावर आधारलेल्या जावा बेटांतल्या नृत्यांचीं कागदांतून कातरलेलीं तिमिरचित्रें (Silhouettes) एका बाजूला मांडून ठेवलीं होतीं.

## बागनेटांची हडेलहप्पी कलेच्या राज्यांत कशाला?

या अजस्र दरबार हॉलचे पांढऱ्या संगमरवराचे किंवा मौल्यवान् पिवळ्या दगडाचे भव्य स्तंभ, सुंदर नक्षीकाम केलेल्या छतांतून लोंबणारे अवाढव्य झुंबर, भिंतींतले मेणबत्त्यांच्या आकाराचे विजेच्या दिव्यांचे गुच्छ, हें सर्व वैभव पाहिलें आणि अशीं किती तरी दालनें या गव्हर्मेंट हाऊसमध्यें आहेत हें लक्षांत घेतलें कीं, मोंगलांवर ताण करण्याचें आपलें स्वप्न एक डझन दिवाण–इ–आम आणि दिवाण–इ–खास मावतील असा हा प्रासाद बांधून ब्रिटिशांनीं खरें केलें, असें वाटूं लागतें. मात्र संपूर्ण स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आणि पहिला हिंदी गव्हर्नर जनरल इथें रहावयाला आल्यानंतरहि या प्रासादाच्या प्रवेशद्वाराशीं जॉर्ज बादशहा आणि राणी मेरी यांचे भव्य संगमरवरी पुतळे पाहून कसेंसेंच वाटतें. जुन्या राजवटीचीं हीं प्रतीकें आतां जितक्या लवकर एखाद्या पुराणवस्तुसंग्रहालयांत जातील तितकें बरें. आणखी एक गोष्ट माझ्या मनाला

सारखी खटकत होती. सेक्रेटरियटमध्यें दाराशींच नव्हे तर पावलोपावलीं चकचकीत बागनेटें लावलेले गुरखे शिपाई पाहिले कीं, आपल्याच लोकांच्या राज्यांत आपण फिरतों आहोंत असें वाटत नाहीं. सध्यां परिस्थिती फार वाईट आहे, आणि मंत्र्यांसाठीं सशस्त्र पहाऱ्याची आवश्यकता आहे हें मान्य करावयाला पाहिजे. पण मनाला बरें वाटत नाहीं हें खरें. इथला सशस्त्र पहारा किंवा व्हाइसरीगल लॉजच्या प्रवेशद्वाराशीं उभे असलेले रुबाबदार सशस्त्र सैनिक पाहून मला विशेष कांहीं वाटलें नाहीं. माझ्या मनाची मी कशी तरी खात्री करूं शकलों. पण मला चीड आली ती व्हाइसरीगल लॉजमधल्या प्रदर्शनाच्या प्रत्येक दालनांत दोन दोन तीन तीन लखलखीत बागनेटें लावलेल्या बंदुका घेऊन उभ्या असलेल्या गुरख्यांना पाहून. मौल्यवान वस्तूंना कुणी हात लावील किंवा मोडतोड करील म्हणून असल्या प्रदर्शनांत शिपाई, प्यादे, ' चपराशी हवेत यांत शंकाच नाहीं. पण बागनेटें सज्ज केलेले ' हुडेलहप्पी ' या कलेच्या राज्यांत कशाला ? शिल्पांची किंवा प्राचीन चित्रांची नक्कल करून घेण्याकरतां दूरदूरचे कलावंत इथें येऊन बसत असत; त्यांच्या कलासमाधीला हा शस्त्रांचा चकचकाट खात्रीनें पोषक नव्हता. जगांतलीं कांहीं विख्यात कलागृहें मी पाहिलीं आहेत. तिथें पहारेकरी आहेत कीं नाहीं, हें ध्यानांतहि येत नाहीं. साऱ्या वातावरणांत सौंदर्य आणि शांतता दरवळत असते. ते गुरखे शिपाई रुबाबदार आणि सुस्वभावी दिसत होते; पण त्या कलावस्तूंच्या मेळाव्यांत त्यांचे खाकी गणवेष आणि लखलखणारीं बागनेटें मला असह्य झालीं.

## काणेकरांसारखेच दिसणारे—काणेकर !

असेंब्लीची बैठक सध्यां चालू आहे, तिथें आज थोडा वेळ जाऊन बसायचें ठरविलें होतें. दुपारीं पावणेबाराच्या सुमारास असेंब्लीच्या त्या भव्य वर्तुळाकार इमारतीशीं जाऊन पोहोंचलों. कुणातरी सभासदाची ओळख असल्याशिवाय असेंब्लीचें कामकाज पहावयाला आंत जाण्याची प्रवेशपत्रिका मिळत नाहीं. रिसेप्शनिस्टकडे चवकशी करतां काकासाहेब गाडगीळ असेंब्लींत आले नसल्याचें कळलें. काय करावें म्हणून विचार करीत उभा होतों,

इतक्यांत पूर्वी 'ज्ञानप्रकाश'मध्यें असलेले व सध्यां दिल्लींत पत्रप्रतिनिधी म्हणून राहिलेले श्री. लोकूरकर जिन्यावरून खालीं येतांना दिसले. त्यांनीं ताबडतोब अध्यक्ष मावळणकरांचे चिटणीस श्री. नाफडे यांना भेटून आम्हाला प्रवेशपत्रिका आणून दिल्या. लोकूरकरांचे आभार मानून आम्ही प्रेक्षकांच्या गॅलरींत जाऊन बसलों. कसल्या तरी रटाळ विषयावर चर्चा चालू होती. बहुतेक बाकें रिकामींच होतीं. मंत्र्यांच्या बांकावरहि कुणी महत्त्वाचे मंत्री नव्हते. फडणीस मथाई यांच्या खात्यासंबंधींच कांहीं चर्चा चालू असल्यामुळें ते मात्र आपल्या बाकावर जवळ जवळ आडवे झाल्यासारखे पडले होते. श्री. अनंतशयनम् अय्यंगारांचें टणठणीत मद्रासी इंग्रजींत वक्तृत्व चाललें होतें. ते खालीं बसल्यावर आसामचे श्री. छलिया उभे राहिले. इतक्यांत अध्यक्ष मावळणकर कांहीं कामाकरितां आंत उठून गेले, आणि अनंतशयनम् अय्यंगार डेप्युटी स्पीकर असल्यामुळें ते अध्यक्षस्थानीं जाऊन बसले. चर्चेंत कांहीं रंग भरत नव्हता तेव्हां उठून आम्ही बाहेर आलों. असेंब्लीच्या गॅलरींत मी एका बाजूला गेलों, आणि दलाल माझी वाट पहात उभे राहिले. मी पांच मिनिटांनीं परत आलों, पण तितक्यांत एक गंमत झाली होती. त्या दिवशीं मी पायजमा आणि शेरवानी घातली होती. शेरवानींत मला कुणी फारसें पाहिलेलें नाहीं. आम्ही असेंब्लींत चर्चा ऐकत बसलों होतों तेव्हां समोरच्या प्रेस गॅलरींत दिल्लींत 'महाराष्ट्र न्यूज सार्व्हिस' नांवाची संस्था चालविणारे श्री. कुळकर्णी हे एक महाराष्ट्रीय पत्रकार इतर पत्रप्रतिनिधींबरोबर बसले होते. ते बेळगांवच्या बाजूचे आहेत. दहा बारा वर्षांपूर्वी त्यांनीं मला पाहिलें होतें. पण शेरवानींत बसलेला हा समोरचा इसम काणेकर असेल असें त्यांना मुळींच वाटलें नाहीं. हुबेहूब काणेकरांसारखा चेहरा असलेला हा कुणी तरी उत्तर हिंदुस्थानी गृहस्थ आहे, तेव्हां याचा फोटो घ्यावा, आणि अगदीं काणेकरांसारखा दिसणाऱ्या या माणसाचा फोटो मराठी पत्रांना पाठवून एक 'स्कूप' करावा, असा विचार त्यांच्या मनांत आला. आम्ही उठून बाहेर आल्याबरोबर तेहि आमच्या मागोमाग बाहेर आले. तितक्यांत मी बाजूला गेल्यामुळें त्यांना दिसलों नाहीं. दलाल तिथें उभे होते. तेहि दिल्लींतलेच कुणीतरी गृहस्थ असतील, आणि त्यांच्या-बरोबर हा काणेकरांसारखा दिसणारा माणूस आला असेल अशा कल्पनेनें त्यांनीं

सफाईदार हिंदुस्थानींत 'तुमच्याबरोबर असलेले ते गृहस्थ कोण' म्हणून दलालांना विचारलें. दलालांनीं शुद्ध मराठींत ते काणेकर म्हणून सांगितलें, तेव्हां अर्थात् त्यांचा 'स्कूप' जागच्या जागीं जमीनदोस्त झाला! मी परत आलों तेव्हां ते दलालांशीं बोलत उभे होते. अगदीं सारखीं दिसणारीं दोन माणसें असूं शकतात हें मी दाखवणार होतों, ते म्हणाले, पण सगळेंच फिसकटलें!


## घटनापरिषदेचें शोभिवंत दालन

श्री. कुळकर्णी यांची भेट झाल्यामुळें आम्हाला फार आनंद झाला. दिल्लींत बरीच वर्षें राहिलेला कुणी तरी महाराष्ट्रीय मित्र आम्हाला दिल्लींत भटकतांना बरोबर हवाच होता. असेंब्लीच्याच इमारतींत असलेली घटनापरिषदेची जागा, फेडरल कोर्ट वगैरे कुळकर्ण्यांनीं दाखविलें. पूर्वी जिथें नरेंद्र मंडळ किंवा प्रिन्सेस चेम्बर होतें, तिथें आतां फेडरल कोर्ट बसतें. या भव्य वर्तुळाकार इमारतीचे तीन भाग होते. एकांत असेंब्ली बसे, एक कौन्सिल ऑफ स्टेट् आणि तिसरा भाग नरेंद्रमंडळाचा. मधल्या लहान वर्तुळांत असेंब्लीचें वाचनालय होतें. त्याचेंच आतां घटना-परिषदेंत रूपांतर झालें आहे. घटनापरिषदेचें हें दालन आतां नव्या स्वरूपांत अतिशय आकर्षक दिसतें. नवे कोरे सुबक बाक सभासदांकरतां आहेत. प्रत्येक बाकावर दोन किंवा तीन सभासद बसतात. त्यांच्या नांवाच्या व्हिजि-टिंग कार्डाच्या आकाराच्या चिठ्या बसायच्या जागेसमोरील मेजावर लावलेल्या आहेत. आम्ही आंत गेलों, तेव्हां बैठक चालू नसल्यामुळें दालन रिकामेंच होतें. त्यामुळें वल्लभभाई पटेल इथें बसतात, बाळासाहेब खेर इथें बसतात, पंडित जवाहरलाल इथें बसतात म्हणून त्यांच्या नांवाच्या चिठ्या पहात आम्ही आरामशीरपणें आंत फिरत होतों. अध्यक्षांच्या उच्चासनाच्या मागें गांधीजींचें एक भव्य चित्र लावलें आहे. पूर्वी इथें असेंब्लीचें ग्रंथालय असतां सभोवार भिंतीवर माजी व्हाइसरॉयांच्या प्रतिमा रांगेनें लावलेल्या होत्या. त्या झांकण्याकरतां म्हणून त्यांच्यावर तिरंगी राष्ट्रध्वज लावले आहेत. नवीन येणाराला शोभेकरतांच ही तिरंगी राष्ट्रध्वजांची रांग लावली आहे, असें वाटेल. सभागृह खरोखरच त्यामुळें शोभिवंत दिसतें. हें सर्व पाहून होईपर्यंत दीड वाजला होता. कॅनॉट-सर्कसमधल्या एका हॉटेलांत जेवण घेतलें;

आणि कुळकर्ण्यांच्या ओळखीनें एक टॅक्सी ठरवून संध्याकाळपर्यंत भटकण्याकरतां बाहेर पडलों.

## विर्ला हाऊसची ती बाग !

पहिल्यांदा दिल्लीच्या दुसऱ्या टोंकाला दहा अकरा मैल दूर असलेला कुतूबमिनार पहावयाला गेलों. कुतूबमिनारच्या बाजूचा बाग आणि डाकबंगला




कुतुबमिनार, दिल्ली

छानदार आहे. कुतूबच्या जवळच एक अशोकाचा लोहस्तंभ आहे. कुतूबवरतीं कुराणाचीं अक्षरें कोरलेलीं आहेत आणि हा कुतूबशहानें बांधला हें खरें आहे; पण एक दंतकथा अशी आहे कीं पृथ्वीराज चव्हाणानें हा पहिल्यांदा बांधला. पृथ्वीराजाची मुलगी दररोज यमुनेचें दर्शन घेतल्याशिवाय अन्न घेत नसे. तिला रोज जाण्यायेण्याचा त्रास होऊं नये; या स्तंभावर जाऊन यमुनेचें दर्शन तिनें घ्यावें या हेतूनें त्यानें तो बांधला, पुढें कुतूबशहानें त्यावर आणखी मजले चढवले, आणि कुराणाचीं अक्षरें खोदून नवें कोरीवकाम केलें. कुतूबच्या कांहीं भागांत हिंदु वास्तुकलेचे अवशेष दिसतात, असें सांगतात. प्राचीन हिंदु मंदिरांचे अवशेष असलेले कांहीं सुरेख कोरीवकाम केलेले खांब कुतूबमिनारच्या आजूबाजूला आहेतच.

तिथून दुपारीं तीनच्या सुमारास बिर्ला हाऊसकडे आलों. याच बिर्ला हाऊसच्या बागेंत गांधीजींचा खून झाला. मागल्या वाटेनें आम्ही बागेंत आलों. तिथें चिटपांखरूंहि नव्हतें. सर्वत्र शांतता होती. फक्त एक पहारेकरी एका कोपऱ्यांत बसला होता. ज्या फुलझाडांच्या आळींतून गांधीजी नेहमीं सायंप्रार्थनेला येत असत आणि तीस जानेवारीच्या त्या संध्याकाळींहि आले ती पाहिली. पुढें दोन तीन पायऱ्या आहेत. त्या चढून पलीकडच्या जागीं ते जात असत. याच पायऱ्या चढतांना मारेकऱ्यानें गोळ्या झाडल्या. तिथेंच ते पडले. त्या जागीं एक चौथरा बांधला आहे. त्यावर 'हे राम' हे गांधीजींच्या तोंडचे शेवटचे शब्द कोरले आहेत. कांहीं फुलें त्यावर पडलीं होतीं. तीन भिंती आणि छप्पर असलेल्या उपासनेच्या जागीं गांधीजी ज्यावर बसत असत तें चौकोनी लाकडी आसन भकास पडलें होतें. मागल्या भिंतींतली खून खटल्यांत अनेक वेळां उल्लेखिलेली ती जाळीदार खिडकी पाहिली. साऱ्या जगाला हादरून टाकणारा तो भयंकर प्रसंग इथें घडला? छेः!—किती स्वच्छ ऊन पडलें आहे! बागेंतील रंगीबेरंगी फुलझाडें, हिरवेंगार गवत किती टवटवीत दिसतें आहे! त्या स्तब्ध वातावरणांत हें प्रशांत दृश्य पहात असतां असें कांहीं इथें घडलें असेल हें क्षणभर खरेंच वाटेना.

## जुन्यानव्या शिल्प-चित्र-कलांचा चिवडा

बहुतेक गांवांत हिंदूंचीं जुनीं देवालयें असतात; आणि धर्मनिष्ठ म्हातारे-कोतारे आणि भोळयाभाबड्या बायाबापड्या सकाळीं किंवा संध्याकाळीं तिथें देवदर्शनाला जातात. प्रख्यात धनपति बिर्ला शेटजी यांनीं 'बिर्लामंदिर' या नांवानें ओळखलें जाणारें एक नवें कोरें भव्य मंदिर दिल्लींतील हिंदूंसाठीं बांधलें आहे. बिर्लांची मूर्ति आंत नाहीं—बिर्लांनीं बांधलें म्हणून बिर्लामंदिर ! मूर्ति लक्ष्मीनारायणाचीच आहे. पांढऱ्या पाषाणाची मोठी सुंदर मूर्ति आहे. मंदिराच्या शेजारींच एक अन्नावत् धर्मशाळा आहे. हें बिर्लामंदिर म्हणजे अनेक मंदिरांची एक लहानशी वसाहतच आहे. संगमरवरी दगडाची फरशी आणि तांबड्या दगडाचीं गोपुरें असलेलीं 'बुद्धमंदिर', 'गीतामंदिर' वगैरे दोन चार प्रशस्त मंदिरें या आवारांत आहेत. कांहीं भिंतींवर मत्स्य, कूर्म वगैरे अवतारांचे देखावे कोरले आहेत, तर कांहींवर हिंदु, शीख, जैन धर्मवीरांचीं रंगीबेरंगी चित्रें रंगविलीं आहेत. एक भली मोठी चिनी घंटाहि एके ठिकाणीं आहे. मागल्या बाजूच्या खुल्या डोंगराळ जागेंत पाण्याचे पाट सोडले आहेत. दगड-चुन्याच्या गुहा आहेत. सिमेंट-कॉंक्रीटचे वाघ, सिंह, उंट आहेत ! मुलांबाळांना खूप मजा वाटते ! खूप खर्च करून सर्व प्रकारच्या जुन्यानव्या शिल्पकलांचा आणि चित्रकलांचा छानदार चिवडा तयार केला आहे. या मंदिराशेजारींच हिंदुमहासभाभवन आहे. भवनाच्या प्रशस्त हॉलच्या भिंतींवर मोटमोटीं चित्रें रंगविलीं आहेत. एका चित्रांत जिंकलेल्या शत्रूला औदार्य दाखवून सोडून दिल्यामुळे त्याच शत्रूच्या हातून पृथ्वीराजाला कसें मरण आलें तें ठळक अक्षरांत सांगितलें आहे. हॉलला लागूनच कचेरी आणि पाहुण्यांकरितां खोल्या आहेत. भवनाच्या मागल्या बाजूला जंगली डोंगराळ भाग आहे. बिर्लामंदिर आणि हिंदुमहासभाभवन पाहून होईतां संध्याकाळचे पांच साडेपांच झाले होते. टॅक्सी-वाल्याला आम्हीं थेट यमुनेच्या कांठीं राजघाटाकडे टॅक्सी न्यावयाला सांगितलें.

### —आणि राजघाटावर !

दूर यमुनेचें पाणी दिसत होतें. जिथें गांधीजींच्या देहाला अग्नि दिला त्या जागीं एक साधा सीमेंटचा चौथरा बांधलेला दिसला. चौथऱ्यावर फुलें पडलीं होतीं. हिंदुस्थानचे सरसेनापति सर रॉय बुशर हिंदुस्तान सोडून जाण्यापूर्वीं

या जागेचें दर्शन घेऊन गेले होते. त्यांनीं वाहिलेला चक्राकार पुष्पहार नांवाच्या कार्डासह तिथें होता. चौथऱ्याभोंवतीं साधा बांबूचा कठडा आहे. आजूबाजूला फारशीं माणसें नव्हतीं. एक वृद्ध गृहस्थ एका कोपऱ्यांत शांतपणें सूत काढीत बसले होते. कांहीं दिवसांपूर्वीं 'सर्वोदयसमाजा'ची एक परिषद इथें जवळच भरली होती. तिच्याकरतां बांधलेला मंडप अजूनहि काढलेला नव्हता. नंदलाल बोस किंवा अशाच कुणीतरी थोर कलावंतानें या मंडपाची कल्पना दिलेली असावी. इतका साधा आणि इतका सुंदर मंडप मी कुठें पाहिलेला नाहीं. चटया, गवताच्या पेंढ्या वगैरे वस्तू वापरून चिनी किंवा ब्रम्ही देवळासारखा दिसणारा हा मंडप केला होता. शोभेसाठीं गोंडे म्हणून ठिकठिकाणीं सुबक गवती झाडू लावलेल्या दिसल्या. इथेंहि लखलखीत संगीन लावलेली बंदूक खांद्यावर टाकलेला सैनिक पहारेकरी पाहून आश्चर्य वाटलें.

फिरोजशहा कोटला बाग या मोकळ्या जागेकडे नंतर गेलों. इथें एका बाजूला मोडकळीला आलेल्या किल्ल्यासारखे कांहीं प्राचीन अवशेष, आणि अशोकाच्या वेळचा एक स्तंभ आहे. हा स्तंभ दगडाचा किंवा लोखंडाचा नसून सिमेंटसारख्या कसल्यातरी पदार्थाचा आहे. त्यावर कांहीं शिलालेखहि कोरलेला दिसला. आजूबाजूला निर्वासितांच्या झोपड्या आहेत, आणि स्तंभाच्या पलीकडेच त्यांचे शौचकूप आहेत ! प्राचीन अवशेषांची काळजी घेण्यासाठीं सरकारचें पुराणवस्तुसंशोधन खातें आहे. आणि आग्र्याचा किल्ला, ताजमहाल वगैरे ऐतिहासिक इमारतींच्या रक्षणासाठीं लाखों रुपये खर्च होतात असें ऐकलें. मग चितोडगडावरील पद्मिनीमहालांत बलुची निर्वासित, किंवा या अशोकस्तंभाजवळ पंजाबी निर्वासित घाण करण्याकरतां कां आणून ठेवले आहेत ? या ऐतिहासिक स्थलांखेरीज दुसऱ्या मोकळ्या जागा कुठें नाहींत काय ?

ता. २१ मार्च, १९५०.

## दिल्लीचें कलाप्रेम !

दुपारीं पत्रकार कुळकर्ण्यांच्या बरोबर दिल्लींत स्थाईक झालेले एक महाराष्ट्रीय चित्रकार श्री. के. एस्. कुळकर्णी यांच्या घरीं गेलों. कुळकर्णी यांच्या

चित्रांचें नुकतेंच एक 'सबकुछ कुलकर्णी' (वन् मॅन् शो) प्रदर्शन दिल्लींत भरलें होतें आणि तें चांगलेंच यशस्वी झाल्याचें कळलें. अखिल भारतीय कीर्ति, आणि चित्रें विकत घेऊं शकणारीं अखिल भारतीय 'धेंडें' राजधानीच्या शहरांत मिळण्याचा अधिक संभव असल्यामुळें हिंदुस्थानांतल्या निरनिराळ्या प्रांतांतले नामांकित चित्रकार अलिकडे दिल्लींत स्थाईक होण्याचा प्रयत्न करीत आहेत. माझे चित्रकार मित्र श्री. गोंधळेकर यांनींहि दिल्लींत चांगलें नांव केलें आहे. कुळकर्ण्यांच्या घरीं चित्रकार कनवाल कृष्ण यांची गांठ पडली. 'दिल्लींत कलेचें चांगलेंच कौतुक होतें असें दिसतें,' मी म्हणालों. 'हो, कौतुक म्हणजे,' कनवाल कृष्ण म्हणाले, 'नेहरूंना प्रदर्शनाच्या उद्घाटनाकरतां आणलें तर त्यांच्याबरोबर आपला फोटो वर्तमानपत्रांत यावा आणि एखादें इंपोर्ट-एक्सपोर्ट लायसेन्स मिळवणें सोपें व्हावें म्हणून दिल्लींतलीं सर्व बडीं धेंडें प्रदर्शनाला येतात खरीं!' या एका वाक्यांत कनवाल कृष्णांनीं दिल्लीच्या कलाप्रेमाची समर्पक कल्पना आम्हाला दिली!

ता. १ एप्रिल, १९४९

आज रात्रीं साडेनऊच्या गाडीनें अमृतसरला जायला निघायचें. दुपारीं साडेचारलाच कँटोनमेंट स्टेशनवर सामान घेऊन गेलों. जुनी दिल्ली स्टेशनांत सहाला पोंहोंचलों. सामान क्लोक-रूममध्यें ठेवून दिलें, आणि स्टेशनापासून जवळच असलेल्या नया बझारमधील महाराष्ट्र-समाजांत गेलों. संध्याकाळीं सात वाजतां समाजांत माझें व्याख्यान होतें. नूतन मराठी शाळा या नांवाची एक शाळा समाज या जागेंत चालवतो. शंभरावर मुलें शाळेंत शिकतात. दिल्लींतली बरीच महाराष्ट्रीय मंडळी इथें भेटली. व्याख्यान झाल्यावर शेजारींच अभ्यंकर नांवाच्या महाराष्ट्रीय गृहस्थांचें हॉटेल आहे तिथें आमची जेवणाची व्यवस्था करण्यांत आली होती. जेवण होईपर्यंत नऊ वाजून गेले. कसेबसे गाडी सुटायच्या आधीं पांच मिनिटें स्टेशनांत जाऊन पोंहोंचलों. गाडी ९–३५ ला सुटली.

ता. २ एप्रिल, १९४९

## धिप्पाड पंजाब्याची धिप्पाड बुद्धि !

सकाळीं ६ ला जागा झालों, तेव्हां लुधियाना स्टेशनांत गाडी उभी होती. गाडी चालू झाली. आजूबाजूला नजर टाकली. हिरवीं पिवळीं अजस्र शेतें क्षितिजापर्यंत पसरलीं होतीं. सरळ रेषेंत दूरपर्यंत गेलेले मोठमोठे कालवे मधून मधून दिसत होते. शेतांतले गाईबैलहि किती धिप्पाड ! पंजाबमध्यें




धिप्पाड पंजाबी व्यक्तिविशेष, अमृतसर

किरकोळ कांहीं नाहीं. अफाट शेतें, लांबरुंद कालवे, धिप्पाड माणसें ! बियास नदी वाटेंत लागली. बियास स्टेशनहि आहे. जालंदर स्टेशन ७–४० ला आलें. स्टेशनांतून पलीकडल्या रस्त्यावरली एक मजेदार इमारत दृष्टीला पडली. मोटारींचा धंदा करणाऱ्या कुणातरी श्रीमंताचें तें घर असावें. घराचा दर्शनी भाग मोठ्या थोरल्या मोटारच्या आकाराचा होता ! अमृतसर स्टेशनांत गाडी आली तेव्हां बरोबर नऊ वाजले होते.

अमृतसर स्टेशनांतल्या पंजाबी लगेज-क्लार्कनें आपल्या धिप्पाड बुद्धीचा आम्हाला थोडासा प्रसाद दिला. माझ्या बॅगला दोन बाजूंना दोन कुलुपें लावण्याची सोय आहे, पण मी नेहमीं एकाच बाजूला कुलूप लावतों. तो म्हणाला, 'दोन्ही बाजूला कुलुपें असल्याशिवाय मी इथें बॅग ठेवून घेणार नाहीं!' 'कुलूप नसेल तर रेल्वे जबाबदारी घेत नाहीं हें मला माहित आहे' मी म्हणालों, 'पण दोन कुलुपांची सोय असेल तर दोन्ही लावलीं पाहिजेत असा नियम नाहीं. एकाच कुलुपाची बॅग असती तर तूं काय केलें असतेंस?' 'तर घेतली असती,' तो म्हणाला, 'पण कुलुपाच्या दोन जागा आहेत तर दोन्ही ठिकाणीं लावलीं पाहिजेत!' आतांपर्यंत कित्येक स्टेशनांत ही बॅग ठेवली आहे, उगाच स्टेशनमास्तरकडे जायला आम्हांला भाग पाडूं नकोस वगैरे गोष्टी सांगून त्याची समजूत घातली, तेव्हां त्यानें बॅग ठेवून घेतली. संध्याकाळच्या डेहराडून एक्सप्रेसनें आम्हाला हरिद्वारला जायचें असल्यामुळें वेटिंग रूममध्येंच मुक्काम करावयाचा आम्ही ठरविलें होतें. तोंड धुणें, चहापाणी वगैरे आटोपून अकराच्या सुमारास शिखांचें प्रख्यात सुवर्णमंदिर पहावयाला टांगा करून बाहेर पडलों.

## फाळणीच्या जखमांचे व्रण

आठनऊ वर्षांपूर्वी मी अमृतसरला आलों होतों त्या वेळेपेक्षां स्टेशनच्या आसपासचा भाग बराच सुधारलेला दिसला. नव्या कोऱ्या बसेस स्वच्छ रस्त्यावर दिसत होत्या, आणि बागबगीचा असलेलीं कांहीं सुबक घरेंहि दिसलीं. पूर्वी पेशावर होतें त्याप्रमाणें अमृतसर हें आतां सरहद्दीचें शहर झालें आहे. इथून दोनतीन तासांच्या रेल्वे अंतरावर असलेलें लाहोर आतां पाकिस्तानचें झालें आहे. स्टेशनच्या आसपासचा भाग ओलांडून पुढें गेल्यानंतर मात्र पूर्वी पाहिलेल्या अमृतसरचे चिंचोळे बोळ आणि मळकट गल्ल्या दिसूं लागल्या. अमृतसर हें केवळ धार्मिक दृष्ट्याच नव्हे तर लोकसंख्येच्या दृष्टीनेंहि, मला वाटतें, शिखांचें शहर आहे. कारण स्टेशनांत दाढ्या, रस्त्यांत दाढ्या, दुकानांत दाढ्या, पिंजारलेल्या दाढ्या, विंचरलेल्या दाढ्या, सर्वत्र दाढ्याच दाढ्या दिसत होत्या. इथें हिंदी शब्द क्वचितच ऐकूं येत होता. 'इथऽ', 'किथऽ'; 'सिंगऽऽ' असे कोंकणी भाषेसारखे हेल असलेले पंजाबी शब्द कानावर



सुवर्णमंदिर, अमृतसर

आदळत होते. हमालांना, टांगेवाल्यांना, दुकानदारांना हिंदी भाषा, त्यांत आणखी आमची हिंदी भाषा, समजावून घेतांना डोळे विस्फारून डोकें खाजवावें लागे! शहराच्या आंत आंत जाऊं लागलों तेव्हां कांहीं गल्ल्यांत दर दोनचार घरांनंतर पडकीं, कोसळलेलीं, अर्धीं जळकीं घरें दिसूं लागलीं आणि बॉंबवर्षावानें उध्वस्त झालेल्या चित्रांतून-चित्रपटांतून पाहिलेल्या युरोपियन शहरांची आठवण झाली. १९४७ सालीं अखंड हिंदुस्थान द्विखंड झाला, त्या काळांतल्या लाहोर-अमृतसरमधल्या कत्तली-जाळपोळींचीं चित्रें डोळ्यांसमोर तरळलीं. त्या जखमांचे हे व्रण. पण हे व्रण अंगावर घेऊन अमृतसर पुन्हां हालत होतें, चालत होतें, खेळत होतें, खिदळत होतें. हमाल ओझीं वहात होते, भाजीवाले भाज्या विकीत होते, मळकट लक्तरें लोंबवीत दाढीवाले भिकारी भिक्षा मागत होते, आणि रंगीबेरंगी सलवार घातलेल्या आणि निळ्यापिवळ्या ओढण्या घेतलेल्या उंच्यापुऱ्या पुष्ट पंजाबी स्त्रिया कापडें खरेदी करीत होत्या.

## शिखांच्या सुवर्णमंदिरांत

शिखांच्या सुवर्णमंदिराच्या आवारांत शिरायच्या आधीं मुख्य प्रवेशद्वाराजवळच जोडेबूट, कॅमेरा, सिगारेट, काड्याची पेटी वगैरे वस्तू तिथें असलेल्या माणसाजवळ काढून ठेवायच्या असतात. हिंदु देवळापाशीं बसतात त्याप्रमाणें या प्रवेशद्वारापाशींहि पिवळ्यापांढऱ्या फुलांच्या माळा विकणारे फुलविके बसले



शिखांच्या सुवर्णमंदिरांत

होते. त्यांच्याजवळून एक एक माळ विकत घेऊन आम्ही आंत गेलों. त्या माळेचें काय करायचें हें आम्हाला माहीत नव्हतें, पण अशा ठिकाणीं सर्व कांहीं यथासांग करण्याचा आम्ही निश्चय केला होता. तुम्ही परके असलां तरी असले रीतिरिवाज पाळलेत कीं तिथल्या लोकांना तुमच्याबद्दल आपलेपणा वाटतो आणि आंत काय चालतें तें सर्व पहायलाहि मिळतें. आंतल्या लांबरुंद विस्तीर्ण आवारांत पांढऱ्या दगडाची फरसबंदी केली आहे आणि मध्यें खूप मोठी पाण्याची पुष्करिणी आहे. टोंकाला सुवर्णमंदिराचा सोन्याच्या पत्र्यानें मढविलेला घुमट सूर्यप्रकाशांत झगझगत होता. आम्ही दाराशीं गेलों तेव्हां आंत भजन चाललें होतें. सुवर्णमंदिर तसें फारसें प्रशस्त नाहीं. मध्यभागीं

रेशमी आणि जरतारी वस्त्रांनीं आच्छादिलेला, मला वाटतें, ग्रंथसाहेब होता. त्यावर फुलांच्या माळांचा ढीग पडला होता. बाजूला दोन तीन शीख बाजाची पेटी वाजवीत भजन म्हणत होते. सभोंवारच्या लहानशा जागेंत भाविक शीख स्त्रीपुरुषांची दाटी होती. त्या गर्दींत आम्ही कसेबसे आंत शिरून उभे राहिलों. बाहेर पुष्कळ शीख भक्तभक्तिणी हिंदु देवळांत वागतात त्याप्रमाणें सपशेल लोटांगण घालून नाक घाशीत होत्या. थोड्या वेळानें भजन संपलें आणि तिथें उभा असलेला शीख लोकांनीं दिलेल्या पांढऱ्यापिवळ्या फुलांच्या माळा ग्रंथसाहेबावर ठेवूं लागला. आमच्या माळा आम्ही त्याच्याकडे दिल्या. त्या घेऊन त्यानें प्रसाद म्हणून तिथलीं कांहीं फुलें आम्हाला दिलीं. तिथेंच आंतल्या बाजूला वर जायचा पांढऱ्या संगमरवराचा जिना दिसत होता. वर जायची परवानगी आहे कीं नाहीं याचा विचार करीत आम्ही इकडे तिकडे पहात होतों. एक म्हातारा शीख म्हणाला, 'बाबूजी, वर जा ना; फार पहाण्या-सारखें आहे वर.' आम्ही वर गेलों. पहिल्या मजल्यावर आणि त्याचप्रमाणें दुसऱ्या मजल्यावरहि एक एक शीख हात दोन हात लांबरुंद भला मोठा ग्रंथसाहेब पुढ्यांत घेऊन आपल्याकडे पोथीपठण करतात त्याप्रमाणें मोटमोठ्यानें तालावर वाचन करीत होता. सुवर्णमंदिराचे घुमट जसे सोन्याच्या पत्र्यानें मढवलेले आहेत त्याचप्रमाणें आंतहि मध्यभागीं ग्रंथसाहेब आहे त्याच्याभोंवतीं लाल मीन्याचीं पानेंफुलें काढलेल्या सोन्याच्या पत्र्यांनीं मढवलेल्या गाभा-ऱ्याच्या भिंती आहेत. बाहेर ताजमहालच्याप्रमाणें पांढऱ्या संगमरवराच्या जाळीदार भिंतींवर रंगीबेरंगी दगडांच्या वेलबुट्ट्या आहेत. सुवर्णमंदिर पाहून दुपारीं एकच्या सुमाराला आम्ही वेटिंगरूममध्यें परत आलों.

संध्याकाळीं ६-१५ च्या डेहराडून एक्सप्रेसनें हरिद्वारला जायला निघालों.

ता. ३ एप्रिल, १९४०.

## नांवें—सरकारी व लोकांचीं

सकाळीं ८ वाजतां लक्सर जंक्शन आलें. संयुक्तप्रांत सरकारनें स्टेशनां-तल्या सर्व पाट्यांचें हिंदीकरण केलेलें दिसलें. वेटिंगरूमऐवजीं 'प्रतीक्षा-


ल्य' अशी नागरी अक्षरांची पाटी होती. 'भोजनालय', 'तारघर', 'पारसलघर', आणि फलाटाच्या टोकाला 'शौचालय'!

९–३५ ला हरिद्वार स्टेशन आलें. स्टेशनाच्या आवारांतच तीन चार 'रिटायरिंग रूम्स' आणि त्यांनाच लागून एक स्वच्छ हॉटेल आहे. या 'रिटायरिंग रूम्स'मध्यें एक दिवस मुक्काम करून उद्यां सकाळीं डेहराडूनला जायचें आम्ही ठरविलें होतें. या 'रिटायरिंग रूम्स' चांगल्या प्रशस्त आहेत. विजेचा दिवा, विजेचा पंखा, स्वच्छ चादरी घातलेल्या बिछान्यासह दोन खाटा, प्रत्येक खोलीच्या मागल्या बाजूला नळ–संडासासह स्वतंत्र स्नानगृह वगैरे व्यवस्था छान आहे. शेजारच्या हॉटेलांत जेवणहि उत्तम मिळतें. स्टेशनाच्या आवारांत असल्यामुळें सुरक्षितता अधिक आहेच, पण हरिद्वार स्टेशनाचें आवार विशेष स्वच्छ आणि त्यांत लहानशी बाग, कारंजा वगैरे असल्यामुळें एखाद्या हॉटेलपेक्षांहि ही जागा चांगली वाटते. चहापाणी, आंघोळ आटोपून स्टेशनाच्या बाहेर पडलों आणि हरिद्वारमधील यात्रेकरूंचें जें तीर्थस्थान 'हरीची पायरी' ती पहावयाला टांगा करून बाहेर पडलों. हरिद्वारांत पाहावें त्याला गंगेचें नांव दिलेलें. गंगा लॉन्ड्री, गंगा हॉटेल, गंगा टॉकीज! इकडील लोकांच्या उच्चारानुसारी भाषेंत लिहिलेल्या कांहीं पाट्या मजेदार वाटल्या. 'क्रांची (म्हणजे कराची) हॉटेल', 'स्प्रिट (स्पिरिट)', 'गंगामंद्र (मंदिर)' वगैरे. हरिद्वार हें तीर्थाचें ठिकाण असल्यामुळें 'हरिकी पायरी'-च्या वाटेवर हिंदुस्थानांतल्या सर्व भागांतले स्त्रीपुरुष दिसत होते. पुण्या–साताऱ्याकडले दोन तीन घाटी पुरुष आणि स्त्रिया डोक्यावर ट्रंका घेऊन चालल्या होत्या. एका दुकानांत मुंबईकडल्या चारपांच म्हाताऱ्या कोळणी हातांत घ्यायच्या काठ्या विकत घेत होत्या. कडेवर मुलें घेऊन कांहीं मद्रासी बाया घाईघाईनें चालल्या होत्या.

## पोसलेले मासे व पंड्ये

किराणा मालाचीं, भाजीपाल्याचीं, मिटाईचीं दुकानें दोन बाजूला असलेल्या एका रस्त्यावरून टांगा चालला होता. एका बाजूला टांगा उभा करून टांगेवाला म्हणाला, 'आतां टांगा पुढें जाणार नाहीं. थोडे पुढें गेलांत कीं

हरि की पायरी दिसेल.' 'हरि की पायरी' म्हणजे लहान लहान देवळें, पुजारी–पंड्यांचीं छोटीं छोटीं छपरें यांची गर्दी असलेला एक लहानसा घाट आहे. इथल्या गंगेचा प्रवाह फारसा मोठा नाहीं. एक लहानसा वाकडा-तिकडा वेढब पूल प्रवाहावर आहे. पुलाच्या मध्यभागावरल्या गच्चींत 'राजा



'हरि की पायरी', हरिद्वार

बिर्ला टॉवर' नांवाचा एक क्लॉक टॉवर आहे. पायऱ्या उतरून पाण्याकडे गेलें कीं काळसर रंगाच्या माशांच्या झुंडी पाण्यात सळसळत असलेल्या दिसतात. आंघोळीला येणाऱ्या भाविकांनीं गंगेला अर्पण केलेल्या लाह्या, फळें वगैरे अमूप वस्तू या माशांना सतत खायला मिळतात, आणि कुणी पकडील किंवा मारील ही भीति नाहीं, त्यामुळें अगदीं धीटपणें तुमच्या पायाभोंवतीं ते पाण्यांत गर्दी करतात. भाविक स्त्रीपुरुष कमरेइतक्या पाण्यांत आंघोळी करीत होते, कुणी पोहत होते, कुणाला पंडये पूजा सांगत होते, तर कुणी नारळ, गंधफूल गंगेला वहात होते. आम्हाला घाटाकडे येतांना

पाह्यल्यापासून भय्यासारख्या दिसणाऱ्या पुष्कळ पंड्यांनीं कांहीं करायचं आहे कीं काय म्हणून विचारलें होतें; पण आम्ही त्यांना धुडकावून लावलें होतें. गंगेला निदान श्रीफलदान तरी करा, एक पंड्या म्हणाला, मी थोड-क्यांत पूजा सांगतों. पहिल्यांदा दक्षिणा बारा रुपये सांगून शेवटीं सव्वा रुपयापर्यंत तो आला ! गंमत म्हणून कांहीं तरी करायचें आम्ही ठरविलेंच होतें. गंधफुलें, नारळ त्यानें सांगितल्याप्रमाणें तिथेंच विकत घेऊन तो पूजा सांगत असतां तें सर्व गंगेला अर्पण केलें. आतां अमुक करा फक्त रुपया, आतां तमुक करा फक्त दीड रुपया, म्हणून तो सांगूं लागला. त्याला दम भरल्यावर त्यानें गंध लावून आशीर्वाद दिला, आणि सव्वा रुपया घेऊन तो निघून गेला. नंतर जवळ जवळ अर्धीअधिक पाण्यांतच असलेलीं छोटीं छोटीं देवळें पहात आम्ही फिरूं लागलों. प्रत्येक ठिकाणीं लोचट भिकाऱ्यासारखी चाललेली पुजाऱ्यांची याचना पाहून उद्वेग आला.

## दक्षप्रजापतीचें जुनाट मंदिर

'हरि की पायरी' पाहून टांग्याकडे आलों. 'आतां काय पाह्यचं बुवा !' टांगेवाल्याला आम्ही विचारलें. इथून कांहीं मैलावर कनखल आहे, तिथलं दक्षप्रजापति मंदिर पाह्यला सर्व यात्रेकरू जातात,—तो म्हणाला. चला तिकडे म्हणून कनखलला जायला निघालों. वाटेंत गंगेचा एक कालवा लागला. या कालव्यावरल्या पुलावरून गंगेचा प्रवाह, कांठावरलीं देवळें आणि दूर दिस-णाऱ्या डोंगरांच्या रांगांचा मनोहर देखावा दिसतो. पूल ओलांडल्यानंतर मोठे मोठे वृक्ष, आजूबाजूला वाड्या, बागा वगैरे असलेला शांत निर्जन रस्ता लागला. अर्धा पाऊण तास टांगा चालला होता तरी कनखल दिसेना. आलें, जवळ आलें म्हणून टांगेवाला आम्हाला धीर देत होता. इतक्यांत रस्त्याच्या एका बाजूला एका मोठ्या वृक्षाखालच्या छायेंत तीस चाळीस टांगे आणि आवतींभोवतीं ओरडाओरड करीत उभे असलेले बरेचसे टांगेवाले दिसले. दोघे तिघे दांडगट टांगेवाले आमच्या टांग्याकडे धांवत आले, आणि आमच्या टांगेवाल्याशीं बोलूं लागले. टांगा इथेंच सोडून देऊन तुला इथें थांबलें पाहिजे म्हणून ते त्याला सांगत होते. रिक्षावाल्यांच्या स्पर्धेविरुद्ध त्यांच्या कांहीं तक्रारी होत्या, आणि त्यांची कलेक्टरनें दाद न घेतल्यामुळें त्यांनीं संप पुकारला

होता. जवळच कुठल्यातरी अधिकाऱ्याच्या कचेरींत त्यांचें शिष्टमंडळ गेलें होतें, आणि काय तो निकाल घेऊन तें परत येईपर्यंत हा संप चालणार होता. तोंपर्यंत कनखलहून परत कोणालाहि टांगा ते पुढें जाऊं देणार नव्हते ! दुपारचे बारा वाजले होते, आणि हरिद्वारमधल्या रिटायरिंग रूमपासून तीन चार मैलांवर इथें अडकून पडलों तर काय करायचें या विचारांत आम्ही हताश झालों. आम्ही जायचा यायचा टांगा ठरवला आहे, यानें आम्हांला परत नेलेंच पाहिजे, म्हणून आम्ही त्यांना सांगूं लागलों, पण कांहीं वळेल असें वाटेना. कनखलला जायला तर कांहीं हरकत नाहीं ना, परत येतांना काय तें पाहूं, मग पाहिजे तर याला इथें थांबवा, असें सांगितल्यावर त्यांनीं पुढें जायला परवानगी दिली. आणखी कांहीं वेळानें कनखल गांवांत आलों. जुनाट घरें, प्राचीन वातावरण सर्वत्र दिसत होतें. कालिदासाच्या मेघदूतांतहि कनखलचा उल्लेख आहे. बाजारपेठेंत तांदळाच्या गोणी पुष्कळ ठिकाणीं दिसल्या. गांवाच्या एका टोकाला ओसाड दिसणाऱ्या एका धुळकट जागीं टांगा उभा करून, तें पहा दक्षप्रजापति मंदिर म्हणून टांगेवाल्यानें आम्हाला सांगितलें. चुना फांसलेलीं धर्मशाळेसारखीं दोनचार पडकीं घरें, आणि मोडकळीला आलेलें एक लहानसें जुनाट देऊळ पाहून, इतकी रखडपट्टी भर दुपारीं बारा वाजतां हेंच पहाण्याकरतां आम्ही केली काय, असें आम्हाला वाटलें ! ‘ आपली निराशा होण्याचें कारण, ’ दलाल म्हणाले, ‘ कांहींतरी सुंदर पहायला मिळणार म्हणून आपण येतों; पण येथें येणारे भाविक लोक वेगळ्या धार्मिक हेतूनें येतात. बिचाऱ्या टांगेवाल्याला काय माहीत आपण श्रद्धाळू यात्रेकरू नाहीं तें !’ दलालांचें म्हणणें बरोबर होतें. दक्षप्रजापतीनें आपल्या यज्ञाला शंकराला बोलावलें नाहीं, तेव्हां सती संतापली आणि तिनें स्वतःला इथेंच जाळून घेतलें. दक्षमंदिराजवळच सतीकुंड आहे. यात्रेकरू येतात ते या स्थळाच्या या पावित्र्यासाठीं.

एक दोन वैरागी आणि देवळांतला एक पुजारी याखेरीज इथें शुकशुकाट होता. मंदिराच्या रुक्ष, धुळकट, निर्जन आवारांतून पलीकडे खुल्या जागेंत आलों तेव्हां समोर गंगेचें अफाट पात्र दिसूं लागलें. पण पात्रांत पाण्याचा थेंब, निदान जवळपास तरी कुठें दिसत नव्हता. दगड, वाळू, गोट्यांचा

एक लांबच लांब विस्तार दूरवर पसरलेला दिसत होता. कालवे काढल्यामुळें गंगेचें इथलें पाणी नाहींसें झालें कीं काय?

## हरिद्वारचा टांगा व हृषीकेशची बस

परत येऊन टांग्यांत बसलों. संपवाले उभे आहेत तो रस्ता टाळून दुसऱ्या रस्त्यानें हरिद्वारला नाहीं का जातां येणार?—आम्ही टांगेवाल्याला विचारलें. नाहीं साहेब, तोच एक रस्ता आहे, तो म्हणाला. काय होईल तें होईल असा विचार करून स्वस्थ बसलों. पंधरा वीस मिनिटांनीं संपवाले उभे होते तें झाड दिसूं लागलें. टांगेवाल्यानें टांगा उभा केला. दोन चार संपवाले धांवत आमच्या टांग्याकडे आले. आमचें काळीज धडधडत होतें. शिष्टमंडळ परत आलें, संप मिटला—जा तूं पुढें, असें आमच्या टांगेवाल्याला सांगून ते परत गेले. टांगेवाल्यानें धडाक्यानें टांगा पुढें हांकल्ला.



एक पहाडी स्त्री, हरिद्वार

दुपारीं इथून पंधरा वीस मैलांवर असलेलें हृषीकेश आणि लक्ष्मणझूला पाहून यायचें ठरलें होतें. रात्रीं हरिद्वारला परत यायचें म्हणजे दुपारीं तीनची बस पकडायलाच हवी होती. जेवल्यावर थोडी विश्रांति घेतली, आणि लगेच अडीच वाजतांच बस स्टँडवर गेलों. हृषीकेशला जाणाऱ्या बसेस कुठें दिसेनात. एका जुनाट,

मोडकळीला आलेल्या बसच्या बाजूला उभा असलेला ड्रायव्हर पुरेसे उतारू मिळाल्यास आपण हृषीकेशला जातों म्हणत होता. आम्ही लगेच तिकिटें घेतलीं. कांहीं वेळानें पुरेसे उतारू जमले. तीनच्या सुमारास त्यानें बस सोडली.

वाटेंत सत्यनारायण मंदिर या नांवानें ओळखलें जाणारें देऊळ लागलें. बस उभी करून आम्ही सर्व उतारू तें देऊळ पाहून आलों. त्या देवळांत आंत किंवा बाहेर विशेष कांहीं नव्हतें. देवळासारखें देऊळ होतें. रस्त्यांतला एक पूल इतका अरुंद होता कीं बसच्या दोन बाजू त्याला खरचटतात कीं काय अशी क्षणोक्षणीं भीति वाटत होती. आमची बस चालत होती हीच मुळीं आश्चर्याची गोष्ट होती. ड्रायव्हरशेजारीं बसलेला त्याचा मदतनीस इंजिनचा एक कसलासा खडखड वाजणारा भाग एकसारखा हातानें दाबून धरून बसला होता. समोर अर्ध्या मैलावर एखादी गाडी दिसली कीं, आमचा ड्राय-व्हर वेग कमी करून बस हळू एका बाजूला वळवायचा. मला वाटतें, गाडीचा ब्रेक काम देत नव्हता. मध्यें एकदोनदां गाडी उभी करतांना ड्रायव्हरनें पहिल्यांदा वेग अगदीं कमी केला, नंतर त्या मदतनिसानें एक लाकडाचा ठोकळा घेऊन हळूच गाडींतून खालीं उडी मारली आणि गाडी उभी रहातां रहातां पुढें धांवत जाऊन चाकाखालीं तो लाकडाचा ठोकळा टाकला! साडेचारच्या सुमाराला हृषीकेशला जाऊन पोहोंचलों.

## पवित्र स्थानांतले महारोगी व पंडेपुजारी

बाजारपेठेंत दुकानासारखीं दुकानें आणि आजूबाजूला कोणत्याहि लहानशा गांवातल्या घरांसारखीं घरें दिसत होतीं. एका बाजूला नदीचें मोठें थोरलें पण कनखलप्रमाणेंच सुकें टणटणीत, गोल दगडगोट्यांनीं भरलेलें रेताड पात्र! दलालांनीं माझ्याकडे आणि मी दलालांच्याकडे 'हेंच पाहायला आलें काय?' अशा अर्थानें एकमेकांकडे पाहिलें. हृषीकेशमध्यें तसें कांहींच पहाण्यासारखें नाहीं, तिथून समोरच्या डोंगरांतून पलीकडे गेलें कीं लक्ष्मणझूला पहाण्यासारखा आहे असें कळलें. हृषीकेशहून हरिद्वारला जाणारी शेवटची बस संध्याकाळीं सातच्या सुमाराला सुटते, तेव्हां टांग्यानें लक्ष्मणझूला पाहून

दोन तासांत सहज परत याल, असें एका चहाच्या दुकानदारानें सांगितलें. बसमध्यें कांजीवरम्‌चा रहाणारा पण अलाहाबादमध्यें नोकरीला असलेला एक मद्रासी तरुण आमच्या ओळखीचा झाला होता. तोहि टांग्यांतून आमच्या-बरोबर यायला तयार झाला. तेव्हां ताबडतोब जाण्यायेण्याचा एक टांगा ठरवून लक्ष्मणझूल्याकडे निघालों. नदीच्या पात्राच्या पलीकडे गेल्यावर डोंगराळ वाटा-सारखा रस्ता सुरू झाला. रस्त्यावर दर चार पांच पावलांगणिक सडलेल्या हातपायांचे आणि सुजलेल्या चेहेऱ्याचे महारोगी स्त्रीपुरुष भिक्षा मागत बसलेले दिसत होते. एके ठिकाणीं वाहनकर देण्याकरतां म्हणून टांगेवाल्यानें टांगा उभा केला आणि तो उतरून गेला. टांगा उभा राहिलेला पाहिल्याबरोबर आजूबाजूचे वीस पंचवीस महारोगी स्त्रीपुरुष कशावर तरी तुटून पडायचें आहे अशा आवेशानें आमच्या रोखानें धांवत आले. तिथेंच उभे रहा म्हणून ओरडून दोघांचौघांना आम्ही पैसे दिले, पण बाकीचे गयावया करीत पुढें येतच होते. नुसता किळसच नव्हे तर मला भीतीहि वाटली. इतक्यांत टांगेवाला आला आणि टांगा चालू झाला. असाध्य रोग झालेले हे लोक पवित्र ठिकाणीं मरण यावें म्हणून हृषीकेश, काशी, प्रयाग अशा तीर्थांच्या ठिकाणीं येऊन रहातात, असें म्हणतात. तें खरें असेल आणि या लोकांची दयाहि येते. पण हे असले घाणेरडे रोगी आणि धर्माचा बाजार करणारे पंडेपुजारी यांच्या गर्दीमुळें या तीर्थस्थळांचें वातावरण तिरस्करणीय झालें आहे. क्षेत्राच्या ठिकाणीं देह ठेवावा या इच्छेनें येणाऱ्या या बिचाऱ्यांना इथें येऊं देऊं नये असें माझें म्हणणें नाहीं; पण त्यांच्यासाठीं सरकारनें किंवा दानशूर धार्मिकांनीं हॉस्पिटलें किंवा खास निवासस्थानें बांधून त्यांची कांहीं तरी व्यवस्था करायला पाहिजे.

## हरिद्वार-हृषीकेशचा आंधळा यात्रेकरू

टांगा या रस्त्यानें जात असतां एका बाजूच्या डोंगरावर उंच कुठें कुठें पांढरीं घरें दिसत होतीं. टांगेवाला म्हणाला, तेहरी गढवाल संस्थानची ही राजधानी,—नरेंद्रनगर. डोंगरावर जाणाऱ्या रस्त्यानें कांहीं पहाडी लोकहि जात असलेले दिसले. ते नरेंद्रनगरलाच जात होते. खडबडत आमचा टांगा पुढें जात होता. उंच काठी हातांत घेतलेला एक आंधळा माणूस तरातरा रस्त्यानें

चालत असलेल्या माझ्या दृष्टीला पडला. हाच आंधळा सकाळीं असाच तरा-तरा चालत असलेला कनखलच्या वाटेवर मला दिसला होता. मला वाटतें, तो पायीं हरिद्वारहून ऋषीकेशला आला, आणि आतां पायींच पुढें लक्ष्मण झूल्याला जात होता. हा खरा यात्रेकरू !

आतां हरिद्वारहून इतक्या लांब आल्याचें सार्थक वाटत होतें. दोन्ही बाजूंना गर्द हिरव्या झाडींनें भरलेले पर्वत दिसत होते. आणि मधून गंगेच्या हिरवट दुधाळ पाण्याचा विशाल प्रवाह खळखळत वहात होता. प्रवाहाच्या या बाजूच्या कडेला, म्हणजे आमचा टांगा जात होता त्या रस्त्याच्या बाजूला 'मुनी की रैती' म्हणतात. लहान लहान आश्रम, मधूनच एखादें दुकान या बाजूला दिसत होतें. एका झोपडीसारख्या दिसणाऱ्या लहानशा घरावर स्वामी शिवानंद यांची 'Divine Life Society' अशी पाटी होती. आमचे सोबती कांजीवरमचे श्री. कुमार यांना स्वामी शिवानंदांना भेटायचें होतें; पण स्वामीजी त्या वेळीं आश्रमांत नसल्याचें कळलें. पलिकडच्या कांठावर एक टुमदार, बैठी इमारत दिसत होती. टांगेवाला म्हणाला, हें 'गीता-भवन'—या पलीकडच्या सर्व भागाला 'स्वर्गाश्रम' म्हणतात. थोडें पुढें गेल्यावर पलीकडच्या कांठावर लहान लहान देवळें आणि घाट दिसूं लागले. रस्त्यावर एक चहाचें दुकान आणि दोनतीन झोपडीवजा घरें दिसलीं. तिथून खालीं नदीच्या कांठाकडे एक मळलेली पायवाट जात होती. नदी ओलांडून पलीकडे जायचें असेल तर इथून नाव सोडतात. पलीकडून येणारी नाव इथेंच लागते. टांगा उभा करून टांगेवाला म्हणाला, 'तुम्ही इथें उतरा. टांगा घेऊन मी इथें थांबतों. जरा पुढें गेल्यावर लक्ष्मणझूला दिसेल. झुल्यावरून तुम्ही पलीकडे जा. त्या काठावरल्या स्वर्गाश्रमांतील देवळें, आश्रम वगैरे पहात पहात समोर नाव सुटते तिथें नावेंत बसून या बाजुला या. इथून हरिद्वारला जायला परत फिरूं.'

## बिचाऱ्या लक्ष्मणाचें कौतुक !

'ठीक' म्हणून आम्ही पुढें चालूं लागलों. नदीच्या भव्य पात्रावर या काठापासून त्या काठापर्यंत पसरलेला 'लक्ष्मणझूला' समोर दिसूं लागला. पूर्वी




'लक्ष्मण झूला'

दोरखंडाचा पूल इथें होता म्हणतात. आतां चांगला मनगटाइतक्या जाड 'तारखंडां'चा, चालतांना वरखालीं 'दबूदबू' होणारा, मजबूत पूल आहे. वरून चालतांना हा प्रशस्त पूल श्वासोच्छ्वास केल्यासारखा वरखालीं होतो तेव्हां मौज वाटते. हिरव्या गर्द झाडीनें आच्छादलेल्या दोन उंच पर्वतांच्या खिंडींतून वळण घेऊन 'झुल्या'खालून खळखळत जाणारा गंगेचा फेसाळ प्रवाह पहात रहावासा वाटतो. पलीकडच्या कांठावर उतरून देवळें, आश्रम, घाट पहात आम्ही पुढें चालूं लागलों. रामलक्ष्मणाचीं कितीतरी लहान लहान देवळें, श्रीमंतांनीं बांधलेल्या लहानमोठ्या, मोडक्या-पडक्या धर्मशाळा या बाजूला आहेत. रावण ब्राह्मण होता; त्याला मारल्यामुळें घडलेल्या ब्रह्महत्येचें पातक धुवून काढण्याकरतां लक्ष्मणानें इथें बसून तपश्चर्या केली, असें इथें असलेल्या जुन्यांत जुन्या लक्ष्मणाच्या देवळांतल्या 'बुवा'नें आम्हाला सांगितलें. रामानें रावणाला मारला, आणि प्रायश्चित्त घ्यायचें लक्ष्मणानें, हा काय न्याय?—असा विचार माझ्या मनांत आला. पुढें कळलें कीं इंद्रजितवधाच्या पातका-

करतां लक्ष्मणानें तपश्चर्या केली. रामाचीं मंदिरें साऱ्या देशभर आहेत; बिचाऱ्या लक्ष्मणाचें कौतुक इथेंच काय तें होतें असें दिसतें!

## नाव दिसेना, आणि नावाड्याचा भरंवसा नाहीं!

एके ठिकाणीं, एका प्रशस्त पटांगणाच्या आसपास दोन चार धर्मशाळा आणि मध्यें एक समाधि दिसली. हिमालयांत प्रवास करतांना ठिकठिकाणीं 'बाबा काली कमलीवाला' यांनीं यात्रेकरूंच्या सोयीकरतां बांधलेल्या धर्मशाळा आहेत. त्या 'बाबा काली कमलीवाल्यां'ची ही समाधि. दोन्ही बाजूंना गर्द छायेचे उंच उंच वृक्ष असलेल्या रस्त्यावरून आम्ही चाललों होतों. दोन अडीच मैल चाललों तरी नावेंत बसण्याकरतां उतरायचा रस्ता मिळेना. सूर्यास्ताची वेळ जवळ येत होती. एका खबदडींतून खालीं उतरलों. पांढरा फडका लावलेली एक काठी कांठाच्या एका बाजूला दिसत होती. तिथून नाव सुटते असें कळलें. नदीकांठच्या खडकांवरून उड्या मारीत त्या जागेपर्यंत गेलों. एक जुनाट नाव उभी होती, आणि तिच्यांत बसलेले दोघे नावाडी भाजी नीट करीत होते. दुसरे कुणीहि उतारू तिथें नव्हते. नाव सोडणार का म्हणून त्यांना विचारलें. 'ही नाव सोडण्यासारखी नाहीं,' ते म्हणाले, 'ती पलीकडे नाव दिसते आहे ती उतारू घेऊन इथें येईल आणि तुम्हाला परत घेऊन जाईल.' त्या बाजूला उतारूहि दिसत नव्हते, आणि नावेंत नावाडीहि दिसत नव्हता. 'तो नावाडी केव्हां येणार?' आम्ही विचारलें. 'तें कांहीं सांगतां येत नाहीं,—येईल तेव्हां येईल!' ते म्हणाले, 'रात्र पडल्यावर या जोरानें वहाणाऱ्या प्रवाहांत नाव घालणेंहि धोक्याचें आहे—कदाचित् तो येणारहि नाहीं!' आम्हाला हें कांहींच माहीत नव्हतें. आम्हाला वाटलें होतें, या काठावरून त्या काठाकडे जायला नियमित नावा मिळतात. हें माहीत असतें तर आम्ही या बाजूला आलोंच नसतों, अलीकडूनच पलीकडल्या घाटदेवळांचें दर्शन घेऊन 'लक्ष्मण झुल्या'वरून परत फिरलों असतों. हिरव्या पर्वतराजींतून खळाळत बाहेर येणाऱ्या गंगेच्या दुधाळ प्रवाहाचें रमणीय दृश्य कुठूनहि दिसत होतें. पण आतां टांगेवाल्यावर आणि स्वतःवर चरफडून उपयोग काय? काळोख झपाट्यानें पडत



हरिद्वारची पंडेगिरी

होता. मनांतहि काळोखें काहूर माजत होतें. नाव मिळाली तरी सात वाजेपर्यंत हृषीकेशला पोहोंचून हरिद्वारला जाणारी शेवटची बस मिळेल काय, त्यापेक्षां इथेंच कुठें तरी गीताभवनांत किंवा एखाद्या आश्रमांत उपाशी तर उपाशी, अंथरुणापांघरुणाशिवाय तशीच रात्र काढावी झालें, अशा कांहींतरी कल्पना काळजाला कुरतडून अस्वस्थ करीत होत्या; आणि आतां संध्याछायांत काळसर दिसणारा गंगेचा तो फेंसाळ प्रवाह स्वस्थपणें आमच्या डोळ्यांसमोरून

खळाळत जात होता. इतक्यांत त्या दगडगोट्यांतून धडपडत एक म्हातारी सिंधी बाई आणि वर्ष सव्वा वर्षाचें एक लहान मूल कडेवर घेतलेली एक तरुण सिंधी स्त्री तिथें आली. त्यांनाहि नदी ओलांडून हरिद्वारचीच बस घेण्याकरतां हृषीकेशला जायचें होतें. आमच्या आधीं सकाळींच त्या इकडे आल्या होत्या. मुलांना अचूक गुणकारी औषध देणारा कुणी साधू इथें रहातो त्याला दाखवायला तें आजारी मूल घेऊन त्या आल्या म्हणे! त्या भकास, निर्जन नदीकांठीं काळोखांतून येतांना त्या बिचाऱ्या घाबरून गेल्या होत्या. आतां नाव नाहीं आली तर त्यांना संभाळणें आम्हाला प्राप्त होतें! पलीकडच्या कांठावर कुणी यावें म्हणून मोठ्यांदा ओरडून पाहिलें; पण नावाडी, उतारू कुणीच दिसेना. अर्धा तास असाच गेला. हताश झालों. इतक्यांत पलीकडच्या नावेकडे थोडी गडबड दिसूं लागली. दोनचार उतारू खबदडींतून खालीं उतरत होते. कांहीं वेळानें नाव या बाजूला येऊं लागली. तरी पण तो नावाडी काळोखांतून परत आम्हाला नेईल कीं नाहीं ही भीति होतीच. नाव काठाला लागली. त्या नावाड्यानें बिनतक्रार आम्हाला पलीकडे नेलें. त्या बायांचा टांगा नव्हता. आमचा टांगेवाला, आम्ही तिघे आणि त्या दोघी असे पांच उतारू टांग्यांत घेऊं शकत नव्हता. त्याला 'दादा' 'बाबा' करून या बायांना घेतलेंच पाहिजे म्हणून समजावलें, आणि पांच माणसें त्या अर्भकासह कशीं तरी टांग्यांत कोंबून बसलीं. हृषीकेशला पोंहोचलों तेव्हां साडेसात वाजून गेले होते. बस सुटली तर हृषीकेशलाच रहावें लागणार म्हणून हातपाय गाळीत होतों. पण पहा शेवटची बस भरून गेली आहे, आतां सुटेल, म्हणून कुणी तरी सांगितलें. बस भरगच्च भरली होती, पण आंतले उतारू समजूतदार होते आणि बसवालाहि चांगला होता. त्यानें आम्हा सर्वांना आंत घेतलें. नऊ साडेनऊच्या सुमारास हरिद्वारला पोहोंचलों. मोकळ्या मनानें रिटायरिंग रूम्सच्या हॉटेलमध्यें जेवणावर हात मारला, आणि स्वस्थ झोपीं गेलों.

तारीख ४ एप्रिल, १९४०.

## ' ॲडमिन्कॉम ' कर्नल लिमये

सकाळीं ८-२४ च्या गाडीनें डेहराडूनला जाण्याकरितां हरिद्वार सोडलें. गाडीच्या दोन्ही बाजूंना कांहीं शेतांत मोटमोठे ट्रॅक्टर्स घेऊन लष्करी जवान जमीन नांगरीत असलेले दिसले. 'अधिक धान्य पिकवा !' मोहिमेंत सैन्यांतले लोक उत्साहानें भाग घेत असल्याचें सांगतात. त्याचाच हा प्रत्यक्ष पुरावा असावा. आतां दोन्ही बाजूंना उंच उंच देवदार आणि साल वृक्षांचीं दाट रानें मधून मधून दिसत आहेत. मध्येंच दगडगोट्यांनीं भरलेलें सुकें ठणठणीत नदीचें पात्र कुठं कुठं दिसतें. साडेदहाला डेहराडून स्टेशन आलें. डेहराडून लष्करी विभागाचे ' ॲडमिन्कॉम् ' ( ॲडमिनिस्ट्रेटिव्ह कमांडन्ट ) कर्नल लिमये यांच्याकडे आम्ही उतरणार आहोंत. पुण्याच्या 'व्हिनस बुक स्टॉल'चे मालक आमचे मित्र श्री. लिमये यांनीं आपले वडील बंधू कर्नलसाहेब यांना आधींच लिहिलें आहे. 'भाऊ तिकडे मुख्य लष्करी अंमलदार आहे; त्याच्याकडे उतरलांत कीं डेहराडूनमध्यें काय पहायचं आणि कसं पहायचं याचा तुम्हाला विचारच करायला नको !'—स्वतः कॅप्टनच्या हुद्यापर्यंत गेल्या महायुद्धांत गेलेले आणि आतां पुस्तकप्रकाशनाचा धंदा अत्यंत यशस्वीपणें करणारे आमचे मित्र लिमये म्हणाले होते. त्यांनीं सांगितलें होतें त्यापेक्षांहि त्यांच्या म्हणण्याचा अधिक गोड अनुभव आम्हाला आला. पहिल्याच भेटींत पाहुण्यांना घरच्यासारखें वाटावयाला लावणाऱ्या, पुष्कळ बोलायला हवें असलेल्या सौ. लिमये, मितभाषी पण मोकळ्या मनाचे कर्नल लिमये, आणि पुण्याच्या कॉलेजमध्यें शिकणारा, सुट्टींत डेहराडूनला आलेला त्यांचा आतिथ्यकुशल मुलगा, यांच्यामुळें डेहराडूनमधला आमचा मुक्काम फारच आनंदाचा झाला. स्टेशनांत टॅक्सी घेऊन आम्ही सरळ 'ॲड्मिन्कॉम्'च्या ऑफिसांत गेलों. कर्नलसाहेबांनीं आपल्या बंगल्याचा पत्ता टॅक्सीवाल्याला देऊन आम्हाला तिथं सोडण्यास सांगितलें.

## लष्करी डेहराडूनची बेशिस्त रहातूक

दुपार विश्रांति घेण्यांत घालवली. डेहराडूनची हवा मोठी उत्साहदायक वाटली. हिमालय आणि शेवालिक या दोन पर्वतांच्या मधलें डून खोरें

अत्यंत सुपीक आहे. संध्याकाळीं गांवांतल्या बाजारांत भटकलों. कांहीं पाट्या मजेदार वाटल्या. एका दवाखान्यावर '**लेडी डॉक्टर** मिसेस्...' अशी पाटी होती, तर दुसऱ्यावर 'डॉ....सिंग...लाल **एम्. बी. बी. एस्. (१९२५)**' अशी होती ! मिसेस् आणि एम्. बी. बी. एस्. च नव्हे तर लेडी डॉक्टरहि; आणि नुसता एम्. बी. बी. एस्. नव्हे तर १९२५ सालीं पास झालेला एम्. बी. बी. एस् ! मुंबईच्या मेडिकल कौन्सिलनें अप्रत्यक्षपणें सुद्धां आपली जाहिरात करण्याची रजिस्टर्ड डॉक्टर लोकांना बंदी केली आहे, तशी बंदी इथें दिसत नाहीं. डेहराडून हें एक महत्त्वाचें लष्करी केंद्र आहे, आणि हिंदी सैन्याचे अधिकारी तयार करणारी इंडियन् मिलिटरी ॲकॅडेमीहि इथेंच आहे; त्यामुळें लष्करी लोकांचा आणि लष्करी मोटारींचा बराच सुळसुळाट इथल्या रस्त्यांवर दिसतो. मुंबईतल्यासारखे मोठे रस्ते इथें नाहींत, साधारण रुंदीचेच रस्ते आहेत; पण अमक्या बाजूनें गाड्या हांकाव्या असा कांहीं नियम, निदान लष्करी मोटारींसाठीं तरी, इथें दिसत नाहीं. लष्करी मोटार-हांके रस्त्याच्या मधून वाटेल तशा बेफाम मोटारी हांकीत असतात, आणि जिवंत घरीं पोहोंचावयाचें असेल तर पायीं चालणारानें रस्त्याच्या एका बाजूनेंच नव्हे तर गटारांतूनच चालावयाला हवें ! सायकलला दिवा असावा, सायकलच्या मागें किंवा पुढें कुणाला घेऊन जातां कामा नये वगैरे नियम असावेत; पण इथले बरेच तरुण यांपैकीं कोणताच नियम पाळीत असलेले दिसले नाहींत. मागेंच नव्हे तर पुढेंहि आणखी एकाला घेऊन दिव्याशिवाय तिघे तिघे एका सायकलवरून जातांना आम्ही पाहिले. पोलीस दिसायला धिप्पाड, पण इतके बावळट कीं अशा एखाद्या सायकलवाल्याला पोलीस ओरडून दम भरावयाचे, पण पोलिसांकडे हंसत पहात त्यांची टिंगल करीत सायकलवाला पुढें जायचा ! एखाद्या अरुंद गल्लींत एक मोटार आंत घुसलेली समोरून पहात असतांहि दुसऱ्या टोकाकडून दुसरा मोटारवाला आपली मोटर आंत घुसवतो, गल्लीच्या मध्यभागीं दोघे समोरासमोर आले कीं मोटारी उभ्या करतात, आणि मला वाट देण्याकरतां तूं आपली मोटार मागें घेतली पाहिजेस म्हणून दोघेहि शिव्यागाळी देत एकमेकांना सांगत असतात ! वल्लभभाई पटेलांच्या खालोखाल 'पोलादी पुरुष' म्हणून ज्यांचे डंके वाज-

वले जातात ते पंडित गोविंद वल्लभपंत पंतप्रधान असलेल्या संयुक्त प्रांत सरकारच्या पोलिसांचा हा चोख कारभार !

## लष्करी सलामीचे प्रकार

माझे एक मित्र प्रो. वाघ मिलिटरी ॲकॅडेमीच्या 'इंटर सर्व्हिसेस विंग'-मध्यें शिक्षक म्हणून नुकतेच आले आहेत; त्यांना भेटावयाला मला जायचें होतें. डेहराडून शहराचे एकमेकांपासून कितीतरी दूर असे तीन टोकांना तीन भाग आहेत. आम्ही रहात होतों तें मूळ डेहराडून, दुसऱ्या टोकाला इंटर सर्व्हिसेस विंग असलेलें 'क्लेमंट्स् टाऊन' आणि तिसऱ्या टोकाला मिलिटरी ॲकॅडेमी. संध्याकाळीं आम्ही फिरून परत आल्यावर कर्नलसाहेब म्हणाले, 'चला माझ्या मोटारमधून क्लेमंट्स टाऊनकडेच तुम्हाला नेतों. तुमचे मित्रहि तुम्हाला भेटतील आणि फिरणेंहि होईल.' क्लेमंट्स् टाऊनमध्यें ॲकॅडेमीचे विद्यार्थी आणि शिक्षक याखेरीज दुसरी वस्तीच नाहीं. छोटे छोटे बैठे बंगले शिक्षकांसाठीं आहेत. मिलिटरी ॲकेडेमींत येणारे विद्यार्थी पुढें सैन्य, आरमार किंवा विमानदल यापैकीं कोणत्यातरी एका शाखेंत जातात, पण त्या आधीं पहिलीं एक दोन वर्षें सर्वांना एकच प्राथमिक अभ्यासक्रम आहे; त्यासाठीं क्लेमंट्स् टाऊन-मधला हा इंटर सर्व्हिसेस विंग आहे. 'ॲडमिन्कॉम'सारख्या एका बड्या लष्करी अधिकाऱ्याबरोबर आम्ही फिरत असल्यामुळें लष्करी सलामीचे बरेच प्रकार आम्हाला पहावयाला मिळाले. त्यापैकीं कांहीं पाहून आम्हा बिनलष्करी लोकांना हंसूं दाबणें कठीण होतें. गणवेषांत असलेला आपल्या हाताखालचा अधिकारी भेटल्यास तो टांचा एकमेकांवर आपटून खाड्कन् सलाम ठोकतो. हा नेहमींचा सलाम झाला. पण साध्या शर्टपॅंटमध्यें किंवा सुटांत असलेला कनिष्ठ अधिकारी समोर वरिष्ठ दिसल्याबरोबर जागच्या जागीं हात, पाय, छाती, चेहरा ताठ करतो ! समोर वरिष्ठ दिसला आणि तो सायकलवर असेल तर सायकलच्या हँडलवरच हात ताठ करून तो पुढें जातो !

प्रो. वाघ यांच्याशीं गप्पा करून आम्ही घरीं परत आलों.

रात्रीं बंगल्याच्या गच्चीवर गेलों, तिथून समोर दूर दिसणाऱ्या डोंगराच्या माथ्यावर आकाशांतल्या ताऱ्यांचा एक तांडा उतरून लुकलुकतो आहे कीं

काय असा भास झाला! हे मसूरीचे दिवे. पंडित जवाहरलाल जिला 'हवानगरींची राणी' (क्वीन् ऑफ् हिल्स्टेशन्स) म्हणतात ती मसूरी इथून फक्त बावीस मैलांवर आहे.

ता. ५ एप्रिल, १९४९.

## बाबर व न्यायमूर्ति रानडे यांचा समकालीन वृक्षराज

मिलिटरी ॲकेडेमीप्रमाणेंच अखिल भारतीय महत्त्वाची इथली दुसरी संस्था 'फॉरेस्ट रिसर्च इन्स्टिटयूट' ही आहे. आज सकाळीं १० वाजतां प्रातरुपाहारानंतर सौ. लिमये ही संस्था दाखवायला आम्हाला घेऊन गेल्या. या संस्थेच्या इमारती आणि आवार म्हणजे मोटमोठे वृक्ष, झाडें, बागा, रस्ते असलेलें एक स्वतंत्र गांवच आहे म्हटलें तरी चालेल. या लाल विटांच्या भव्य इमारतींतला 'कॉन्व्होकेशन हॉल' आंतून अत्यंत मौल्यवान तुकतुकीत 'टीक' लाकडानें मढविला आहे. जमिनीपासून छतांची उंची इतकी आहे आणि हा भव्य हॉल इतका लांब रुंद आहे, कीं यूरोपांतल्या एखाद्या भव्य कॅथेड्रलमध्यें उभें राहिल्यासारखें वाटतें. संस्थेच्या प्रचारखात्याचे अधिकारी श्री. खन्ना यांनीं आम्हाला संस्था दाखविण्याकरतां श्री. दे नांवाचे एक अधिकारी आमच्या बरोबर दिले. अत्यंत टापटीपीनें वस्तू मांडून ठेवलेल्या, अत्यंत स्वच्छ आणि अत्यंत व्यवस्थित अशा एक एका भव्य दालनांत जंगलांच्या संशोधनासाठीं आवश्यक असलेल्या वस्तूंचें आणि पदार्थांचें एक एक 'म्यूझियम्' आहे. पहिल्या म्यूझियमध्यें निरनिराळ्या प्रकारचीं झाडें कोणत्या जागीं किती उंचीवर वाढतात, झाडें लावावयाचीं कशीं, जंगलें वाढवायचीं कशीं वगैरे गोष्टी दाखविणारे रंगीत नमुने मोटमोठ्या काचेच्या पेट्यांमध्यें रांगेनें मांडून ठेवले आहेत. 'ब्ल्यू पाईन' आणि 'बर्च वुड' समुद्रसपाटीपासून सहा हजार फूट उंचीच्या खालीं असलेल्या प्रदेशांत होत नाहींत. त्या खालच्या उंचीवर साधा 'पाईन' आणि 'साल' वृक्ष वाढतात. दुसऱ्या दालनात निरनिराळ्या वृक्षांच्या लाकडांचे नमुने मांडून ठेवले होते. पांच सहा

फूट उंचीचा आडवा कापलेला एका वृक्षाच्या लाकडाचा प्रचंड ढालेसारखा दिसणारा एक गोल तुकडा होता. त्यांत एकाहून एक मोठीं रेषांचीं वर्तुळें दिसत होतीं. या रेषांच्या वर्तुळांवरून झाडाचें वय अजमावतां येतें म्हणतात. वर्षांवर्षांनीं थरावर थर चढून झाडांचा घेर वाढत जातो. या रेषा त्या घेराची वाढ दाखवीत असाव्या. हा तुकडा सातशेंहून अधिक वर्षें जगलेल्या झाडाचा होता. एक एका रेषावर्तुळांत इसवी सन आणि त्या सनांतला ठळक प्रसंग लिहिला होता. मधल्या लहानशा वर्तुळांत पंधराशें सोळा सन आणि बाबराची हिंदुस्थानवर स्वारी अशीं अक्षरें होतीं. लाकडांतला तो थर त्या सालचा. त्याहून मोठ्या एका वर्तुळांत सन अठराशें पंच्याऐंशीं आणि हिंदी राष्ट्र-सभेची–कॉंग्रेसची–संस्थापना असें लिहिलें होतें. या तुकड्यांत कांहीं ठिकाणीं डाग दिसत होते; त्यावरून ज्या अरण्यांत हें झाड होतें तिथें (हें झाड बचावलें तरी) किती सालीं आग लागली होती तेंहि कळूं शकतें–दे म्हणाले. बाबर, शिवाजी, न्यायमूर्ति रानडे या सर्वांचा समकालीन असलेल्या वृक्ष-राजाच्या त्या तुकड्याकडे पहात असतां नाना कल्पनांचें काहूर डोक्यांत उठलें..

## वृक्षांचे सुंदर शत्रू

या पुढल्या दालनांत निरनिराळ्या झाडांपासून मिळणारे रासायनिक पदार्थ त्यांच्या माहितीसह ठेवले होते. म्हैसूरच्या जंगलांत चंदनाचें लाकूड मिळतें; पण चंदनाचें तेल काढण्याची आमची पद्धति अतिशय खर्चाची आहे; त्यामुळें ऑस्ट्रेलियन चंदन तेल आमच्या तेलाला बाजारांतून उठवून लावतें आहे. तुळशीच्या रसापासून भरपूर कापूर करतां येईल. यावरच आमच्या रसायनशास्त्रज्ञांनीं अधिक लक्ष केंद्रित करायला पाहिजे. कारण कापूर 'पाईन' झाडाच्या निवगाऱ्या तेलापासून करतात; आणि आमच्या इथला 'पाईन' तीस टक्के कापूर देतो तर अमेरिकेंतला ऐंशी टक्के देतो. तेव्हां बाजारांत आमचा कापूर टिकाव धरणार नाहीं. सँटोनिन, एफेड्रीन, त्याचप्रमाणें 'इसेन्सियल ऑइल' करतां लागणारें कुथ हें सर्व बलुचिस्तान वगैरे आतां पाकिस्तानांत गेलेल्या प्रदेशांत होत असे. पूर्वपंजाबमध्यें या वनस्पति लावतां येतील, आणि तसे प्रयत्न चालू असल्याचें श्री. दे यांनीं

आम्हाला सांगितलें. या दालनाला लागून असलेल्या दालनांत झाडांचे शत्रू,—निरनिराळ्या प्रकारचे कीटक आणि फुलपांखरें—होतीं. तांबड्या तुकतुकीत मखमलीचीं किंवा हिरव्या निळ्या रेशमाचींच जणूं काय ज्यांचीं शरीरें बनविलीं आहेत असे हे लहानमोठे किडे आणि कीटक मोठमोठ्या वृक्षांचीं पोखरून कवचें करतात हें त्यांना पहातांना खरें वाटेना. कांहीं किडे आणि कीटक इतक्या सुंदर रंगांचे आणि इतक्या सुबक आकारांचे होते कीं त्यांना किडे–कीटक म्हणणें बरें वाटेना. दार्जिलिंगजवळ असलेल्या सिक्कीमच्या जंगलांतलीं कांहीं फुलपांखरें नऊनऊ दहादहा इंच लांबीरुंदीचीं होतीं. त्यांच्या पंखावरल्या इंद्रधनुष्यालाहि लाजवणाऱ्या हिरव्या, पिवळ्या, निळ्या, तांबड्या रंगच्छटा आणि थक्क करून टाकणाऱ्या चित्रविचित्र आकृती अत्यंत सुपीक प्रतिभेच्या कलावंतालाहि 'हरलों !' म्हणायला लावतील अशा होत्या. लढाईपूर्वी हीं फुलपांखरें जपानी लोक फार मोठ्या प्रमाणावर खरेदी करून नेत असत. जपानी स्त्रियांच्या 'किमोनो'वर फुलपांखरांसारख्याच विविध रंगांच्या चित्रविचित्र आकृती असतात. या आकृतींच्या नव्या नव्या कल्पना सुचण्याकरतां या फुलपांखरांना मागणी होती म्हणतात.

## कागदाच्या 'जादूचे प्रयोग'

हीं सर्व दालनें पाहून झाल्यानंतर या संस्थेचे एक मुख्य रसायनशास्त्रज्ञ डॉ. कसबेकर यांना आम्ही भेटलों. त्यांनीं लाकडाचे तुकडे एका अजस्र यंत्रांत घालून त्याचीं चिपाडें कशीं होतात, तीं चिपाडें भिजून त्यांचा लगदा कसा होतो, लगद्याचा कागद कसा होतो वगैरे लाकडांच्या तुकड्यांपासून कागदाचा पुठ्ठा तयार होईपर्यंतच्या सर्व प्रक्रिया आपल्या प्रयोगशाळेंतल्या निरनिराळ्या दालनांतून दाखविल्या. पांढरा स्वच्छ लिहिण्याचा कागद तयार होत असलेला पहातांना जादूचा प्रयोग पहात असल्यासारखें वाटलें. एका टोंकाला पांढऱ्या रंगाच्या पातळ खिरीसारखा द्रव पदार्थ होता. तो एका यंत्रांत ओतला जात होता. पुढल्या यंत्रांत त्याचा चौकोनी थर होऊन तो वहात होता. तिसऱ्यांत ओल्या धोतरासारखा तो जाड झाला. त्या पुढच्यांत ऊष्णता देणाऱ्या विजेच्या यंत्रानें त्यांतलें पाणी शोषून घेतलें. दोन नळ्यांमधून जात तो तुळ-

वुळीत होऊं लागला आणि शेवटीं विशिष्ट रुंदीचा पांढरा स्वच्छ कागद होऊन बाहेर येऊं लागला. एका खोलींत निरनिराळ्या प्रकारचीं छोटीं छोटीं चकचकीत यंत्रें होतीं. एका यंत्रांत कागदाचा नमुना घालायचा आणि त्यांत पाणी टाकायचें; कांहीं वेळानें पाणी गाळलें जातें, आणि कागदाची छिद्रमयता ( पोरॉसिटी ) किती आहे ती यंत्र दाखवतें. एका यंत्रांत कागद ठेवून खटका दाबला कीं, त्यावर वजन वाढूं लागतें आणि तो फाटला कीं किती वजनाखालीं तो फाटेल ( बर्स्टिंग टेस्ट् ) तें कळतें. एक यंत्र आपण दोन हातांनीं कागद टरकावतों तसा टरकावतें आणि त्याची टरकण्याची शक्ति ( टेअरिंग टेस्ट ) अजमावतें. एक त्याला दोन बाजूला धरून ताणूं लागतें आणि त्याची ताणशक्ति ( टेन्शन् टेस्ट ) सांगतें ! दोन-चार बाटल्यांतलीं रसायनें एकांत दुसरें, दुसऱ्यांत तिसरें अशी हातचलाखी करून रेशमासारखा तुकतुकीत आणि कांचेसारखा पारदर्शक 'सेलोफेन पेपर' डॉ. कसवेकरांनीं कांहीं मिनिटांत आम्हाला करून दाखविला. दुपारीं दीड वाजतां फॉरेस्ट रिसर्च इन्स्टिट्यूटमधून घरीं परत आलों.

## 'डोळस' झालेले आंधळे सैनिक !

युद्धांत अंधत्व आलेल्या हिंदी शिपायांसाठीं 'सेंट डन्स्टन्स होम् फॉर इंडियन् वॉर-ब्लायंडेड्' नांवाची एक फार जुनी संस्था डेहराडून येथें आहे. बॉम्बच्या धक्क्यानें किंवा लढाईंत डोक्याला इजा झाल्यामुळें पुष्कळ सैनिकांची दृष्टि जाते आणि ते निकामी होतात. अशा सैनिकांना कांहीं तरी उपयुक्त काम शिकवून त्यांचें जीवन सुसह्य करणें हें या संस्थेचें काम आहे. मला वाटतें, पहिल्या महायुद्धानंतर सर क्लुथा मॅकेंझी या स्वतः युद्धांत अंध झालेल्या स्कॉटिश गृहस्थांनीं ही संस्था स्थापन केली; आणि गेलीं पंचवीस तीस वर्षें ती अंध सैनिकांसाठीं अत्यंत उपयुक्त कार्य करीत आहे. सध्यां मि. मॉर्टिमर नांवाचे एक मध्यमवयस्क युरोपियन गृहस्थ तिचे चिटणीस आहेत. सौ. लिमये यांनीं मॉर्टिमरना टेलिफोन करून आज दुपारीं आम्ही संस्था पहायला येणार म्हणून कळविलें होतें. दुपारीं साडेतीन वाजतां आम्ही तिथें गेलों. आंधळा म्हणजे ज्याच्या डोळ्यावर पडदा वाढला आहे, मोतीबिंदु

पडला आहे, किंवा ज्याच्या डोळ्याच्या खांचा झाल्या आहेत अशी आपली कल्पना आहे. पण इथले आंधळे पाहिल्यानंतर ती कल्पना चुकीची ठरते. आपल्याशीं बोलणाऱ्या किंवा समोरून येणाऱ्या माणसाचे डोळे अगदीं आपल्या डोळ्यांसारखेच जागच्या जागीं जसेच्या तसे असतात, उघडतात, मिटतात, हालतात; फक्त पाहण्याची शक्ति त्यांना मुळींच नसते. या संस्थेंत राहून आपापल्या कामांत तयार झालेले कांहीं आंधळे तर आंधळे आहेत हें शेवटपर्यंत आमच्या ध्यानांतच आलें नव्हतें. मॉर्टिमर यांच्याबरोबर आम्हाला निरनिराळीं खातीं दाखवीत असलेल्या सुभेदारानें व्यवस्थित खाकी गणवेष घातलेला होता, तुळतुळीत दाढी केलेली होती आणि डोक्यावर ऐटबाज बेरे टोपी ठेवली होती. वेतकाम करणाऱ्या, हातमाग चालवणाऱ्या, यंत्राचे बारीक सारीक भाग व्यवस्थितपणें सुटे करून पुन्हां जसेच्या तसे काळजीपूर्वक जुळविणाऱ्या आंधळ्या शिपायांना निरनिराळ्या खात्यांत आम्हाला अमुक करून दाखवा म्हणून तो सुभेदार हुकूम देत होता; अमक्या ठिकाणीं अडखळाल—संभाळून चला म्हणून आम्हाला सांगत होता; फार काय अंध सैनिकांनीं तयार केलेल्या चादरी, गालिचे, टॉवेल वगैरे वस्तू विकायला ठेवलेल्या स्टोअररूममध्यें गेलों, तिथें हे टॉवेल यापेक्षां चांगले आहेत, याची वीण पहा कशी आहे म्हणून इकडे तिकडे फिरून हें तें काढून दाखवीत होता. आमच्याबरोबर तो इकडून तिकडे चालत असतां, बोलत असतां किंवा वस्तू दाखवीत असतां आम्हांला कल्पनाहि नव्हती कीं तो साफ आंधळा आहे! त्यालाहि मुळींच दिसत नव्हतें हें कळल्यावर मि. मॉर्टिमर तरी डोळस होते ना म्हणून थट्टेनें आम्ही सौ. लिमये यांना विचारलें! स्टोअररूममधल्या पिल्हे नांवाच्या कारकुनानें आमचें बिल तयार केलें तोहि आंधळा होता! एका खोलींत उठावदार अक्षरांच्या ब्रेल-लिपींतला मजकूर हातांनीं चाचपून वाचायचा कसा तें एक व्यवस्थित कपडे केलेला माणूस अंध शिपायांना शिकवीत होता. त्याच्याशीं बोलतांनाहि तो आंधळा आहे हें लक्षांत आलें नाहीं. एक दोन गुरखे एके ठिकाणीं गाणें शिकत होते. शिकवणारा आंधळा पेटी वाजवून एक ओळ म्हणे, आणि भयंकर बेसुर स्वरांत ते तीच ओळ मोठ्यांदा ओरडत. मि. मॉर्टिमर थट्टेखोर

स्वभावाचे होते. आम्ही दाराशीं उभे आहोंत हें गाणारांना माहीत नव्हतें. 'बहोत अच्छा !' म्हणून हिंदुस्थानींत मॉर्टिमर म्हणाले, तेव्हां गाणारे गुरखे लाजून हंसूं लागले. आम्ही उभे होतों त्या स्टोअररूमपासून सुभेदाराची कचेरी समोर बरीच लांब होती. तुले नांवाचा एक मध्यमवयस्क अंध गुरखा कुठें तरी जात होता. मॉर्टिमरनीं त्याला हांक मारली. आमच्यासमोर येऊन मोठ्या शिस्तींत सलाम ठोकून तो उभा राहिला. 'तुले मोटा हुषार आहे,' मॉर्टिमर म्हणाले, 'या एवढ्या मोठ्या आवारांत तो सांगावें तिथें न चांचपडतां जातो. तुले, सुभेदारसाहेबांच्या कचेरींत जाऊन इकडे परत ये बघूं.' मॉर्टिमर त्याला म्हणाले. लष्करी शिस्तींत पावलें टाकीत बरोबर कचेरीच्या दिशेनें तुले न चुकतां सगळीं वळणें घेत जात होता. मध्येंच एक मोटा थोरला वृक्ष होता. सरळ चालत त्या वृक्षाकडे तो जाऊं लागला. कदाचित् जवळ गेल्यावर त्या झाडाला त्यानें बरोबर वळसा घातला असता, पण त्या आधींच मॉर्टिमर हंसत ओरडले, 'तुले, डोन्ट् हर्ट् दि ट्री!' 'मला माहीत आहे, साहेब,' म्हणून तें झाड टाळून तो बरोबर सुभेदाराच्या कचेरींत गेला आणि तसाच परत आला. सेंट् डन्स्टन्स होमच्या बागेंत आणि निरनिराळ्या इमारतींच्या बाजूनें कमरेइतक्या उंचीवर तारा लावल्या आहेत. त्या धरून आंधळ्यांना कुठेंहि फिरतां येतें. एके ठिकाणीं एक मराठा शिपाई दोरखंड वळीत बसला होता. जवळ कुणी तरी आल्याची चाहूल लागल्यावर वर मान करून 'नमस्ते साब!' म्हणून त्यानें नमस्कार केला. 'कुठले तुम्ही?' म्हणून आम्ही त्याला मराठींत विचारलें, तेव्हां हैद्राबादमधल्या मानूर गांवचे आपण म्हणून त्यानें सांगितलें. मॉर्टिमरसाहेबांचे आभार मानून घरीं परत आलों.

ता. २७ एप्रिल, १९४९

## कुत्रे व युरोपियन्स यांना प्रवेश आहे !

सकाळीं ८ च्या बसनें मसूरीला जायला निघालों. राजपूर नांव सोडल्या-नंतर चढण सुरू झाली. काश्मीरमधलीं पहलगांव, गुलमर्ग यासारखीं किंवा सिमला, मसूरीसारखीं सात आठ हजार फूट उंचीवरलीं, 'पूर्वापरौ तोय-

निधीऽवगाह्य स्थितः पृथिव्या इव मानदण्डः ’ अशा नगाधिराज हिमालयाजवळचीं हवेचीं ठिकाणें पाहिलीं कीं, ‘ हवेचें ठिकाण ’, ‘ घाट ’ वगैरे शब्दांचे खंडाळा—लोणावळा पाहून ठरविलेले अर्थ बदलावेसे वाटतात. सात आठ हजार फूट उंचीवर वळणें घेत घेत मोटार वर जाऊं लागली कीं आतां आलोंच माथ्यावर म्हणावें तों दुसरी पहिल्याहून उंच डोंगरांची रांग समोर दिसूं लागते; खालीं पहावें तों वर आकाशाचा निळा विस्तार दिसतो तसा खालीं सपाटीवरला अंधुक हिरवा विस्तार दिसतो. सिमला, दार्जिलिंग हींहि प्रख्यात हवेचीं ठिकाणें आहेत, पण मसूरीची कीर्ति फार ऐकली होती. हवेची मधुर शीतलता आणि हिमालयाचें धवल दर्शन इतर ठिकाणच्या प्रमाणेंच आहेत; पण मसूरी हें चोव्वीस चौरस मैल विस्ताराचें, मोठे रस्ते, मोठे बाजार, मोठे बार अँड बॉलरूम, मोठीं हॉटेलें असलेलें, विशेषतः ब्रिटिश राजवटींत बड्या युरोपियनांचें फार आवडतें असें अस्ताव्यस्त पसरलेलें मोठें हवेचें ठिकाण आहे, असें बरेच लोक सांगत. कांहीं बड्या युरोपियन हॉटेलांच्या दारावर ‘ Dogs and Indians not allowed ’ अशा पाट्या होत्या म्हणून ऐकलें होतें. मात्र ब्रिटिश गेल्यापासून बहुतेक बडीं हवेचीं ठिकाणें ओस पडलीं आहेत. त्याबरोबर मसूरीची तर फारच दैना झाली आहे, आणि ‘ Dogs and Europeans allowed ’ अशा पाट्या या बड्या हॉटेलांवर लावायची पाळी आली आहे, हेंहि ऐकलें होतें !

## मसूरी–हिरव्या झाडींतले लालपांढरे ठिपके !

आतां मसूरी जवळ येत होती. मोटारीनें एक वळण घेतलें, आणि समोर उंचावर दिसणाऱ्या डोंगरमाथ्यावरल्या काळसर हिरव्या झाडींत स्वच्छ उन्हांत चमचमणारे किती तरी लाल पांढरे ठिपके दिसले. मसूरीतल्या घरांच्या त्या पांढऱ्या भिंती आणि लाल रंगाच्या पत्र्यांचीं तीं छपरें होतीं. आणखी एक वळण गेल्यावर हें सर्व लुप्त होऊन पुन्हां डोंगर आणि डोंगरांतला मोटारचा रस्ता समोर दिसूं लागला. आणखी दोनचार वळणांनंतर पत्र्यांचीं छपरें सभोंवार असलेली एक मोकळी सपाट जागा दिसूं लागली. हें ‘ किंक्रेग ’ आणि हा ‘ किंक्रेग ’चा बसस्टँड. यापुढें बस जात नाहीं. इथून



हिरव्या झाडींतले लालपंढरे ठिपके

पायीं किंवा रिक्शामधून वर जायला हवं. सकाळचे साडेनऊ वाजले होते. पायींच वर जायचें आम्ही ठरविलें. बसमधून उतरल्याबरोबर हॉटेलाच्या प्रतिनिधींनीं आपापलीं कार्डें पुढें करून आम्हाला गराडा घातलाच होता. मसूरीला दोन दिवसांपूर्वींच जाऊन आलेले, डेहराडून येथें प्रो. वाघ यांचे घरीं आम्हाला

भेटलेले श्री. शास्त्री यांनीं आम्हाला 'ग्रॅन्ड हॉटेल'चें नांव सांगितलें होतें. तेव्हां कसलाहि विचार न करतां हमालाकडे सामान देऊन 'ग्रॅन्ड हॉटेल'च्या माणसाबरोबर आम्ही चालूं लागलों. कश्मीर, सिमला, मसूरी वगैरे पहाडी मुलखांतले हमाल कितीहि वजनाचें सामान असलें तरी दोरी किंवा चामड्याचे पट्टे बांधून तें पाठीवरून वहातात हा एक विशेष आहे. मोठमोठीं कपाटें किंवा पियानोसारखें सामान तीन किंवा चार मजूर रांगेनें उभे राहून पाठीवर बांधून घेतात, आणि मग सारखीं पावलें टाकीत वर चढूं लागतात. कारण उघड आहे. पहाडी मुलखांत एकसारखा चढउतार असतो. कांहीं घरांचा, आपण वरच्या रस्त्यानें जात असलों तर जो तळमजला वाटतो तोच खालच्या रस्त्यानें जाऊं लागलों कीं चौथा मजला आहे हें लक्षांत येतें. डोक्यावर वजनदार सामान घेऊन डोंगरी चढण एकसारखी चढणें किंवा उतरणें जवळ जवळ अशक्यच आहे. मात्र यूरोपांतले हमाल डोंगरी मुलुख नसतो तिथेंहि —लंडन, पॅरीस किंवा बर्लिनसारख्या ठिकाणींहि—या पहाडी हमालांसारखीं पाठीवरूनच ओझीं वहातात. डोक्यावरून ओझें वहाणें युरोपियन हमालांना माहीतच नाहीं, असें दिसतें. आमचे मुंबई-पुण्याकडले हमाल मोठे मोठे बोजे डोक्यावरून वहातांना जेव्हां एखादा नवीनच इथें आलेला युरोपियन माणूस पहातो तेव्हां तो आश्चर्यचकित होतो आणि यांच्या किरकोळ माना या ओझ्याखालीं मोडत कशा नाहींत म्हणून विचारतो !

## थंडी, आंघोळ आणि कपड्यांची स्वच्छता !

हे पहाडी मजूर गुरख्यांसारखे ठेंगू बांध्याचे पण मजबूत असतात. त्यांच्या पायाच्या पोटऱ्या पपनिसासारख्या गुटगुटीत गोल असतात. मसुरी काय, सिमला काय, कश्मीर काय, या पहाडी मुलखांतल्या हमालांच्या इतके भयंकर मळके कपडे मी जगांत कुठें पाहिलेले नाहींत. भयंकर दारिद्र्य आणि भयंकर थंडी यांचा हा परिणाम आहे. नवीन कपडा कधीं काळीं घ्यायचा, आणि कधीं काळीं अंगाला पाणी लावायची इच्छा झाली तर अंगावर आहे तो बदलायचा, यामुळें पहाडी हमालाच्या अंगावरला फाटका सदरा एके काळीं पांढरा होता यावर कुणीहि विश्वास ठेवणार नाहीं. सपाटीवरल्या ऊष्ण

प्रदेशांतहि दारिद्र्य असलें आणि गरिबांचे कपडे फाटके असले तरी नदींत किंवा तळ्यांत अंग किंवा कपडे धुण्याचा त्यांना कंटाळा वाटण्याचें कारण नाहीं, – किंबहुना, तेवढा एकच फुकट मिळणारा सुखोपभोग त्यांना घेतां येतो. त्यामुळें ते अधिक स्वच्छ असतात, असें मला वाटतें. मसूरींतल्या बिचाऱ्या गरिबांना काय दोष द्यायचा ? दुपारीं एक वाजतांहि थंडीची इतकी हुडहुडी अंगांत भरत होती कीं, आम्ही तरी दोन दिवसांत कुठें आंघोळ केली ? फ्लॅनेलची पँट आणि जाड ट्वीडचा गरम कोट जसाचा तसा अंगांत ठेवून, दुपारचें जेवण झाल्यावर फक्त पायांतले बूट काढून गरम ब्लँकेट अंगावर घेऊन मी बिछान्यांत गुरफटून पडलों.

## पांढऱ्या शुभ्र बर्फाच्या या प्रचंड राशी !

किंक्रेगहून वर मुख्य रस्त्यावर येऊन पोहोंचलों तेव्हां चांगले दहा सव्वादहा झाले होते. बँड स्टँड आणि लायब्ररी या रस्त्याच्या कोपऱ्यावरच होतीं; आणि त्यांच्याजवळच ' ग्रोव्ह हॉटेल ' होतें. प्रातरुपहार, चहापाणी वगैरे घेऊन फिरण्याकरतां बाहेर पडलों. थंडी चांगली होती, पण उन्हांत फिरतांना बरें वाटत होतें. मसूरीचा सीझन सुरू व्हावयाला अजून पुष्कळ अवकाश असल्यामुळें मोठमोठीं हॉटेलें अजून उघडावयाचींच होतीं आणि ' ग्रोव्ह ' सारखीं जीं उघडीं होतीं त्यांत फारशी गर्दी नव्हती. रस्त्यांतहि फार लोक दिसत नव्हते. बरेचसे रिक्शावाले गिऱ्हाईक नसल्यामुळें बँड स्टँडजवळ विड्या फुंकीत बसले होते. आम्हाला पाहिल्याबरोबर दुष्काळांतून आलेले लोक अन्नावर तुटून पडावे तसे ते सर्वजण आमच्यावर तुटून पडले. आम्हाला पायींच फिरावयाचें असल्यामुळें त्यांच्या गर्दींतून बाहेर पडून आम्ही चालावयाला लागलों. बाजार ओलांडून पलीकडल्या शांत, निर्जन रस्त्यावर गेल्याबरोबर समोर लांबच लांब पसरलेल्या दऱ्या, आणि दूर क्षितिजाकडे डावीकडून उजवीकडे–जिथें नजर फिरवावी तिथें–तळापासून शिखरापर्यंत पांढऱ्या शुभ्र, उनांत चकचकणाऱ्या बर्फाच्या पर्वतांच्या रांगा दिसूं लागल्या. त्यांतलें एक सर्वांत उंच शिखर उन्हांत चमचमत होतें. त्यावरून मधून मधून धुक्यासारखे ढग जात. कांहीं वेळानें तें पुन्हां दिसे. तिथून जाणाऱ्या एकानें सांगितलें, हिमालयाच्या प्रख्यात

शिखरांपैकीं हें ‘नंदादेवी’. सर्व क्षितिज भरून टाकीत निळ्या गगनाला भिडणाऱ्या, उन्हांत चमचमणाऱ्या पांढऱ्या शुभ्र बर्फाच्या या अजस्र राशी पहात आम्ही किती तरी वेळ उभे राहिलों. हा नगाधिराज हिमालय. पांढऱ्या शुभ्र हिमानें आच्छादलेल्या या एकाहून एक उंच पर्वतांच्या रांगा पहिल्यांदा पाहिल्याबरोबर, ज्या संस्कृतभाषी आर्यांनें ‘हिमालय’ हें नांव या पर्वताला दिलें त्याच्या तोंडून दुसरा कांहीं शब्द बाहेर पडणेंच शक्य नव्हतें. त्याची वाणी कुंठित झाली असेल, आणि शेवटीं तो उद्गारला असेल, ‘हिमालय!’ सर्वत्र हिमच हिम—हें हिमाचें आलय! या शांत


तीन स्त्रिया, चकोता

रस्त्यावर खूप दूरपर्यंत फिरून दुपारच्या जेवणाकरतां हॉटेलांत परत आलों.

## हिरव्या झाडींतून पिवळ्या उन्हांत डोकावणारीं घरें


संध्याकाळीं लंडोर नांवाचा मसूरींतला सर्वांत उंच भाग आहे त्या बाजूला फिरायला गेलों. जातांना कुल्डी बाजार नांवाची मोठी बाजारपेठ वाटेंत लागली.

ही जुनी मसुरी. इथें वस्ती बरीच दाट आहे. लंडोरमधल्या सर्वांत उंच 'पॉइंट'वर उभें राहिलें कीं आजूबाजूला वरखालीं अस्ताव्यस्त पसरलेल्या मसूरींतल्या ल्हानमोठ्या घरांचे पुंजके डोंगरांच्या कुशींतली गर्द हिरवी झाडी बाजूला करून मधून मधून पिवळ्या उन्हांत डोकावतांना दिसतात.

रात्रीं हॉटेलच्या खिडकींतून खूप दूर पहातां खालीं सपाटीवर कुठें कुठें अंधुक लुकलुकणाऱ्या पिवळसर दिव्यांचे पुंजके दिसत होते. खालून डोंगराच्या माथ्यावर जसे मसूरीचे दिवे दिसतात तसेच हे डेहराडून, क्लेमंट्स टाऊन वगैरेचे दिवे असावे.

ता. ७ एप्रिल, १९४९

आज सकाळीं पुन्हां एकदां नंदादेवीच्या बर्फमय भव्यतेचें दर्शन घेऊन कालच्याच रस्त्यानें खूप लांबपर्यंत फिरायला गेलों. या रस्त्याच्या टोकाला खालीं



काटेसरचें देऊळ, मसुरी

दूरवर पसरलेल्या दरीच्या कांठावरील एका उंच टेकाडावर एक चिमुकलें पांढरें देऊळ दिसत होतें. आजूबाजूला अफाट दरी आणि उंचावर तें एकुलतें एक देऊळ पाहून तिथें जाण्याची इच्छा झाली. वर चढून गेलों तों एक प्रशस्त बंगला आणि आवतींभोवतीं सुंदर बाग दिसली. बंगल्याच्या मागल्या कुणाच्या खासगी जागेंतून पलीकडे कसें जावें म्हणून विचार करीत होतों तों तिथें काम करणारा माळी दिसला. हा काटेसरच्या महाराजांचा बंगला, आणि हें काटेसरच्या महाराजांच्या खासगी मालकीचेंच देऊळ आहे, असें कळलें. मात्र तुम्ही देवळांत जाऊं शकतां, माळी म्हणाला. बंगला बंदच होता. टेकाडाकडे जाणारा चिंचोळा रस्ता चढून आम्ही देवळांत गेलों. पांढऱ्या रंगाचें चिमुकलेंच पण मोठें सुबक देऊळ होतें. देवळा-मागल्या पांढऱ्या शुभ्र संगमरवराच्या चिमुकल्या गच्चींतून दिसणारा, वरखालीं जाणाऱ्या डोंगरांच्या रांगांचा आणि खोल दऱ्यांचा देखावा डोळे फिरवून टाक-णारा होता.

## मसूरीचें वैभव पार गेलें !

येतांना वाटेंत 'रिव्हिएरा' नांवाचं एक छोटेंसें फोटोग्राफीच्या सामानाचें दुकान दिसलें त्यांत शिरलों. कुणी गिऱ्हाईक नसल्यामुळें शर्मा नांवाचा दुकानाचा तरुण मालक स्वस्थपणें कांहीं वाचीत पडला होता. कांहीं दिवस तो मुंबईत एका फोटोग्राफरच्या स्टूडिओंत काम करीत होता. आमच्या-बरोबर बराच वेळ तो गप्पा करीत होता. 'अलिकडे मसूरीचें वैभव पार गेलें आहे,' तो म्हणाला, 'या वर्षापासून परराष्ट्रीय वकीलाती उन्हा-ळ्यांत इथें येणार आहेत असें कळतें; तसें झाल्यास मात्र धंद्याला तेजी येईल.' मसूरीची पुष्कळ माहिती त्यानें आम्हाला सांगितली. इथून गंगोत्री फक्त सव्वीस मैलांवर आहे. ऐशीं मैलांवर सिमला आहे. चक्रोता नांवाचें मसूरी-पेक्षांहि उंचावर असलेलें हवेचें ठिकाण इथून तीस मैल असल्याचें त्यानें सांगितलें.



कोळसेवाला व त्याची टोपली, मसूरी

पाठीवरलें ओझें सावरीत रस्त्यानें हळुहळू जात असलेला एक कोळसेवाला दृष्टीला पडला. इथला कोळसेवाला आणि त्याची कोळशाची टोपली पहाण्यासारखी असते. तळाला अरुंद आणि वर रुंद होत जाणारी एक उंच वेताची टोपली कोळशांनीं तुडुंब भरून ती वरून दोरीच्या जाळीनें बंद केलेली असते. ती पाठीवर बांधून तिची दोरी कपाळाला अडकवून हा कोळसे-वाला डोंगरांतून वर खालीं फिरत असतो.

ता. ८ एप्रिल, १९४९

सकाळीं १० च्या बसनें डेहराडूनला परत जायला निघालों. सव्वा तासांत खालीं डेहराडूनला आलों.

संध्याकाळीं कर्नलसाहेबांबरोबर ' इंडियन मिलिटरी ॲकेडेमी 'च्या बाजूला फिरायला गेलों. लष्करी अधिकाऱ्यांचे लहान लहान बंगले, रस्ते, बागा असलेलें फॉरेस्ट रीसर्च इन्स्टिट्यूटप्रमाणेंच हेंहि एक लहानसें गांवच आहे. हॉकी, फूटबॉल, बास्केट बॉल, वगैरे खेळ खेळण्याकरतां ठिकठिकाणीं मोकळीं क्रीडांगणें आहेत. पोहण्याकरतां वर छप्पर असलेला सुंदर तलाव बांधला आहे. गंजी-फ्रॉक आणि चड्ड्या घालून निरनिराळ्या क्रीडांगणांवर विद्यार्थी खेळत होते.

लाल तुरा लावलेली निळी बेरे टोपी आणि लष्करी गणवेष घातलेले ॲकॅडेमीचे विद्यार्थी तरतरीत आणि रुबाबदार दिसतात.

इथून ५८ मैलांवर असलेल्या चक्रोत्याला जायला उद्यां सकाळीं सात वाजतां कर्नलसाहेबांबरोबर निघायचें.

ता. ९ एप्रिल, १९४९

## मधुचंद्र साजरा करावा तर चक्रोत्याला !

चक्रोता हें हवेचें ठिकाण मसूरीपेक्षांहि थोडें अधिक उंचावर आणि अधिक सुंदर आहे, असें डेहराडूनचे लोक सांगतात. पण मसूरीइतकी चक्रोत्याची कीर्ति झालेली नाहीं. दिल्लीहून एका रात्रींत डेहराडूनला येऊन मसूरीला जातां येतें. चक्रोत्याचें तसें नाहीं. डेहराडूनहून एकतीस मैलांवर कलसी गांव घाटाच्या पायथ्याशीं आहे. तिथून पुढें सत्तावीस मैलांवर एक उंच घाट चढून उतरायचा आणि दुसरा एक त्याहून उंच चढायचा म्हणजे आपण चक्रोत्याला पोहोंचतों. तेव्हां इतक्या लांब आणि इतकी कठीण वाट असलेल्या चक्रोत्याला बंगले बांधायला आणि हॉटेलें काढायला श्रीमंत लोक कशाला जातील ? त्यामुळें चक्रोता हें शहरी कृत्रिमतेनें दूषित न झालेलें असें एक शांत, ल्हानसें हवेचें ठिकाण आहे. इथून दिसणारा डोंगरदऱ्यांचा आणि उंच उंच पाईन वृक्षांच्या जंगलांचा देखावा अधिक भव्य आणि अधिक रम्य आहे. हिमालयाचीं पांच सहा शिखरें रांगेनें इथून दिसतात. पण मसूरी-सारखी इथें गर्दी नाहीं. आपल्या गडद हिरव्या पानांच्या अजस्र राहुटीचा कळस आकाशाला भिडवूं पहाणाऱ्या उत्तुंग पाईन वृक्षांच्या छायेंत बसून, हिमालयाचीं शुभ्र शिखरें निवांतपणें न्याहाळीत बसायचें असेल तर चक्रो-त्यालाच जायला हवें. ऐटबाज बूटसूट घातलेले शोकीन पुरुष आणि त्यांच्या-बरोबर उंच टाचेच्या बुटांच्या ठेक्यावर चालणाऱ्या रंगवलेल्या ओठांच्या स्त्रिया यांचा मसुरींतला कलकलाट, आणि चक्रोत्यांतल्या भव्यभयानक निसर्गसौंदर्याची शांतता हीं दोन्ही पाहून कुणी तरी म्हटलें आहे कीं, 'Mussouri for divorce and Chakrota for honeymoon!'

चक्रोत्याला हिंदी लष्कराचा इंजिनियरिंग डेपो आहे, आणि कलसीला लष्कराचा ‘टॅक्टिकल मोटर ड्रायव्हिंग अँड हिल-ड्रायव्हिंग ट्रेनिंग कँप’ आहे. त्यामुळें हा सर्व विभाग ॲडमिन्कॉम् लिमयांच्या हुकमतीखालीं आहे. महिन्यांतून एकदोनदां त्यांना कामासाठीं चक्रोत्याला जावेंच लागतें. सकाळीं ७ वाजतां मिलिटरी स्टाफ कारमधून कर्नलसाहेबांबरोबर चक्रोत्याला जायला निघालों.

## अवखळपणें खळाळणारी यमुना

चक्रोत्याच्या वाटेवर कांहीं ठिकाणीं दोन्ही बाजूंना साल वृक्षांचीं दाट जंगलें दिसत होतीं. कांहीं ठिकाणीं जंगलांत कोळशाच्या भट्ट्या लागलेल्या दिसल्या. या जंगलांत बऱ्याच ठिकाणीं चहाचे मळेहि दिसले. कलसी गांव दीड दोन मैल होतें. इतक्यांत आमच्या मोटारीचें कांहीं तरी बिघडलें. ड्रायव्हरसह मोटर तिथेंच ठेवून कलसीच्या मोटर ट्रेनिंग कँपकडे जायला पायींच निघालों. कर्नल-साहेब म्हणाले, तिथें आपल्याला दुसरी मोटर मिळेल. वाटेंत एक नदीवरचा पूल लागला. ही यमुना नदी आणि यमुना नदीवरचा हा पहिला पूल. जवळ-पासच कांहीं मैलांवर जम्नोत्री असावी. पर्वतांतल्या आपल्या उगमापासून यमुना इथेंच पहिल्यांदा अवखळपणें खळाळत उघड्या मैदानांत बाहेर पडते. इथें तिचें पात्र फारसें मोठें नाहीं आणि खोलहि नाहीं. फार तर कमरेइतकें खोल असेल. तळाकडचे पांढरे हिरवे दगड गोटे जवळ गेलें असतां साफ दिसतात; इतकें निर्मळ आणि स्वच्छ पाणी इथें आहे. या कलसी गांवाच्या एका टोकाला कांहीं तरी शिलालेख असलेला अशोकाचा एक चौकोनी स्तंभ आहे. लवकरच ट्रेनिंग कँपमध्यें आम्ही जाऊन पोहोंचलों. आमची बसायची आणि चहापाण्याची सोय एका तंबूंत करून तिथल्या अधिकाऱ्यांनीं तात्रडतोब आमची मोटार दुरुस्त करून इथें आणा-यला एक ट्रक पाठविला. चक्रोत्याला जाणाऱ्या मोटारींना इथें थांबावेंच लागतें. घाटाचा रस्ता इथून सुरू होतो. चक्रोत्याहून आलेली पहिली मोटर मागून किती येत आहेत तें इथल्या अधिकाऱ्याला सांगते. त्या सर्व एकामागून एक घाट उतरून इथें येऊन पोहोंचल्या कीं इथें थांबलेल्या

मोटारी सोडतात. दोन्ही बाजूच्या मोटारी घाटांतून एकदम जाऊं शकणार नाहींत म्हणून ही पद्धत आहे.

## पानपतला ? –छे, वायव्य सरहद्दीवर !

चहापाणी चालू असतां तिथल्या कांहीं लहानमोठ्या लष्करी अधिकाऱ्यां-बरोबर आम्ही गप्पा करीत होतों. शाळेच्या शिक्षणासाठीं कांहीं वर्षें जम्मूंत असलेला एक तरुण कॅप्टन म्हणाला, 'काश्मीर खोरें फक्त आपणाकडे रहावें; मिरपूर, पूंच, गिलगित पाकिस्तानकडे राहिल्यास मला कांहीं वाटणार नाहीं !'

'कां हो ?' मी म्हणालों.

'या मिरपुरी, पुंची आणि गिलगिती मुसलमानांइतके दगाबाज आणि हरामखोर लोक दुसरीकडे कुठें नसतील !'

दुसरा एक ज्युनिअर अधिकारी म्हणाला, 'फाळणीनंतर माझे कांहीं मुसलमान सोबती पाकिस्तानांत गेलेत, त्यांपैकीं एक तिथून थट्टेनें लिहितो, आतां आपली भेट पानिपतला ! मी त्याला उलट लिहिलें आहे कीं बहुतेक वायव्य सरहद्दीवरल्या जमरूडच्या किल्यावरच आपली भेट होईल !'

बोलतां बोलतां हेंहि कळलें कीं गुरखा पलटणीवर हिंदी अंमलदार ब्रिटिश सरकार कधींहि नेमीत नसे. तुम्ही हिंदी नाहीं, हिंदुस्थानशीं तुमचें कांहीं सोयरसुतक नाहीं ही गोष्ट ब्रिटिश लष्करी अंमलदार गुरखा शिपायांच्या मना-वर नेहमीं ठसवीत. सध्यां एका गुरखा पलटणीचा मुख्य असलेल्या एका हिंदी अंमलदारानें सांगितलें, माझ्या पूर्वीच्या ब्रिटिश अंमलदारानें पलटणीचा शेवटचा निरोप घेतला तेव्हां त्याच्या डोळ्यांत पाणी आलें; पण गुरखे निर्वि-कार चेहेरे करून ताठ उभे होते ! स्वातंत्र्य मिळाल्यावर हिंदी लष्करांतल्या कांहीं गुरखा पलटणी ब्रिटिशांनीं घेतल्या; तेव्हां ज्यांना हवें असेल त्यांना हिंदी लष्करांत रहाण्याची मुभा देण्यांत आली होती. त्या पलटणींतले फक्त दहा टक्के गुरखे ब्रिटिश लष्करांत गेले, आणि पलटणींतल्या शिपायांची संख्या पुरी करण्याकरतां नेपाळातून नवे रिक्रूट ब्रिटिशांना घ्यावे लागले.

## उंच कडे, खोल दऱ्या आणि सरळसोट झाडें

सव्वादहाच्या सुमाराला आमची मोटर नीट होऊन आली आणि डोंगरांच्या रांगावर रांगा मागें टाकीत गिरक्या घेत वर वर जाणारा घाट रस्ता कापावयाला आम्ही सुरुवात केली. एक घाट संपविल्यानंतर सहिया नांवाचें एक गांव लागलें. दोन डोंगर रांगांच्या मध्येंच असलेल्या या गांवांत बरींचशीं दुकानें व घरें दिसलीं. आजूबाजूच्या पहाडांत पहाडी लोक आलें, लसूण, हळद, बटाटा वगैरे पिकवतात. या गांवांतले व्यापारी आणि सावकार त्यांना साखर, गूळ वगैरे बदली देऊन तो माल घेतात. सहियांत थोडा वेळ मुक्काम करून दुसरा घाट चढावयाला आम्ही सुरुवात केली.

चक्रोत्यांत पोहोंचलों तेव्हां साडेबारा वाजले होते. उंच झाडांच्या सावलींतून चालतांना थंडी वाटूं लागली. एका बाजूला मोठी थोरली लष्कराची परेड ग्राऊंड आणि क्रीडांगण होतें. एवढीच काय ती मोठी थोरली सपाट मोकळी जागा चक्रोत्यांत दिसली; नाहींतर पहावें तिथें उंच कडे, थोडींशीं घरें, खोल दऱ्या आणि सरळसोट झाडांची गर्द हिरवी झाडी. एका कोपऱ्यावर लष्करी मालकीची एक मोठी इमारत होती. या इमारतीच्या समोरच्या रस्त्यावरून समोर पाहिलें कीं अनेक डोंगर-दऱ्यांच्या पलीकडे दूर क्षितिजाला लागून बर्फमय डोंगरशिखरांच्या उंच सखल रांगा दिसतात. हिमालयाचीं हीं निरनिराळीं शिखरें आहेत. पूर्वीं फक्त ब्रिटिश शिपायांसाठीं चक्रोत्याला एक मोठें थोरलें हॉस्पिटल होतें. बिचाऱ्या हिंदी शिपायांसाठीं त्याकाळीं इतकी चांगली जागा कोण निवडणार ? ब्रिटिश सैनिकांचें हें हवेचें राखीव ठिकाण असल्यामुळें कांहीं उत्कृष्ट सोयी ब्रिटिश सरकारनें इथें केल्या होत्या. त्यापैकीं एकीचा आम्हांला चांगला उपयोग झाला. या रस्त्यावर एक आडवी पाटी डोळ्यासमोर येईल अशा बेतानें लावली आहे. त्या पिवळ्या पाटीवर समोरच्या शिखरांच्या रांगा काळ्या रंगांत दाखविलेल्या आहेत, आणि प्रत्येक शिखराचें नांव उंचीसह दिलें आहे. पाटीवरचें शिखर नांवासह पहायचें आणि समोर आकाशाकडे पहायचें–हें बंदरपूंच, हें केदारनाथ, ही नंदादेवी ! शिखर ओळखायची ही छानदार सोय आहे. बंदरपूंच हें वीस वीस हजार

फूट उंचीच्या दोन टोकांचें जुळें शिखर आहे! या शिखरांवरून सारखें धुकें जात असतें. त्यामुळें सगळींच शिखरें दिसतात असें नाहीं.

सध्यां चक्रोत्यांत काश्मीर युद्धामुळें निराश्रित झालेल्या जम्मू, मिरपूर, पूंच वगैरे विभागांतल्या निर्वासितांचा एक कॅंप आहे. हवेकरतां येणाऱ्या लष्करी अधिकाऱ्यांसाठीं सुंदर बंगले कांहीं ठिकाणीं आहेत. अशा एका बंगल्यांत दुपारचें जेवण केलें आणि कर्नलसाहेब आपलीं कामें उरकीत असतां आम्ही सापडेल त्या रस्त्यावरून भटकून घेतलें. एका रस्त्यावर कांहीं पहाडी स्त्रीपुरुष भेटले. त्या पहाडी स्त्रीचे कपडे, आणि ज्याच्यांतून शेंदाड शिपायाला सहज



गुरखा कुटुंब, डेहराडून

तीर मारतां येईल असें चांदीच्या तारेचें तिच्या नाकांतलें भलें मोठें चक्र पाहून त्यांना उभे करून त्यांचे एक दोन फोटो घेतले. हे पहाडी लोक फारच साधे आणि सुस्वभावी असतात. उभे रहा म्हटल्यावर मुळींच आढेवेढे न घेतां हंसत उभे रहातात. ब्रिटिश सैनिकांसाठीं ब्रिटिश सरकारनें इथें बांधलेलें

अडीचशें खाटांचें सुसज्ज हॉस्पिटल ज्या उंच कड्यावर आहे तिथून दिसणारा दऱ्याखोऱ्यांचा आणि डोंगररांगांचा देखावा इतका आल्हाददायक आहे कीं हें विशाल निसर्गदृश्य पाहूनच रोगी अर्धाअधिक बरा व्हायचा !

## तांबड्या लाल बुरात फुलांचे झुबके

चक्रोत्याहून येतांना वाटेंतल्या कांहीं झाडावर कुणीतरी आणून ठेवल्या-सारखे तांबड्या लाल फुलांचे झुबके दिसले. या फुलांचें नांव बुरात. टोपली भरेल इतकीं बुरात फुलें आम्ही तोडून घेतलीं. या फुलांची फार चवदार चटणी करतां येते ! सहा-सव्वासहाला कलसीला येऊन पोहोंचलों. तिथें चहापाणी घेऊन पुढें निघालों. यमुनेचा पूल आला तेव्हां मोटार थांबवून खालीं उतरलों. यमुनेचें पाणी इथें जितकें प्रसन्न आणि थंड आहे—हिमालयां-तून नुकतीच कुठें ती इथें बाहेर आली आहे—तितकें दुसरीकडे कुठेंच नसणार, तेव्हां त्या खळखळणाऱ्या स्वच्छ ‘यमुनाजळीं’ यथेच्छ हात, पाय, तोंड धुण्याचें सकाळीं जातांनाच ठरविलें होतें. गुढगाभर पाण्यांत उभे राहून त्या स्फटिकासारख्या स्वच्छ आणि बर्फासारख्या गार पाण्याचा अंगावर शिडकाव करतांना आनंदानें शरीर शहारलें. घरीं पोहोंचेपर्यंत रात्रीचे आठ वाजले.

ता. १० एप्रिल, १९४०.

## कर्नलसाहेबांच्या पाहुण्यांना भेटण्यासाठीं...

डेहराडूनमध्यें सध्यां कांहीं गुरखा पलटणी आहेत. त्यांच्या बराकींतून फिरतांना गळ्यांत रंगीबेरंगी मण्यांच्या माळा आणि नाकाकानांत पहाडी दागिने घातलेल्या गुरखा स्त्रिया आणि त्यांचीं गुटगुटीत मुलें आम्ही पाहिलीं होतीं. दलालांच्या मनांतून त्यांना ‘स्केच’ करायचीं होतीं. उभा राहून गुरख्यांच्या बायकांचें कुणी ‘स्केच’ करूं लागला तर गुरख्याच्या कुकरीनें त्याची गर्दनच छाटली जाईल ! तेव्हां गुरखा पलटणीच्या कर्नलना मुद्दाम निरोप पाठवून एक गुरखा शिपाई आपल्या बायकोमुलासह कर्नल लिमयांनीं बोलावून घेतला

होता. आज सकाळीं १० वाजतां 'ऑफिसर्स मेस 'च्या प्रशस्त बागेंत तें गुरखा कुटुंब दलालांना ' सिटिंग ' देणार होतें. कर्नलच्या हुकुमाप्रमाणें तो तरुण गुरखा आपली बायको आणि पांचसहा वर्षांचा छोकरा यांच्यासह वेळेवर आला. पण त्यांना पाहून आम्ही थंडच झालों! त्यानें हाफ् पँट आणि ठेवणींतला निळ्या सर्जचा डबल ब्रेस्ट कोट घालून डोक्याला लालहिरवा गळपट्टा बांधला होता, मुलाला परीटघडीची लांडी विजार आणि शर्ट चढविला होता, आणि त्याची बायको गडद निळ्या रंगाचें तलम पातळ चापून चोपून नेसली होती! नाकाकानांत, हातापायांत तिनें कसलेच दागिने घातले नव्हते. कर्नल-साहेबांच्या पाहुण्यांना भेटायला सर्व पहाडी कपडे आणि दागिने काढून ठेवून ' अप् टु डेट ' पोशाख करून ती मंडळी आली होती! दलालांना काय हवें होतें तें त्यांना सांगितल्यावर त्यानें घरीं जाऊन बायकोचे कांहीं दागिने आणले, आणि त्या तिघांचें चित्र दलालांनीं पुरें केलें.

तो गुरखा आपल्या बायकोशीं बोलत असतां किंवा त्याची बायको आपल्या मुलाशीं बोलत असतां त्यांच्या ' गुरखाली ' बोलींतल्या कांहीं शब्दांचें मराठी शब्दांशीं साम्य पाहून मला आश्चर्य वाटलें. त्या मुलाला आम्ही सरबत प्यायला दिलें. उभ्यानें पितांना तो अंगावर सांडूं लागला तेव्हां त्याची आई त्याला म्हणाली, ' भुइबस्तर खा!'

संध्याकाळीं ५-२० च्या गाडीनें लखनौला जायला निघालों.

ता. ११ एप्रिल, १०४९

## सत्तावनच्या बंडाचें स्मारक

गाडी लखनौ स्टेशनांत आली तेव्हां सकाळचे साडेसात वाजले होते. वेटिंगरूममध्यें चहा, पाणी, आंघोळ, प्रातरुपाहार वगैरे उरकून १० वाजतां शहर पहावयाला बाहेर पडलों. दुपारपर्यंत आम्हाला शहरांत भटकायचें आहे तेव्हां तासाला काय घेशील, म्हणून एका म्हाताऱ्या टांगेवाल्याला विचारलें. तो म्हातारा गंभीरपणें आमच्या चेहेऱ्याकडे पहात म्हणाला, 'जनाब, मी असा-


तसा टांगेवाला नाहीं; तासावर पैसे मोजण्याच्या कसल्या गोष्टी करतां? एकदम पांचदहा रुपये द्या झालं!'

'असातसा नाहींस म्हणजे कोण आहेस तूं?' आम्ही विचारलें.

'जनाब, कॉंग्रेसच्या चळवळींत भाग घेऊन अनेक वेळां मी देशासाठीं तुरुंगवास भोगलाय. देशासाठीं सर्वस्व घालवून आतां पोटासाठीं हा धंदा करायचं माझ्या नशिबीं आलंय्!'

त्याच्या चेहेऱ्यावरून तो खरें बोलत होता, असें दिसलें. एक रक्कम ठरवून आम्ही त्या 'जंटलमन्' टांगेवाल्याच्या टांग्यांत बसलों.

गव्हर्मेंट हाऊस, कौन्सिल हॉल वगैरे भव्य इमारती पहात हजरतगंज विभागांतल्या बाजारपेठेंत गेलों. मुंबईतल्या कोट विभागांत फिरलेल्या माणसाला या बाजारपेठेचें विशेष कांहीं वाटावयाचें कारण नाहीं. १८५७ सालच्या बंडांत गाजलेली ब्रिटिश रेसिडेन्सी पहावयाला नंतर गेलों. एखाद्या जुन्या किल्ल्याच्यासारखी पडकी तटबंदी पहिल्यांदा दिसली. बंडवाल्यांच्या तोफांच्या गोळ्यांनीं त्या तटबंदीला पडलेलीं भगदाडें पहात असतां हिंदुस्थानच्या त्या पहिल्या स्वातंत्र्ययुद्धाच्या आठवणी मनांत गर्दी करतात; आणि राणी लक्ष्मीबाई, तात्या टोपे, नानासाहेब पेशवे वगैरेंचे चेहरे डोळ्यासमोर तरळूं लागतात. आंतल्या आवारांत कांहीं धड, कांहीं पडक्या जुन्या इमारती आहेत. ब्रिटिशांसाठीं लढतांना जे पडले त्या ब्रिटिश आणि 'इमानी' हिंदी अधिकाऱ्यांचे आणि शिपायांचे स्मारकस्तंभ ठिकठिकाणीं आहेत! मधल्या एका छोट्याशा इमारतींत बंडाच्या वेळच्या वस्तूंचें आणि चित्रांचें नीटनेटकें वस्तुसंग्रहालय आहे. या इमारतीच्या प्रवेशद्वाराशींच एका भिंतीवर एक दगडी पाटी लावली आहे. तिच्यावर बंडानंतर शांतता प्रस्थापित करण्याकरतां आलेले व्हाइसरॉय लॉर्ड कॅनिंग यांनीं बंडवाल्यांविरुद्ध कित्येक दिवस रेसिन्डेसी लढवणाऱ्या शूर ब्रिटिश शिपायांबद्दल काढलेले गौरवोद्गार कोरले आहेत. त्या उद्गारांत अर्थात् बंडवाले कुणी तरी क्रूर राक्षस होते हें ध्वनित झालेंच आहे. खरें म्हटलें तर स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आमच्या राष्ट्रीय सरकारनें हीं असलीं, आम्हाला खालीं मान घालवयाला लावणारीं स्मारकें ताबडतोब काढून टाका-



१८५७ ची ब्रिटिश रेसिडेन्सी, लखनौ

वयाला हवींत. फार तर त्यांना इथून हालवून एखाद्या वस्तुसंग्रहालयांत ठेवावीं. इतकेंहि होत नसेल, आणि ऐतिहासिक वस्तू आहेत तिथेंच ठेवणें योग्य वाटत असेल, तर निदान या असल्या पाटीच्या शेजारीं दुसरी एक नवी पाटी लावून आमच्या स्वातंत्र्यवीरांचा योग्य गौरव करावयाला नको काय ?

## इमामवाडा आणि इमामवाडा

लखनौमधली इमामवाडा ही एक पहाण्यासारखी जुन्या काळची इमारत आहे. तिकडे आम्हाला आमच्या टांगेवाल्यानें नेलें. इमामवाड्याच्या भव्य प्रवेशद्वारावरली छोट्या छोट्या टोकदार घुमटांची कमान प्रेक्षणीय आहे. इमारतीच्या महिरपीवर मत्स्यचिन्हांची नक्षी आहे. आंतल्या दालनांत हसन-हुसेनचे दहाबारा फूट उंचीच्या नाताळच्या केकसारखे दिसणारे लखलखीत ताजिये आहेत. खरें सांगायचें म्हणजे बोडके घुमट आणि भकास मिनार यांखेरीज दुसरें विशेष कांहीं नसलेले हे मुसलमानी शिल्पकलेचे नमुने पहावयाचा आम्हाला आतां कंटाळा आला आहे. टांगेवाल्याला टांगा स्टेशनकडे घेऊन चल, म्हणून आम्ही सांगितलें. पण आमचा ‘ देशभक्त ’ टांगेवाला आम्हाला फसवायला तयार नव्हता. तो म्हणाला, ‘ यापेक्षां प्रेक्षणीय असा

थोड्या अंतरावर गोमती नदीच्या कांठीं दुसरा एक इमामवाडा आहे. तो तुम्हाला न दाखवतां परत जाणें मला बरें वाटत नाहीं!'

'बरं आहे. चल तर तिकडे' आम्ही म्हणालों. हा इमामवाडा अधिक प्रेक्षणीय म्हणजे इतकेंच कीं वर्ख लावल्यासारखे त्यांचे घुमट लखलखत होते, आणि त्याच्या दोन बाजूंना असलेल्या दोन छोट्या मशिदी साध्या वीटचुन्याच्या असून मोठ्या सुबक दिसत होत्या.

दुपारीं एक दीडला स्टेशनांत परत आलों. रेस्टोरांमध्यें जेवण घेतलें आणि अलाहाबादला जाणारी सव्वादोनची गाडी पकडली. रात्रौ ८ वाजतां गाडी अलाहाबादला पोहोंचली. आग्र्याला भेटलेल्या एका मित्रानें अलाहाबादचें 'न्यू ग्रँड हॉटेल' चांगलें आहे म्हणून शिफारस केली होती. त्या हॉटेलचा प्रतिनिधी स्टेशनांत आलेला होताच. त्याच्याबरोबर हॉटेलांत गेलों.

ता. १२ एप्रिल, १९४९

## त्रिवेणी संगम व 'आनंदभुवन'


सकाळीं ९ वाजतां एक सायकल-रिक्शा घेऊन त्रिवेणीसंगम पहाण्याला निघालों. संगम मैल दीड मैलावर होता तरी नाववाले 'संगम पहायला माझी नाव घ्या' म्हणून रिक्शाबरोबर धावत होते. शेवटीं घाटाकडे रिक्शावाल्यानें रिक्शा उभी केली. एका बाजूला गंगेवरचा भव्य पूल आणि दूर दुसऱ्या बाजूला यमुनेवरचा पूल दिसत होता. गंगा, यमुना आणि गुप्त सरस्वती यांच्या संगमांत वेणीदान किंवा इतर कर्मक्रिया करणाऱ्यांना होडींत बसून संगमापर्यंत जावें लागतें. आम्हाला तसें कांहींच करावयाचें नव्हतें. घाटावर उभें राहून संगम चांगला दिसत होता. संगमाच्या ठिकाणीं विशेष कांहीं सृष्टिचमत्कार किंवा निसर्गसौंदर्य दिसत नाहीं. नदीसारखी नदी आणि पाण्यासारखें पाणी आहे. तेव्हां वाटेल तेवढे पैसे देऊन नावेंतून आम्हांला जावयलाच पाहिजे होतें असें कांहीं नव्हतें. गंमत म्हणून नावेंतून जावयाचा विचार होता इतकेंच. पण पांच दहा मिनिटांच्या अंतरावर



त्रिवेणी संगम, अलाहाबाद

जाऊन यावयाला नाववाला बारा रुपये सांगावयाला लागला तेव्हां निश्चयपूर्वक आम्ही मागें फिरलों; आणि त्रिवेणी बांधाकडे खालीं उतरून यात्रेकरूंची आणि पंड्यांची गंमत पहाण्याकरतां नदीच्या कांठापर्यंत पायींच

जाण्याचें ठरविलें. नाववाले मागून धांवत होते आणि बारापासून तीन रुपयांपर्यंत दर उतरवीत होते; पण त्यांच्याकडे लक्ष न देतां आम्ही सरळ चालू लागलों. मैल सव्वा मैल रेती तुडवून आम्ही कांठापर्यंत जाऊन पोहोंचलों. लहान लहान झोपड्यांत आणि छत्रीवजा छपराखालीं गरगरीत अंगातोंडाचे पंडे पूजा यात्रेकरूंना सांगत होते. कांहीं ठिकाणीं यात्रेकरू श्मश्रू करून घेत होते. कांहीं ठिकाणीं आंघोळीसाठीं नदींत जात होते. पण काय असेल तें असो, त्रिवेणी संगमाच्या ठिकाणीं यात्रेकरूंची नेहमीं खूप गर्दी असेल अशी आमची कल्पना होती ती मात्र खरी ठरली नाहीं. कोणत्याहि नदीवर सामान्यपणें माणसांची जितकी गर्दी असते त्याहूनहि कमीच गर्दी आम्हाला इथें दिसली. कदाचित् गंगेवर नेहमीं स्नानाला येणारे लोक दुसऱ्या कुठल्यातरी घाटावर जात असतील; फक्त दुरून येणारे यात्रेकरूच इथें येत असतील.



नेहरूंचें 'आनंदभुवन'

त्रिवेणी संगमाचे कांहीं फोटो घेऊन रिक्शावाल्याला पंडित नेहरूंच्या 'आनंदभुवना'कडे रिक्शा घ्यावयाला सांगितलें. पंडित मोतीलाल जिथें रहात होते आणि जवाहरलाल जिथें लहानाचे मोठे झाले तें 'आनंदभुवन'—आतां

' स्वराज्यभुवन '-लहानशीच पण जाळीदार गच्च्या, घुमट वगैरे असलेली ऐटबाज इमारत आहे. इमारत बंदच आहे. बाग व्यवस्थित ठेवलेली आहे. पण माणसें कुणीच रहात नसल्यामुळें सर्व वातावरण निष्प्राण, उदासीन दिसतें. बागेंत बसून दलालांनीं ' आनंदभुवना 'चें एक स्केच केलें.

ओ. टी. आर्. रेल्वेच्या दुपारच्या १।२० च्या गाडीनें बनारसला निघालों.

## माणसें अन्याय फारच सहन करतात !

लांबलांब दंडे हातांत घेतलेले छोटे मोठे, तरुण, म्हातारे भय्ये आणि त्यांचीं बायकापोरें यांच्या झुंडीच्या झुडी प्रत्येक स्टेशनांत गाडींत शिरत होत्या; शिरत होत्या म्हणण्यापेक्षां शिरू पहात होत्या म्हणणेंच अधिक बरोबर होईल. बेसुमार भरलेल्या गाड्या मी पुष्कळ वेळां पुष्कळ ठिकाणीं पाहिल्या आहेत; पण या गाडीच्या तिसऱ्या वर्गाच्या डब्यांत उडालेली झुंबड कांहीं विलक्षणच होती. फाळणीनंतर पश्चिम पंजाबमधून पूर्व पंजाबमध्यें येणाऱ्या निर्वासितांच्या गाड्यांचीं वर्णनें वाचलीं होतीं आणि चित्रें पाहिलीं होतीं त्यांची आठवण ही झुंबड पाहून झाली. फूटबोर्डावर, खिडक्यांत, फार काय गाडीच्या छपरावर चढूनदेखील हे पुरभय्ये खेडवळ बसले होते. अहिमनपूर नांवाच्या कुठल्या तरी गांवीं एक मोटा मेळा या दिवसांत असतो, त्याच्यासाठीं या शेतकरी स्त्रीपुरुषांच्या झुंडी चालल्या होत्या. आमच्या दुसऱ्या वर्गाच्या डब्यांत एकएका उतारूला झोपतां येईल इतकी जागा होती, आणि तिसऱ्या वर्गाच्या सर्व डब्यांत हा असा कहर चालला होता. गरीब, भोळसट, खेड-वळ स्त्री-पुरुषांच्या त्या झुंडी आमच्या डब्यांत डोकावून पुढें जायच्या, तेव्हां कसल्या तरी चमत्कारिक भीतीची लहर माझ्या अंतःकरणाला चाटून जायची. दुसऱ्या वर्गांत ही इतकी जागा आणि तिसऱ्या वर्गांत या अशा हालअपेष्टा पाहून, ' ही समाजव्यवस्था आहे तरी काय ?' अशी चीड उत्पन्न करणारा विचार अचानक या झुंडींत उत्पन्न झाला किंवा अशी एखादी स्फोटक ठिणगी, स्वतःचा कांहीं एक अपराध नसतां दुःख भोगावें लागणाऱ्या या गरिबांच्या झुंडींत कुणी टाकली, तर चवताळलेल्या वाघसिंहासारखे ते आमच्यावर तुटून पडतील ! आणि त्यांनीं कां पडूं नये ? आपली चीड बरोबर

आहे कीं चूक आहे, आपण करतों आहोंत तें न्याय्य आहे कीं अन्याय्य आहे, याचा विचार त्यांनीं कां करावा ? बरें, आमच्यासारख्या एखाद्या दुसऱ्यानें भलेपणानें त्यांच्यापैकीं एकदोघांना आमच्या मोकळ्या डब्यांत घेऊनहि हा प्रश्न सुटणार नाहीं. कित्येकांना आम्ही घेतलेंच होतें आंत; पण उरलेल्या अफाट झुंडीला या इवल्याशा भलेपणाचें काय? या असल्या असह्य परिस्थितींत आमच्यासारख्या एकदोन समजूतदार भल्यांना आपणाला हजारों वर्षें छळणाऱ्या आणि पिळणाऱ्या ऐतखाऊंबरोबरच या झुंडीनें फाडून खाल्लें तर त्यांत आश्चर्य वाटण्यासारखें काय आहे? बंगालच्या त्या विख्यात दुष्काळांत म्हणे पस्तीस लाख कीं चाळीस लाख भुकेकंगाल लोक कलकत्त्याच्या आसपास मरून पडले. त्यांच्या प्रेतांचा कलकत्त्याच्या गल्ल्यागल्ल्यांत म्हणे खच पडला होता आणि गिधाडें त्यांवर ताव मारीत होती. या मरणारांनीं हातपाय झाडीत मरण्यापेक्षां साऱ्या कलकत्त्यालाच नव्हे तर साऱ्या बंगालला, साऱ्या हिंदुस्थानला आग लावून दिली असती, तरी मला त्याचें आश्चर्य वाटलें नसतें आणि वाईटहि वाटलें नसतें ! माणसें अन्याय फारच सहन करतात. त्यामुळेंच जगांत अन्याय वाढत चालला आहे.

माझ्या डोक्यांत हें काहूर माजलें होतें. त्या भोळ्या खेडवळांच्या मनांत तसें कांहीं आलें नाहीं. घाईंत चुकून एखाद्यानें आमच्या डब्यांत पाऊल टाकलें, तर आजूबाजूला बघून 'अरे, ये तो फष्ट कलास है !' म्हणून बिचारा तितक्याच घाईनें परत उतरून जायचा !

रात्रीं साडेसातला बनारस कॅन्टोनमेंट स्टेशन आलें.

ता. १३ एप्रिल, १९४९

## मधमाश्यांच्या पोळ्यांसारखीं गजबजलेलीं वसतिगृहें

बनारस हिंदु युनिव्हर्सिटीच्या होस्टेलमध्यें उतरावयाचें आम्ही ठरविलें होतें. आमचे मुंबईचे मित्र श्री. द. वा. केळकर यांचा मुलगा हिंदु युनिव्हर्सिटींत आहे. त्याला अगोदर लिहिलेंच होतें. कांहीं परीक्षा झालेल्या असल्यामुळें होस्टेलमधल्या कांहीं खोल्याहि रिकाम्या असण्याचा संभव होता. बनारस

हिंदु युनिव्हर्सिटीचें एक एक होस्टेल म्हणजे मुंबईतल्या कांहीं अवाढव्य चाळींसारखी एक एक स्वतंत्र वसाहतच आहे. मध्यें भला मोटा चौक, आणि पन्नास साठ खोल्या खालीं आणि पन्नास साठ वरच्या माळ्यावर अशा खोल्यांच्या समोवार चार रांगा असें एक एक होस्टेल आहे. एक एका खोलींत दोन दोन विद्यार्थी म्हणजे सबंध होस्टेलमध्यें चारपांचशें तरी विद्यार्थी असतील. कुणी वाचताहेत, कुणी बोलताहेत, कुणी ओरडताहेत,–एकंदर बकाल वातावरण वाटतें. सध्यां परीक्षा चालू असल्यामुळें रात्रीं एक दोन वाजेपर्यंत वाचीत असलेलेच विद्यार्थी फार. गप्पागोष्टी, ओरडाआरड करणारे थोडेच आहेत. अभ्यासाच्या दृष्टीनें पहातां, मला वाटतें, विद्यार्थ्यांचीं वसतिगृहें अशीं मधमाशांच्या पोळ्यासारखीं गजबजाट असलेलीं असूं नयेत. लहान लहान आणि दूर अंतरावर असावींत. हिंदु युनिव्हर्सिटीला जागेचा मुळींच तोटा नाहीं. कित्येक मैलांचें आवार असलेली युनिव्हर्सिटीची जागा आहे. या आवारांत शेतकी कॉलेज आहे, मेडिकल कॉलेज आहे, इंजिनियरिंग कॉलेज आहे, वाङ्मय, शास्त्रें शिकविणारीं कॉलेजें आहेत, विद्यार्थ्यांचीं एकाहून एक प्रचंड वसतिगृहें आहेत, प्राध्यापकांचे बंगले आहेत. राजे-महाराजांकडून मोठमोठ्या देणग्या घेऊन पंडित मालवीयजींनीं या इमारती उभ्या केल्या आहेत. या संस्थानिकांचीं नांवें त्या इमारतींना दिलीं आहेत. काल रात्रीं आम्ही आलों ते सरळ केळकर रहात होते 'त्या मोरवी होस्टेल'मध्यें गेलों.

## 'भारतमातामंदिरां'तील निधर्मी देवता

सकाळीं ८ वाजतां सायकलरिक्शामधून बनारसचे घाट पहावयाला बाहेर पडलों. युनिव्हर्सिटीपासून गांव पांचसहा मैल तरी दूर आहे. पूर्वी युनिव्हर्सिटीच्या आसपास दुसरी कांहींच वस्ती नव्हती. आतां बरींच घरें आणि दुकानें युनिव्हर्सिटीच्या आवारांतून बाहेर पडल्यावर दिसतात. या भागाला 'लंका बाजार' म्हणतात.

'दशाश्वमेध घाटा'कडे जाणाऱ्या रस्त्याच्या नाक्यावर आमची रिक्शा आली तेव्हां कळलें कीं, आज हा रस्ता रिक्शा, टांगे वगैरे वाहनांना बंद आहे. आज वैशाखी पौर्णिमेचा मेळा आहे; त्यामुळें घाटाकडे लोकांच्या झुंडी जात आहेत.

तेव्हां इथलें ' भारतमातामंदिर ' पहाण्यासारखें आहे असें कुणी तरी म्हणालें होतें तिथें गेलों. मंदिराची दगडी इमारत छोटीशीच पण सुबक आहे. पायऱ्या चढून वर गेलों. देवदेवतांच्या देवळांत शिरण्यापूर्वी लोक जोडेबूट बाहेर काढून ठेवतातच; पण इथें हा नियम लोक पाळतीलच ही खात्री नसल्यामुळें कीं काय व्यवस्थापकांनीं जोडेबूट काढून ठेवावे अशी पाटी लावली आहे. ' भारतमातामंदिर ' म्हणजे भारतमातेची मूर्ति आंत असेल अशी कुणाची कल्पना असल्यास ती चूक आहे. कुस्तीचा हौदा असतो त्याप्रमाणें वीस बावीस फूट लांबरुंद आणि दोनतीन फूट खोल अशी मोठी थोरली चौकोनी जागा दालनाच्या मध्यभागीं बांधून काढली आहे, आणि भोंवती कठडा आहे. प्लास्टरचा रिलीफ मॅप किंवा उठावाचा नकाशा असतो तसा संगमरवरी दगडाचा हिंदुस्थानचा भव्य नकाशा मध्यें खोदलेला आहे. वर हिमालयाच्या रांगा, निरनिराळ्या नद्या, खालीं सिलोन, आजूबाजूचे महासागर वगैरे व्यवस्थित दाखविले आहेत. भारताचा हा संगमरवरी नकाशा खरोखरच प्रेक्षणीय आहे. आजूबाजूच्या भिंतीवर हिंदुस्थानांत जीं निरनिराळीं राज्यें, साम्राज्यें होऊन गेलीं त्यांचे नकाशे चित्रित केले आहेत. मंदिरांत आमच्याखेरीज कुणी एक नव्हतें. सर्वत्र शुकशुकाट होता. आमच्या निधार्मिक राज्यांत खरें म्हटलें तर मंदिरें किंवा मशीदी यांपेक्षांही असल्या मंदिरांत गर्दी लोटायला हवी, निदान ती लोटेल अशी सरकारनें व्यवस्था करायला हवी ! पण लोकांना आपल्या देशाबद्दल कितीही प्रेम वाटत असलें तरी ते नकाशाच्या देवळांत जातील काय ?

इथून ' राजघाटा 'कडे रिक्शा घेतली. इथून गंगेच्या पलीकडल्या तीरावर जाण्याकरतां तरंगतीं पिंपें एकत्र बांधून आणि वर फळ्या, माती वगैरे टाकून टांगे, रिक्शा, बैलगाड्या वगैरेकरतां एक पूल केला आहे. या बाजूला एकापुढें एक दोन किंवा तीन बैल जोडलेल्या कांहीं बैलगाड्या पाहिल्या. अशा तऱ्हेनें बैल जोडण्याची पद्धति आपल्या बाजूला कधीं पाहिलेली आठवत नाहीं. या पुलावरून पलीकडच्या बाजूला गेलों आणि खूप दूरपर्यंत रिक्शामधून फिरून परत आलों.

संध्याकाळीं केळकरांच्याबरोबर युनिव्हर्सिटीच्या निरनिराळ्या इमारती

पाहिल्या. संस्कृत भाषेच्या खास अभ्यासासाठीं बांधलेल्या ‘ क्रिन्स ओरिएन्टल कॉलेज ’ची तांबडया दगडाची देवळासारखे घुमट असलेली नवी इमारत पहाण्यासारखी आहे.

ता. १४ एप्रिल, १९४९

## बौद्धांच्या पवित्र स्थळांतील शांतता व स्वच्छता

इथून दहाबारा मैलांवर असलेलें बुद्धधर्मीयांचें प्रख्यात पवित्र स्थान सारनाथ पहावयाला सकाळीं साडेनऊला सायकल रिक्शामधून निघालों. शेवटपर्यंत छानदार डामरी रस्ता आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना हिरवीगार आंब्याचीं झाडें आणि मधून मधून लहान लहान टुमदार घरें दिसतात. बनारसच्या धुळकट, रखरखीत वातावरणांतून बाहेर पडल्यावर या शांत रस्त्यावरलीं हीं हिरवीगार झाडें, शेतें आणि तळीं अधिकच आनंददायक वाटतात. सारनाथला पोहोंचेपर्यंत अकरा वाजले.

दोन तीन प्राचीन स्तूप आणि बुद्धकालीन मठांचे कांहीं जुनाट अवशेष हेंच सारनाथमध्यें पहाण्यासारखें आहे. तिथें सांपडलेल्या प्राचीन मूर्ति आणि शिल्पकृती एका पुराण-वस्तु-संग्रहालयांत व्यवस्थितपणें मांडून ठेवल्या आहेत. भोंवतीं व्यवस्थित बाग असलेली संग्रहालयाची छोटीशीच दगडी इमारत अतिशय सुबक आहे. पण सारनाथ पहायचें म्हणजे काय पहायचें हें बिचाऱ्या रिक्शावाल्याला काय माहीत ? त्यानें आम्हाला एका ओसाड टेकाडावरल्या एका लहानशा पडक्या देवळासमोर नेऊन सोडलें ! ‘ हें सारनाथाचें देऊळ ! ’–तो म्हणाला. त्याची कांहींच चूक नव्हती. तें खरोखरच सारनाथाचें हिंदु देऊळ होतें. अर्थात् सारनाथला येणारे लोक हें देऊळ पहायला येत नाहींत; त्यांत कांहींच पहाण्यासारखें नाहीं. कोणत्याहि खेड्यांतल्या लहानशा पडक्या देवळासारखें तें देऊळ आहे.

चौखंडी आणि धमेख हे दोन स्तूप लांबून जुनाड दगडांच्या प्रचंड राशीसारखे दिसतात. जवळ गेल्यावर ते व्यवस्थित बांधून काढले आहेत हें लक्षांत येतें. या स्तूपांवर कोरलेल्या अजस्त्र कमलपत्रांच्या आणि



प्राचीन बौद्ध स्तूप, सारनाथ

कमलपुष्पांच्या महिरपी पहाण्यासारख्या आहेत. या स्तूपांच्या आजूबाजूला बुद्धकालीन मठांचे पडके अवशेष इतस्ततः पसरलेले दिसतात. जगांतल्या बुद्धधर्मीयांची मध्यवर्ति संस्था ‘महाबोधि सोसायटी’ या पवित्र स्थानांवर देखरेख ठेवते. हिंदूंच्या तीर्थक्षेत्रीं दिसणारी घाण, गडबड, आणि भिकाऱ्यांची गर्दी, आणि बौद्धांच्या या पवित्र स्थळांच्या ठिकाणीं दिसणारी स्वच्छता आणि शांतता यांच्यांतला फरक तावडतोब जाणवतो.

## नवा चिनी विहार व भव्य मूलगंधकुटी विहार

चिनी देवळाच्याप्रमाणें वर वळवलेल्या कांठांचें पिवळ्या रंगाच्या पत्र्याचें छप्पर असलेली एक नवी कोरी इमारत एके ठिकाणीं दिसली. हा विहार १९४२ सालीं चीनमधील फुकिएन शहरांतल्या एका चिनी गृहस्थानें बांधला. रंगीबेरंगी सिमेंट कॉंक्रीटची फरशी असलेल्या प्रशस्त चौकोनी हॉलच्या मध्यभागीं उंच दगडी चौथऱ्यावर स्वच्छ पांढऱ्या दगडाची चिनी चेहऱ्याच्या बुद्धाची मूर्ति होती. मूर्तीसमोर समईसारखा एक मोटा दिवा तेवत होता. या हॉलच्या मागें कांहीं खोल्या आहेत; तिथें कांहीं चिनी भिक्षू आणि कांहीं चिनी स्त्रीपुरुष रहात असलेले दिसले. या विहाराभोवतीं आवाराची भिंत बांधण्याचें काम चालू होतें. काम करणाऱ्या मजुरांवर देखरेख करणारे सर्व मुकादम चिनी होते !

'महाबोधि सोसायटी'चे एक आधारस्तंभ अंगारक धर्मपाल यांनीं बांधलेला भव्य 'मूलगंधकुटी विहार' पहावयाला नंतर गेलों. आंत मध्यभागीं बुद्धाची भव्य मूर्ति आहे, आणि बाजूच्या भिंतींवर बुद्धाच्या जीवनांतले निरनिराळे प्रसंग दाखविणारीं भव्य चित्रें रंगविलीं आहेत. विहाराच्या दाराशीं बुद्ध-धर्मावरील पुस्तकें विकायला ठेवलेलीं दिसलीं. हा विहार बांधण्याकरतां सिलोन, चीन, ब्रह्मदेश मधल्या बुद्धधर्मीयांनीं देणग्या दिल्याचें तिथल्या एका पाटीवरून दिसतें. होनोलुलूमधल्या एका अमेरिकन बाईनें या विहारा-करतां तीस हजार रुपये दिले आहेत !

एक नवी कोरी धर्मशाळेची इमारत दिसली. इमारती वरल्या पाटीवरून कळलें कीं राजा बलदेवदास बिर्ला यांनीं ही धर्मशाळा 'आर्यधर्मा'च्या अनुयायांकरतां बांधली आहे ! या इमारतीच्या आवाराची भिंत सांची येथील स्तूपाच्या भोंवतीं असलेल्या दगडी कटड्यासारखी आहे.

एका टुमदार पिवळ्या इमारतींत 'महाबोधि सोसायटी'ची कचेरी आणि 'मूलगंधकुटी विहारा'चें छोटें पुस्तकालय दिसलें. सोसायटी एक प्रायमरी शाळा इथें चालवते. हायस्कूलच्या इमारतीचें बांधकाम चालू आहे. प्राचीन काळीं बुद्धभिक्षू जिथें मनन चिंतन करीत बसत असत, त्या मठांच्या पायाचे दगड आजूबाजूला असलेल्या या जागेंत अभ्यास करतांना विद्यार्थ्यांना विशेष आनंद वाटल्याशिवाय राहाणार नाहीं.

**अशोकस्तंभाचें ' चोरून ' दर्शन**

इथें सांपडलेल्या शिल्पाकृती जिथें मांडून ठेवल्या आहेत तें आर्किऑलॉजिकल म्यूझियम् शेवटीं पहावयाचें आम्ही ठरविलें होतें. त्या सुबक दगडी इमारतीकडे येऊन पोहोंचलों.—आजूबाजूला भग्न प्राचीन अवशेष पसरले असल्यामुळें ती इमारत आणि भोंवतालची रेखीव बाग विशेषच सुबक दिसते. साडे बारा वाजले होते. बागेंत शिरलों तेव्हां कळलें कीं म्यूझियम सकाळीं ११ वाजतांच बंद होतें. दुपारीं ३ ला पुन्हां उघडेल! तीन वाजेपर्यंत कसें थांबायचें? सातव्या, आठव्या शतकांतल्या शिल्पाचे सुंदर नमुने बाहेरच्या खुल्या जागेंतच मांडून ठेवलेले होते. ते पाहून घेतले. प्रजासत्ताक भारताचें राजचिन्ह ज्यावरून घेतलें आहे तो सिंहशीर्षक आणि धर्मचक्र असलेला मूळ अशोकस्तंभ मधल्या बंद दालनांत होता. सारनाथला येऊन हा स्तंभ पाहिल्याशिवाय जायचें म्हणजे काय? इकडे तिकडे पहात असतां एक युक्ति मला सुचली. त्या दालनाच्या मुख्य दरवाजावर कांचेची भली मोठी खिडकी होती. आजूबाजूला कुणी चिटपांखरू नव्हतें. तिकडचें एक अवजड शिल्प हळूच पुढें सरकवलें आणि त्याच्यावर चढून वरच्या खिडकींतून आंत डोकावलें. दालनाच्या मधोमध डोक्यावर चार सिंह घेतलेला तो प्रचंड अशोकस्तंभ होता. तुकतुकीत लालसर गुलाबी रंगाचा तो दिसतो. दगडी स्तंभांना ' पॉलिश् ' करण्याची ही पद्धत गुप्तकालीन आहे म्हणतात. तज्ज्ञांत ' गुप्त, पॉलिश ' या नांवानें हें पॉलिश् ओळखलें जातें. कित्येक शतकें झालीं तरी हें पॉलिश् अजूनहि तुकतुकीत आहे. याच दालनांत बुद्धाच्या दोन प्रचंड मूर्ति आणि एक भलें मोठें दगडी धर्मचक्र ठेवलेलें दिसलें. आणखी विशेष कांहींच नव्हतें. जें पहायचें तें अशा तऱ्हेनें ' चोरून ' पाहून आम्ही बनारसला यायला निघालों.

रात्रीं हिंदु युनिव्हर्सिटीचे प्रो. नारळीकर यांच्याकडे जेवायला गेलों. मोरवी होस्टेलवर देखरेख करणारे प्रो. अरणीकर यांनाहि आमच्याबरोबर जेवायला बोलावलें होतें. नारळीकरांच्या मुलांना चित्रें काढण्याची विशेष आवड आहे. दलालांना भेटायला तीं फार उत्सुक होतीं. महाराष्ट्रांतलीं बरीच विद्वान् माणसें बनारस हिंदु युनिव्हर्सिटींत आहेत. ' रामन् इफेक्ट ' प्रमाणेंच ' जोशी

इफेक्ट ' नांवाची शास्त्रविज्ञानांत नवी भर घालणारे प्रो. जोशीहि याच युनिव्हर्सिटींत आहेत. ' जोशी इफेक्ट 'चे प्रयोग पहाण्याची माझी फार इच्छा आहे.

ता. १५ एप्रिल, १९४९

## अरुंद बोळाच्या कोंदट कोपऱ्यांतला काशीविश्वेश्वर

आज सकाळीं प्रो. अरणीकरांच्या घरीं चहाचें आमंत्रण होतें. चहा घेऊन काशीविश्वेश्वराचें मंदिर पहाण्याकरतां केळकरांना बरोबर घेऊन सायकल-रिक्शांतून बाहेर पडलों.

दोन्ही बाजूंना कापड, तंबाखू, खेळणीं, चांदीपितळेचीं भांडीं वगैरेंचीं दुकानें असलेली विश्वनाथाच्या मंदिराकडे जाणारी गल्ली इतकी अरुंद आहे कीं या गल्लींत एखादी गाय किंवा बैल शिरला तर माणसांना वाट काढणें कठीणच व्हावें. या गल्लींतलीं आडवीतिडवीं वळणें घेऊन मंदिरापर्यंत जाऊन पोहोंचलों. यच्चयावत् हिंदु माणसाला परम पवित्र वाटणारें हें काशीविश्वेश्वराचें देऊळ एका अरुंद बोळाच्या चिखलघाणीनें भरलेल्या कोंदट कोपऱ्यांत असावें ही खरोखरच आश्चर्याची गोष्ट वाटते. मंदिराच्या प्रवेशद्वाराशीं फुलांचे हार विकणारांचीं दुकानें आहेत. एक एक हार घेऊन आंत जाऊं लागलों तेव्हां अनेक पंडेमध्ये ' अमकें करा, तमकें करा ' म्हणत मागून येऊं लागले. कांहीं करावयाचें नाहीं म्हटलें तरी सदरा घातलेला एक तरतरीत पंड्या ' हें अमुक, हें तमुक ' म्हणून शेवटपर्यंत दाखवीतच होता. पांचसहा चौरस फूट लांबीरुंदीच्या कोंदट गाभाऱ्यांत विश्वेश्वराची पिंडी आहे. तिचें दर्शन घ्यावयाला भाविक स्त्रीपुरुषांची गर्दी एका बाजूनें आंत शिरून दुसऱ्या बाजूनें बाहेर पडत होती. जाणाऱ्या येणाऱ्या भक्तांच्या पायांच्या चिखलासह पिंडीवर पडणारें पाणी मागल्या बाजूच्या डबक्यांत साचत होतें. तीर्थ म्हणून तें पुजारी देत होता; आणि भाविक स्त्रीपुरुष भक्तिपूर्ण अंतःकरणानें त्याचे घुटके घेत होते.


## किळसवाणें, अत्यंत किळसवाणें !

गाभाऱ्यांतून बाहेर आल्यावर आजूबाजूला रांगेनें एकएका कोनाड्यांत असलेल्या अन्नपूर्णा, कालिमाता, राधाकृष्ण, शंकरपार्वती वगैरेंच्या मूर्ति पाहिल्या. प्रत्येक ठिकाणचा पुजारी कांहीं तरी दक्षिणा द्या म्हणून सांगतच होता. एकाला एक आणा दिला तेव्हां तो कळवळून म्हणाला, 'एकच आणा देतां, साहेब ? इथं जितकं द्याल तेवढंच पुण्य वर जातांना बरोबर नेणार आहांत हें लक्षांत ठेवा !' म्हणजे या सोद्याला रुपया दिला तर स्वर्गारोहण करतांना आमच्या पाठीवरलें पुण्याचें गांठोडें सोळापट मोठें होणार !

विश्वनाथ मंदिराच्या जवळ जातांना गल्लीच्या दोन्ही बाजू अडवून कल्कलाट करीत बसलेला शेंकडों रोगी, भिकारी आणि सोवळ्या म्हाताऱ्यांचा 'गार्ड ऑफ् ऑनर' किळसवाणा आहे. पण त्याहिपेक्षां किळसवाणें दृश्य म्हणजे साऱ्या हिंदु जातीचें आद्य क्षेत्रस्थान असलेल्या या मंदिराच्या बाहेरच्या पांढऱ्या भिंतीवर काळ्या डामरानें भसाड्या अक्षरांत चितारलेल्या मूळव्याध, भगंदर आणि याहिपेक्षां घाणेरड्या रोगांवरल्या औषधांच्या अचकट विचकट जाहिराती ! लक्षावधि धर्मपरायण लोक इथें येऊन जातात त्यांच्यापैकीं कुणीच कांहीं तक्रार कशी करीत नाहीं ? साऱ्या जगाची नीति सुधारावयाला बाहेर पडलेले पंडित नेहरू, पंडित पंत या संयुक्त प्रांतांतलेच ना ? मग युक्त-प्रांत सरकार याची दखल कशी घेत नाहीं ? हें तर काशीविश्वेश्वराचें विश्वविख्यात मंदिर; पण या असल्या जाहिराती आग्रा, लखनौ, अलाहाबाद या युक्त प्रांतांतल्या प्रमुख शहरांतल्या प्रमुख रस्त्यांवरल्या अनेक भिंतींवर आणि पुलांवर, छापील पत्रकांत नव्हे तर पांढऱ्या चुन्यावर ढळढळीत काळ्या अक्षरांत भरकटलेल्या आम्ही पाहिल्या होत्या. इकडच्या जाहिरातदारांची ही मोठी विशेष आवडती जाहिरातीची पद्धति दिसते. नीति, अनीति किंवा श्लील, अश्लील राहूं द्या, पण सारें शहर विद्रूप करून टाकणारी ही जाहिरातीची पद्धति सरकारनें कायद्यानें बंद करायला नको काय ?

## सोन्याच्या कळसाचें नेपाळी मंदिर

विश्वेश्वरमंदिर पाहून झाल्यावर गंगेच्या कांठचे निरनिराळे घाट पहावयाला



नेपाळी मंदिर, बनारस

गेलों. एक नाव ठरविली आणि एक एक घाट पहात पाण्यांतून पुढें जाऊं लागलों. दशाश्वमेध घाट, अहिल्याबाई घाट, दरभंगा घाट, उदेपूर घाट, मानमंदिर, बंगाली घाट, असे घाट पहात 'ललिता घाटा'कडे उतरलों. वर एक चिनी किंवा ब्रह्मी पद्धतीचा वरचा भाग असलेलें मंदिर दिसत होतें. नाववाला म्हणाला, हें नेपाळी मंदिर. वर दिसतो त्या घंटेच्या आकाराच्या सोन्याच्या कळसासाठीं नेपाळ सरकारनें ऐशीं हजार रुपये खर्च

केलेत! वर चढून तें मंदिर पहावयाला गेलों. शिसवी लाकडासारख्या काळ्या लाकडाचा बाहेरचा दर्शनी भाग होता, आणि त्यावर फार बारीक कोरीव काम केलेलें होतें. मुख्य दारावरल्या चवकटींत नटेश्वराची रेखीव मूर्ति कोरलेली होती. छपराला आधार देणाऱ्या खालच्या मुख्य स्तंभांना जोडलेल्या तिरप्या स्तंभांवर देवतांच्या आणि द्वारपालांच्या फार सुबक मूर्ति कोरल्या आहेत. या प्रत्येक स्तंभाच्या पायथ्याकडे सोळा खांबावर सोळा वेगवेगळ्या संभोगासनांच्या आकृती आहेत. ऐतिहासिक कादंबऱ्यांतल्या भुयारासारखे गुंतागुंतीचे वर खालीं जाणारे बोळ ओलांडून बाहेर रस्त्यावर आलों.

हिंदु युनिव्हर्सिटींत जर्मन शिकवणारे प्रा. करमरकर रात्रीं नऊ वाजतां आम्हाला भेटायला आमच्या खोलींत आले होते. कांहीं निवडक मराठी पुस्तकांचें हिंदी भाषांतर करण्याचा विचार कांहीं वर्षांपूर्वीं करमरकरांनीं केला होता. त्यावेळीं माझ्याशीं त्यांचा पत्रव्यवहार झालेला होता. बनारसमधल्या हिंदी साहित्यिकांशीं करमरकरांचे घनिष्ठ संबंध आहेत, आणि 'साहित्य-सहकार' नांवाच्या निरनिराळ्या भाषांच्या साहित्यिकांना एकत्र आणूं पहाणाऱ्या बनारसमधल्या एका नमुनेदार संस्थेचे ते उत्साही कार्यकर्ते आहेत.


ता. १६ एप्रिल, १९४९

सकाळीं ८ वाजतां प्रा. करमरकरांकडे चहा घेऊन बनारस विद्यापीठाचें सयाजीराव ग्रंथालय पहावयाला निघालों. रस्त्यावर समोरून एक पांढरा सूट घातलेले आणि पांढरें कापड लावलेली उनाची छत्री घेतलेले, पन्नाशीच्या आसपासचे, विचाराच्या तंद्रींत खालीं मान घालून शांतपणें येत असलेले गृहस्थ दिसले. करमरकर म्हणाले, 'हे प्रख्यात शास्त्रज्ञ प्रो. जोशी.' ते जवळ आल्यावर त्यांची आणि माझी व दलालांची करमरकरांनीं ओळख करून दिली. शास्त्रज्ञ असूनहि प्रो. जोशींना वाङ्मयाची चांगलीच माहिती दिसली. 'नाट्यमन्वन्तरा'च्या नाटकांसंबंधीं त्यांनीं चवकशी केली. माझें 'धुक्यांतून लाल ताऱ्याकडे' पुस्तक त्यांनीं वाचलें होतें. रशियांतल्या परिस्थितीसंबंधीं त्यांनीं खोदून प्रश्न विचारले. संध्याकाळीं त्यांनीं आपल्या

घरीं चहाला बोलावलें. 'जोशी इफेक्ट'चा प्रयोगहि तुम्हाला त्या वेळीं दाखवतों असें ते म्हणाले तेव्हां आम्हाला विशेष आनंद झाला.

## 'नागरी प्रचारिणी सभा'

सयाजीराव ग्रंथालयाची इमारत खूप मोठी आणि भव्य आहे. मधल्या प्रशस्त दालनाच्या भिंतींवर सभोंवार मालवीयजी, लोकमान्य टिळक, म्हैसूर, दरभंगा वगैरे संस्थानांचे मोठमोठ्या देणग्या देणारे महाराज यांचीं भव्य तैल-चित्रें लावलेलीं आहेत. ग्रंथालयाच्या वरच्या मजल्यावर एका बाजूला रजपूत पद्धतीच्या प्राचीन चित्रांचें एक व्यवस्थित प्रदर्शन मांडून ठेवलें आहे.



संस्कृत महाविद्यालय, बनारस हिंदु विद्यापीठ

ग्रंथालय पाहून झाल्यावर गांवामध्यें श्री. दामले नांवाचे बनारसी साड्यांचा व्यापार करणारे एक फार जुने महाराष्ट्रीय व्यापारी आहेत त्यांच्याकडे जायला निघालों. प्रा. करमरकर आणि केळकर बरोबर होतेच. कांहीं कामाकरतां मुख्य

पोस्ट ऑफिसांत गेलों. पोस्टाच्यासमोरच 'नागरी प्रचारिणी सभा' नांवाची एक मोठी थोरली पाटी एका इमारतीवर पाहिली. या सभेचे कार्यकर्ते करमरकरांचे मित्र असल्यामुळें त्यांना भेटायला आंत गेलों. इमारतीच्या आवारांत ठिकठिकाणीं 'हिंदी का विरोध देशद्रोही है', 'हिंद की लिपि नागरी है' वगैरे घोषणांचीं पत्रकें लावलेलीं दिसलीं. सभेच्या कार्यकर्त्यांनीं उत्तम थंडगार पाणी आणि तोंडांत विरघळणाऱ्या चवकदार बनारसी पानांचे भरपूर विडे देऊन आमचें आदरातिथ्य केलें. सभेचें लहानसेंच पण निवडक नवे-जुने ग्रंथ असलेलें वाचनालय आणि वरच्या मजल्यावरचें राजस्थानी आणि आधुनिक चित्रांचें संग्रहालय पाहिलें. या संग्रहालयांत लांबलचक गुंडाळून ठेवलेल्या कागदावरली अत्यंत सुंदर अक्षरांत लिहिलेली भागवताची एक हस्तलिखित प्रत पाहिली. गंगेच्या कांठावरील राजघाटाकडे केलेल्या उत्खननांत सापडलेले प्राचीन शिल्पकलेचे अनेक अवशेष बाहेरच्या आवारांत एका बाजूला ठेवले आहेत.

## बनारसमधल्या 'असूर्यंपश्या' गल्ल्या

मुंबईच्या दोन चाळींच्या मध्यें गटारांच्या अरुंद गल्ल्या असतात तशा वाकड्यातिकड्या काळोख्या गल्ल्या बनारसमध्यें आहेत. या गल्ल्यांशीं तुलना करतां पुण्यांतले बोळ हमरस्ते वाटतील! लोक हवीं तशीं घरें बांधीत गेले, आणि मधून मधून जिथें वाव राहिला त्याच्या या गल्ल्या झाल्या आहेत. नव्या माणसाला आपण कुठून कसे चाललों आहोंत तें कांहींच कळत नाहीं. मात्र मुख्य रस्त्यावरून या गल्ल्यांत शिरल्यावर एक मोठा आनंद वाटतो तो ऊन मुळींच लागत नाहीं त्याचा! सूर्यकिरणांना आंत शिरायला जागाच मिळत नाहीं. त्यामुळें भर दुपारीं बारा वाजतांहि या गल्ल्यांतून फिरतांना थंडगार छायेंतून आपण फिरत असतों! नागरी प्रचारिणींतून बाहेर आल्यावर कापड-वाल्या दामल्यांच्या घरीं जाण्याकरतां असल्याच एका बनारसी गल्ल्यांच्या गुंताळ्यांत आम्ही शिरलों. केळकर आणि करमरकर बरोबर नसते आणि आम्ही स्वतंत्रपणें या गल्ल्यांत शिरलों असतों तर या जन्मीं आम्ही बाहेर पडलों असतों असें वाटत नाहीं. डावीकडून उजवीकडे, उजवीकडून समोर,

समोरून डावीकडे, डावीकडून मागें, मागून पुढें असे अर्धा पाऊण तास वळसे घेत आणि कसेंहि मागेंपुढें जावें लागलें तरीं ऊन लागत नाहीं म्हणून आनंद मानीत शेवटीं दामल्यांच्या घरीं पोहोंचलों. दामले घराणें गेलीं दोनशें वर्षें बनारसमध्यें आहे. 'हा आमचा वाडा दोनशें वर्षांचा जुना आहे.'—दामले म्हणाले. दामल्यांच्या किंवा त्यांच्या घरांतल्या बायकामुलांच्या बोलण्याचालण्यांत किंवा रहाणींत कांहींहि 'अमराठी' आम्हाला दिसलें नाहीं. कोणतेंहि दामले कुटुंब पुण्यांतल्या वाड्यांत जसें दिसलें असतें तसेंच हें दिसत होतें! बनारसच्या ब्रम्हघाट, दुर्गाघाट वगैरे भागांत महाराष्ट्रीय लोकांची विशेष वस्ती असल्याचें दामले यांनीं सांगितलें. पूर्वीं जवळ जवळ चार हजार महाराष्ट्रीय बनारसमध्यें होते आणि त्यांचा दराराहि बराच होता. दामले म्हणाले, 'सध्यां फार तर दोन अडीच हजार असतील.'

या दामल्यांचे एक नातेवाईक रॉयटर वृत्तसंस्थेचे प्रतिनिधी श्री. दामले जवळच रहातात त्यांच्या भेटीला नंतर गेलों. त्यांच्याशीं गप्पा करतांना इथल्या वृत्तपत्रांच्या व्यवसायांत बरेच महाराष्ट्रीय प्रमुख असल्याचें कळलें. 'अमृतबझार पत्रिका' या कलकत्त्याच्या प्रख्यात वृत्तपत्राच्या इथल्या कचेरींत श्री. जोगळेकर नांवाचे एक महाराष्ट्रीय आहेत. हिंदी पत्र-कारांत 'आज'चे श्री. पराडकर हे तर अग्रगण्य समजले जातात. 'आज' कचेरींतल्या श्री. खाडीलकर नांवाच्या महाराष्ट्रीय पत्रपंडितांनींहि हिंदी पत्रसृष्टींत चांगलें नांव कमावलें आहे.

दुपारीं ३—३० ला घरीं परत आलों.

संध्याकाळीं ७ ला डॉ. जोशांच्या घरीं चहाला गेलों. उशीरां या असें मुद्दामच त्यांनीं सांगितलें होतें; कारण 'जोशी—इफेक्ट' काळोखांत पहायचा असतो. कलिंगडाचें फार सुंदर आइस्क्रीम सौ. जोशी यांनीं केलें होतें. त्याचा समाचार घेऊन 'मायनिंग ॲंड मेटॅलर्जिकल कॉलेज'च्या प्रयोग-शाळेंत 'जोशी—इफेक्ट'चा प्रयोग पहावयाला गेलों. डॉ. जोशी यांना त्याच वेळीं विद्यापीठाच्या व्हाइस-चॅन्सेलरांच्या घरीं एका समितीच्या बैठकीसाठीं तांतडीचें बोलावणें आल्यामुळें श्री. देशपांडे नांवाच्या त्यांच्या हाताखालीं

काम करणाऱ्या एका विद्यार्थ्याला आम्हाला प्रयोग दाखवयास त्यांनीं सांगितलें. प्रयोगशाळेंत श्री. मराठे, श्री. आगाशे आणि श्री. सन्यास राजू नांवाचे आणखी दोन तीन संशोधन करणारे विद्यार्थी भेटले. प्रयोगासाठीं विजेचा भरपूर पुरवठा मिळावा आणि कामांत कोणत्याहि प्रकारचा व्यत्यय येऊं नये म्हणून आम्ही रात्रीं ९ ते पहांटे ३ पर्यंत प्रयोगशाळेंत काम करतों, ते विद्यार्थी म्हणाले.

## ' जोशी–इफेक्ट 'नें प्रकाशावर अधिक प्रकाश पडेल !

' जोशी–इफेक्ट ' या नावानें ओळखल्या जाणाऱ्या डॉ. जोशी यांच्या शोधानें विज्ञानांत घातलेली नवी भर म्हणजे, सर्वसामान्यपणें जें वाटत होतें कीं विजेची तीव्रता प्रकाश टाकल्यास वाढेल तें खरें नाहीं; प्रकाशाचा परिणाम उलटाच, म्हणजे तीव्रता कमी करण्यांत होतो. हें सर्व अर्थात् मला जें समजलें तें मी माझ्या भाषेंत सांगतों आहें. शास्त्रज्ञांना तें वाचतांना कदाचित् हंसूं येईल. श्री. मराठे यांनीं क्लोरीन् आणि ब्रोमिनमधून विजेचा प्रवाह सोडून आणि त्यावर प्रकाशाच्या झोताची उघडझांप करून हा प्रयोग आम्हाला करून दाखविला. प्रवाहाची तीव्रता प्रकाशाचा झोत पडल्यावर कमी होते, आणि झोत बंद केला कीं वाढते ही गोष्ट गॅल्व्हानोमिटर यंत्र व्होल्टेज कमी-जास्त झालेलें दाखवित होतें. एवढाच पुरावा आमच्यासमोर नव्हता. तीव्रता कमी होते हें आम्ही डोळ्यांनीं पहात होतों आणि कानांनीं ऐकत होतों. समोर एका काचेवर विजेच्या निळ्या जांभळ्या रेषा तेजानें थरथरत होत्या. तिकडे प्रवाहावर प्रकाशाचा झोत पडला कीं इकडे या रेषा अस्पष्ट व्हायच्या; झोत बंद झाला कीं पुन्हां निळ्या जांभळ्या तेजानें चमकायच्या. दुसऱ्या खोलींत मर्क्यूरीव्हेपरवर सन्यास राजू काम करीत होता. त्यानें प्रकाशाचा झोत टाकून लाऊडस्पीकरवरून येणारा आवाज कसा कमी होतो हें आम्हांला ऐकवलें. पहिल्यांदा बराच वेळ त्याचा प्रयोग जमेना. बिचारा घामाधूम झाला होता. कुणीसा म्हणाला, प्रकाशानें जशी विजेच्या प्रवाहाची ' एफिशियन्सी ' ' रिड्यूस ' होते तशीच तुम्ही आल्यामुळें याची झाली कीं काय ? हाहि एक ' जोशी–इफेक्ट 'च नाहीं ना ! शेवटीं

लाऊडस्पीकरवरला आवाज प्रकाशझोताच्या उघडझांपेबरोबर कमीजास्त होऊन प्रयोग यशस्वी झाला, तेव्हां सन्यास राजूचा चेहरा खुलला. हे सर्व विद्यार्थी मोठे सौजन्यशील आणि सुस्वभावी होते. आगाशे म्हणाले, 'डॉ. जोशांच्या या संशोधनामुळें प्रकाशाच्या रचनेचें अधिक सम्यक्‌ज्ञान होण्याचा संभव आहे.' म्हणजे या संशोधनामुळें प्रकाशावर अधिक प्रकाश पडेल म्हणायचा! त्या विद्यार्थ्यांचे आभार मानून रात्रीं साडे आठच्या सुमारास खोलीवर परत आलों.

ता. १७ एप्रिल, १९४९


## महाराष्ट्र-मंडळाचें 'टिळक वाचनालय'

बनारसमध्यें एक महाराष्ट्र-मंडळ आहे. 'टिळक वाचनालय' नांवाचें एक वाचनालय मंडळांतले उत्साही विद्यार्थी चालवतात; आणि 'जागृति' नांवाचें एक हस्तलिखितहि काढतात. गांवांतून हिंदु विद्यापीठांत शिकावयाला येणारे आणि मंडळाशीं संबंध असलेले दोन विद्यार्थी, जोगळेकर आणि लेले, मला आणि दलालांना 'टिळक वाचनालयां'त नेण्याकरतां सकाळीं आठ वाजतांच आले. त्यांच्याबरोबर गांवांत गेलों. हें वाचनालय औंधप्रतिनिधी घाटावरल्या एका देवळांत आहे. घाटावरल्या म्हणण्यापेक्षां घाटांतल्या म्हणणें अधिक बरोबर होईल. गंगेच्या कांठापर्यंत घाटाच्या पायऱ्या जातात. अजंठा किंवा कार्ला येथें जशा खडकांत खोदलेल्या गुंफा आहेत तसेंच घाटांत मध्येंच गुंफेसारखें हें देऊळ आहे. देवळापुढल्या ल्हानशा खोलींत वाचनालय आहे. मला हें छोटें वाचनालय फार आवडलें. आजूबाजूला वरखालीं दगडी भिंत असल्यामुळें आंत थंडगार वाटतें. समोर गंगेचा प्रवाह दिसतो आणि त्यावरून येणाऱ्या वाऱ्याच्या झुळकी अंगावरून जात असतात. औंधच्या प्रतिनिधींनीं ही जागा वाचनालयाला दिली आहे. शाळेंतले आणि कॉलेजांतले बरेच महाराष्ट्रीय विद्यार्थी आम्हाला भेटायला वाचनालयांत जमले होते. 'अमृत बझार पत्रिके' चे श्री. जोगळेकर आणि 'आज' मधल्या

खाडिलकरांचे बंधू 'महाराष्ट्र–मंडळा' चे चिटणीस असलेले खाडिलकरहि तिथें होते. लोकमान्य टिळकांच्या हस्तें या वाचनालयाचें उद्घाटन झालें होतें, ही गोष्ट विद्यार्थ्यांनीं रास्त अभिमानानें आम्हांला सांगितली. विद्यार्थ्यांबरोबर कांहीं वेळ गप्पा करून आम्ही बाहेर पडलों.

## धन्य त्या हिंदूंची ! सत्यमेव जयते !

या घाटाला लागूनच प्रख्यात बिंदु माधव देवालय आहे. मूळचें हिंदु देवालय फोडून त्याच्या उरावर औरंगजेबानें उभारलेली भव्य औरंगजेब मशीद या देवालयाला खेटून अभिमानानें उभी आहे. तिला कां अभिमान वाटूं नये ? गंगेच्या कांठावरल्या सर्व भव्य घाटांपेक्षां आणि तिथल्या पवित्र देवालयांच्या सर्व कळसांपेक्षांहि औरंगजेब मशिदीचे मिनार किती तरी उंच आहेत. नावेंत बसून गंगेवरून फिरतांना हे मिनार कोणत्याहि घाटाच्या किंवा कोणत्याहि देवालयाच्या आधीं डोळ्यांत भरतात. कित्येक शतकें ते पहाणाऱ्यांच्या डोळ्यांत असे भरत आहेत. मात्र मराठ्यांचीं भिमथडीचीं



पंचगंगा घाट, बनारस

घोडीं गंगेचें पाणी चाखण्याकरतां गंगथडीला आलीं तेव्हां हे उत्तुंग मिनार त्या नतद्रष्ट मराठ्यांच्या डोळ्यांत भरण्याऐवजीं खुपले; आणि इथल्या हिंदूंना ते मराठे म्हणाले, " ही मशीद आम्ही जमीनदोस्त करतों आणि तुमचें मूळचें देवालय बांधून देतों." त्यावर ते धर्मनिष्ठ आणि सत्त्वगुणी हिंदु म्हणाले, " छे, छे, असली विध्वंसक वृत्ति आम्हाला आवडत नाहीं, आणि म्लेंच्छांनीं भ्रष्ट केलेल्या या जागेवर पवित्र हिंदु देवालय उभें करणें आम्हाला बिलकूल मंजूर नाहीं ! " इथल्या माहीतगारांकडून हा इतिहास आम्हाला कळला तेव्हां आम्ही म्हटलें, " धन्य, धन्य त्या हिंदूंची ! सत्यमेव जयते ! "

## प्रेतयात्रा आणि वरात

ही मशीद आणि बिंदु माधव देवालय पाहून झाल्यावर श्री. खाडिलकरांच्या घरीं गेलों. त्यांचा हा वाडा त्यांच्या पणजोबांनीं बनारसमध्यें बांधल्याचें कळलें. तिथें चहापाणी, गप्पा गोष्टी झाल्यानंतर परत फिरलों. वाटेंत एक मिरवणूक दिसली. मिरवणुकींतले लोक आनंदानें आरोळ्या ठोकीत होते आणि मोठमोठ्यांदा हंसत खिदळत होते. फुलांनीं आणि रेशमी कपड्यानें सजवलेलें कांहीं तरी चौघांच्या खांद्यावर होतें. मूठमूठ सुटे पैसे मिरवणुकींतले कांहीं लोक रस्त्यावर उधळीत होते आणि कळकट कलंदरांच्या झुंडी ते उचलण्याकरतां झोंबाझोंबी करीत होत्या. हें काय म्हणून विचारतां कळलें कीं, ही कुणातरी खूप म्हातारा होऊन मेलेल्याची प्रेतयात्रा आहे !

'पण हे लोक इतके बेफाम आनंदांत कां?'

'म्हाताऱ्याला देवाकडे जाण्याची संधि मिळाल्याबद्दल आनंद व्यक्त करण्याची या लोकांची रीत आहे ! म्हातारा मेला त्यांत रडण्यासारखें कांहीं नाहीं; हंसत खेळत त्याला देवाघरच्या वाटेवर सोडायचा असें या लोकांना वाटतें ! '

'असं काय ! ' आम्ही म्हणालों. कांहीं वेळानें दुसरें एक मजेदार दृश्य वाटेंत दिसलें. एक वरात भर दुपारीं बारा वाजतां वाजत गाजत चालली होती. जरीचा पोशाख घातलेला वर घोड्यावर ऐटींत स्वार झाला होता. मागून

एक मेणा चौघे जण खांद्यावरून वहात होते. या मेण्यांत वधू होती, असें कळलें. मेण्याच्या मागून एक मोठी थोरली चारपाई हमाल डोक्यावर घेऊन चालले होते. या चारपायीवर बिछाना, चादर आणि एक पत्र्याची रंगीत ट्रंक होती ! होस्टेलमध्यें परत येईपर्यंत दुपारचे साडेबारा बारा वाजले. जेवण करून ताबडतोब सामानाची बांधाबांध केली. दुपारीं २–३० च्या डून–एक्सप्रेसनें गयेला जायचें टरलें होतें.

## हें ‘ दालमियानगर ’

डून एक्सप्रेस वेळेवर बनारस स्टेशनांतून निघाली.

आतां बिहारची भूमि आजूबाजूला दिसत होती. युक्तप्रांतांतल्या भय्यांपेक्षांहि मळकट आणि कळकट असे बिहारी भय्ये निरनिराळ्या स्टेशनांत आणि आजूबाजूच्या शेतांत दिसत होते. साहसराम जंक्शन सोडल्यानंतर ‘ डेहरी ऑन् सोन ’ ( शोणवरील डेहरी ) हें मोठें जंक्शन आलें. या स्टेशनांतून आजूबाजूला पहातां दूरपर्यंत मोठें गडबडीचें, आरडाओरडीचें, खडखडाटाचें वातावरण दिसलें. कारखान्यांच्या मोठमोठ्या धुरकट इमारती जिकडे तिकडे दिसत होत्या. इकडून तिकडे ताणलेल्या डोक्यावरून जाणाऱ्या मनगटाएवढ्या जाड तारांवरून मोठमोठ्या लोखंडी टोपल्या खड्खड् आवाज करीत चाकावरून घसरत होत्या. कुठें दूर यंत्रें भगभगत होतीं. हें ‘ दालमियानगर ’ आणि हा दालमिया शेटजींचा सिमेंटचा कारखाना.

गाडी पुढें जाऊं लागली. एक लांबच लांब,—कितीतरी लांब पूल वाटेंत लागला. शोणनदीच्या अफाट पात्रावरून हा पूल जात होता. एवढ्या या अजस्र पात्रांत पाणी क्वचित्च दिसलें. वाळू, वाळू, सारखी वाळू दिसत होती.

रात्रीं ८ ला गया स्टेशन आलें. स्टेशनांतल्या रेस्टोरांमध्यें जेवण घेऊन हॉटेल शोधण्याकरतां हमालाच्या डोक्यावर सामान देऊन बाहेर पडलों. एक दोन हॉटेलें पाहिलीं. अगदींच गचाळ होतीं. ‘ न्यू मारवाडी हॉटेल ’ नांवाचें स्वच्छ हॉटेल त्या स्टेशनसमोरच्याच रस्त्यावर आहे म्हणून कुणी तरी सांगितलें. मारवाडी हॉटेलचा जयपूरचा अनुभव असल्यामुळें ताबडतोब त्या हॉटेलांत गेलों. साधें पण स्वच्छ हॉटेल होतें. खोलीचे इतके पैसे. हवें

तर जेवण घ्यावें; जेवणाचे इतके पैसे. स्वच्छता आणि चोखपणा. एक खोली ठरवून विजेचा पंखा चालू केला, आणि खाटेवर अंग टाकलें.

ता. १८ एप्रिल, १९४९

## मळकट व मागासलेले बिहारी


सकाळचें चहापाणी आटोपून बुद्ध गयेला जाण्याकरतां साडेआठच्या सुमाराला सायकल-रिक्शामधून निघालों. इथें गयेंत तसें पहाण्यासारखें विशेष कांहींच नाहीं. ज्या विष्णुपद मंदिरांत पितरांसाठीं क्रियाकर्म करण्याकरतां साऱ्या भारतांतले भाविक हिंदु येतात तें बुद्धगयेहून आल्यानंतर दुपारीं पाहून घेऊं असें ठरविलें होतें. बुद्धगया इथून आठ मैल आहे. शेवटपर्यंत चांगला डामरी रस्ता आहे; पण मध्यें कांहीं ठिकाणीं तो फारच खडबडीत झाला आहे. गयेच्या आसपास थोडासा डोंगराळ प्रदेश दिसतो. जवळ जवळ आठहि मैल हा रस्ता फल्गु नदीच्या कांठानें जातो. मात्र नदीच्या कांठाकांठानें रस्ता आहे, म्हणून सुंदर देखावा दिसत असेल किंवा थंडगार वाटत असेल, अशी कल्पना कुणी केल्यास ती साफ चुकीची ठरेल. फल्गु नदीचें पात्र खूप मोठें आहे, पण तें रखरखणाऱ्या पिवळट वाळूनें भरलेलें आहे. आम्हाला तरी चुकूनसुद्धां कुठें पाण्याचा थेंब दिसला नाहीं. तेव्हां नदीच्या कांठानें रस्ता जातो म्हणण्यापेक्षां एका अजस्र, लांबच लांब, रखरखीत वाळवंटाच्या कांठानें हा रस्ता जातो, असें म्हणणेंच अधिक योग्य होईल. मात्र रस्त्याच्या दुसऱ्या बाजूला मधून-मधून मोठमोठीं शेतें आणि पाण्याचीं मोठमोठीं तळीं दिसत होतीं. रस्त्याच्या बाजूला नारळीसारख्या दिसणाऱ्या खजुरीच्या झाडांचीं बनें मात्र एकसारखीं दिसत होतीं. दर पन्नास साठ पावलांवर या बनांत एखादें दुसरें ‘ तिरकुट ’ किंवा ताडीचें झोपडें दिसायचें. या झोपड्यांच्या दाराशीं बायकामुलांसह मडक्यांतील ताडी पीत बसलेले बिहारी शेतकरी मजूर दिसले. बुद्धगयेंतल्या बुद्धमंदिरांच्या दाराशीं पोहोंचेपर्यंत हे ताडीचे पिठे दिसत होते. मला वाटतें, मंदिराच्या आवाराच्या आसपासहि एक पिठा होता ! बिहारमधले हे गोरगरीब लोक भारीच मळकट आणि मागासलेले

दिसतात. पहाडी लोकहि अतिशय गरीब असतात, आणि अतिशय मळके कपडे घालतात, पण त्यांच्या कपड्यालत्त्यांत आणि तांब्यापितळेच्या दागिन्यांतहि कलात्मकता आणि रंगदारपणा असतो. या बिहारी लोकांच्या कपड्यांना रंग, रूप, आकार कांहीं नाहीं. बायका मळकट धोतरासारखें एक पातळ एकेरी गुंडाळून डोक्यावरून घेतात, आणि अर्ध्या हाताच्या पैरणीसारखें कांहींतरी वर घालतात. रस्त्याच्या कडेला पुष्कळ ठिकाणीं लहान लहान झोपडीवजा दुकानांत कसल्या तरी पिठाच्या राशी ओटयावर मांडून ठेवलेल्या दिसल्या. गरीब लोक हें पीठ विकत घेऊन मूठमूठ खात असलेले दिसले. हें लाह्यांचें पीठ आहे असें कळलें.

## इथें कुमार शाक्यसिंह 'बुद्ध' झाला...

बुद्धगया खेड्यांत पोहोचलों तेव्हां सकाळचे १० वाजले होते. सायकल रिक्शावाल्याला एका झाडाखालीं सोडून बुद्धमंदिराकडे आम्ही चालूं लागलों. एक सदरा, टोपी वगैरे घातलेला गलेलठ्ठ बिहारी भय्या, मला फक्त आठ आणे द्या, मी तुम्हाला सर्व कांहीं दाखवतों, म्हणत मागून येऊं लागला. त्याला बरोबर घेऊन आम्ही मंदिराकडे गेलों.

बुद्धगयेचें हें मंदिर सम्राट् अशोकानें चोवीसशें वर्षांपूर्वीं बांधलें म्हणतात. ही जागा बुद्धधर्मीयांना अत्यंत पवित्र वाटते. कारण या जागीं असलेल्या महाबोधि वृक्षाखालीं ध्यानस्थ बसलेले असतांनाच आत्मज्ञान होऊन राजकुमार सिद्धार्थ भगवान् बुद्ध झाले. तो वृक्ष या मंदिराच्या मागें अजूनहि दाखवतात. अर्थात् अडीच हजार वर्षांपूर्वीचें तेंच पिंपळाचें झाड तें असेल असें वाटत नाहीं. पण त्याच झाडाच्या मुळांतून नवीन मुळें वेळोवेळीं फुटून हा जगद्विख्यात महाबोधि वृक्ष अजूनहि इथें उभा असावा. या मंदिराची उंची एकशें ऐंशी फूट असून त्यावरील कोरीव काम पहाण्यासारखें आहे. या मंदिराच्या एका बाजूला त्या मंदिरासारखेंच दिसणारें एक छोटेंसें विटांचें पडकें मंदिर आहे. हें भव्य दगडी मंदिर बांधण्याच्या आधीं विटांचें हें 'मॉडेल' अशोकानें करून घेतलें असावें अशी कल्पना आहे. या जागेचें उत्खनन झालें त्या वेळेला सांपडलेले स्तंभांचे आणि मूर्तींचे



बुद्ध मंदिर, बुद्धगया

पुष्कळ प्राचीन अवशेष मंदिराच्या आजूबाजूला पडले आहेत. मंदिराच्या द्वारापुढील खुल्या जागेंत इतर अवशेषांच्या बरोबर कोरीवकाम केलेल्या दोन प्रचंड घंटा आहेत. एक सातशें शेर वजनाची, आणि एक पांचशें शेर वजनाची.

ब्रह्मदेशाचा शेवटचा राजा थिबॉ यानें या घंटा दिल्या आहेत. मंदिराच्या प्रवेशद्वारावरील कमानींत इंग्रजींत पुढील मजकूर आहे. "कुमार शाक्यसिंह जिथें बुद्ध झाला ती हीच जागा. हेंच तें प्राचीन महाबोधि मंदिर. बंगालचे लेफ्टनंट गव्हर्नर सर ॲशले ईडन यांच्या विनंतीवरून इ. स. १८८० सालीं हें मंदिर ब्रिटिश सरकारनें साफसूफ करून दुरुस्त केलें."

## बुद्धाच्या गळ्यांत भगवें झबलें !

आंतल्या प्रशस्त गाभाऱ्यांत सोनेरी वर्ख लावलेली बुद्धाची प्रचंड मूर्ति आहे. आश्चर्यांतलें आश्चर्य म्हणजे जगांतल्या साऱ्या बुद्धधर्मीयांना परम पवित्र वाटणाऱ्या ह्या बुद्ध मंदिरांत एक म्हातारा हिंदु पुजारी बसलेला आम्हांला दिसला. त्याहूनहि मोठें आश्चर्य म्हणजे बुद्धमूर्तीच्या पुढ्यांत एक लहानसें शिवलिंग होतें, आणि तीन काठ्या उभ्या करून त्यांना बांधलेल्या मातीच्या मडक्यांतून थेंब थेंब पाणी पिंडीवर झिरपत होतें. पिंडीवर बेलाचीं पानेंहि दिसत होतीं ! या जगद्विख्यात बुद्धमंदिराचें शिवमंदिर कुणी केलें ?

दगडी जिना चढून देवळाच्या वरच्या मजल्यावर गेलों. तिथें असलेल्या कुमार सिद्धार्थाच्या मूर्तीवर लहान मुलांना झबलें घालावें तसें एक भगवें वस्त्र गळ्याला नाडी बांधून घातलेलें पाहून पुन्हां आश्चर्य वाटलें. एका कोपऱ्यांत यशोधरेची मूर्ति आहे. गोरखपूर येथें बुद्धाचें निर्वाण झालें तिथली त्याची समाधीची अवस्था दाखविणारी, आडवा पडलेल्या बुद्धाचीहि एक छोटी मूर्ति इथें आहे. बुद्धाची आई मायादेवी हिची मूर्ति, तिच्या पायाशीं जमिनीवर डोकें टेकलेल्या बुद्धाच्या मूर्तीसह आहे. महाबोधि वृक्षाखालीं बसलेल्या बुद्धावस्थेंतल्या गौतमाची, सुजातेनें पुढें केलेला दुधाचा प्याला घेत असलेल्या बुद्धाची, त्यागी बुद्धाची, अशा बुद्धाच्या अनेक सुंदर मूर्ति ठिकठिकाणीं या देवळांत कोरलेल्या आहेत. दगडी जिना उतरून आम्ही खालीं आलों, आणि पुन्हां एकदां सोनेरी वर्ख लावलेल्या गाभाऱ्यांतली ती बुद्धाची भव्य मूर्ति पहावयाला गेलों. आम्ही आंत जातों तों तो पुजारी वरच्या मूर्तीवर होतें तसलेंच एक भलें मोठें भगवें झबलें त्या मूर्तीच्या गळ्यांत बांधीत असलेला दिसला ! हा फाजीलपणा काय आहे म्हणून आम्ही

आमच्या त्या बिहारी वाटाड्याला विचारलें. बुद्धाच्या कुठल्याहि मूर्तीवर वस्त्र कधींच नसतें. मग हा काय प्रकार आहे ? वाटाड्यानें या मंदिराची सर्व हकीकत सांगितली, तेव्हां तें शिवलिंग, तो हिंदु पुजारी, हीं भगवीं वस्त्रें या सर्वांवर स्वच्छ प्रकाश पडला. या सनातनी हिंदु पुजाऱ्याला या नागव्या मूर्ति पहावत नाहींत, म्हणून तो त्यांच्याभोंवतीं हीं भगवीं वस्त्रें गुंडाळतो, —आमचा वाटाड्या म्हणाला.

'पण या सनातनी हिंदु पुजाऱ्याचा आणि या प्रख्यात बुद्धमंदिराचा संबंध काय,' आम्ही विचारलें.

'तो मोठा इतिहास आहे,' वाटाड्या म्हणाला.

## बुद्धमंदिराची मालकी हिंदु महंताकडे !

हें देऊळ जरी बुद्धाचें असलें तरी त्याची कायदेशीर मालकी गेलीं शेंकडों वर्षें एका हिंदु महंताकडे आहे. ही महंताची गादी अतिशय श्रीमंत आहे. सध्यांच्या महंताचें वार्षिक उत्पन्न सालीना चोव्वीस लाख रुपये असल्याचें आमच्या वाटाड्यानें सांगितलें. तें खरें कीं खोटें कुणाला ठाऊक; पण हिंदु महंताकडे हें देऊळ आहे आणि बुद्धधर्मियांच्या एखाद्या अधिकृत संस्थेच्या हातीं हें देऊळ देऊन टाकावें असें मध्यवर्ती भारत सरकारला, विशेषतः पंडित जवाहरलालांना, फार वाटतें, वगैरे गोष्टी मी वृत्तपत्रांत केव्हां तरी वाचल्याच्या आठवतात. देवळाच्या ताब्यासाठीं बुद्धधर्मियांनीं त्या महंतावर केलेला एक खटलाहि कोर्टांत चालू आहे. पण कायद्यानें कांहीं जमेल असें वाटत नाहीं. तेव्हां बिहार सरकार या देवळासंबंधीं खास बिल कायदे-कौन्सिलांत आणून तें पास करून घेणार आहे असें कळलें. चार बुद्धधर्मी, चार हिंदु आणि या विभागाचा कलेक्टर अध्यक्ष अशा नऊ जणांच्या समितीनें या देवळाची व्यवस्था पहावी अशी कांहीं तरी तडजोड घाटते आहे.

देवळांच्या बाजूला कांहीं अंतरावर बुद्धकुंड नांवाचा एक मोठा थोरला तलाव आहे. या तलावाच्यामध्यें एक अशोकस्तंभ आहे. हें बुद्धकुंड १८८२ सालीं साफसूफ करण्यांत आलें. तिथल्या घाणेरड्या पाण्यांत कांहीं लोक आंघोळ करीत होते.

## वरतीं भगवान आहे: त्याच्यासाठीं हे रुमाल !

बुद्धमंदिरांच्या मागें मंदिराला लागूनच तो महाबोधि वृक्ष किंवा त्या मूळ महाबोधीचा वंशज असलेला पिंपळ आहे. इथें तीन तुकडे झालेलें एक लांबरुंद काळ्या दगडाचें चौकोनी आसन आहे. तें अशोककालीन आहे म्हणतात. तिथें उभा असलेला एक माणूस आमच्याकडे पैसे मागूं लागला. कशाला म्हणून विचारतां त्यानें उत्तर दिलें कीं या आसनावर दूध घालायचें असतें ! आम्हाला घालायचें नाहीं म्हणून आम्ही सांगितलें. इथेंच दगडांत कोरलेलीं दोन बुद्धपदें आहेत. एक विष्णुपदहि इथें दिसलें. हें इथें कसें काय आलें ? कीं नंतर कुणी तरी आणून ठेवलें ? कारण गयेला जाणारे सर्व भाविक हिंदु ज्या विष्णुपद मंदिरांत जातात तें गयेंत आहे. इथें हिंदूंचें कांहीं नाहीं.

या बुद्धमंदिराच्या पलीकडे मोकळ्या जागेंत 'महाबोधि सोसायटी' ची इमारत आहे. तिथें खालच्या मजल्यावर बुद्धधर्मावरील पुस्तकें असलेलें एक 'महाबोधि पुस्तक भांडार' आहे. या इमारतींत राहण्याचीहि व्यवस्था आहे.



चिनी बौद्ध भिक्षु, बुद्धगया

तिथून कांहीं अंतरावर पिवळ्या, निळ्या, लाल रंगाची, चिनी देवळाच्यासारख्या चमत्कारिक आकाराच्या छपराची एक इमारत दिसली. जवळ गेल्यावर कळलें कीं तिबेटी लोकांनीं बांधलेलें हें बुद्ध मंदिर आहे. आम्ही आंत शिरलों तेव्हां तिथें हिरव्या, पिवळ्या, तांबड्या,

निळ्या, रेशमी कापडाचे तुकडे घेऊन गोधडीसारखें कांहीं तरी शिवीत बसलेले चार पांच बसक्या तोंडाचे, बारीक डोळ्यांचे तिबेटी दिसले. हें काय करतां, म्हणून त्यांना हिंदुस्थानींत विचारलें. पण त्यांना कांहीं बोध होईना. हातांनीं खुणा केल्यावर आमचा प्रश्न त्यांच्यापैकीं एकाच्या ध्यानांत येऊन आपणालाहि हिंदी येतें अशा थाटांत वरच्या मजल्याकडे बोट दाखवीत तो म्हणाला, 'बोगवॉन, ऊमॉल !–बोगवॉन्, ऊमॉल !' आम्ही समजलों. वरतीं भगवान आहे, त्याच्यासाठीं हे रुमाल करतों आहोंत ! आम्ही हंसलों तेव्हां तो तिबेटी लहान मुलांसारखा खी खी करून कितीतरी वेळ हंसत होता. वर जाऊं का म्हणून त्यांना खुणेनें विचारलें, तेव्हां मोठ्या आनंदानें त्यांनीं 'जा, जा' म्हणून खुणा केल्या.

## लाल, पिवळ्या, हिरव्या रेशमी रुमालांचा समुद्र

वरच्या मजल्यावरल्या दालनांत एखाद्या बाहुल्यांच्या मोठ्या थोरल्या दुकानांत लहान मोठ्या बाहुल्या मांडून ठेवतात त्याप्रमाणें शेंपन्नास लहान मोठ्या बुद्धाच्या मूर्ति तर्भोवार मांडून ठेवल्या होत्या. या मूर्तींच्या अंगावर ते खालीं शिवीत होते त्या प्रकारचे लाल, हिरवे, पिवळे रेशमी रुमाल होते. आम्ही मूर्तींना फुलें किंवा पानें वहातों त्याप्रमाणें रेशमी रुमाल वाहाण्याची या तिबेटी लोकांची कांहीं तरी पद्धति दिसते. हें दालन म्हणजे लाल, पिवळ्या हिरव्या रेशमी फडक्यांचा एक समुद्रच होता. कारण मूर्तींवर रंगीत रेशमी रुमाल होते त्याप्रमाणेंच छतांतूनहि ठिकठिकाणीं रंगीबेरंगी रेशमी फडकीं लोंबत होतीं. दालनाच्या मध्यें एक दोन तीन फूट उंच, आणि दोन अडीच फूट रुंदीचा घेर असलेलें भलें मोठें तांब्याचें गोल भांडें होतें. हें प्रचंड भांडें कांठापर्यंत तुपानें भरलेलें होतें आणि त्यांत एक वात पेटत होती. ही वात चोवीस तास पेटत असते म्हणतात. एका बुद्धाच्या मूर्तीला तिबेटी लामांच्या-सारखा रंगीत झगा घातलेला होता, आणि डोक्यावर उंच टोपासारखा मुकुटहि होता ! या बुद्धांच्या घोळक्यांत एके ठिकाणीं दलाई लामाचा एक फोटोहि ठेवलेला आढळला. या दालनाच्या एका कोपऱ्यांत एक तिबेटी लामा एक मोठी थोरली पोथी पुढ्यांत घेऊन तिचें पठण करीत होता. 'ऊं–ऊं–ऊं–ऊं–

ॐ–आदिमाया–ॐ–ॐ–ॐ–ॐ...' असे कांहीं तरी तो पुटपुटत असलेले शब्द ऐकूं आले. त्यांतला 'आदिमाया' शब्द अर्थात् आम्हाला समजला !

सारनाथप्रमाणेंच इथेंहि एक बिर्ला धर्मशाळा आहे. बिर्लांनीं एक स्तूपहि बांधला आहे. एका लहानशा इमारतीकडे बोट दाखवून आमचा वाटाड्या म्हणाला, 'ही चिनी धर्मशाळा. सध्यां ती बंद आहे, कारण तिथला चिनी महंत आजारी पडल्यामुळें निघून गेला आहे.'



बुद्धमंदिरांतील बुद्धमूर्ति

आजूबाजूला फिरतांना एक पी. डब्ल्यू. डी. चा चांगला डाक बंगला दिसला. बरेचसे प्राचीन शिल्पाचे अवशेष कसे तरी भरून ठेवलेला एक वखारवजा म्यूझियमहि दिसला.

## 'भीम हॉटेल' आणि 'अर्जुन हॉटेल' देखील !

साडेबाराच्या सुमारास गयेंत परत आलों. येतांना रिक्शावाल्याला हिंदु यात्रेकरू ज्याकरतां गयेला येतात त्या विष्णुपद मंदिराकडे रिक्शा घ्यावयाला सांगितलें. फल्गूच्या रेताड कांठाकडे एका ओसाडशा दिसणाऱ्या उंच जागीं हें देऊळ आहे. घाटासारख्या पायऱ्या चढून गेल्यावर काळ्या दगडाचें हें मोठें थोरलें देऊळ दिसतें. देवळाच्या एका बाजूला पुरुष दोन पुरुष उंचीचे खरकट्यांचे आणि पत्रावळींचे ढीग दिसले. देवळांचा काळ्या दगडी खांबांचा सभामंडप प्रशस्त आहे. आंतल्या गाभाऱ्यांत चांदीची बैठक दिसली. आंत कुणी तरी महाराष्ट्रीय मंडळी सभोंवार पाटावर बसून पूजाअर्चा करीत होती. ब्राम्हण पूजा सांगत होता, आणि एक मध्यमवयस्क पुरुष आणि त्याची बायको पूजा करीत होतीं. एक सोवळी म्हातारी बाजूला बसली होती. कोंकणातलीं माणसें असावीं.

गया स्टेशनांतल्या केल्नर्स रेस्टोरांमध्यें दुपारचें जेवण घेतलें, आणि हॉटेलांत येऊन पडलों.

संध्याकाळीं बाजारांत फिरत असतां कांहीं कळकट हॉटेलें दिसलीं. त्यांचीं नांवें मजेदार होतीं. एक 'भीम हॉटेल', तर दुसरें 'अर्जुन हॉटेल', तिसरें 'गणेश हॉटेल !'

रात्रीं ७–५० च्या डून एक्सप्रेसनें कलकत्त्याला जावयास निघालों.

ता. १९ एप्रिल, १९४९

सकाळीं जागा होऊन आजूबाजूला पाहूं लागलों तेव्हां इतकें फटफटीत उजाडलें होतें, आणि बाहेर इतका स्वच्छ सूर्यप्रकाश दिसत होता, कीं सकाळचे सातसाडेसात वाजले कीं काय असें वाटलें. घड्याळांत पहातों तों फक्त

पांच वाजले होते ! हा काय चमत्कार ? मग माझ्या लक्षांत आलें कीं कलकत्त्यांत मुंबईपेक्षां तास सव्वातास आधीं उजाडतें. गाडीच्या दोन्ही बाजूंना हिरवींगार शेतें, गर्द हिरव्या झाडींत आणि डोलणाऱ्या नारळींच्या बनांत तुडुंब भरलेले तलाव, आणि या तलावांच्या कांठीं कोकणांतल्यासारखीं झोपडी-वजा घरें दिसत होतीं. ही बंगालची 'सुजला, सुफला, सस्य-श्यामला' भूमि ! किती हिरवी झाडी आणि किती हे तलाव ! बंगाली खेड्यांत प्रत्येक घराला लागून एक 'पुकूर' किंवा एक लहानसें तळें असतेंच म्हणतात. कोकणी लोक परसांत भाजी किंवा अळू लावतात, त्याप्रमाणेंच बंगाली या 'पुकूरांत' मासे पाळतात, आणि हवे तेव्हां काढून खातात म्हणे ! तळ्यां-मागून तळीं आणि त्यांच्या कांठच्या झोपड्या दिसत होत्या. पहांटेची वेळ असल्यामुळें तळ्याच्या पायऱ्यावर बसून स्त्रिया, मुलें तोंड धुतांना, आंघोळ करतांना दिसत होतीं. कांहीं वेळानें चंद्रनगर स्टेशन आलें. नंतर बेलूर, लिलुआ, हुगली; आणि पावणेसातला हौरा. हौरा हें कलकत्त्याचें मोठें स्टेशन. कलकत्त्याचा हा उत्तर भाग. दक्षिण भागांत 'महाराष्ट्रनिवास' आहे. दादर, माटुंगा हा जसा मुंबईचा वाढता भाग आहे तसाच कलकत्त्याचा हा दक्षिण भाग आहे. एक टॅक्सी घेऊन निवासाकडे जावयाला निघालों.

## अट्टल मुंबईकरांची घमेंड उतरविणारें कलकत्ता

हुगळीचें भव्य पात्र पलीकडे दिसत होतें. लहान मोठ्या आगबोटींची गर्दी हुगळींत दिसत होती. हुगळीवरचा अजस्त्र पोलादी पूल ओलांडून टॅक्सी पुढें जाऊं लागली. मुंबईइतकें मोठें आणि गजबजलेलें दुसरें कोणतें शहर हिंदुस्थानांत असणेंच शक्य नाहीं, अशी मनांतल्या मनांत घमेंड बाळगणाऱ्या माझ्यासारख्या अट्टल मुंबईकराच्या घमेंडीला कलकत्त्यानें थोडासा धक्का दिला हें प्रांजळपणें कबूल केलें पाहिजे. कलकत्ता खूपच मोठें शहर आहे. कलकत्त्याचा डलहौसी स्क्वेअर, चौरंगी हा विभाग मुंबईच्या कोट-विभागापेक्षांहि मोठा, अधिक गजबजलेला आणि अधिक मोठमोठ्या इमारती असलेला विभाग आहे. मुंबईच्या कापाच्या मैदासासारखीं दहा मैदानें माव-तील अशीं मोठमोठीं मैदानें, आणि मुंबईपेक्षांहि विशेष म्हणजे मोठमोठे

पाण्याचे तलाव कलकत्त्याच्या या विभागांत आहेत. ट्राम गाड्या, मोटारी, बसेस वगैरेंचीहि वहातूक प्रचंड आहे. अर्थात् यांत आश्चर्य कांहीं नाहीं. दिल्लीच्या आधीं ब्रिटिशांची राजधानी कलकत्ता शहरच होतें. वॉरन् हेस्टिंग्ज-पासून कित्येक गव्हर्नर जनरलांनीं कलकत्त्यांतूनच आपल्या भारतीय साम्राज्याचा कारभार चालवला. हिंदुस्थानांतल्या ब्रिटिश व्यापाऱ्यांचेंहि सर्वांत मोठें आणि महत्त्वाचें केंद्र कलकत्ताच. कलकत्त्यांतले रस्ते, इमारती, पुतळे या सर्वांत भारतांतल्या ब्रिटिश साम्राज्याच्या पूर्वेतिहासाच्या कांहीं ना कांहीं खुणा दिस-तात. डलहौसी स्क्वेअरमधल्या या जागीं हेस्टिंग्जनें नंदकुमाराला फांशीं दिला, जनरल पोस्टाजवळ ही लहानशी खोली दिसते हेंच तें कलकत्त्याचें 'ब्लॅक होल', हायकोर्टाकडून येतांना वाटेंत ही तांबडी, एक मजली जुनाट इमारत दिसते, हिच्यांत १७७४ ते १७८५ पर्यंत पहिला गव्हर्नर जनरल वॉरन् हेस्टिंग्ज रहात असे.

बेलतोला रोडवरील महाराष्ट्र–निवासांत येऊन पोहोचलों तेव्हां साडेसात वाजून गेले होते. निवासाच्या तीन मजली इमारतींतील रहाण्याची व्यवस्था आणि स्नान, चहा, जेवण वगैरेंची सोय उत्कृष्ट आहे.

## भर रस्त्यावर गव्हर्मेंट हाऊस

दुपारीं अडीच वाजतां फिरायला बाहेर पडलों. लॉंड्रींत देण्याकरतां कपडे बरोबर घेतले होते. लॉंड्री बंद होती. शेजारचा पानवाला म्हणाला, 'चारच्या-पुढें लॉंड्री उघडेल.'

'म्हणजे?' आम्ही म्हणालों.

'हे बंगाली लोक भारी आळशी,' तो म्हणाला, 'पहा, इथें पांच वाजतां साफ उजाडतं; पण सकाळीं दहा वाजेपर्यंत हे लोक दुकानें उघडायचे नाहींत. पुन्हां बारा वाजतां दुकान बंद करून जेवायला गेले कीं चार वाजतां चहा घेऊन परत येणार!' ट्राममध्यें बसून डलहौसी स्क्वेअरकडे गेलों. मुंबईतल्या-प्रमाणें इथलें गव्हर्मेंट हाऊस लोकांना दिसणार नाहीं अशा कुठल्यातरी जागीं नाहीं. डलहौसी स्क्वेअरमधल्या अगदीं गर्दीच्या रस्त्यावर गव्हर्मेंट हाऊसचा


मुख्य दरवाजा आहे. प्रशस्त बागेंत मोठी थोरली पिवळी इमारत दिसते. एका हॉटेलांत चहा घेऊन व्हिक्टोरिया मेमोरियल ही इमारत पहावयाला गेलों. ब्रिटिश साम्राज्याचें वैभव मोंगल साम्राज्याच्यापेक्षांहि अफाट करण्याचा हव्यास घेतलेल्या लॉर्ड कर्झननें ही इमारत ताजमहालाशीं स्पर्धा करण्याकरतां बांधली म्हणतात. मला मात्र लांबून ती बोरीबंदर स्टेशनाच्या इमारतीसारखी दिसली. अर्थात् स्टेशनाची पांढऱ्या संगमरवरी दगडाची नाहीं;– ही आहे इतकेंच !

ता. २० एप्रिल, १९४९

## विवेकानंदांचा शांत शुचिर्भूत बेलूरमठ

इथून पंधरा सोळा मैलांवर असलेला विवेकानंदांचा प्रख्यात बेलूरमठ पहाण्याकरतां सकाळींच चहा, स्नान आटोपून निघालों. इथून बस घेऊन हौरा स्टेशनाजवळ जायचें, आणि तिथून दुसरी बस बेलूरसाठीं घ्यायची. कलकत्त्यांत मुंबईच्या दुप्पट गर्दी असून बससाठीं फार वेळ मुळींच तिष्ठावें लागत नाहीं. सरकारी बस सर्व्हिस आहेच; पण खाजगी बस कंपन्यांनाहि परवानगी असल्यामुळें एकामागून एक बसेस येतात आणि कंडक्टर आग्रह करून आंत घोलावतात. खासगी कंपन्यांवर दोनच निर्बंध दिसतात. बसचे नंबर आणि भाड्यांचे दर सरकारी बसेससारखेच असले पाहिजेत. खुली स्पर्धा असल्यामुळें उतारूंची सोय होते यांत शंका नाहीं. मुंबईत ठेकेदारी असल्यामुळें उतारूंना कुणी विचारीत नाहीं. पिवळ्या बंगाली वाघाचें चित्र असलेल्या किरमिजी रंगाच्या सरकारी बसेस सोडल्यास बाकीच्या बसेस मात्र खडखडणारे खोके आहेत. कशा का असेनात, हव्या तेव्हां मिळतात हें केवढें सुख !

अर्ध्या तासांत हौऱ्याला पोहोंचलों. ताबडतोब बेलूरची बस मिळाली. मुंबईच्या कांदिवली, बोरिवलीसारखें बेलूर हें एक शांत, खेडेंवजा उपनगर आहे. तागाच्या गिरण्या असलेला हौरा विभाग, माटुंग्याप्रमाणें रेल्वेचें प्रचंड वर्कशॉप् असलेला लिलुआ विभाग वगैरे मागें टाकीत बस बेलूरला आली. हिरवी झाडी आणि पाण्याचीं तळीं सभोवार असलेल्या एका



बेलूर मठ, कलकत्ता

विस्तीर्ण मोकळ्या जागीं विवेकानंदांनीं बांधलेलें रामकृष्ण परमहंसांचें सुंदर मंदिर, इतर लहान लहान मंदिरें आणि रामकृष्ण मिशनची कचेरी वगैरे इमारती आहेत. पलीकडे हुगळी नदीचें विस्तीर्ण पात्र आहे. नदीच्या पलीकडल्या कांठावर दूर दक्षिणेश्वरच्या कालिमंदिराचे घुमट दिसतात. याच दक्षिणेश्वरांतल्या कालिमंदिरांत रामकृष्ण परमहंस पुजारी होते, आणि तिथेंच त्यांना कालिमातेनें दर्शन दिलें. बेलूरमधल्या या रामकृष्णमंदिराचें शिल्पकाम अतिशय प्रेक्षणीय आहे. विवेकानंदांच्या अमेरिकन शिष्यांनीं हें भव्य मंदिर बांधलें म्हणतात. वरचे घुमट दक्षिणेश्वरच्या जुन्या कालिमंदिराच्या घुमटांसारखेच आहेत. मांडी घालून समोर निरागसपणें पहात बसलेली रामकृष्ण परमहंसांची शुभ्र संगमवराची मूर्ति अतिशय जिवंत वाटते. याच आवारांत दोन छोटींशीं घुमटवजा मंदिरें आहेत. एकांत विवेकानंदांच्या बरोबरीचेच रामकृष्णांचे एक शिष्य स्वामी ब्रह्मानंद यांची संगमरवरी प्रतिमा आहे; आणि दुसऱ्यांत विवेकानंदांची आहे. या शांत, शुचिर्भूत वातावरणांत कांहीं वेळ भटकून आम्ही बाहेर पडलों.

## दक्षिणेश्वर मंदिरांतील गडबडीचा देखावा

बेलूरमधून दक्षिणेश्वराला जायचें म्हणजे होडी घेऊन नदीपार व्हायचें किंवा नदीवरला तो लांबरुंद पूल ओलांडायचा. बेलूर येथें बस घेऊन पुलाच्या पाय-

ध्याशीं गेलों. तिथें एक सायकल रिक्शा घेऊन पूल ओलांडून थेट दक्षिणेश्वर मंदिराच्या आवारांत गेलों. इथें शुचिता, शांतता वगैरेंच्या ऐवजीं हिंदु देवा-ल्यांतला नेहमी दिसतो तो भिकाऱ्यांच्या, रोग्यांच्या, भक्तांच्या, पुजाऱ्यांच्या गडबडीचा देखावा दिसत होता. कालीच्या मंदिरासमोर चौकोनी सभामंडप आहे. लक्षांत भरण्यासारखा विशेष म्हणजे मंदिराला जोडूनच सभामंडप नाहीं; मध्यें दहा बारा फूट जागा सोडून वेगळा सभामंडप आहे. बाजूला नदीकांठीं घाट आहे. याच मंदिरांत रामकृष्णांनीं 'माते, दर्शन दे !' म्हणून ध्यास घेतला, आणि शेवटीं मातेनें त्यांना दर्शन दिलें. मंदिराच्या आवारांत एक नवपरिणीत बंगाली जोडपें बरोबरच्या बायकामुलांसह इकडून तिकडे दर्शनासाठीं फिरत होतें. आम्हांला गंमत वाटली ती वधूच्या पदराची गांठ वराच्या अंगावरील वस्त्राला मारलेली होती, आणि दोघेंहि तशींच फिरत होतीं त्याची ! दक्षिणेश्वरला बस घेतली तिचा रस्ता शामबझार, बारांगोर, सेंट्रल ॲव्हेन्यू, काशीपूर, चित्तरंजन ॲव्हेन्यू वगैरे अर्ध्या अधिक कलकत्यांतून जात होता. त्यामुळें शहराची ही बाजू आयतीच पहायला मिळाली. बसनें एस्प्लेनेडमध्यें आणून सोडलें. तिथें ट्राममध्यें बसून निवासांत परत आलों.

## 'चिडियाखान्यां'तील 'सर्पगृह'

दुपारीं पावणेतीनला बसनें किदरपूर या कलकत्याच्या गोदी विभागाजवळ असलेला कलकत्याचा 'राणीचा बाग' किंवा 'चिडियाखाना' पहायला गेलों. 'राणीच्या बागे'सारखाच दुर्मिळ वृक्षलतांनीं भरलेला विस्तीर्ण बाग आहे आणि पशु-पक्षीहि तसेच आहेत. पण राणीच्या बागेइतका व्यवस्थितपणा आणि साफसफाई इथें दिसली नाहीं. थोडेंसें ओसाड आणि धुळकट वातावरण आहे. आजूबाजूची वस्तीहि गोदी-विभागांत नेहेमीं दिसते तशी कळकट आणि मळकट आहे. राणीच्या बागेंत नाहीं अशी एक गोष्ट इथें पहायला मिळाली. 'रेप्टाईल हाऊस' किंवा 'सर्पगृह' राणीच्या बागेंत नाहीं. इथल्या सर्पगृहांत नाग, घोणस, तक्षक वगैरे सर्व प्रकारचे विषारी साप जिवंत पहा-वयाला मिळाले. लहान लहान कांचेच्या घरांत त्यांना रांगेनें ठेवले आहेत.

कलकत्यांत शक्य तितकीं बंगाली नाटकें पहायचें ठरविलें होतें. इथलीं

नाटकगृहें ‘ रिव्हॉल्व्हिंग ’ असल्याचें आणि नेपथ्यरचना, प्रकाशयोजना, अभिनय वगैरे बाबतींत बंगाली रंगभूमि अद्यावत् असल्याचें ऐकलें होतें. निवासापासून थोड्याच अंतरावर असलेल्या थिएटरांत संध्याकाळीं सहा वाजतां ‘ बिल्व-मंगल ’ नाटक पहावयाला गेलों. आपल्या प्रेमपात्राला भेटण्याकरतां पूर आलेली नदी प्रेताच्या साहाय्यानें ओलांडणाऱ्या आणि दोर म्हणून सर्पाला धरून तिच्या घरांत उतरणाऱ्या भक्त सूरदासाची कथा परिचित आहे. ‘ बिल्वमंगल ’ चित्रपटहि येऊन गेलेला आहे. प्रख्यात सिनेमानटी मोलिना सूरदासाच्या प्रेयसीचें काम करणार होती. एक उदयोन्मुख नवीन नट नीतीश मुकर्जी सूरदासाचें आणि आपल्या सुरेल आवाजानें साऱ्या कलकत्त्याला सध्यां जिनें वेड लावलें आहे ती राधाराणी नाटकांतल्या एका संन्यासिनीचें काम करणार होती. त्याशिवाय लोकप्रिय बालनट गोपाळ याचेंहि काम होतें. बंगाली भाषेचा आम्हाला गंध नसल्यामुळें नाटक अक्षरशः ‘ पहाणें ’ आम्हाला प्राप्त होतें.

## ‘ कालिका ’ थिएटरांत ‘ बिल्वमंगल ’ नाटक

‘ कालिका ’ हें नवीनच थिएटर आहे. ‘ रिव्हॉल्व्हिंग स्टेज ’ ची त्यांत व्यवस्था आहे. थिएटर फारसें मोठें नाहीं, मुंबईच्या बॉंबे थिएटरसारखें मला वाटलें. रंगभूमीवरील कमानीवर राक्षसांच्या पोटावर पाय येऊन तांबडी लाल जीभ बाहेर काढलेल्या कालिकेचें चित्र होतें. खालच्या आणि वरच्या दोन्ही मजल्यांवर भिंतीला लागून सभोंवार टागोर, बंकिमबाबू, राममोहन रॉय, जग-दीशचंद्र बोस, चित्तरंजन दास, सुभाष बाबू वगैरेंचे अर्ध पुतळे रांगेनें मांड-लेले दिसत होते. रंगभूमीच्या एका बाजूला बंगालचे आद्य नाटककार गिरीश चतर्जी आणि दुसऱ्या बाजूला रामकृष्ण परमहंस यांचे पुतळे ठेवलेले होते. रामकृष्ण परमहंसांच्या जीवनचरित्रावर लिहिलेलें ‘ जुगदेवता ’ हें नवें नाटक सध्यां या थिएटरांत चालू आहे. तें अत्यंत लोकप्रिय असून प्रत्येक प्रयोगाला तोबा गर्दी लोटते, म्हणतात. दोन तीन दिवसांनीं त्याचा इथें प्रयोग आहे, तो पहाण्याचा आमचा विचार आहे. आजचें ‘ बिल्वमंगल ’ नाटक गिरीश चतर्जींचें असावें, असें वाटतें. इतक्या जुन्या विषयावर नव्या नाटककारानें नाटक लिहिलें नसावें. नाटक फक्त तीन तासांचें आहे, त्यावरून निर्मात्यानें

संपादन करून त्याची सुटसुटीत रंगावृत्ति तयार केलेली असावी. संतचरित्रात्मक नाटक असल्यामुळें कीं काय, पांढरीं पातळें नेसलेल्या म्हाताऱ्या बंगाली बाया पुष्कळच आलेल्या दिसत होत्या. म्हाताऱ्या काय किंवा तरण्या काय, पदराच्या टोकाला किल्ल्यांचा जुडगा बांधून तो पाठीवर मागें लोंबत ठेवून बाहेर फिरायला जाण्याची किंवा नाटक पहायला येण्याची या बंगाली बायांची रीत तिऱ्हाइताला मजेदार वाटते. आज बुधवार असल्यामुळें नाटकाला फारशी गर्दी नाहीं. इथल्या कंपन्या बुधवार, गुरुवार, शनिवार संध्याकाळीं एकेक प्रयोग करतात; आणि रविवारीं दुपारीं तीनला आणि संध्याकाळीं साडेसहाला असे दोन प्रयोग करतात. मराठी रंगभूमीची भरभराट होती तेव्हांसुद्धां बुधवारीं आणि शनिवारीं रात्रीं एक आणि रविवारीं दिवसां एक असे आठवड्यांतून तीनच प्रयोग आमच्या कंपन्या करीत असत. पुढें पुढें बुधवारचा प्रयोग बंद होऊन दोनच उरले. सर्वच बादशाही कारभार. श्री. के. नारायण काळे यांनीं यासंबंधीं बोलतांना एकदां म्हटलें होतें, कीं आठवड्याचे सहा दिवस सर्व धंद्यांतले लोक दररोज आठ आठ तास काम करीत असतां नाटकवाल्यांनींच फक्त दोन दिवस काम करण्याची बादशाही मिजास केली हेंहि आमच्या रंगभूमीच्या अवनतीचें एक कारण आहे.

## फिरत्या रंगमंचावरील सुंदर नाट्यप्रयोग

नाटक बरोबर ६–३० ला सुरू झालें. प्रकाशयोजना आणि देखावे अतिशय मनोहर होते. भिजलेला सूरदास पाण्यांतून बाहेर येतो, वादळी वारा वहातो आहे, विजा कडाडताहेत आणि मागल्या बाजूला पूर आलेल्या नदीच्या लाटांवर तो ज्यावर बसून आला तें प्रेत वरखालीं होत तरंगतें आहे हा देखावा आणि त्यावेळची प्रकाशयोजना फारच सुरेख होती. सूरदासाच्या प्रेयसीची झोपडी, तो ज्याला धरून आला तो भिंतीवरून लोंबणारा साप वगैरे दृश्येंहि यथातथ्य वाटलीं. डोळे फोडून घेतलेल्या सूरदासाला वृंदावनांत शेवटीं राधाकृष्णाचें दर्शन होतें, हा देखावाहि अप्रतिम होता. सर्वच प्रयोग फार सफाईदार वाटला. मोलिना फार लठ्ठ दिसते. पण तिचा अभिनय परिणामकारक होता. सूरदासाचें काम करणारा नीतीश मुकर्जी पृथ्विराजसारखा गोरा-

पान आणि उंच आहे. पृथ्विराजशीं त्याचें बरेंच साम्य आहे. संन्यासिनीचें काम करणाऱ्या राधाराणीचा आवाज खरोखरच असामान्य सुरेल आहे.

तबला-पेटीची साथ होती, पण मराठी रंगभूमीवर तबला-पेटीवाले समोर बसतात आणि पात्रांच्या अभिनयाबरोबर त्यांचे अंगविक्षेपहि प्रेक्षकांना पहावे लागतात, तसा प्रकार इथें नाहीं. साथवाले प्रेक्षकांच्या नजरेआड विंगमध्यें होते. नाटक जुन्या प्रकारचें असल्यामुळें एकांकी एकप्रवेशी नव्हतें. पुष्कळ प्रवेश होते. पण रंगभूमी ' फिरती ' असल्यामुळें पडदा टाकण्याऐवजीं चट कन् नवें दृश्य पुढें आणतां येत होतें. प्रवेश संपला कीं रंगभूमीवर काळोख ( ब्लॅक आऊट ) व्हायचा आणि शिटी वाजली कीं एक मिनिटभर खड् खड् खड् खड् असा ' फिरणाऱ्या ' रंगभूमीचा आवाज कानावर येऊन पुन्हां प्रकाश व्हायचा तेव्हां नवें दृश्य दिसायचें. दृश्यांची रचना, वेषभूषा किंवा रंगभूषा यांत नांव ठेवण्यासारखें आम्हांला तरी कांहीं दिसलें नाहीं. दोन लहानशा गोष्टी किंचित् खटकल्या. मधून मधून ' प्रॉम्पटिंग ' ऐकूं येई आणि राजाचे शिपाई एका प्रवेशांत येतात त्यांच्या मुख्याचे कपडे आधुनिक सब-इन्स्पेक्टर-सारखे होते ! प्रयोगाला गालबोट हें एवढेंच होतें. नाटक बरोबर साडे-नऊला संपलें.

ता. २१ एप्रिल, १९४०.

## बंगाली व महाराष्ट्रीय माणसांतली आत्मीयता

आम्ही हरिद्वारहून लखनौला येत असतां गाडींत श्री. घोष नांवाचे एक बंगाली गृहस्थ आम्हाला भेटले होते. आपल्या आईला हरिद्वार दाखवून ते कलकत्त्याला परत जात होते. आम्ही कलकत्त्यांत महाराष्ट्र-निवासांत उतरणार आहोंत हें त्यांना समजलें तेव्हां कलकत्त्यांत आपल्या घरीं येण्याचें आम्हाला त्यांनीं आग्रहाचें आमंत्रण दिलें होतें. महाराष्ट्र-निवासाच्या जवळच त्यांचें रहाण्याचें ठिकाण होतें. कलकत्त्यांतल्या एका कारखान्यांत ते लेबर ऑफिसर होते. माणूस मोठ्या उमद्या स्वभावाचा होता.




बंगाली स्त्रीविशेष, कलकत्ता

आपल्या घरीं आम्हाला चहाला नेण्याकरतां आज सकाळीं साडेसात वाजतां ते निवासांत आले. त्यांचा धाकटा भाऊ घरीं होता त्याच्या बोलण्यावरून दोघांहि भावांना महाराष्ट्रियांविषयीं विशेष आत्मीयता वाटत होती हें उघड होतें. काय असेल तें असो, टिळकांच्या वेळेपासून बंगाल महाराष्ट्रियांना आणि महाराष्ट्र बंगाल्यांना जवळचा वाटतो यांत शंका नाहीं. उत्तर हिंदुस्थानांत इतक्या ठिकाणीं फिरत असतां जें वाटलें नाहीं तें कलकत्त्यांत बंगाली लोकांत आल्याबरोबर आम्हाला वाटूं लागलें. तसें पाहूं गेल्यास बंगाली भाषेचा आम्हाला गंध नाहीं, हिंदीच थोडीबहुत समजते; पण बंगाली लोकांत आल्यावर आपण आपल्या जवळच्या माणसांत आल्यासारखें वाटूं लागलें.

घोषबंधूंच्या बोलण्यावरून सुभाषबाबूंचे ते निःस्सीम भक्त दिसले. त्यांना संगीताचाहि विशेष शोक आहे, असें वाटतें. हेकणे नांवाचे कुणी महाराष्ट्रीय संगीतज्ञ कलकत्त्यांत आहेत त्यांच्याबद्दल आणि त्यांनीं रवींद्र-संगीतांत घातलेल्या भरीबद्दल ते अत्यंत आदरानें बोलत होते. शिवाजीच्या जीवनावरील एक बंगाली नाटक इथल्या लोकांत अत्यंत लोकप्रिय असल्याचें त्यांनीं सांगितलें. आतां पाकिस्तानांत गेलेल्या पूर्वबंगालमधील फरीदपूर येथें घोषकुटुंबांचें घरदार, शेतवाडी होती. आम्ही बसलों होतों तिथून समोरच्या भिंतीवर नारिंगी आणि हिरव्या रंगाचा अखंड हिंदुस्थानचा एक नकाशा दिसत होता. हिंदुस्थान देश स्वतंत्र झाला होता, पण घोषबंधूंची पूर्वबंगालमधली 'सुजला, सुफला, सस्यश्यामला' मातृभूमि विष चढल्यासारखी हिरवीगार होऊन ते तिला पारखे झाले होते; आणि त्या नकाशावरल्या त्या हिरव्या डागांकडे पहात निःश्वास टाकणें त्यांच्या नशिबीं आलें होतें !

## जुनाट आणि भकास कलकत्ता युनिव्हर्सिटी

घोषबंधूंचा निरोप घेऊन दलालांना हौऱ्याच्या त्या प्रचंड पोलादी पुलाचें चित्र करावयाचें होतें म्हणून तिथें गेलों. आकाशांत ढग जमले होते आणि



हौरा पूल, कलकत्ता

पावसाळी हवा वाटत होती. पावसाळी ढगाळ हवा, गढूळ पाण्याची ती विशाळ नदी, तिच्यावरून जाणाऱ्या छोट्या छोट्या बोटींच्या शिट्या आणि घसघस आवाज हें सर्व त्या पुलाच्या टोकाला उभा राहून पहात असतां थेम्सवरल्या पुलाचा आणि लंडन शहराचा मला क्षणभर भास झाला.

तिथून एक बस घेऊन कॉलेजस्क्वेअरमध्यें कलकत्ता युनिव्हर्सिटी पहावयाला गेलों. कलकत्ता युनिव्हर्सिटी फार जुनी आहे, आणि ती तशी दिसतेंहि! मुंबईच्या टाऊन हॉलसारखी पिवळ्या रंगाची भव्य, पण भकास अशी युनिव्हर्सिटीची इमारत आहे. प्रवेशद्वार रस्त्याला लागूनच आहे; मुंबई युनिव्हर्सिटीच्या दगडी इमारतीभोवतीं जशी प्रशस्त बाग आहे तसें इथें कांहीं नाहीं. आंतल्या वर्गांच्या खोल्याही एखाद्या जुनाट शाळेंतल्यासारख्या रंगहीन आणि भकास वाटल्या. जुनाट वखारीचें सर्वत्र वातावरण आहे. ग्रंथालय मोठें आहे; पण ग्रंथालयाचें दालन आणि तिथली व्यवस्थाहि अस्ताव्यस्त वाटली. मात्र दालनाच्या भिंतीवरलीं मोठमोठीं ऐतिहासिक चित्रें छान आहेत.

संध्याकाळीं आम्ही रहातों त्या दक्षिण कलकत्त्यांतच 'लेक्स' नांवाचा एक उपनगर विभाग आहे. तो पहायाला गेलों. दादर-माटुंग्यासारखीं नवीं घरें या बाजूला झालीं आहेत. या बाजूला असलेलीं दोनतीन विस्तीर्ण तळीं, तिथली हिरवी झाडी आणि आजूबाजूचें निसर्गरम्य वातावरण फारच आल्हाददायक आहे.

सातच्या सुमारास महाराष्ट्र-मंडळाच्या चिटणीस सौ. पाटकर आणि त्यांचे यजमान माझे मित्र श्री. पाटकर यांच्याकडे चहापार्टीला गेलों.

घरीं परत आलों तों आकाशांत गडगडाट सुरू झाला, विजा चमकूं लागल्या आणि धो धो पाऊस पडूं लागला.

**ता. २२ एप्रिल, १९४९**

## रक्तरंजित कालिमातेचें दर्शन

श्री. घोष सध्यां रजेवर असल्यामुळें आज ते आमच्याबरोबर फिरायला आले. आज सकाळपासून बाहेर भटकायचें आणि दुपारचें जेवणहि बाहेरच घ्यावयाचें ठरविलें होतें.

सकाळीं ८ वाजतां कालिघाटावरलें प्रख्यात कालिमंदिर पहायला गेलों. रस्त्यावर बंगाली पंड्ये मागें लागले होते; पण त्यांना वाटेला लावलें. मंदिर लहानसेंच आहे. मंदिराच्या दारासमोर दररोज कितीतरी बोकडांचे बळी देतात. एक लाकडी टोकळा आहे त्यावर बोकडाची मान तोडतात, आणि बोकडाचें डोकें नैवेद्य म्हणून हातांत घेऊन कालिमातेपुढें ठेवतात. आजहि त्या जागीं एक मारून टाकलेला बोकड आणि त्याचें ताजें रक्त दिसत होतें. मंदिरांत खूप गर्दी होती; पण पुजाऱ्यानें गर्दी बाजूला करून देवीचें दर्शन आम्हांला घेऊं दिलें. शंकराचा मुखवटा पिंडीवर ठेवतात, तसाच लाल जीभ बाहेर काढलेल्या कालीच्या तोंडाचा मुखवटा इथें होता. पुजाऱ्यानें दिलेलें तीर्थ घेऊन आम्ही बाहेर पडलों. या देवळाजवळून गंगेचा म्हणजे हुगळीचा एक फाटा जातो; पण मोठ्या थोरल्या घाणेरड्या ओहाळासारखा तो इथें दिसतो. त्या पवित्र घाणींत भक्त आंघोळ करीत असलेले दिसले.

इथून हौऱ्याला गेलों आणि तिथून दुसरी बस घेऊन कलकत्त्यांतली प्रख्यात 'बोटॅनिकल गार्डन्' पहावयाला गेलों. या अफाट बागेंत फिरतांना एकाद्या सुव्यवस्थित अरण्यांत फिरल्यासारखें वाटतें. नाना प्रकारचे लहान मोठे वृक्ष आणि झाडें इथें आहेत. बागेच्या एका टोकाला एक घाट आहे आणि तिथें नियमितपणें अर्ध्या तासानें हुगळीच्या कांठावरील निरनिराळ्या ठिकाणीं उतारू नेणारी बोट लागते. परत बसनें न जातां बोटीनेंच जायचें आम्ही ठरविलें होतें. 'मायापूर' नांवाच्या बोटींतून हायकोर्टाजवळच्या चांदपाल घाट स्टेशनांत उतरलों. बोटींतून जातांना हुगळी नदी म्हणजे एक समुद्रच वाटतो. नदींत उभ्या असलेल्या 'कपारा', 'सिटी ऑफ दर्बान', 'जलजवाहर' वगैरे प्रचंड बोटी पाहून मुंबई बंदराजवळच्या समुद्राची आठवण झाली.

## नांवें आणि नांवें !

चांदपाल घाटावर उतरून बाहेर पडल्यावर रस्त्यांत 'ईडन गार्डन' लागली. या गार्डनमध्यें एक ब्रम्ही पॅगोडा आहे तें पहायला जाऊं या, असें घोष म्हणाले. पण दरवाजावर कळलें कीं गार्डनमध्यें नुकतेंच एक 'आर्ट ॲंड इंडस्ट्रियल' प्रदर्शन झालें होतें तेव्हांपासून निर्वासित विद्यार्थ्यांची इथें रहाण्याची सोय केली आहे, आणि आंत कुणाला उगाच सोडीत नाहींत.

रात्रीं 'अमृतबझार-पत्रिका' वाचीत असतां कांहीं संस्थांचीं आणि इमारतींचीं नांवें मजेदार वाटलीं. इथल्या बंगाली साहित्यिकांची एक संस्था आहे तिचें नांव 'शनिवारेर बैठक'! इमारतीचें नांव 'पादुकासदन'. महाराष्ट्र-निवासांतले आचारी, वाढपे वगैरे बिहारी आहेत. त्यांचींहि नांवें सांगण्यासारखीं आहेत. एक 'फलटन' तर दुसरा 'परीक्षित'! बनारस विद्यापीठाच्या होस्टेलमधल्या नोकरांचींहि अशींच मजेदार नांवें होतीं. कुणी 'मसाली' तर कुणी 'मिठाई'; एक 'जासूद' तर दुसरा 'सुकुमार'!

ता. २३ एप्रिल, १९४९

## म्यूझियममधील अद्भुत 'स्वर्गविहंगम'

आज सकाळीं कलकत्याचा प्रख्यात 'म्युझियम्' पहावयाला गेलों. एवढें मोठें वस्तुसंग्रहालय हिंदुस्थानांतच काय, पण आशियांत असेल किंवा काय याची मला शंका वाटते. इमारत अफाट मोठी आहे; आणि एक एक दालनहि




'स्वर्गविहंगम', म्युझियम, कलकत्ता

अचाट आहे. एका दालनांत 'फॉसिल्स' किंवा शिलीभूत झालेल्या प्राचीन प्राण्यांचे अवशेष आहेत. एकांत बोटाएवढ्या माशापासून तो वीसबावीस फूट लांबीरुंदीच्या देवमाशापर्यंत भुसा भरून ठेवलेले मासे आहेत. एका लांबच लांब दालनांत अंदमान, निकोबार, आसाममधील नागा पर्वत वगैरे प्रदेशांतल्या आदिवासी स्त्रीपुरुषांच्या हुबेहूब मातीच्या प्रतिमा, त्यांचीं खेडीं, त्यांचे कपडे, त्यांचीं शस्त्रास्त्रें, त्यांचीं भांडींकुंडीं वगैरे मोठमोठ्या कांचेच्या खोल्यांत रांगेनें मांडून ठेवलीं आहेत. संयुक्त प्रांतांतलें एक मासलेवाईक खेडें, बंगालमधलें एक, बिहारमधलें एक, वगैरे खेड्यांचे असेच रंगीत मातीचे नमुने ठेवले आहेत. भुसा भरून ठेवलेल्या चित्रविचित्र पक्ष्यांचा विभाग तर तास न् तास पहात रहावें असा आहे. 'बर्ड ऑफ पॅराडाईज्' नांवाचा पक्षी पहातांना अक्षरशः आम्ही स्तंभित झालों. हा पक्षी पाहिल्यानंतर 'स्वर्गविहंगम' याखेरीज दुसरें कोणतें नांव कुणाला सुचणेंच शक्य नाहीं. त्याच्या सौंदर्याचें काय वर्णन करावें? पांढऱ्या भुरक्या रंगाच्या कावळ्याच्या आकाराचा हा पक्षी आहे; पण त्याच्या शेपटाच्या आजूबाजूला, तलम रेशमी फेट्याचा पाठीवर शेमला सोडावा तसा दीड दोन फूट घेराचा रेशमापेक्षांहि मऊ आणि तलम, पांढरे ठिपके असलेल्या मोतिया रंगाच्या पिसाचा पदर आहे. त्याच्या छातीवरचीं पिसें, त्याच्या पंखांचे रंग या सर्वांची रंगसंगति शब्दातीत आहे. राजस्थानी, पर्शियन वगैरे चित्रांची गॅलरी पाहून परत फिरलों.

## जुनाट थिएटर, वृद्ध नटश्रेष्ठ व जुनें नाटक...

आमचे दाते, बोडस, चिंतामणराव कोल्हटकर यांच्याप्रमाणें बंगाली रंगभूमि गाजवलेले वृद्ध नट शिशिर बहादुरी, 'चंद्रगुप्त' या 'श्रीरंगम्' नाटकगृहांत आज संध्याकाळीं असलेल्या नाटकांत चाणक्याचें काम करणार आहेत. दुसरे एक प्रख्यात तरुण बंगाली नट छवी विश्वास चंद्रगुप्ताची भूमिका करणार. बरोबर ६ वाजता आम्हीं कलकत्याच्या दुसऱ्या टोकाला म्हणजे उत्तर भागांत असलेल्या 'श्रीरंगम्' थिएटरांत बसनें गेलों. थिएटर पाहिल्यावर आमचा उत्साह किंचित् मावळला. थिएटरची बाहेरची बाजू मोडकेंतोडकें सामान इतडे तिकडे पडलेल्या एखाद्या भकास वखारीसारखी दिसत होती.

एका गल्लींत असल्यामुळें पुण्याच्या ‘ विजयानंद ’ थिएटरसारखी या श्रीरंगम्‌ची एकंदर कळा आहे. आंतले खडखड करणारे जुनाट विजेचे पंखे, एकमेकांना खेटलेल्या खुर्च्या, घाणेरडीं शौचालयें वगैरे पाहिल्यानंतर आमच्या पुण्या-मुंबईच्या भिकार नाट्यगृहांना थोडें बरें वाटेल ! आज शनिवार संध्याकाळ असल्यामुळें आणि बहुधा बहादुरींचें काम असल्यामुळें नाटकाला गर्दी खूप होती. नाटक सुरू व्हायला अजून पंधरा वीस मिनिटांचा अवधि होता. आमच्या इकडल्या थिएटरांत शेंगदाणे, पिस्ता, चहा, सोडा, लेमनच लोक घेत असतात. बंगाली आमच्या पुढें गेले आहेत,—ते पुडिंग, मटन चाप्, कटलेट् वगैरे थिएटरांत मागवून खात होते. फक्त ‘ करीराईस ’ मागवला असता कीं जेवण पुरें झालें असतें !

बरोबर साडेसहाला नाटक सुरू झालें. नाटक जुन्या तंत्राचेंच होतें. स्वगतें होतीं, प्रवेश होते, आणि महाराष्ट्र नाटक मंडळींतल्या नटांसारखे रंगभूमीवर सर्वजण व्यवस्थित आरोहअवरोह घेत तारस्वरांत ओरडत होते. ऐतिहासिक नाटक असल्यामुळें ओरडणें कदाचित् अपरिहार्य होतें. चंद्रगुप्ताचें काम करणाऱ्या छवी विश्वासचा आवाज एकदोनदां ऐकूं आला नाहीं, तेव्हां श्रोत्यांनीं ओरडाओरड केली. बंगाली रंगभूमीवर, मला वाटतें, सडपातळ नटी क्वचितच दिसते. पिंपांना जरीच्या साड्या गुंडाळून खालीं लहानशीं चाकें लावून रंगभूमीवर ढकलून द्यावीं तशा चंद्रगुप्ताची आई, बायको, बहीण वगैरे रंगभूमीवर तरंगत होत्या. मात्र एखादी सडपातळ नटी चुकून रंगभूमीवर दिसते तेव्हां ती फारच सडपातळ म्हणजे काडीला साडी गुंडाळल्या सारखी असते. एक साधू आणि त्याची मुलगी या नाटकांत मधून मधून येऊन गात होतीं. ही मुलगी सडपातळ म्हणजे अगदीं हाडाची काडें झालेली होती. नाटक जुन्या प्रकारचें होतें हें सांगितलेंच. फूटलाईट नव्हते—स्पॉटलाईट किंवा प्रकाशझोत वापरीत होते, आणि दृश्य बदलतांना ‘ फिरत्या ’ रंगभूमीवर ‘ ब्लॅक आऊट ’ किंवा काळोख करीत होते एवढेंच नावीन्य होतें.

## शिशिर बहादुरींचा अप्रतिम अभिनय

बंगाली भाषा समजत नसल्यामुळें अभिनयावर टीका करणें न्याय्य होणार नाहीं. पण पहात असतांना काय वाटलें तें सांगतों. शिशिर कुमार बहादुरींचें



शिशिरकुमार बहादुरी चाणक्याच्या भूमिकेंत

चाणक्याचें काम सर्वांत उठून दिसत होतें, हें साहाजिकच होतें. मला वाटतें, बहादुरी साठीच्या आसपास आलेले असावेत. त्यांचें शरीर किंचित् स्थूल झालें आहे; पण वर्ण केतकीसारखा पिवळट गोरा आहे. नाक तरतरीत आणि डोळेहि मोठे आहेत. पडद्यामागें चंद्रगुप्ताकडून नंद मारला गेल्याच्या आरोळ्या उठल्या, त्यावेळीं कित्येक वर्षांच्या सूडाची परिपूर्ति झाल्याच्या अत्यानंदांत कमरेला उपरणें घट्ट बांधीत बहादुरी तरातरा आंत चालत गेले तेव्हां, आणि प्रतिज्ञेसाठीं कित्येक वर्षें गांठ न मारतां तशीच ठेवलेल्या शेंडीची, नंदाच्या रक्तानें माखलेल्या हातांनीं गांठ मारीत हर्षभरानें लहान मुलासारख्या उड्या मारीत ते बाहेर आले तेव्हां, टाळ्यांचा कित्येक मिनिटें कडकडाट झाला. त्यांचा त्यावेळचा अभिनय खरोखरच अप्रतिम होता. माझी कदाचित् चूक होत असेल, पण बहादुरींच्या त्या उड्या मारण्यांत मात्र चाणक्यासारख्या कुटिलनीतिविशारद, आंतल्या गांठीच्या, धूर्त मुत्सद्याच्या भूमिकेला विसंगत असा पोरकटपणा मला दिसला. त्यांचें ओरडणें आणि ‘ ओव्हर ॲक्टिंग ’ किंवा अतिरेकी अभिनयहि फार

होतो असें मला वाटतें. भाषा समजत नव्हती, आणि त्यांचें एकच काम मी पाहिलें, तेव्हां मी करीत असलेलीं हीं विधानें फारशा किंमतीचीं नाहींत हें मात्र प्रांजलपणें सांगून टाकलेलें बरें.

नंद मारला जातो तिथेंच नाटकाचा उत्कर्षबिंदू येतो आणि नाटक खरोखर संपतें; पण आणखी दोन अंकांचें भारूड पुढें चालू राहिलें. 'भाऊबंदकी' नाटकांत ज्याप्रमाणें बारभाई रांगेनें बसले आहेत, आणि मध्यें मांडीवर बालपेशव्याला घेऊन सखारामबापू सहकार या विषयावर व्याख्यान देत आहेत असा पांच दहा मिनिटांचा नाट्यशून्य प्रवेश आहे, तसाच चंद्रगुप्ताच्या दरबाराचा शेवटचा अंक या नाटकांत आहे. नाटक साडेनऊला संपलें.

ता. २४ एप्रिल, १९४९

## रामकृष्ण परमहंस नसलेलें रामकृष्णांवरील नाटक

आज रविवार असल्यामुळें 'कालिका' थिएटरांत सध्यां गाजत असलेलें 'जुगदेवता' हें नाटक दुपारीं ३ वाजतां आहे. रामकृष्ण परमहंसांच्या जीवनावर हें नाटक आधारलेलें आहे. पण मला असें कळलें कीं बेलूरमठानें आक्षेप घेतल्यामुळें नाटकांत रामकृष्ण परमहंस हें नांव न वापरतां मुख्य भूमिकेला भगवान् सच्चिदानंद हें नांव दिलें आहे. विवेकानंद, भगिनी निवेदिता वगैरे नाटकांत येतात तेव्हां रामकृष्ण परमहंसांचें नाटक आपण पहात आहोंत ह्याबद्दल मुळींच शंका उरत नाहीं. रामकृष्णांचें काम करणाऱ्या उपेन्द्र मित्र या नटाची रंगभूषा किंवा मेक्‌अप् हुबेहुब रामकृष्णांसारखाच आहे. 'तुकाराम' चित्रपट निघाल्यावर विष्णुपंत पागनीसांना जी कीर्ति मिळाली तशीच या भूमिकेमुळें उपेन्द्र मित्रांना मिळणार असें दिसतें. तहान-भूक, अन्नवस्त्रादिकांचें भान विसरून 'आई, मला दर्शन दे! आई, मला दर्शन दे!' असा आक्रोश करीत कालिमातेच्या पायाशीं रात्रंदिवस धरणें धरून बसलेल्या रामकृष्णांचा उपेन्द्र मित्रांनीं केलेला अभिनय अंतःकरण पिळवटून टाकणारा होता. संतचरित्रावरलें नाटक असल्यामुळें नाटकांत चमत्कारांचीं दृश्यें बरींच होतीं. 'फिरती' रंगभूमि आणि कुशल प्रकाशयोजना यांच्या

सहाय्यानें हे 'चमत्कार' फारच परिणामकारक रीतीनें दाखविण्यांत आले. 'नाहीं तूं दर्शन देत, तर माझें शिर कापून तुझ्या पायावर ठेवतों!' म्हणून रामकृष्ण सुरा उचलतात, तेव्हां देवी वरच्यावर त्यांचा हात धरते आणि दर्शन देते हा देखावा, किंवा सिनेमांत एकांत एक दृश्यें 'वि र घ ळ ता त', डिझॉल्व्ह होतात, त्याप्रमाणें कालिमातेच्या मंदिरांत देवीच्या जागीं क्षणांत राम-कृष्ण, क्षणांत विवेकानंद, निवेदिता, बुद्ध, ख्रिस्त एका-मागून एक दिसतात, पुन्हां देवीची मूर्ति दिसते, हा देखावा फारच सुंदर दाखवि-ण्यांत आला. नाटक संध्या-काळीं ६ ला संपलें.


तीन पुरुष, कलकत्ता

साडेसहाला निवासांत माझें व्याख्यान होतें. व्याख्यानाला मुखवस्तु महाराष्ट्रीय स्त्रीपुरुषांची बरीच गर्दी होती.

ता. २५–२६–२७ एप्रिल, १९४९

**सुभाषबाबूंच्या घरांत ..**

मुंबईच्या प्रार्थनासमाजाशीं निकटचा संबंध असलेल्या श्रीखंडेकुटुंबापैकीं एक बंधु कलकत्त्यांत रहातात. त्यांनीं आज सकाळीं आम्हाला चहाला बोलावलें

होतें. त्यांच्याकडे चहा झाल्यानंतर जवळच एल्जिन रोडवर असलेलें सुभाषबाबूंचें घर पहावयाला गेलों. बंगल्याच्या दारावर जे. एन्. ( जानकीनाथ ) बोस म्हणजे सुभाषबाबूंच्या वडिलांच्याच नांवाची पाटी आहे. बोस घराण्याचें कलकत्त्यांतलें हेंच मूळचें घर असावें. शरच्चन्द्र इथून जवळच असलेल्या स्वतःच्या वेगळ्या बंगल्यांत रहातात. शरद्बाबूंनीं इतर भावांचे वाटे विकत घेऊन हें घर आझाद हिंद फौजेला देऊन टाकलें आहे असें कळतें. जुन्या तऱ्हेचा लांबच लांब बंगला आहे. गुलाबी रंगाचा दर्शनी भाग किल्ल्यासारखा दिसतो. आवारांत आझाद हिंद फौजेचे मोठमोठे चित्रफलक पडले होते. हें घर पहावयाला पुष्कळ लोक येतात. दुपारीं ठराविक वेळीं येणाऱ्याजाणाऱ्याकरतां तें उघडें असतें. आम्ही आज दुपारच्या गाडीनें मुंबईस जाण्याकरतां निघणार असल्यामुळें आम्हाला दुपारीं येणें शक्य नाहीं. तिथल्या माणसाला आम्ही आमची अडचण सांगितली, तेव्हां त्यानें मोठ्या आनंदानें यावेळींहि उघडून दाखविण्याचें कबूल केलें.

वरच्या मजल्यावरच्या सुभाषबाबूंच्या झोंपावयाच्या खोलींतलें सर्व सामान ते खोली सोडून गेले त्यावेळीं होतें तसें ठेवलें आहे. जुन्या तऱ्हेच्या त्यांच्या मोठ्या थोरल्या पलंगावर बिछाना, चादर जशीच्या तशी आहे. त्यावर ते नेहमीं अंगावर घेत असलेली शाल पडली आहे. ज्या व्याघ्रचर्मावर बसून ते प्रार्थना करीत तें खालीं जमिनीवर पडलें आहे. टेबलावरचें घड्याळ ते गेल्यानंतर ७–५० ला बंद पडलें त्यांत अजूनही तितकेच वाजलेले आहेत! त्यांना निरनिराळ्या वेळीं मिळालेलीं वेगवेगळ्या आकाराचीं मानपत्रें एका कपाटांत आहेत. पलंगाच्या बाजूच्या भिंतीवर सुभाषबाबूंचे वडील आणि आई यांचीं भव्य चित्रें दिसलीं. खोलीच्या एका कोपऱ्यांत त्यांच्या दोन छत्र्या उभ्या होत्या, तिथेंच दोन तीन स्लिपर्स आणि बुटांचे जोड होते. त्यांच्या ग्रंथालयाच्या खोलींतल्या कपाटांत असलेलें 'गीतारहस्य', युद्धशास्त्रावरील एकदोन पुस्तकें आणि पुण्याच्या डेक्कन एज्युकेशन सोसायटीचा इतिहास या पुस्तकांकडे आमचें विशेष लक्ष गेलें. थोडा वेळ गांवांत भटकून साडे-अकराला निवासांत परत आलों.

## पुन्हां मुंबईची माती व मुंबईचें आकाश !

दुपारीं साडेतीनच्या गाडीनें मुंबईस यावयास निघालों.

संध्याकाळीं साडेपांचला खरगपूर स्टेशन आलें. रात्रीं ९ वाजतां टाटा-नगर स्टेशनांत गाडी उभी राहिली. दूर काळोखांत मोटमोठ्या भट्ट्यांतून आगीचे ढग भसाभस बाहेर पडतांना दिसत होते. टाटांच्या पोलादाच्या कारखान्यांतल्या या भट्ट्या असाव्यात.

ता. २६ ला सकाळीं ६ वाजतां बिलासपूर व नंतर कांहीं वेळानें रायपूर स्टेशन आलें. दुपारीं १२-३० ला गोंदिया स्टेशनांत गाडी आली तेव्हां भट्टींत भाजून निघतों आहोंत असें वाटूं लागलें. ऊन नुसतें मी म्हणत होतें. दुपारीं साडेतीनला नागपूर आलें. गाडी बराच वेळ स्टेशनांत उभी राहिली. नागपुरी संत्रीं स्टेशनांत विकत घेतलीं. त्यापैकीं एक फोडलें तों आंतून वाफा आल्या !



ता. २७ ला सकाळीं पावणे-सातला कसारा स्टेशनांत गाडी आली, तेव्हां पुढें रस्त्यांत मालगाडी रूळावर पडल्याचें कळलें. दोन दिवस गाडींत काढले होते, पण हा तास सव्वातासाचा विलंब असह्य झाला. कांहीं वेळानें गाडी सुटली आणि ठरलेल्या वेळेपेक्षां दीडतास उशीरां सकाळीं १० वाजतां दादर स्टेशनांत आली. मुंबईची माती आणि मुंबईचें आकाश पाह

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ८७४२
REFBK-0008142
REFBK-0008142